13-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
ABG/ 10:00

**<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>**

**पृ.शी.** :"धनगर" समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करणेसंबंधी
**मु.शी.** :"धनगर"समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करणे यासंबंधी
श्री.प्रकाश शेंडगे,वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा
तास चर्चा.

श्री.प्रकाश शेंडगे ( विधानसभा सदस्याव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" बिहार,ओरिसा,झारखंड व हिरयाणा या राज्यांनी "ओरॉन" जमाती म्हणजेच "धनगर"जमात तसेच "धनगड" असा शब्द अंतर्भूत करण्याची शिफारस केंद्र शासनाकडे केली असणे व केंद्र शासनाने अधिनियम,2002 अन्वये केंद्रीय गॅझेटमध्ये त्यानुसार सुधारणा करुन उपरोक्त राज्यातील "धनगर" समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश केला असणे, पण गत काही वर्षापासून राज्यातील घनगर समाजाच्या विविध संघटनांनी लोकप्रतिनिधींनी याबाबत राज्य शासनाचे निवेदनाव्दारे व आंदोलनाव्दारे लक्ष वेधले असतानाही शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे समाजातील जनतेत पसरत असलेली असंतोषाची भावना,तसेच केंद्र शासनाने भटक्या व विमुक्तांसाठी तिसरी अनुसूची तयार करण्यासाठी नेमलेल्या आयोगाकडे राज्य शासनाने दिनांक 6 सप्टेंबर,2004 रोजीच्या पत्रान्वये राज्यातील धनगर या जातीचा तिस-या सूचीत समावेश करुन त्यांना अनुसूचित जामतीच्या सवलती लागू करण्यासाठी शिफारस केली असून त्यासंबंधात शासनाकडून कोणताही पाठपुरावा होत नसल्याने या प्रकरणी जाणीवपूर्वक होत असलेला विलंब याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

सभापती महोदय, ""धनगर" समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावा व त्यांना अनुसूचित जमातीच्या सर्व सवलती लागू कराव्यात यासाठी या विषयाच्या बाबतीत गेल्या चार वर्षापासून या सभागृहात लक्षवेधी सूचना वा अन्य आयुधांच्या माध्यमातून चर्चा होते आहे. परंतु आज तागायत धनगर समाजाला सरकार न्याय देऊ शकलेले नाही. या महाराष्ट्रातील धनगर

13-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

ABG/ 10:00

श्री.प्रकाश शेंडगे...

समाज उन्हातान्हात, डोंगरद-यांमध्ये आपली कच्ची बच्ची घेऊन घोडयाच्या पाठीवर पूर्ण संसार घेऊन पोटाची खळगी भरण्यासाठी अहोरात्र फिरतो आहे. या भटक्या समाजाला सरकारकडून न्याय मिळावा म्हणून मी गेली अनेक वर्षे प्रयत्न करीत आहे. या समाजाने अनेक वेळा मोर्चे, आंदोलने केली. गेल्या वर्षी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनावर धनगर समाजाने प्रचंड मोर्चा काढला होता. या राज्याचे नवनियुक्त मुख्यमंत्री माननीय श्री. अशोकराव चव्हाण हे त्या मोर्चाला सामोरे आले. त्यांनी धनगर समाजाच्या मागणीचे निवेदन स्वीकारले आणि सांगितले की, धनगर समाजाच्या या प्रश्नाच्या बाबतीत सरकार सहानुभूतीपूर्वक विचार करील. परंतु आत तागायत या प्रश्नाच्या अनुषंगाने एकही बैठक माननीय मुख्यमंत्र्यांकडून तसेच संबंधित मंत्र्यांकडून आयोजित केली गेली नाही. त्यामुळे या प्रश्नावर सरकार किती उदासिन आहे हे दिसून येते. सभापती महोदय, पेशवाईच्या काळामध्ये "ध" चा "मा" करुन पेशवाई उद्ध्वस्त झाली. परंतु त्यापेक्षा महाभयंयकर असा शब्दांचा घोटाळा झालेला आहे. या ठिकाणी "र" च्या ऐवजी "ड" करण्यात आले. आणि "ड" करुन धनगर समाजाच्या तीन पिढया उद्ध्वस्त करण्याचे काम या सरकारने केलेले आहे. यासंदर्भात मी सरकारकडे अनेक वेळा पुरावे सादर केलेले आहेत. तरी देखील सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सरकारकडे काही पुरावे सादर करीत आहे. सुरुवातीच्या काळात पंडित नेहरु यांनी धनगर समाजाचा अभ्यास करण्यासाठी कालेलकर कमिशन नेमले. त्या कालेलकर कमिशनने रिकमंडेशन केले की, "Dhangar Community" is the most backward Community in the State of Maharashtra." आणि त्यानुसार सरकारने एक परिपत्रक काढले. अनुसूचित जमातीची त्यांनी यादी काढली, त्या यादीत 36 क्रमांकावर "ओरॉन सल्पविराम धनगड " सभापती महोदय, ओरॉन शब्द जो आहे. मला वाटते की महाराष्ट्रात "ओरॉन" समाजाचे एकही कुटुंब नाही. मी ओरॉन समाजाचा आहे, मी अनुसूचित जमाती या प्रवर्गात मोडतो व त्यामुळे मला अनुसूचित जमातीला मिळणाऱ्या सवलती मिळाव्यात म्हणून अशी महाराष्ट्रात एकाही कुटुंबाने मागणी केलेली नाही. माननीय मंत्री महोदयांकडे या समाजाबाबतची काही माहिती उपलब्ध असेल तर ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी. त्यावेळी सल्पविराम देऊन "धनगड" केले. आता हा "धनगड" शब्द कसा काय आला? महाराष्ट्रात "धनगड" समाज किती आहे ? "धनगड" समाजातील किती लोकांना अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात आले ?

श्री.प्रकाश शेंडगे...

असे प्रश्न मी मागील अधिवेशनात माननीय मंत्री महोदयांना विचारले होते. त्यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावीत यांनी उत्तर दिले की, महाराष्ट्रात "धनगड" समाजाचे एकच कुटुंब आहे. सभापती महोदय, एकच कुटुंब असेल तर एका कुटुंबाचा समाज होऊ शकत नाही. एकाच कुटुंबाचा सर्व्हे करण्यासाठी कालेलकर कमिशन चंद्रपूरच्या जंगलात गेले होते काय ? या प्रश्नाला सरकार उत्तर देऊ शकले नाही. या प्रश्नाच्या बाबतीत दिल्ली येथे सुध्दा बरीच चर्चा झाली आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

माझ्याकडे पुरावे आहेत. धनगर म्हणजे धनगड कसे काय? मराठीमध्ये शब्दाच्या शेवटी 'र' हे अक्षर येत असेल तर तो 'र' हा शब्द हिंदीमध्ये 'ड़' होतो. उदाहरण द्यायचे झाले तर सन्माननीय श्री.बलराम जाखर यांनी नागपूरच्या विधानभवन इमारतीचे उद्‌घाटन केले होते, त्या उद्‌घाटन समारंभाची कोनशिला तेथे बसविलेली आहे. त्या पाटीवर लिहिले आहे की, बलराम जाखर यांच्या हस्ते या नवीन इमारतीचे उद्‌घाटन झाले आहे. दिल्ली येथे त्यांच्या नावाची जी पाटी आहे ती मी पाहिली असता त्या पाटीवर 'बलराम जाखड़' असा उल्लेख आहे. म्हणजे हिंदीमध्ये 'र' या शब्दाचा उल्लेख 'ड़' का होतो? व्यक्ती तीच आहे, बदल काहीही नाही तरी सुध्दा भाषा शास्त्रामुळे हे घडते. मराठीमध्ये जया भादुरी असा उल्लेख होत असला तरी हिंदीमध्ये भादुरी ऐवजी भादुड़ी असा उल्लेख होतो.

सभापती महोदय, केवळ शब्द ब्रम्हघोटाळा झाल्यामुळे हा समाज उद्‌ध्वस्त झाला आहे म्हणून न्याय मागण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. मंत्रीमहोदयांच्या माहितीसाठी माझ्याकडे जे पुरावे आहेत ते याठिकाणी सांगू इच्छितो. Descriptive Ethnology of Bengal, Edward Tuite Dalton यामध्ये ओरॉन म्हणजे काय हे म्हटले आहे. "The Khurukh or Oraon of Chotta Nagpur are the people best known in many parts of India as 'Dhangars'." म्हणजे ओरॉन म्हणजेच धनगर याबद्दलचा हा पुरावा माझ्याकडे उपलब्ध आहे तो मी आपल्याकडे सादर करीत आहे. "A word that from its apparent derivation (dang or Dhang, a hill) may mean any hill men, but among several tribes of the southern Tributary Mahals, the term Dhangar and Dhangarin means the youth of the two sexes both in highland and lowland villages..." हा ओरॉन म्हणजेच धनगर असल्याचा पुरावा आपल्या माध्यमातून मंत्रीमहोदयांकडे देऊ इच्छितो. Bibliography on Scheduled Castes, Scheduled Tribes and Selected Marginal Communities of India यामध्ये पृष्ठ क्रमांक 294 वर म्हटले आहे की "Dhangad, Dhangar Scheduled Caste in Bihar, Uttar Pradesh and West Bengal. Scheduled Tribe in Madhya Pradesh and Maharashtra. म्हणजे धनगर ही महाराष्ट्रातील शेड्युल्ड ट्राईब आहे. Bibliography of India आणि सेन्सस ऑफ इंडिया म्हणते

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे....

की, धनगर हे महाराष्ट्रातील शेड्युल्ड ट्राईब्स आहेत. सभापती महोदय, 1982 ची Bibliography on Scheduled Castes and Scheduled Tribes, Census of India, Occasional Paper one of 1982 हा पेपर आहे त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, "Dhangad, Dhangar, A Scheduled Caste in Bihar, Uttar Pradesh and West Bengal. A Scheduled Tribe in Madhya Pradesh and Maharashtra. म्हणजे त्यांनी सुध्दा हेच म्हटले आहे की, धनगर हे महाराष्ट्रातील शेड्युल्ड ट्राईब्स आहेत. आणखी एक महत्वाचा पुरावा माझ्याकडे उपलब्ध आहे. प्रा.कोकणे यांचे एक पत्र आहे. केंद्र सरकारने त्यांना पत्र लिहिले आहे त्यामध्ये क्लिअरकट म्हटले आहे. समाजकल्याण खात्याचे डायरेक्टर यांनी म्हटले आहे की "Dhangad" including "Dhangar" and "Oraon" are already covered in the tribal survey of the 44th Round NSS in Maharashtra State." सर्व्हे करुन त्यांनी धनगर समाजाचा एस.टी.मध्ये समावेश केलेला आहे. तो पेपर मी आपल्याकडे देत आहे. बिहार, ओरिसा आणि झारखंड या तीन राज्यांनी त्या राज्यातील ओरॉन जमातीचा धनगर म्हणून समावेश करण्याची शिफारस केंद्र शासनाकडे केली. या संदर्भात केंद्रामध्ये माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांचे युपीए सरकार सत्तारुढ असताना आम्ही दिल्लीमध्ये जाऊन त्यांच्या ही बाब निदर्शनास आणली असता त्यांनी तुमच्यावर अन्याय झाला असून तुम्हाला न्याय दिला जाईल असे सांगितले. केंद्र सरकारने तीन राज्यांबाबत शिफारस केली. ओरॉन म्हणजे धनगर आहे आणि धनगर म्हणजेच धनगड आहे अशी शिफारस केली. या संदर्भात 2003 मध्ये केंद्र सरकारने जी.आर.काढला. त्यामध्ये ओरॉन म्हणजे धनगर असे केंद्र सरकारने मान्य केले आहे. माझा सरकारला प्रश्न आहे की, ज्याप्रमाणे बिहार, ओरिसा व झारखंड या तीन राज्यामध्ये शिफारस मान्य झाली त्यानुसार आम्ही तक्रार केल्यानंतर सन्माननीय मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी एक शिष्टमंडळ या तीन राज्यांमध्ये पाठविले. त्यांनी एक पत्र देखील मला लिहिले.

सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे .....

परंतु तीन राज्यांमध्ये हे शिष्टमंडळ गेले होते त्यांनी सांगितले की, हे "धनगर" नसून "धांगड" असे लिहिले आहे. तेथे सुध्दा शासनाने शब्दच्छल केला. परंतु हे एस.सी. व एस.टी. कमिशनचे आपले म्हणणे पाठविलेले आहे. परंतु महाराष्ट्राचे पुणे येथील ट्रायबल रिसर्च इन्स्टिटट्युट जे आहे त्यांनी सांगितले की, जे पुरावे सादर केले आहेत त्यांच्या अनुषंगाने रिपोर्ट सादर करतो. सहा महिने झाले अजुनही हा रिपोर्ट सादर होत नाही. यावरुन मला अशी शंगा येते की, कोणाच्या तरी राजकीय दबावाखाली हा निर्णय होत नसावा. आपण सांगितले की, भिन्न संस्कृती वगैरे. परंतु कालेलकर कमिशनने जो निष्कर्ष काढला त्याचा विचार करणार की नाही, हा महत्वाचा प्रश्न आहे. पंढरपूर येथे भारतीय जनता पक्षाचे माननीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली एक मेळावा झाला होता. त्या मेळाव्यात माननीय अटलजींनी ढोल वाजवून सांगितले होते. त्याचबरोबर बालकृष्णन् कमिशनने सुध्दा केंद्रशासनाला तसा अहवाल 2 जुलै, 2008 रोजी सादर केला आहे. त्यात म्हटले आहे की, धनगर समाज महाराष्ट्राती भटका समाज असून अतिशय मागासलेला आहे आणि या समाजाला केंद्रसरकारचे आरक्षण मिळाले पाहिजे. अशा प्रकारची शिफारस केंद्रशासनाच्या एका वाक्याने सुध्दा केली आहे. त्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाचे म्हणणे आहे की, यामध्ये तथ्य उरलेले नाही. मध्यंतरीच्या काळात मी लक्षात आणून दिले की, सन 1979 मध्ये आपल्या सरकारने शिफारस केली होती तीच शिफारस परत घेतली. अशा प्रकारे एखाद्या समितीला दिलेली शिफारस परत घ्यावयाची असल्यास त्यासंबंधीची प्रोसिजर अशी आहे की, त्या समाजाचा विकास किती झाला, त्या समाजातील किती लोकांना नोकऱ्या दिल्या, किती लोकांची शिक्षणात प्रगती झाली आणि किती लोकांचा राजकीय सहभाग आहे हे सर्व पाहिल्यानंतरच अशी शिफारस परत घेण्याचा अधिकार आहे. पण महाराष्ट्र शासनाने दिलेली शिफारस मात्र अशा प्रकारची कुठलीही माहिती न घेता दोनच वर्षात परत घेतली. माझी मागणी अशी आहे की, दोन वर्षात या समाजाने कुठला विकास केला, शासनाने त्यांना कोणती मदत केली म्हणून ही शिफारस परत घेतली त्याचेही स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी करावे. एवढे झाल्यानंतर राज्यशासनाकडे आता काहीही उरलेले नाही. ज्या पक्षाचे आपण मंत्री व आमदार आहात त्या राष्ट्रवादी काँग्रेसने मागील निवडणुकीच्या काळात जाहिरनामा प्रसिध्द केला होता आणि आश्वासन दिले होते की, आम्ही धनगर समाजाचा एस.टी. मध्ये समावेश करण्याबाबतचा प्रश्न सोडवू. या अधिवेशनात आजच्या दिवसासारखा शुभ मुहुर्त दुसरा नसेल. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना हात जोडून विनंती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2

श्री. प्रकाश शेंडगे .....

आहे की, या गरीब समाजाच्या वतीने आपण आज ती घोषणा करुन टाकावी. आपले नेते खूष होतील, त्यांनी सुध्दा निवडणुकीमध्ये फिरत असताना धनगरांच्या वाड्या-वस्त्यांना भेट देऊन या समाजाची कशी हालत आहे हे पाहिले आहे. या समाजाला न्याय मिळवून दिला ते सुध्दा खुष होतील. म्हणून आपल्या पक्षाची, नेत्यांची व जनतेची जी इच्छा आहे ती आपण मान्य करावी, अशी मी मागणी करतो. तसेच एस.टी. चे केंद्रिय मंत्री Shri P.R. Kyndiah यांनी मला 9 जून, 2009 रोजी पत्र पाठविले त्यात त्यांनी सांगितले आहे की, " Please refer to your letter dated 18.2.2008 regarding inclusion of "Dhangar" community in the list of Scheduled Tribes of Maharashtra. In this connection, I would like to inform you that the State Government of Maharashtra in the year 1981 had withdrawn their earlier recommendation and had not recommended the inclusion of "Dhangar" community in the list of Scheduled Tribes of Maharashtra. The Government on 15.6.1999, has laid down the modalities for determining the claims for inclusion in, exclusion from and other modifications in Orders specifying Scheduled Castes and Scheduled Tribes lists. According to these modalities, only those proposals, which have been recommended and justified by the concerned State Government, the Registrar General of India and the National Commission for Scheduled Tribes are to be considered for amendment of Legislation. Accordingly, the demands for inclusion of 'Dhangar' community in S.T.List of Maharashtra received in the Ministry in the year 2003 were processed as per these modalities and referred to the State Government of Maharashtra for their comments/views. The State Government of Maharashtra has informed that the "Dhangar" is totally different from ' Oraon, Dhangad ' notified as a Scheduled Tribe in S.T. List of Maharashtra and has, therefore, not recommended the inclusion of 'Dhangar' community in the Scheduled Tribe list of Maharashtra."

अस्थारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ...

सभापती महोदय, महसूल खात्याच्या जीआरमध्ये "धनगर" समाजाच्या संदर्भात स्पष्टपणे उल्लेख आहे. स्टँप डयूडीमध्ये ज्या जातीला बेनिफिट मिळतो त्या सर्व जातीचा उल्लेख केलेला आहे. स्टँप ड्यूटीमध्ये धनगर समाजाला सवलत दिलेली आहे. एस.टी.च्या लिस्टमध्ये आपण क्लिअरकट "धनगर" नावाचा उल्लेख केलेला आहे तो सुध्दा आपण बघून घ्यावा अशी माझी माननीय उपसभापती महोदयांना विनंती आहे. या अर्धा तास चर्चेच्या संदर्भात "धनगर" समाजाच्या संदर्भातील सर्व पुरावे मी आपल्याला देण्यास तयार आहे. त्यामुळे माननीय उपसभापतींनी यासंदर्भात स्पष्टपणे निर्देश द्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी निवडणुकीत "धनगर" समाजाच्या संदर्भात जे आश्वासन दिले होते ते मंत्रीमहोदयांनी पाळावे अशी मी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करतो आणि येथेच थांबतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय मल्हार.

---------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे साहेबांनी धनगर समाजाच्या संदर्भातील ज्वलंत प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. मला वाटते की, प्रकाश शेंडगे साहेब ज्या दिवसापासून विधान परिषदेत आले तेव्हा पासून त्यांनी एकही अधिवेशन सोडले नाही की, त्यांनी हा प्रश्न सभागृहात विचारला नाही. प्रत्येक अधिवेशनामाध्ये सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय सभापतींनी त्यांच्या दालनात सन्माननीय सदस्य श्री. शेंडगे, विरोधी पक्ष नेते तसेच विविध पक्षाच्या नेत्यांना बोलावून 12.7.2005 रोजी एक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, "धनगर" समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावयाचा असेल तर त्यासाठी काही प्रोसिजर असते. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, बिहार, ओरिसा तसेच झारखंड या ठिकाणी "ओरॉन" आणि "धनगड" अशा पध्दतीचा उल्लेख केलेला आहे त्यामुळे यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी बिहार, ओरिसा तसेच झारखंड येथे एक पथक पाठविण्यात यावे. त्याप्रमाणे शासनाने पथक पाठविले व त्या पथकाने सुध्दा यासंदर्भातील काढलेले निष्कर्ष दिले. या ठिकाणी एका गोष्टीचा मला उल्लेख करावासा वाटतो की, सन 2002 मध्ये बिहार, ओरिसा तसेच छत्तीसगड राज्यांमध्ये "ओरॉन", "धनगड" या जातीच्या समावेशाच्या संदर्भात, त्यावेळी तेथील समितीने अभ्यास केला त्यामध्ये महाराष्ट्रातील "धनगर" समाजाचा देखील उल्लेख केलेला आहे. ज्यावेळेस हे बील 2002 मध्ये पार्लमेंटमध्ये आले त्यावेळेला त्यावर चर्चा करीत असतांना काही सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केला की, महाराष्ट्रातील "धनगर" समाजाचा आदिवासीमध्ये समावेश का केला जात नाही ? धनगर समाजाच्या चालीरिती काय काय आहेत या बाबत त्या ठिकाणी चर्चा झाल्यानंतर यासंदर्भात संबंधित मंत्रीमहोदयांनी "धनगड"या शब्दाचा अर्थ सांगितला की, "धनगड" याचा अर्थ जो समाज दुस-याच्या शेतामध्ये, घरामध्ये काम करतो त्यांना "धनगड" असे संबोधले जाते. तशा प्रकारच्या चालीरिती, तशा प्रकारची परिस्थिती मात्र महाराष्ट्रातील "धनगर" समाजाची नाही त्यामुळे आदिवासींमध्ये "धनगर" समाजाचा समावेश करता येत नाही. सन 2002 च्या सूचीमध्ये महाराष्ट्र राज्याच्या यादीमध्ये "ओरॉन" आणि "धनगड" या जातीचा समावेश असून "धनगर" समाजाचा समावेश केलेला नाही.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. असा प्रकार काही झालेला नाही. धनगर समाजाचा प्रश्न पार्लमेंटमध्ये यशस्वी होऊ शकला नाही असे पत्र माझ्याकडे आहे ते मी आपल्या मार्फत माननीय मंत्रीमहोदयांना देऊ इच्छितो.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय खासदार श्री. प्रदीप रावत यांनी या विषयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केल्यानंतर संबंधित मंत्र्यांनी असे उत्तर दिले की,

यानंतर श्री. गायकवाड...

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावीत.....

"The Ministry in their reply has stated that in the State of Maharashtra there are two distinct communities having similar nomenclature, one is Dhangad which is a sub-group of Oraon, a Scheduled Tribe appearing at Sr. No.36 of the List of Scheduled Tribes. The traditional occupation of this community is cultivation. There is another community known as 'Dhangar' whose traditional occupation is cattle rearing and weaving of woolens. The 'Dhangad' and the 'Dhangar' are two distinct communities having no ethnic affinity at all. The 'Dhangars' who are shepherds have been notified as Nomadic Tribe in the State of Maharashtra. Therefore, there is no printing mistake in the Scheduled Castes and Scheduled Tribes (Amendment) Act,1976, through which the Constitution (Scheduled Tribes) Order,1950 was amended."

सभापती महोदय, अशा प्रकारे माननीय केन्द्रीय मंत्र्यांनी बिलावर लोकसभेमध्ये उत्तर दिलेले होते. त्या उत्तरामध्ये त्यांनी स्पष्टपणे असे म्हटलेले होते की, या दोन्ही कम्युनिटीज वेगवेगळया असल्यामुळे त्यांचा अनुसूचित जमातीमध्ये इनक्लुजन करता येणार नाही. सभापती महोदय, या पूर्वीच मी सांगितले आहे की, या विषयाच्या संदर्भात माननीय सभापतींच्या दालनात बैठक झाली होती आणि त्या बैठकीत असे ठरविण्यात आले की, या दोन्ही जातीमध्ये भिन्नता आहे की त्या एकच आहेत याबाबत एक सर्व्हे करण्यात यावा. त्यानुसार यासबंधीचा अभ्यास करणारे ट्रायबल रिसर्च इन्स्टिटयूट असून त्यांच्या मार्फत सर्व्हे करण्यात आला होता. या इन्स्टिटयूटचे अधिकारी त्या ठिकाणी जाऊन सर्व्हे करुन आले होते. लोकसभेमध्ये माननीय मंत्री महोदयानी जे उत्तर दिले होते तशाच प्रकारे या दोन्ही जातीमध्ये फरक आहे असे त्यांनाही दिसून आले होते त्यामुळे . या दोन्ही जातीमध्ये फरक आहे असे त्यांनीही सागितले होते. त्यामुळे धनगर समाजाचे इनक्ल्युजन शेडयूल ट्राईबमध्ये झालेले नाही. सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाने दिनांक 6.5.2005 रोजी केन्द्र सरकारला एक शिफारस केली होती की या समाजाचे इनक्लुजन तिस-या सूचीमध्ये करण्यात यावे परंतु त्याबाबत त्यांनी असे कळविले की तिसरी सूचीच अस्तित्वात नसल्यामुळे तसे करता येणार नाही.

E-2

श्री.प्रकाश शेंडगे: सभापती महोदय, तिसरी सूची जर अस्तित्वात नाही तर निवडणुकीच्या तोंडावर आम्हाला तसे का सांगण्यात आले होते.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, निवडणुकीच्या तोंडावर कोणी काय सांगितले हे सुध्दा जाणून घेण्याची गरज आहे. तत्कालिन पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी महाराष्ट्रात आले असतांना एका जाहीर मेळाव्यात त्यांनी असे सागितले की, धनगर समाजाचा समावेश तिस-या सूचीमध्ये करण्यता येईल. त्यांनीच हा प्रश्न उपस्थित केला होता म्हणून महाराष्ट्रात वेगवेगळया स्तरावरुन मागणी करण्यात आली होती म्हणून महाराष्ट्र सरकारने शिफारस केली होती मात्र त्या शिफारशीच्या बाबतीत केन्द्र सरकारने राज्य सरकारला जे कळविले होते ते मी आताच आपणास सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांकडे यासंदर्भात आणखी काही पुरावे असल्यास ते त्यांनी माझ्याकडे द्यावे ते मी तपासून घेईन परंतु आतापर्यतच्या अभ्यासावरुन आणि केन्द्र सरकारने महाराष्ट्र सरकारला जे कळविले आहे त्यानुसार धनगर समाजाचे इनक्लुजन अनुसूचित जमातीमध्ये करता येणार नाही.

श्री.प्रकाश शेंडगे : सरकारच्या निषेधार्ह मी सभात्याग करतो.

(सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडील पुराव्याचे कागदपत्रे माननीय मंत्री महोदयांकडे भिरकावले, विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांनी घोषणा देत सभात्याग केला )

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, वारंवार हा प्रश्न विचारुन जाती - जातीमध्ये तणाव निर्माण करण्याचा धंदा सन्माननीय सदस्य श्री प्रकाश शेंडगे यांनी बंद करावा.जे होत नाही त्याबाबतीत खोटे नाटे काही तरी सांगून सरकारवर दबाव आणून जातीचे राजकारण करणा-यांना कोणतेही महत्व दिले जात नाही हे लोकांनी सातत्याने दाखवून दिलेले आहे. त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर विष पेरण्याचे काम विरोधकांनी बंद करावे असे मी या निमित्ताने सांगतो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : कोकण प्रदेश दुय्यम सेवा मंडळाने शिल्पनिदेशक (गिरणीकार

व विद्युत ) यांची दुय्यम पदावर नेमणूक करणे

मु.शी : कोकण प्रदेश दुय्यम सेवा मंडळाने शिल्पनिदेशक (गिरणीकार व विद्युत ) यांची दुय्यम पदावर नेमणूक करण्यासंबंधी श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे .

" कोकण प्रदेश दुय्यम सेवा मंडळाने शिल्पनिदेशक ( गिरणीकार व विद्युत ) या पदासाठी निवड प्रक्रिया पूर्ण करुन गुणवत्तेनुसार उमेदवारांना प्रादेशिक सेवा मंडळाने निवड झाल्याचे कळवून कागदपत्रासह उपस्थित राहण्याचे आदेश देणे, प्रत्यक्ष नेमणूक आदेश देतांना सदर पदावर नियुक्ती आदेश न देता गिरणीकार व्यवस्थापन या दुय्यम पदावर नेमणूक केल्याचा आदेश देणे, सदर पदाची वेतनश्रेणी रु.1400-2600 असणे परंतु प्रत्यक्ष नेमणूूक देतांना सदर वेतनश्रेणी रु.1400-2300 असणे ज्या पदावर नेमणूक आदेश देण्यात आला त्या पदासाठी निवड प्रक्रिया न होणे वारंवार मागणी करुनही सदर आदेशात दुरुस्ती न करणे सबब, अंन्याय झालेल्या
कर्मचा-यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

सभापती महोदय, 1993-1995 या कालावधीत संबंधित तंत्र शिक्षण विभागातील काही पदे भरण्यासाठी संबंधित विभागाने मागणी केल्यानंतर कोकण प्रदेश दुय्यम सेवा मंडळामार्फत ही पदे भरण्यासाठी 1993 साली जाहिरात देण्यात आली होती. त्या जाहिरातीनुसार या पदासाठी जे पात्र धारक उमेदवार होते त्या सगळयांनी अर्ज केले होते. त्या संदर्भात पात्रताधारक उमेदवारांची मुलाखत कोकण प्रदेश दुय्यम सेवा मंडळामार्फत घेण्यात आली होती . या विशिष्ट पदासाठी आवश्यक असलेल्या पात्रताधारक उमेदवारांच्या मुलाखतीच्या वेळी त्यांच्या परफारमन्सची नोंद घेऊन त्या उमेदवारांची निवड करण्यात आली होती. तंत्रशिक्षण विभागातील शिल्पनिदेशक (गिरणीकार व विद्युत ) या पदासाठी कोकण निवड मंडळाने जाहिरात दिली होती.

श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.गायकवाड . . . . 10:25

श्री.रामनाथ मोते. .. . .

तंत्रशिक्षण विभागाच्या मागणीनुसार या पदासाठी आवश्यक असलेल्या पात्रताधारक उमेदवारांची मुलाखत झाल्यानंतर त्यांची निवड झाली. यानंतर त्यांची शिल्पनिदेशक या टिचिंगच्या पदासाठी निवड झाल्यानंतर तंत्रशिक्षण विभागाने त्यांना असे आदेश दिले की, संबंधितांनी तातडीने या कार्यालयाशी संपर्क साधावा आणि आपले नेमणुकीच्या संदर्भातील आदेश घ्यावेत असे निदेश देण्यात आले. संबंधित उमेदवारांनी तंत्रशिक्षण विभागाशी संपर्क साधल्यानंतर त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करुन त्यांना नेमणुकीचे आदेश देण्यात आले. परंतु नेमणूक आदेश देताना मात्र "शिल्पनिदेशक" या पदाऐवजी "गिरणीकार व्यवस्थापन" या पदासाठी या सर्व उमेदवारांना नेमणूक देण्यात आली. सभापती महोदय, गिरणीकार व्यवस्थापन हे नॉन-टिचिंगचे पद आहे. प्रत्यक्षामध्ये टिचिंगच्या पदासाठी, शिल्पनिदेशक या पदासाठी जाहिरात देण्यात आली होती आणि उमेदवारांची निवड देखील शिल्पनिदेशक या पदासाठी झाली. त्यानंतर तंत्रशिक्षण विभागाने उमेदवारांना नेमणूक आदेश वेगळया पदासाठी दिले की ज्या पदासाठी जाहिरात देण्यात आली नव्हती. ज्या पदासाठी मुलाखत झाली नाही, उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज केलेले नाहीत, त्या पदावर त्यांची चुकीच्या पध्दतीने नेमणूक करण्यात आली. या उमेदवारांना नोकरीची गरज असल्यामुळे त्यांनी अपॉईंटमेंट ऑर्डर स्विकारली आणि त्यानंतर संबंधित उमेदवारांनी शासनाकडे वेळोवेळी निवेदने दिलेली आहेत. या उमेदवारांच्या 1995 मध्ये नेमणूक झालेली आहे. त्यानंतर 1997-98 पासून हे उमेदवार सतत याबाबतीत प्रयत्न करीत आहेत. या लोकांच्या यासंबंधात अनेक तक्रारी आहेत, पण अद्यापही शासनाने, संबंधित विभागाने कोणत्याही प्रकारची दखल घेतलेली नाही. यामध्ये सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, या उमेदवारांची ज्या पदासाठी निवड करण्यात आली, त्याची वेतनश्रेणी त्यावेळी 1400-2600 अशी होती. त्यांना प्रत्यक्षात ज्या पदासाठी नेमणूक आदेश देण्यात आला, त्याची वेतनश्रेणी मात्र 1400-2300 आहे, ज्याची पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीमध्ये फरक आहे. शिल्पनिदेशकाची वेतनश्रेणी 5800 इतकी आहे आणि गिरणीकार व्यवस्थापकाची वेतनश्रेणी 4500-7000 अशी आहे. म्हणजे वेतनश्रेणीमध्ये फरक, कामामध्येही फरक आणि मुख्य म्हणजे या उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्जच केला नव्हता, मुलाखतच दिली नव्हती त्या पदासाठी शासनाने या उमेदवारांची चुकीच्या पध्दतीने निवड केलेली आहे. आमचा माननीय मंत्री महोदय श्री.राजेश टोपेसाहेबांवर खूप विश्वास आहे. त्यांनी या विधीमंडळामध्ये आमचे अनेक प्रश्न मार्गी लावलेले ...

. . . .एफ-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . ..

आहेत. आपल्याकडे आता नवीन पोर्टफोलिओ आलेला आहे. आम्हाला आपली एफीशिअन्सी माहिती आहे. त्यामुळे गेली अनेक वर्षे या विभागामध्ये हा प्रश्न प्रलंबित आहे. मला सांगावयास वाईट वाटते की, मी यासंदर्भात विभागाकडे एक वर्षापूर्वी पत्र दिलेले आहे. पण अद्यापही मला या पत्राचे उत्तर देखील देण्यात आलेले नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांवर झालेला अन्याय कसा दूर करण्यात येणार आहे, हे मला समजलेले नाही. म्हणजे मला जर एकेक वर्ष पत्राचे उत्तर मिळत नसेल तर 9-9,10-10 वर्षे या तक्रारदार उमेदवारांना सुध्दा उत्तर देण्यात आलेले नाही. म्हणून माझी विनंती आहे की, यामध्ये त्या उमेदवारांची चूक नाही. ही शासनाने केलेली चूक आहे असे मी म्हणत नाही. पण या उमेदवारांवर जाणीवपूर्वक अन्याय केलेला आहे. या उमेदवारांच्या चुकीच्या पध्दतीने नेमणुका केलेल्या आहेत. म्हणून या नेमणुका दुरुस्त करण्याची गरज आहे. त्यामुळे उमेदवारांनी ज्या पदासाठी अर्ज केला होता, त्या पदासाठी त्यांची नेमणूक केली होती. त्याच पदासाठी त्यांना नेमणूक मिळणे आवश्यक आहे. आता हा प्रश्न कसा सोडवावयाचा याबद्दल शासनाने विचार करावा पण आपण या कर्मचाऱ्यांना, शिक्षकांना न्याय द्यावा अशी माझी य अर्ध्या तासाच्या चर्चेच्या निमित्ताने आपल्याला विनंती आहे.

-----

. . . .एफ-3

श्री.राजेश टोपे (तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने एक फार जुना म्हणजे 1993 मधील, 17 वर्षापूर्वीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांनी जी माहिती दिली, ती खरी आहे. त्यावेळी जी जाहिरात देण्यात आली होती, तीच मुळामध्ये चुकलेली आहे. जे पदच अस्तित्वात नाही, शिल्पनिदेशक म्हणजे इन्स्ट्रक्टर, ही टिचिंग पोस्ट आहे. शिल्पनिदेशक (गिरणीकार व विद्युत) हे पद अस्तित्वात नसतानाही यासाठी जाहिरात देण्यात आली. खरे म्हटले तर शिल्पनिदेशक हे पद गिरणीकारसाठी नाही. त्यासाठी डिप्लामा मेकॅनिकल अशा प्रकारचे क्वॉलिफीकेशन लागते.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/ प्रथम सौ.रणदिवे.... 10:30

श्री. राजेश टोपे...

आणि डिप्लोमा इलेक्ट्रिकल हे क्वालिफिकेशन जाहिरातीमध्ये दाखविण्यात आले होते. मी हे मान्य करतो की, शिल्पनिदेशक, गिरणीकार व विद्युत हे पद खरे म्हटले तर अस्तित्वात नसताना त्यावेळच्या तत्कालीन अधिकाऱ्याने चुका केल्या आणि अशा पध्दतीची जाहीरात दिली. त्यासाठी क्वालिफिकेशन डिप्लोमा इलेक्ट्रिकल देण्यात आले. जाहिरातीप्रमाणे मुलाखती घेण्यात आल्या. मुलाखती घेतल्यानंतर मात्र ज्या आर्डर्स देण्यात आल्या त्या मेन्टेनन्सच्या देण्यात आल्या, त्या टिचिंग पोस्टच्या न देता नॉन टिचिंग पोस्टच्या देण्यात आलेल्या आहेत. ही वस्तुस्थिती जरी खरी असली तरी यामागचे फक्त दोन मुद्दे मी या ठिकाणी सांगू इच्छितो. 1994 ला त्याठिकाणी त्यांना नेमणुका देण्यात आल्या. त्यावेळी पे-स्केलमध्ये फार विशेष फरक नव्हता. 1400 ते 2600 हा पे-स्केल टिचिंगसाठी होता आणि 1400 ते 2300 हा पे-स्केल नॉन टिचिंगसाठी होता. कदाचित त्यावेळचा पे-स्केल साधारण सारखा असल्या कारणाने त्याने ते ॲक्सेप्ट केले आणि त्यांनी हमीपत्र सुध्दा लिहून दिले की,आम्हाला हे मान्य आहे. तसेच हमीपत्रामध्ये त्यांनी स्पष्ट लिहून दिले की, कोणताही आक्षेप न घेता नियुक्ती स्वीकारलेली आहे. अशा पध्दतीने त्या ठिकाणी लिहून दिल्यानंतर आणि हमीपत्र सुध्दा लिहून दिल्यानंतर हा सगळा प्रश्न थांबला होता. परंतु 1995 च्या हमीपत्रानंतर 1999 मध्ये ज्यावेळी पाचवा वेतन आयोग लागू झाला आणि या पाचव्या वेतन आयोगामध्ये प्रामुख्याने मोठी तफावत आली. ज्यामध्ये गिरणीकार व्यवस्थापन पदासाठी 4500 ते 7000 आणि शिल्पनिदेशक पदासाठी 5500 ते 9000 अशा पध्दतीने पाचव्या वेतन आयोगामध्ये मोठा फरक निर्माण झाला. त्याअनुषंगाने यापैकी श्री. शेलार यांनी निवेदन केले की, आमच्यावर अन्याय झालेला आहे आणि आम्हाला इन्स्ट्रक्टर या पदावर सामावून घेण्यात यावे. सभापती महोदय, मी ही पार्श्वभूमी या ठिकाणी मुद्दाम सांगितली आहे. परंतु एक वस्तुस्थिती अशी आहे की, शासनाच्या त्या संबंधित अधिकाऱ्याकडून निश्चितप्रकारे चूक झालेली आहे. या संबंधित ट्रेडमध्ये अशा पध्दतीचे पदच अस्तित्वात नाही. दुसऱ्या ट्रेडमध्ये जाऊन या पध्दतीच्या पदासाठी ज्या काही नेमणुका चुकीच्या झ ाल्या होत्या त्यांना दुरुस्त करता येणे शक्य आहे. म्हणून कदाचित दुसऱ्या ट्रेडमध्ये, ज्याला आपण इलेक्ट्रिशिअन म्हणा किंवा वायरमन म्हणा या ट्रेडमध्ये जी काही पदे रिक्त असतील किंवा रिक्त होतील त्यावेळी यांना एक सहानुभूतीपूर्वक या संबंधित लोकांचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

श्री. राजेश टोपे...

विचार निश्चितप्रकारे करता येऊ शकेल. फक्त ज्यांच्या चुकीच्या जाहिरातीमुळे सिलेक्शन चुकीच्या पध्दतीने झाले होते, तेवढयापुरतेच मर्यादित मला या ठिकाणी बोलावयाचे आहे. कारण मेन्टेनन्सचे जे लोक आहेत त्यांचे क्वालिफिकेशन आणि टिचिंगचे क्वालिफिकेशन सारखेच असल्यामुळे मेन्टेनन्सचे लोक इनजनरल सातत्याने आग्रह करीत आहेत की,क्वालिफिकेशन सारखे असल्यामुळे आम्हाला वरची श्रेणी देण्यात यावी. सभापती महोदय, या सर्वांसाठी उत्तर देऊ शकत नाही परंतु जे लोक चुकीच्या जाहिरातीमुळे सिलेक्ट झाले तेवढयापुरता शासनाचा सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोन निश्चित प्रकारे राहील. सभागृहाची ही भावना लक्षात घेऊन आणि सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी जे विचार व्यक्त केलेले आहेत, निश्चित प्रकारे काही प्रमाणात शासनाच्या चूका झालेल्या आहेत. खरे तर हमीपत्र लिहून दिल्यानंतर विषय उरत नाही, रहात नाही. अशा पध्दतीने मागणी करण्याचा सुध्दा प्रश्न येत नाही. परंतु तरी सुध्दा जी काही चूक निदर्शनास आणून दिलेली आहे, ती चूक खरी मानून येणाऱ्या काळात जी काही रिक्त पदे होतील त्या पदांच्या माध्यमातून अशा अन्याय झालेल्या लोकांना जे एक-दोन लोक राहिलेले आहेत त्यांना निश्चितप्रकारे यामध्ये सामावून घेता येईल, अशा पध्दतीच्या सूचना मी संबंधित विभागाला देईन आणि सगळयात महत्वाचा मुद्दा असा की, ज्यांनी ही चूक केली त्या अधिकाऱ्यांच्या संदर्भात खरे म्हणजे चौकशी होणे आवश्यक आहे, त्यांच्यावर कारवई होणेही आवश्यक आहे. त्याबाबत सुध्दा जे लोक यामध्ये दोषी असतील त्यांचीही निश्चितप्रकारे चौकशी करुन त्यांच्यावर सुध्दा कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, ज्या वेळेला कोकण निवड मंडळाकडून मुलाखती झाल्या आणि उमेदवारांची निवड झाली. त्यावेळेला ही पदे अस्तित्वात होती. विभागाने मागणी केली म्हणूनच कोकण निवड मंडळाने जाहिरात दिली. आपल्या विभागाने जाहिरात दिलेली नाही. आपल्या विभागाने मागणी केली म्हणून कोकण निवड मंडळाने जाहिरात दिली. त्यावेळी शिल्पनिदेशक पद अस्तित्वात होते. म्हणूनच त्या पदाची जाहिरात देऊन नेमणुका करण्यात आल्या. केवळ अधिकाऱ्यांनी दिलेल्या चुकीच्या माहितीमुळे मंत्रिमहोदयांनी तसे विधान केलेले आहे. परंतु माननीय मंत्रिमहोदंयांनी सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन दिलेले आहे आणि त्यावर माझा विश्वास आहे. या ठिकाणी कमी वेळामध्ये जास्त चर्चा करणे शक्य नाही त्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी केव्हा तरी सवडीनुसार आपल्या दालनामध्ये बोलवून एक बैठक घेतली तर यातून कसा मार्ग काढता येईल याबाबत निश्चित स्वरुपात आपण चर्चा करुन प्रश्न मार्गी लावू शकतो. माननीय मंत्रिमहोदय त्याबाबत विचार करतील काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अशी बैठक घेऊन निश्चितपणे जे काही प्रश्न असतील ते सोडवू.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सन 2004 पासून खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देणे बंद करण्यात आल्याबाबत

**मु. शी.** : सन 2004 पासून खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देणे बंद करण्यात आल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 46077 ला दिनांक 17 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, "सन 2004 पासून खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देणे बंद करण्यात आल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 46077 ला दिनांक 17 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याच्या संदर्भात मी ही अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. या राज्यामध्ये 90 टक्के शाळा ग्रामीण भागामध्ये चालतात. या शाळांमध्ये शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी वेतनेतर अनुदान दिले जाते. साधारणत: शाळांना प्रयोगशाळेचे साहित्य घेता यावे, खडू-फळा इत्यादी साहित्य घेता यावे, ग्रंथालयासाठी पुस्तके घेता यावीत यासाठी वेतनेतर अनुदान दिले जाते. तेथील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वर्षाचे जे एकूण वेतन आहे त्या वेतनावर 12 टक्के एवढे वेतनेतर अनुदान आतापर्यंत दिले जात होते. परंतु महाराष्ट्र शासनाने अचानकपणे मार्च, 2004 पासून या सर्व शाळांचे वेतनेतर अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतला. 2004 पासून आतापर्यंत कोणत्याही प्रकारचे वेतनेतर अनुदान शासनाने दिलेले नाही. हे वेतनेतर अनुदान द्यावे यासाठी या सभागृहामध्ये जवळपास चार अधिवेशनात या प्रश्नाविषयी चर्चा झालेली आहे. परंतु त्या चर्चेला आता माननीय मंत्रिमहोदय जे उत्तर देणार आहेत तेच उत्तर दिले गेले होते. मंत्रिमंडळ

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विक्रम काळे ....

समितीसमोर आम्ही जात आहोत, प्रस्ताव देणार आहोत असे उत्तर देण्यात आले. 17 डिसेंबर, 2008 ला नागपूरच्या अधिवेशनामध्ये या प्रश्नाची चर्चा झाली होती. त्यावेळी सुध्दा माननीय मंत्रिमहोदयांनी हेच उत्तर दिले होते की, मंत्रिमंडळासमोर जात आहोत आणि निर्णय घेणार आहोत. 22 जानेवारी, 2008 ला मंत्रिमंडळाने एक उपसमिती गठीत केली होती. त्या उपसमितीमध्ये डॉ. पतंगराव कदम, श्री. दिलीप वळसे-पाटील असे वजनदार मंत्री होते. अशा सर्व मंत्रिमहोदयांनी विचारविनिमय केला आणि त्या उपसमितीने 12 टक्के वेतनेतर अनुदान देण्याऐवजी आता 5 टक्के वेतनेतर अनुदान द्यावे अशी शिफारस सुध्दा मंत्रिमंडळाकडे केलेली आहे. मंत्रिमंडळाकडे प्रस्ताव सादर होऊन एक वर्ष झाले परंतु या एक वर्षामध्ये हे मंत्रिमंडळ निर्णय घेऊ शकलेले नाही. या चर्चेच्या निमित्ताने माझे दोन प्रश्न आहेत. हा महिना संपण्याच्या आत मंत्रिमंडळासमोर एक वर्षापासून सादर केला जो काही प्रस्ताव आहे, आपल्या मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्रिमहोदयांनी विचारविनिमय करुन 5 टक्के वेतनेतर अनुदानाचे जे सूत्र स्वीकारलेले आहे त्या सूत्रानुसार सन 2009-10 पासून या शाळांना वेतनेतर अनुदान सुरु करणार काय ? तसेच 2004 ते 2009 पर्यंतची थकबाकी देणार काय ? असे महत्वाचे प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित करीत आहे. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो.

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली भावना बरोबर आहे की, वेतनेतर अनुदानाचा प्रस्ताव बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहे. मंत्रिमंडळ उपसमितीने आता मान्यता दिल्यानंतर ती बाब राज्याच्या मंत्रिमंडळापुढे मान्यतेसाठी आहे. यासाठी संघटनेचे अध्यक्ष श्री. शेखावत साहेब यांनी शिष्टमंडळासह माझ्या समवेत माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट घेतली. 2004 पासूनची 522 कोटी रुपयांची थकबाकी आहे. सन 2008-09 पासून सरकारकडून जे देय आहे त्यामध्ये 225 कोटी रुपये माध्यमिकच्या बाबतीत आहेत आणि उच्च व तंत्रशिक्षणाच्या अंतर्गत येणा-या महाविद्यालयांच्या बाबतीत 72 कोटी रुपये आहेत. ही गोष्ट खरी आहे की, वेतनेतर अनुदान आपण देऊ शकलो नाही त्यामुळे ग्रामीण भागामध्ये विशेषकरुन शाळांच्या मेन्टेनन्सची तसेच महाविद्यालयांच्या मेन्टेनन्सची परिस्थिती गंभीर झालेली आहे. मंत्रिमंडळापुढे हा प्रस्ताव मंजुरीसाठी आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

म्हणून सन्माननीय सदस्यांनी एक महिन्याच्या आत त्याला मंजुरी देण्याची भावना व्यक्त केली आहे. पण राज्याच्या आर्थिक परिस्थितीनुरुप विचार करुन निर्णय घ्यावा लागतो. मध्यंतरीच्या काळामध्ये शासनाने शेतक-यांना कर्जमाफी दिली असे अनेक निर्णय घ्यावे लागले. जो सरकारच्या मूळ योजनेचा भाग नव्हता. अशाप्रकारच्या सर्व बाबींवर विचार करताना पैशाची अडचण येते. त्यांना मदत करण्याची सरकारची भूमिका आहे. परंतु प्राथमिकता बदलत चालल्या आहेत. ते पाहून सरकारला निर्णय घ्यावे लागतात. सरकार दायित्वापासून मागे गेलेले नाही. एक महिन्याच्या आत निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी तसे सूतोवाचही केलेली आहे. या मूळ प्रस्तापासून शासन मागे चालले आहे असा गैरसमज करण्याचे कारण नाही. त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी असा मुद्दा मांडलेला नाही. या देशाच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचे पती डॉ.देविसिंह शेखावत हे राज्यातील या संस्था चालक मंडळाचे अध्यक्ष आहेत. ते स्वत: आपल्या मंत्रालयामध्ये आले होते. सन्माननीय डॉ.शेखावत, सन्माननीय शिक्षण मंत्री यांच्या समवेत सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 7.7.2008 रोजी बैठक घेतली होती. या देशाच्या राष्ट्रपतींचे पती या राज्याच्या या महामंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांचे काहीतरी वजन पडेल, आमचे तर पडले नाही. ही बैठक होऊन एक वर्ष झाले आहे. त्यांनाही दिलेल्या आश्वासनाची पूर्ती या राज्यामध्ये होत नसेल तर ते योग्य होणार नाही. मंत्रिमहोदय, आपण ग्रामीण भागात एक नामवंत शिक्षण चालवित आहात. मोठया प्रमाणावर खेडे गावांमध्ये आपल्या शाळा आहेत. त्यामुळे या प्रश्नाची आपल्याला तीव्रतेने जाणीव आहे. हा महिना संपण्याच्या आत निर्णय घ्यावा. मागील बाकीबाबत काय निर्णय घ्यावयाचा असेल तो घ्यावा. पण चालू शैक्षणिक वर्षापासून 5 टक्के वेतनेतर अनुदान देण्याचा ठोस निर्णय घ्यावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. ती अपेक्षा शासन पूर्ण करणार काय ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्याच्या सन्माननीय शिक्षण मंत्र्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी आश्वासन दिले आहे. मध्यंतरी वेतनेतर अनुदान मिळणार नाही अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे 2003-2004 पासून अनेक शाळांनी आपले लेखे सादर केलेले नाहीत. अनुदान निर्धारण झालेले नाही. एक वर्ष उशिरा सादर केल्यामुळे अनुदान लॅप्स होते असा शासनाचा निर्णय आहे. शासनाने यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. ज्यांनी फाईल सादर केलेली नाही त्याची सुध्दा दखल घेतली जाणार आहे काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : तपासून घेण्यात येईल.

----

**अर्धा तास चर्चेच्या सूचना क्रमांक 4 व 7 पुढे ढकलण्याबाबत**

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवरील क्रमांक 4 व 7 वर दाखविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अशासकीय शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधाबाबत

**मु. शी.** :अशासकीय शाळांमधील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आककृतिबंधाबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 46242 ला दिनांक 17 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, "अशासकीय शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आकृतिबंधाबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 46242 ला दिनांक 17 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, राज्यातील अशासकीय माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचा-यांचा प्रश्न मी उपस्थित केलेला आहे. या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री कै.वसंतदादा पाटील यांनी घेतलेल्या निर्णयामुळेच या राज्यात खाजगी माध्यमिक शाळा सुरु झाल्या. एका उदात्त हेतूने त्यांनी तो निर्णय घेतला होता. ग्रामीण भागातील विद्यार्थी पुढे यावेत, त्यांना चांगल्या नोक-या मिळाव्यात या भावनेतून या शाळा सुरु झाल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 10:45

(श्री. विक्रम काळे....)

ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी तुम्ही आम्ही ग्रामीण भागामध्ये शाळा सुरु केल्या आणि काबाडकष्ट कणा-या शेतक-यांची मुले या शाळांतून शिक्षण घेऊन कोणी लिपिक झाले, कोणी शिक्षक झाले तर कोणी सेवक म्हणून कामाला लागले. सन 2000-2001मध्ये या राज्याची आर्थिक परिस्थिती खालावली, आर्थिक परिस्थिती बिघडली म्हणून सर्व विभागामध्ये आकृतिबंध आणण्याचे शासनाने निश्चित केले आणि सर्व विभागांचा आढावा घेऊन कर्मचा-यांची कपात करण्याचा निर्णय घेतला. सभापती महोदय आपण या सगळया कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीचा विचार केला तर शिपाई पदाची वेतनश्रेणी ही अगदी कमी वेतनश्रेणी आहे. जर शासनाकडे पैसे नव्हते, शासनाला आर्थिक टंचाई भेडसावत होती तर मग उच्च वेतनश्रेणीमध्ये जे अधिकारी काम करतात त्यांच्या बाबतीत देखील आकृतिबंध लागू करावयास पाहिजे होता. त्यांच्या देखील संख्येमध्ये आणि वेतनश्रेणीमध्ये कपात करायला पाहिजे होती. मग जिल्हाधिकारी असतील, उपजिल्हाधिकारी असतील, ही जितकी पदे आहेत त्या पदांची गरज आहे काय असा विचार त्यावेळी सरकारने का केला नाही ? एवढी पदे जर शासनाने कंत्राटी पध्दतीवर भरली असती तर शासनाचे किती तरी पैसे वाचले असते. परंतु अगदी कमी वेतनावर जे सेवक म्हणून, शिपाई म्हणून, लिपिक म्हणून काम करतात यांच्यावर शासनाने कुऱ्हाड चालविण्याचे, त्यांच्यावर घाला घालण्याचे काम केलेले आहे. शेवटी विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात शिक्षकेतर पदांच्या संख्येच्या बाबतीत शासनाने धोरण ठरविलेले आहे. उदा. 500 विद्यार्थी संख्या असतील तर इतके शिपाई, हजार विद्यार्थी संख्या असेल तर इतके शिपाई, या प्रमाणे शिक्षकेतर पदांची संख्या शासनाने निश्चित केलेली आहे. ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ श्री. व्ही.व्ही.चिपळूणकर यांनी शाळांमधून किती शिक्षकांची आणि शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे असावीत याबाबतीत शिफारशी केलेल्या असून त्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आणि त्यानुसार शासनाने शिक्षकेतर पदांना मंजुरी दिली. असे असताना आकृतिबंधाच्या गोंडस नावाखाली शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे का कमी करण्यात येत आहेत ? मग शासनाने जी व्ही.व्ही.चिपळूणकर समिती नेमली होती ती चुकीची होती काय ? सभापती महोदय, शिक्षकेतर कर्मचा-यांचा आकृतिबंध मागे घ्यावा यासाठी मंत्रिमंडळाच्या औरंगाबाद येथील बैठकीच्या वेळी शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने मोर्चा नेला होता. या आकृतिबंधाबाबत मार्च 2008च्या अधिवेशनामध्ये तसेच डिसेंबर 2008 मधील

..2..

(श्री. विक्रम काळे....)

हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी, हा आकृतीबंध महाराष्ट्र शासन मागे घेत असून, आवश्यकते प्रमाणे शाळांना ही पदे भरण्याची परवानगी देऊ असे आश्वासन दिले होते. हे आश्वासन देऊन एक वर्षाचा कालावधी उलटला. वेतनेतर अनुदानासाठी 500 कोटी रु.,200 कोटी रुपये लागतील असे जर शासन म्हणत असेल तर शिक्षकेतर कर्मचा-यांचा प्रश्न हा कोणत्याही आर्थिक बाबीशी निगडित नाही. शिक्षण संस्थाचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शेखावत साहेब यांनी सुध्दा दिनांक 8.8.2007 रोजी तत्कालीन मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक घेतली होती आणि त्या बैठकीत स्वत: तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आणि शिक्षण मंत्र्यानी या प्रश्नी ठोस निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. याबाबतीत मी मागील एक वर्षापासून सातत्याने पाठपुरावा करीत आहे. जानेवारी 2009मध्ये मी वित्त मंत्र्यांबरोबर बैठक घेतली. त्यांनी सांगितले की, एक महिनयाच्या आत हा प्रस्ताव निकाली काढू. परंतु अजूनपर्यन्त त्याबाबतीत कार्यवाही झाली नाही. माझा माननीय शिक्षणमंत्र्यांना असा प्रश्न आहे की. आपण या महिन्याअखेरपर्यन्त या शिक्षकेतर कर्मचा-यांचा आकृतिबंध मागे घेण्या संबंधीचा जी.आर. काढणार आहात काय ? तसेच एस.एस.कोड प्रमाणे पदे भरण्यास परवानगी देणार काय ?

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 10:45

डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील (शालेय शिक्षण मंत्री) : सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी चिपळूणकर समिती, कोकणे समिती अशा समित्यांचा उल्लेख केला.

....नंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील......

स्वाभाविकपणे नंतरच्या काळामध्ये संस्थाचालक संघटनेनेही शासनाकडे निवेदन दिले आहे. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी सूचना केली होती त्यानुसार अर्थ विभागाला माहिती पाठविलेली आहे. राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती गठीत करण्यात आली असून या उपसमितीची मान्यता घेऊन त्यापुढील कार्यवाही होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांची भावना बरोबर आहे आणि शासनाची देखील तीच भूमिका आहे. शासन स्तरावर वेगवेगळया विषयासंदर्भात व वेगवेगळया विभागांच्या माध्यमातून मांडण्यात येणा-या भूमिकांचा उच्चस्तरीय उपसमितीमध्ये विचार होईल व लवकरात लवकर कार्यवाही करण्याबाबत शासनाच्या वतीने पाठपुरावा करण्यात येईल.

सभापती महोदय, या विषयासंदर्भात आणखी एक महत्वाचा मुद्दा आहे. संस्था चालकांच्या माध्यमातून ब-याच ठिकाणी कर्मचारी भरती बाबतची मागणी पुढे येते. आकृतीबंधात दोन ऐवजी चार पदे ठेवावीत, अशा प्रकारची मागणी पुढे येते. यासदंर्भात देखील पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. या पदांची आवश्यकता खरोखरच आहे का ? केवळ प्रस्ताव येतात, क्षेत्रीय अधिकारी योग्य पध्दतीने प्रस्ताव तपासत नाहीत आणि या पार्श्वभूमीवर विनाकारण भरती करण्याचा प्रयत्न होतो. माझी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना विनंती आहे की, त्यांनी कर्मचा-यांचे तुष्टीकरण करु नये. हे दोन भिन्न विषय आहेत. आकृतीबंधासंबंधीचा विषय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय उपसमितीपुढे आहे व याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेऊन पुढे जाईल. त्याचप्रमाणे अशाही सूचना दिल्या आहेत की, नवीन नियमावली तयार करुन पुढच्या दोन-तीन महिन्यात त्या त्या विभागात जाऊन शिबिरे घ्यावित व जी विद्यार्थी पटसंख्या दाखविण्यात येत आहे, ती बरोबर आहे का, यासंबंधीची तपासणी करावी. कारण, यासंबंधी ब-याच तक्रारी शासनाकडे प्राप्त होत आहेत. त्यामुळे यासंदर्भात देखील आपल्याला सर्वंकष विचार करावा लागेल. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी जो मूळ विषय उपस्थित केला आहे त्यापासून सरकार बाजूला गेलेले नाही. उच्चस्तरीय समितीपुढे विचार होऊन त्यासंदर्भातील आदेश काढले जातील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यात शिक्षकेतर कर्मचा-यांची गरज आहे का, यासंदर्भात देखील उपसमिती नेमण्याचा विचार मंत्री महोदयांनी केला पाहिजे. सद्य:स्थितीत 300





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील........

विद्यार्थीसंख्येमागे 1 लिपिक, 5 तुकडयांमागे 3 शिपाई एवढा कर्मचारीवृंद असतांना शाळेत कोणी साधा झाडुही मारत नाही. सांगण्याचा उद्देश हा आहे की, एवढया कर्मचा-यांची आवश्यकता खरोखरच आहे का ? माझे तर म्हणणे हे राहील की, 2000 विद्यार्थी संख्येमागे 1 लिपिक देण्यात यावा. कारण, आता सर्व ठिकाणी संगणकीकरण झालेले आहे. त्यामुळे आता जादा कर्मचा-यांची आवश्यकता राहिलेली नाही. याचा देखील शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. विनाअनुदान तत्वावरील शाळांना शासन अनुदान देत नाही, या संस्थांकडे शिक्षकेतर कर्मचा-यांना वेतन देण्याएवढे पैसे नाहीत. सभापती महोदय, आपण देखील ग्रामीण भागात शैक्षणिक संस्था चालविता, स्वत: माननीय शिक्षण मंत्री शाळा चालवित आहेत. आपलाही हाच अनुभव असेल की, शिपाई काम करीत नाहीत, लिपिक काम करीत नाहीत. त्यामुळे 2000 विद्यार्थी संख्येमागे 1 लिपिक आकृतीबंधात मंजूर करावा, अशी माझी सूचना असून शासनाने या सूचनेचा गांभीर्याने विचार करण्यासाठी एक उपसमिती नेमावी. अशा प्रकारची उपसमिती माननीय मंत्री नेमतील का ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना आपल्या माध्यमातून मी विनंती करीन की, ते सुध्दा ग्रामीण भागात शेतक-यांचे नेतृत्व करतात. मला असे सांगावयाचे आहे की,.........

**उपसभापती** : विषय वाढत चालला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना या विषयावर बोलण्यासाठी मी पुरेशी संधी दिली आहे. आता पुन्हा बोलण्याची संधी मी त्यांना देऊ शकणार नाही. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या मताशी मी सहमत आहे.

----------

....3.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावलीतील सेवा ज्येष्ठतेच्या नियमांना छेद देणारी परिपत्रके निर्गमित होणे

**मु.शी.**: खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावलीतील सेवा ज्येष्ठतेच्या नियमांना छेद देणारी परिपत्रके निर्गमित होणे या विषया संबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 94 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियमावली 1981 च्या नियम 12 अन्वये व शेडयुल 'एफ' प्रमाणे सेवाज्येष्ठता यादीचे निकष निश्चित असणे, कायदेशीर तरतुदींना छेद देणारे शासन निर्णय व परिपत्रके शासनाकडून निर्गमित होणे, अनेक न्यायालयीन प्रकरणांमध्ये न्यायालयाने निर्णय देऊनही त्याची अंमलबजावणी न होणे, परिणामत: शिक्षकांवर अन्याय होणे, वारंवार लेखी निवेदन देऊनही शासनाने दखल न घेणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, खाजगी शाळा कर्मचा-यांच्या सेवाज्येष्ठते संबंधीच्या मुद्याबाबत मी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली आहे.

यानंतर श्री.गिते.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ MAP/ SBT/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर 10:55

श्री. रामनाथ मोते..

सभापती महोदय, मी या ठिकाणी सेवाज्येष्ठतेच्या संदर्भामध्ये अर्धा तास चर्चेची सूचना उपस्थित केलेली आहे. महाराष्ट्र खाजगी शाळांसाठी राज्य शासनाने 1977 चा कायदा आणि 1981ची नियमावली लागू केलेली आहे. संस्थांच्या सेवाज्येष्ठता यादीच्या संदर्भात शासनाने 1977 च्या कायद्यामध्ये आणि 1981 च्या नियमावलीमध्ये तरतूद केलेली आहे. नियम क्रमांक 12 मध्ये स्पष्ट तरतूद आहे की, संस्था चालकांनी आपापल्या सर्व शाळांची सेवाज्येष्ठता यादी कोणत्या पध्दतीने ठरवावी ? त्याबाबतचे निकष कोणते आहेत ? कोणत्या तत्वाचे पालन करावयाचे आहे? त्यासंबंधीच्या गाईड लाईन्स परिशिष्ट-एफ मध्ये नमूद केलेल्या आहेत. यासंदर्भात कायदेशीर तरतूदी स्पष्ट असताना जिल्हा शिक्षण अधिका-यांकडून, शिक्षण उप संचालक, शिक्षण संचालक यांच्याकडून नव्हे तर मंत्रालयातून सुध्दा कायदेशीर तरतुदींना छेद देणारे आदेश काढले जातात. सेवा ज्येष्ठतेच्या संदर्भामध्ये प्रत्येक अधिकारी आपापल्या मताने त्यासंदर्भातील निर्णय घेत असतात. त्यामुळे त्यांनी काढलेल्या परिपत्रकामुळे, निर्णयामुळे अनेक वाद आणि संघर्ष निर्माण होतात. बरेच प्रकरणे न्यायालयात जातात. न्यायालयाने निकाल दिल्यानंतर सुध्दा शासनाकडून परिपत्रके काढली जातात आणि या गोष्टीला माझा विरोध आहे. राज्य शासनाने विधिमंडळात जो काही कायदा केलेला आहे. त्या कायद्यातील ज्या तरतुदी, शेडयूल-एफ मध्ये ज्या काही गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. त्याला छेद देणारे कोणतेही परिपत्रक कोणताही शासन निर्णय शासनाला काढता येणार नाही. यासंदर्भातील अधिका-यांना सुध्दा आदेश निर्गमित करता येणार नाहीत. न्यायालयाच्या निर्णयामध्ये वेगळे काहीही सांगितलेले नसते. ज्या कायद्यातील तरतुदी आहेत, त्याचा नेमका अर्थ काय होतो ? न्यायालयाच्या निर्णयामध्ये इंटर पिटीशन असते, त्याच्या अगदी विरुध्द निर्णय शासकीय अधिका-यांकडून काढले जातात आणि त्यामुळे खऱ्या अर्थाने वाद निर्माण होतात. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, न्यायालयाचे जे निर्णय आहेत, कायद्यातील ज्या तरतुदी आहेत, त्याच्या विरोधात किंवा आपले मत प्रदर्शित करणारे असे कोणतेही परिपत्रक काढता कामा नये. मंत्रालयातून जी परिपत्रके काढली जातात, शासनाकडून जे निर्णय घेतले जातात, त्याची अंमलबजावणी शिक्षणाधिकारी, शिक्षण उप संचालक आणि संचालक यांच्याकडून केली जाते. शासनाकडून जी.आर.काढले जातात, मंत्रालयातून जी परिपत्रके काढली जातात ती त्यांना मोठी





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

वाटतात. कायद्यातील तरतुदींचा ते आधार घेत नाहीत. कायद्यातील तरतुदी ते मान्य करीत नाहीत. मंत्रालयातून काढल्या जाणा-या परिपत्रकाचा आणि जी.आर.चा अधिकारी आधार घेतात. यासंदर्भातील कायद्यामध्ये स्पष्ट तरतूद आहे की, वेतनश्रेणीच्या आधारे सेवा ज्येष्ठता ठरविण्यात येऊ नये. 15 वर्षापूर्वीचे लॅण्डमार्क जज्मेंट आहे. आजही शासनाचे आदेश आहेत की, वेतनश्रेणी नुसारच शिक्षकांची सेवा ज्येष्ठता ठरविण्यात यावी. त्यामुळे ख-या अर्थाने वाद निर्माण होतो आहे. सेवा ज्येष्ठता ठरविण्याचा एकमेव निकष आहे तो म्हणजे संबंधित शिक्षकांची पात्रता असा आहे. तो शिक्षक कोणत्या वेतनश्रेणीत काम करतो. तो डी.एड.वेतनश्रेणीत काम करतो आहे की बी.एड.वेतनश्रेणीत काम करतो याचा विचार न करता त्याच्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे निर्णय व्हावा. 10 वर्षाच्या सेवेनंतर तो बी.एड.समकक्ष ठरतो. सेवा ज्येष्ठता यादीमध्ये त्याला "क" संवर्गामध्ये घ्यावयाचे आहे. यासंदर्भात शासनाचे परिपत्रक आहे की, त्याला "क" संवर्गामध्ये घ्यावयाचे नाही. यासंदर्भातील स्पष्टीकरण आम्हाला करावे. त्यासंदर्भातील खुलासा आम्हाला करावा म्हणून मी दोन वर्षापूर्वी शिक्षण संचालकांना पत्र दिले आहे. शिक्षण संचालकांकडून उप संचालकांकडे पत्र दिले की, तातडीने खुलासा करावा. मला दोन वर्षापूर्वी लिहिलेल्या पत्राला मला उत्तर मिळाले नाही. त्याबाबतीत त्यांनी सांगितले की, शिक्षण उप संचालकांकडून अहवाल आलेला नाही. यासंदर्भात चर्चेच्या निमित्ताने सगळया विषयावर बोलता येणार नाही. म्हणून मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, सेवा ज्येष्ठता, शासनाचे आदेश आणि कायद्यातील तरतुदी यांची सांगड घालण्यासाठी माननीय शिक्षण मंत्र्यांनी एक महिन्यात आत बैठक घेऊन आम्हाला निमंत्रित करुन आमचे म्हणणे मांडण्यासाठी संधी द्याल काय म्हणजे सगळे प्रश्न मार्गी लागू शकतील.

-----

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट बरोबर आहे. न्यायालयात काही प्रकरणे गेली. अधिकाऱ्यांच्या काही विसंगत निर्णयामुळे, मत प्रदर्शित केल्यामुळे सुप्रीम कोर्टात एक प्रकरण गेले होते. म्हणून आम्ही बैठकीमध्ये सूचना दिल्या आहेत. विसंगत अर्थ काढल्यामुळे अशा प्रकारची किती न्यायालयीन प्रकरणे निर्माण झाली, मग ती शिक्षणाधिकारी, उपसंचालक किंवा संचालक स्तरावर असतील, अशा प्रकरणांबाबत राज्यामध्ये एक मोठा ड्राईव्ह घ्यायचा आहे. अशा विसंगत पध्दतीमुळे प्रशासनामध्ये प्रश्न निर्माण होतात. त्याबाबत जरुर पावले उचलली जात आहेत. सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार अधिवेशन संपल्यानंतर या विषयाबाबत बैठक घेऊ. आपल्याकडून जे काही निवेदन असेल किंवा आतापर्यंत आलेल्या निवेदनातील मागण्या संबंधित विभागाला पाठवून त्यांच्या अभिप्रायासह आपल्यासमवेत बैठक घेऊन या संदर्भात निर्णय घेऊ.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>अर्धातास चर्चा पुढे ढकलण्यासंबंधी</u>**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांची अनुक्रमांक-7 वरील अर्धातास चर्चा पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पुढील अर्धातास चर्चा माझी आहे. परंतु संबंधित मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत?

**उपसभापती** : सभागृहात उपस्थित राहण्याबाबत मी मंत्रीमहोदयांना निरोप दिला आहे. तोपर्यंत सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांची अनुक्रमांक-9 वरील अर्धातास चर्चा घेण्यात येत आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शिक्षण मंडळाने विहित केलेल्या गणित व संख्याशास्त्र विषयाच्या जादा कारभाराला मान्यता न दिल्याबाबत

**मु. शी.** : शिक्षण मंडळाने विहित केलेल्या गणित व संख्याशास्त्र विषयाच्या जादा कारभाराला मान्यता न दिल्याबाबत या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 46260 ला दिनांक 24 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, "शिक्षण मंडळाने विहित केलेल्या गणित व संख्याशास्त्र विषयाच्या जादा कारभाराला मान्यता न दिल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 46260 ला दिनांक 24 डिसेंबर, 2008 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, दरवर्षी राज्यामध्ये जेवढ्या काही माध्यमिक शाळा, कनिष्ट महाविद्यालये आहेत यामध्ये सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस पट पडताळणी केली जाते. पट पडताळणी म्हणजे प्रत्यक्षपणाने आपल्या शासकीय अधिकाऱ्यांनी जाऊन त्या ठिकाणी शिरगणती करण्याचा कार्यक्रम प्रत्येक वर्गामध्ये करावा. ज्या दिवशी शासकीय अधिकारी तपासणीसाठी जातील त्या दिवशी प्रत्येक वर्गात किती मुले हजर आहेत, त्या मुलांची संख्या एकत्रित करुन त्या त्या शाळांची संच मांडणी केली जाते. प्रत्यक्ष वर्गामध्ये विद्यार्थी किती हजर आहेत, किती होते त्यानुसार दरवर्षी राज्यामध्ये शाळांचा आढावा घेतला जातो व विद्यार्थी संख्येनुसार त्या शाळांमध्ये, त्या वर्गामध्ये जास्त विद्यार्थी असतील तर नवीन पदे दिली जातात. नवीन वर्ग, तुकड्या दिल्या जातात. ही प्रक्रिया दरवर्षी या राज्यामध्ये पार पाडली जाते आणि ही पध्दत वर्षानुवर्षे सुरु आहे. अचानक याच वर्षी किंवा मागील वर्षी ही पध्दत सुरु झाली असे नाही. वर्षानुवर्षे ही पध्दत शिक्षण विभागामार्फत अंमलात आणली जात आहे. क्षेत्रीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी यांच्याकडून उपसंचालकांकडे प्रस्ताव पाठविला जातो. उपसंचालकांकडून डायरेक्टरकडे आणि डायरेक्टर यांच्याकडून शासनाकडे हे प्रस्ताव सादर होतात. आतापर्यंत मंत्रालयात शिक्षण विभागाकडे 2004-05, 2005-06, 2006-07, 2007-08 व 2008-09 या 5-6 वर्षात जी काही पदे वाढली आहेत त्या पदांची मागणी करणारे

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



SGB/ MMP/ MAP/ KGS/ SBT/ 11:00

श्री.विक्रम काळे.......

प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवून 6 वर्षे झाली. 6 वर्षे उलटूनही अद्याप याबाबत निर्णय झालेला नाही. मागील वर्षभरात मी वारंवार पाठपुरावा करीत आहे. याबाबत माननीय अर्थमंत्र्यांनी 24 जानेवारी, 2009 रोजी बैठक घेतली. या पदांना उच्चस्तरीय समितीपुढे जाण्याची गरज नाही, ही रेग्युलर प्रोसेस आहे, वित्तीय समितीने याला मान्यता द्यावी असा निर्णय त्या बैठकीमध्ये चर्चेअंती घेण्यात आला. आता या राज्याला चांगले शिक्षणमंत्री लाभले आहेत. ते स्वत: एका मोठया शिक्षण संस्थेचे संचालक आहेत. त्यांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे प्रश्न अधिक चांगले माहिती आहेत. क्षेत्रीय अधिकारी कसे काम करतात हे त्यांनी सांगितले आहे. शिक्षण खाते स्वच्छ करण्याची गरज निर्माण झाली आहे. शासनाकडून जे आदेश पाठविले जातात त्या आदेशांना सुध्दा केराची टोपली दाखविण्यात येते.

एन.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे ......

म्हणून माझी विनंती आहे की, अजून तुकड्यांचे प्रस्ताव आलेले नाहीत, शासनाने दोन स्मरणपत्रे पाठविलेली आहेत तरी देखील संचालकांकडून प्रस्तावच प्राप्त होत नाहीत. अशा प्रकारे जर शासनाचे आदेश संचालक मानत नसतील तर त्यांना खुर्चीवर कशाला ठेवावयाचे याचाही विचार शासनाने केला पाहिजे. म्हणून मी विनंती करतो की, कनिष्ठ महाविद्यालयातील गणित विषयाचा कार्यभार आणि संख्या शास्त्र या विषयाचा कार्यभार वाढलेला आहे त्यामुळे 900 पदे वाढली आहेत. ही 900 पदे आणि रेग्युलर जी पदे वाढलेली आहेत ती पदे आणि माध्यमिकच्या ज्या तुकड्या वाढलेल्या आहेत त्या तुकड्यांची पदे अशा सर्व पदांना हे शैक्षणिक वर्ष संपण्याच्या आत शासन मान्यता देणार आहे काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, ही गोष्ट खरी आहे की, सचिव स्तरावरील समितीसमोर आता जाण्याची आवश्यकता नाही असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. म्हणून या पदांना मान्यता देण्यासाठीचे प्रस्ताव वित्त विभागाने समजून निर्णय घेण्यासंबंधीचे ठरलेले आहे. खरे म्हणजे संच मान्यतेसंबंधीचे अधिकार शिक्षण संचालकांच्या स्तरावरच असतात. ही गोष्ट खरी आहे की, संचालक स्तरावरुन छाननी होऊन प्रस्ताव येणे याबाबतीत मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे कारण अधिकाऱ्यांची कमतरता असल्याची तक्रार आहे, काही ठिकाणी जादा कार्यभारही सोपविलेले आहेत. या सर्व स्तरावर शिक्षण विभागाच्या काही मर्यादा आहेत त्या लक्षात घेतल्या तरी हा जो प्रश्न उपस्थित केला तो बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित असल्यामुळे या शैक्षणिक वर्षात या सर्व पदांना मान्यता दिल्या जातील, असे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. कपिल पाटील : महोदय, असे अनेक मुद्दे आहेत त्यांच्यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी बैठक घ्यावी, अशी माझी सूचना आहे.

श्री. विक्रम काळे : महोदय, या महिन्याच्या आत हा निर्णय झाला तर बरे होईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांचे देखील जे प्रश्न आहेत त्याबाबत बैठक घेण्याचे ठरलेलेच होते. याच महिन्यात अशा प्रश्नांबाबत बैठका घेण्यात येतील.

श्री. रामनाथ मोते : महोदय, सन 2005 ते 2009 या चार वर्षापासून पायाभूत पदांच्या मान्यता प्रलंबित आहेत, त्या सर्वांच्या बाबतीत तातडीने एक महिन्यात निर्णय घेऊन असे सांगितले आहे परंतु एक वर्षाचा विलंब मी समजू शकतो किंवा शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी जरी मानयता मिळाली तरी हरकत नाही परंतु पाच-पाच वर्षे लागत असतील त्यामध्ये सुधारणा होण्याची देखील गरज आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, आम्ही असा निर्णय घेतला की, पत्र पाठवून माहिती मागविली तर ती सहा-सहा महिने उत्तर येत नाही. त्यापेक्षा राज्यात जे आठ विभाग आहेत त्यांच्या संदर्भात मंत्रालयातील सह सचिव व उप सचिवाच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या व त्यानुसार प्रत्येक विभागात मंत्रालयातील अधिकारी जाऊन दोन-दोन दिवस काम करावयाचे आणि माहिती एकत्रित करुन निर्णय घ्यावे, अशाही सूचना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली त्याबाबत सुध्दा बैठक घेण्यात येईल.

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

**उपसभापती** : अर्धा-तास चर्चा क्र. 10 चे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत तर त्या विषयाचे मंत्री उपस्थित नाहीत. त्यानंतर क्र. 11 ही अर्धा-तास चर्चा देणारे सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब उपस्थित नाहीत पण त्या विषयाचे मंत्री उपस्थित आहेत. त्यानंतर कार्यक्रम पत्रिकेवरील 12 व्या क्रमांकाची अर्धा-तास चर्चेची सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर उपस्थित आहेत तर मंत्री नाहीत. अशा प्रकारे यापुढील सर्व अर्धा तास चर्चा मी पुढे ढकलतो. माननीय सभापतींच्या संमतीने या उर्वरित अर्धा-तास चर्चा नंतर घेण्यात येतील.

आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन सभागृहाचे नियमित कामकाज दुपारी 12.00 वाजता पुन: सुरु होईल.

( 11.09 ते 12.00 बैठक स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ SBT/ 12:00

( स्थगितीनंतर)

( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )

( विरोधीपक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य डायस समोरील मोकळया जागेवर बसतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसावे.

श्री. दिवाकर रावते : ( डायस समोरील मोकळया जागेत उभे राहून बोलतात.) सभापती महोदय, आजच्या कामकाजात 12 अर्धा-तास चर्चा दाखविण्यात आल्या होत्या. या सर्व अर्धा तास चर्चेच्या संदर्भातील अनेक विषयांचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बऱ्याच अर्धा-तास चर्चा होऊ शकल्या नाहीत. सभागृहात मंत्रीमहोदयांनी उपस्थित रहावे अशा प्रकारचे आदेश आपण दिलेले असतांनाही सन्माननीय मंत्री महोदय आपल्या आदेशाला जुमानत नाहीत.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर जाऊन विचार व्यक्त करावे. सन्माननीय सदस्य आपली जागा सोडून विचार व्यक्त करीत असल्यामुळे त्यांचे म्हणणे रेकॉर्ड होणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रमपत्रिकेत 12 अर्धा-तास चर्चा दाखविण्यात आलेल्या होत्या. या अर्धा-तास चर्चांवर चर्चा करण्यासाठी सकाळी 10.00 ते 11.55 या वेळ देण्यात आला होता. या अर्धातास चर्चेच्या अनुषंगाने संबंधित सदस्य अर्धा-तास चर्चेसाठी उपस्थित होते परंतु संबंधित मंत्रिमहोदय उपस्थित नसल्यामुळे बारा अर्धा-तास चर्चांपैकी केवळ तीनच अर्धा-तास चर्चा होऊ शकल्या. या अर्धातास चर्चेसाठी केवळ एकच मंत्री सभागृहात उपस्थित होते. अशा पध्दतीने सभागृहाचे कामकाज चालणार असेल, सदस्यांचा असाच अवमान चालणार असेल तर ते योग्य नाही. सभागृहात मंत्रिमहोदयांनी उपस्थित रहावे असे आपण वारंवार सांगून देखील सन्माननीय मंत्री महोदय त्यासंदर्भात दखल घेत नाहीत. अशा परिस्थितीत आमच्यापुढे कोणताही पर्याय नसल्यामुळे आम्ही आज बैठा सत्याग्रह पुकारलेला आहे.

श्री. अरविंद सावंत :( डायस समोरील मोकळया जागेत बसून बोलतात.) : या राज्यात विशेषत: सभागृहात तरी सरकार नावाची चीज शिल्लक आहे काय?

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, माझ्या प्रकरणाच्या संदर्भात आपण निदेश दिले होते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आजच्या अर्धा-तास चर्चेच्या वेळी संबंधित मंत्रिमहोदय उपस्थित नव्हते यासंदर्भात विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी भावना व्यक्त केली आहे ती बरोबर आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ......

सभापती महोदय,मी आपल्या माध्यमातून सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांच्या जागेवर जाऊन बसावे. त्याचबरोबर जी काही घटना घडलेली आहे त्याबद्दल मी शासनातर्फे दिलगिरीसुध्दा व्यक्त करतो. अधिवेशनाचा जो उरलेला कालावधी आहे त्या कालावधीमध्ये, भविष्यकाळात माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून चर्चा झाली नाही अशा तक्रारीची संधी मी देणार नाही. या संदर्भात मी स्वत: माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्र्यांशी बोलेन. तसेच त्या त्या मंत्र्यांनासुध्दा याबाबतीत कळवीन. परंतु उरलेल्या दिवसामध्ये असा प्रकार पुन्हा घडणार नाही याची मी हमी देतो. या ठिकाणी मी दिलगिरीसुध्दा व्यक्त केलेली आहे.

सभापती महोदय, आम्ही जागेवर बसलेलो आहोत आणि आमचे सहकारी खाली बसलेले आहेत हे योग्य वाटत नाही. माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि अन्य सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की , त्यांनी त्यांच्या जागेवर जाऊन बसावे. अधिवेशनाचे जे काही पुढचे दिवस आहेत त्या दिवसांमध्ये असा प्रकार पुन्हा घडणार नाही याची मी हमी देतो . तसेच मी आता केलेली विनंती मान्य करावी. जी काही घटना घडलेली आहे ती सार्वभौम सभागृहाला भूषणावह नाही .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ही कृती करणे अत्यंत क्लेशदायक आहे. आजपर्यंत आम्ही अशी कृती केलेली नव्हती. माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित न राहणे ही घटना पहिल्यांदाच घडलेली नाही. या सभागृहामध्ये आमचा, आपला तसेच सभागृहाचा इतक्या वेळा अपमान झाला आहे की, शेवटी नाईलाजास्तव आम्ही आज येथे बसलो आहोत.

माझ्या माहितीप्रमाणे या अधिवेशनामध्ये आतापर्यंत जवळजवाळ नऊ वेळा असे घडले असल्याचे आपण शासनाला सांगितले होते आणि त्याबाबत शासनाने वेळोवेळी दिलगिरीही व्यक्त केली होती.सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांनी आता जे काही सांगितलेले आहे त्याप्रमाणे घडेल याची कोणी खात्री देऊ शकणार आहे काय ? सन्माननीय मंत्री महोदयांच्या भावनांचा आदर करुन मी आपल्याला अशी विनंती करतो की, आपण दहा मिनिटे सभागृहाची बैठक तहकूब करावी. सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांचा या प्रकाराशी काहीही सबंध नाही. त्यांच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

विभागाचे राज्य मंत्री आले नाहीत म्हणून त्यांच्यावर राग काढण्यात काही अर्थ नाही. या ठिकाणी त्यांनी जी विनंती केली आहे त्याचा आम्ही सन्मान राखतो. परंतु माननीय मुख्यमंत्री वा या सभागृहाचे नेते यांच्या सबंधीचा हा प्रश्न आहे. कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे जे प्रतोद असतात त्यांचे काम फार महत्वाचे असते. सभागृहात सन्माननीय सदस्य उपस्थित राहतात किंवा नाही, मंत्री उपस्थित राहातात किंवा नाही हे पाहणे आणि सभागृहाचे कामकाज व्यवस्थित करुन घेणे हे प्रतोदांचे काम आहे.परतु सर्वजण बेफिकीर आहेत. कोणी कोणाची दखल घेत नाही. अर्थसंकल्पाच्या चर्चेवर आम्ही बहिष्कार टाकला होता.सभापती महोदय, सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करण्यात येऊन आपल्या दालनात एक बैठक घेण्यात यावी तसेच माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांना आपल्या दालतील बैठकीला बोलविण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे. त्या बैठकीत त्यांनी असे सागितले पाहिजे की,यानंतर असा प्रकार पुन्हा कधीही होणारी नाही. माननीय मंत्री उपस्थित न राहण्याचे प्रकार वारंवार होत असतात. त्यामुळे म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावता कामा नये. मंत्री उपस्थित न राहिल्यामुळे आमचा, सभागृहाचा तसेच तुमचासुध्दा अपमान होतो. कोणी मंत्री कधीही येतात आणि कधीही जातात.असे जर घडत असेल तर हा कार्यक्रम कशासाठी निश्चित केला होता ?. या प्रकरणाशी माननीय मंत्री श्री नारायण राणे यांचा काहीही सबंध नाही. कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे असा हा प्रकार आहे . ते काही पक्षाचे प्रतोद नाहीत. त्यामुळे ही सर्व जबाबदारी पक्षाच्या प्रतोदांची, माननीय मुख्यमंत्र्याची आहे. हे सरकार गंभीर नसल्याचे गेल्या अठरा वर्षात मी प्रथमच पाहत आहे. कोणीही मंत्री कधी येतो, कधी येंत नाही तसेच कॅबिनेट मंत्र्यांचे राज्यमंत्री ऐकत नाही.हा काय प्रकार चालू आहे हे मला समजत नाही. या प्रकारासंबंधी तर एक नाटकच बसवले पाहिजे असे मला वाटते.सभापती महोदय, आपण सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी तहकूब करावी. आमच्या भावना लक्षात घेऊन सभागृहाच्या नेत्यांना बोलावून त्यांना यासंबंधीचा खुलासा करु द्यावा. त्यांच्या पक्षाचे प्रतोद काय करतात ? मंत्री का येत नाहीत ? माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय मंत्र्यांना मेमो दिले असल्याचे आम्मी ऐकले आहे.परंतु मेमो दिल्यानतरसुध्दा मंत्री महोदय अशा प्रकारे वागत आहेत. कोणीही कोणाचे ऐकत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांचे मंत्री ऐकत नाही हा काय अनागोंदीचा प्रकार सुरु आहे ? सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता तहकूब करण्यात यावी.अशी

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

मी आपणाला पुन्हा एकदा विनंती करतो. माननीय मंत्री श्री नारायण राणे यांच्या भावनेशी मी सहमत असून त्यांच्या भावनेचा मी आदर राखतो. परतु सभागृहाचे नेते किंवा माननीय मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेऊन याबाबतीत त्यांना खुलासा करण्यास आपण सांगावे.माननीय मंत्री श्री नारायण.राणे आता उपस्थित आहेत परंतु थोडया वेळानंतर ते येथून निघून जातील. आज ते आमच्यासमोर योगायोगाने उपस्थित आहेत. हा जो प्रकार घडलेला आहे त्याची दखल घेण्याची जबाबदारी सभागृहाच्या नेत्यावर आहे. आम्ही खाली बसलो आहोत हे त्यांना कळले नसेल काय ? सभागृहाचे नेते येथे का येत नाहीत ? या बाबतीत त्यांची काही जबाबदारी नाही काय ?लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षाची संवेदनशीलता एवढी बोथट झालेली आहे काय ? सभापती महोदय,जो प्रकार घ्ंडलेला आहे त्याबाबतीत आपल्या दालनात बैठक घेण्यात आली पाहिजे. हा आपलासुध्दा अपमान आहे.त्यामुळे आपणसुध्दा येथे बसावयास नको होते.आपण सभागृहातून निघून जावयास पाहिजे होते. माझ्या 20 वर्षाच्या कारकीर्दीमध्ये माननीय सभापती आणि माननीय उपसभापतींच्या चेअरचे एवढे अवमूल्यन झालेले मी कधीही पाहिलेले नाही. माननीय सभापती तसेच माननीय उपसभापती यांनी शासनाला सांगितल्यानंतर त्यांचेही कोणी ऐकत नाही हे माझ्या आयुष्यात मी कधीही पाहिलेल नाही. तो प्रकार आता झाल्याने त्याचे मला अत्यंत दु:ख होत आहे.

नंतर श्रीमती रणदिवे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

सभापती महोदय, आपण सहिष्णू आहात, उदार आहात म्हणून सन्माननीय सदस्यांनी आपला अवमान करावा काय ? आपल्याला अशा प्रकारे वागणूक देतात ? आपल्या म्हणण्याला किंमत नाही. जोपर्यंत याठिकाणी सभागृहाचे नेते येत नाहीत आणि आपल्या चेंबरमध्ये येऊन यापुढे असे होणार नाही आणि या गोष्टीबद्दल दिलगिरी व्यक्त करीत नाहीत, तोपर्यंत आम्ही खाली बसणार आहोत. आपल्याला जे करावयाचे असेल ते करावे. जर आपल्याला या परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालवावयाचे असेल तर ते चालवावे. आम्ही खाली बसणार आहोत.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांनी माझे एक मिनिट ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांना मी सांगू इच्छितो की, मी याठिकाणी शासनाच्या वतीने दिलगिरी व्यक्त केलेली आहे, नारायण राणे म्हणून नाही.

अनेक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : अशा प्रकारे नऊ वेळा दिलगिरी व्यक्त केलेली आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी याठिकाणी जबाबदारी घेतलेली आहे. मी स्वतः माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या कडे मी स्वत: जाऊन याठिकाणी घडलेली घटना आणि येथे जे विचार व्यक्त करण्यात आलेले आहेत, त्याबद्दल सांगणार आहे. तसेच अधिवेशन सुरु असेपर्यंत असे घडू नये यादृष्टीने काळजी घेण्यासंबंधी मी त्यांच्याशी चर्चा करणार आहे. याबाबत मी हमी घेतलेली आहे. मी असे म्हटलेले नाही की, आताचे होऊन जाऊ दे. यानंतरची पुढची जबाबदारी माझ्यावर नाही, असे काही नाही. तर मी सर्व जबाबदारी घेतलेली आहे. आता सदनामध्ये माननीय उप मुख्यमंत्री देखील आलेले आहेत. पण मला सर्व विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना विनंती करावयाची आहे की, आमचे सर्व सन्माननीय सहकारी खाली बसलेले आहेत, ही गोष्ट आम्हाला बरी वाटत नाही. याठिकाणी मी स्वत: दिलगिरी व्यक्त केलेली आहे. म्हणून त्यांनी मन मोठे करुन . . . .

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : नऊ वेळा मन मोठे केले आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, यापुढे असे होणार नाही याची हमी दिलेली आहे. त्यामुळे आमच्या सन्माननीय सहकाऱ्यांनी मन मोठे करुन आम्हाला सहकार्य द्यावे. सभापती महोदय, आपला आणि सन्माननीय सदस्यांचा अपमान करण्याचा आमचा कोणताही हेतू नव्हता....

. . . .क्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे . . . .

म्हणून मी परत एकदा आमचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सर्व गटनेते आणि सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, कृपया आम्हाला एक वेळ संधी द्यावी. आम्ही परत असे घडणर नाही याची खबरदारी घेऊ. पण याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचे कामकाज सुरु करावे अशी मी परत एकदा माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब आपल्याला विनंती करतो. मी स्वत: तुम्हाला हमी देऊन सांगत असताना, आपण मनाचा मोठेपणा दाखवावा असे मला वाटते

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अतिशय गंभीर मुद्याला स्पर्श केलेला आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील, आपण याच विषयावर बोलणार आहात काय ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी ते बोलत नाही. मी दोन मिनिटांमध्ये सांगतो. या सभागृहाशी आमच्या भावनाही निगडित आहेत आणि त्या व्यक्त करण्यासाठी संधी दिली पाहिजे. मला हे मान्य आहे की, आदरणीय श्री.नारायण राणे यांनी सदनामध्ये दिलगिरी व्यक्त केली, त्याचाही आदर केला पाहिजे. पण त्याचबरोबर या सदनामध्ये असे प्रकार सातत्याने घडत आहेत. म्हणून सभागृहाच्या भावना प्रक्षुब्ध आहेत. आम्ही फक्त खाली बसलो नाही, परंतु आमच्या भावना देखील त्याच्याशी निगडित आहेत. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत आमचे जे म्हणणे आहे, ते जाऊन सांगण्यासाठी माननीय श्री.नारायण राणे, या सभागृहाचे नेते या दोघांनाही 10 मिनिटांचा वेळ मिळावा. . . .

**उपसभापती** : या सभागृहाचे नेते येथे उपस्थित आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांना माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत आमचे म्हणणे मांडण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे आणि त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करावे म्हणजे विरोधी पक्षाचाही मान राखल्यासारखे होईल आणि सभागृहाचाही मान राखल्यासारखे होईल, एवढीच माझी विनंती आहे.

**उपसभापती** : याठिकाणी विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य खाली बसलेले आहेत. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांनी आपले म्हणणे मांडले. माननीय मंत्री ......

. . . .क्यु-3

**उपसभापती** . . . .

श्री.नारायण राणे यांनी आपले म्हणणे मांडले.या सदनातील एक अत्यंत जबाबदार आणि ज्येष्ठ नेते आणि उद्योग मंत्री श्री.नारायणराव राणे यांनी देखील सदनामध्ये घडलेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी व्यक्त केली आणि यापुढे जे काही कामकाज शिल्लक आहे, त्यावेळी असे काही घडणार नाही याची त्यांनी हमी देखील घेतलेली आहे. आता सदनामध्ये सभागृहाचे नेते देखील आलेले आहेत. मला असे वाटते की, आपण सर्वांनी . . . .

श्री.नितीन गडकरी (खाली बसून) : सभापती महोदय, आपण आपल्या दालनामध्ये बैठक घेऊन चर्चा करावी. आतापर्यंत असे प्रकार नऊ वेळा घडलेले आहेत, हमी दिलेली आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : मी आता सभागृहाची बैठक 12.30 वाजता सुरु होईल असे जाहीर करतो. तोपर्यंत सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब, सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.छगन भुजबळसाहेब, सन्माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणेसाहेब आपण सर्वांनी माझ्या चेंबरमध्ये यावे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 14 मिनिटांनी, 12 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, अर्धा-तास चर्चेच्यावेळी काही मंत्री सभागृहात हजर नव्हते त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी जो विरोध आणि संताप प्रदर्शित केला तो आम्ही समजू शकतो. यासाठी खरे म्हणजे या सदनाचे ज्येष्ठ मंत्री श्री. नारायण राणे यांनी दिलगिरी सुध्दा व्यक्त केलेली आहे. हे खरे आहे की, मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित राहणे हे शासनाचे काम आणि कर्तव्य आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी कारण सांगावयाचे म्हणून सांगत नाही परंतु शनिवार असल्यामुळे आणि अनेक वेळा शनिवारी आणि रविवारी मंत्री आणि सदस्य सुध्दा कार्यक्रम घेत असतात म्हणून कदाचित असे झाले असेल तर त्याची चौकशी निश्चितपणे करण्यात येईल. अर्थात ते कारण असू शकत नाही. एकदा कामकाज सल्लागार समितीने सभागृहाचे कामकाज ठरवून दिल्यानंतर शनिवार असेल, रविवार असेल किंवा इतर सुट्टीचा दिवस असेल त्यावेळी सभागृहाचे कामकाज असेल तर त्या दिवशीचे सगळे कार्यक्रम रद्द करावयाला पाहिजेत, या मुद्याशी कोणीही असहमत असू शकत नाही. सभापती महोदय, मी परत एकदा दिलगिरी व्यक्त करीत असताना याबाबतीत यापुढे अधिक काळजी घेतली जाईल असे सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो. तसेच आता पुढचा कार्यक्रम सुरु करावा, अशी मी आपल्या मार्फत त्यांना विनंती करतो.

<u>म.वि.स.नियम 289 च्या सूचनेसंबंधी</u>

**सभापती** :आज सदनापुढे नियम 289 अन्वये एक प्रस्ताव मला प्राप्त झालला आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेता, श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री. दिवाकर रावते, श्री. मधुकर चव्हाण, डॉ. नीलम गोऱ्हे श्री. विनोद तावडे आणि श्री. सावंत यांनी एक सूचना दिलेली आहे. त्याबाबतीत त्यांनी एक ते दोन मिनिटात त्यांचे म्हणणे मांडावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुंबईमध्ये जी गंभीर घटना घडली. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स,कामा रुग्णालय, मेट्रो सिनेमा, गेटवे ऑफ इंडिया आणि ताज हॉटेल येथे पाकिस्तानी अतिरेक्यांनी अंधाधूंद गोळीबार केला त्यामध्ये तीन आयपीएस अधिकारी ठार झाले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MAP/

श्री. पांडुरंग फुंडकर....

आणि काही पोलीस मृत्युमुख्री पडले. सारा देश या घटनेने हादरुन गेला. या हल्ल्याच्यावेळी शासनाने जी उपाययोजना केली ती योग्य होती की, त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या होत्या, त्या हल्ल्याला जबाबदार कोण आहे? सतत 72 तास हा हल्ल चालू असताना सरकारने त्याची खबरदारी घेतली काय यासंबंधिची चौकशी करण्याठी शासनाने राम प्रधान यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने चौकशी केली आणि आपला अहवाल दिनांक 28 मे, 2009 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर केला त्याच दिवशी तो अहवाल वर्तमानपत्रात प्रसिध्द झाला आणि त्याच दिवशी त्यांनी टी.व्ही.वर मुलाखत देखील दिली. सभापती महोदय, तो अहवाल सभागृहाला सादर करण्यासंबंधी आम्ही मागणी केली, त्यावेळी आपण निर्देश दिले होते की, विधमंडळाच्या अधिवेशनामध्ये हा अहवाल सादर करावा. सभापती महोदय, विधिमंडळाचे अधिवेशन संपायला आता दोन दिवसच राहिले आहेत. आजतागायत तो अहवाल विधिमंडळापुढे दाखल झालेला नाही, सादर केलेला नाही. म्हणून आमची मागणी आहे की, विधिमंडळासमोर आजच तो अहवाल सादर करुन त्यावर चर्चा घडवावी, अशा प्रकारची नियम 289 अन्वये आम्ही मागणी केलेली आहे. सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा असा हा अहवाल आहे. म्हणून महाराष्ट्राला आणि देशाला हे समजले पाहिजे की, दि.26-11 च्या घटनेमध्ये खऱ्या अर्थाने कोण जबाबदार आहे. या घटनेमध्ये 200 ते 250 लोक मारले गेले आहेत.त्यावेळी पोलीस यंत्रणा काय करीत होती. दक्षिण मुंबईचे पोलीस त्यावेळी काय करीत होते हे संपूर्ण महाराष्ट्राला समजणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

त्याच वेळी महाराष्ट्राचे सरकार, महाराष्ट्राचे पोलीस खाते कोणत्या पध्दतीने काम करीत होते हे निश्चितपणे स्पष्ट होणे आवश्यक आहे. म्हणून हा अहवाल सादर करुन त्यावर चर्चा घडवून आणावी. तोपर्यंत सभागृहाचे कोणतेही कामकाज करु नये अशा प्रकारची विनंती या प्रस्तावाव्दारे मी केलेली आहे. ती विनंती आपण मान्य करावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, हायकोर्टाने श्रीकृष्ण कमिशनच्या नावाने घटनेची चौकशी सुरु केली आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेबांनी विधानमंडळात असे आश्वासन दिले की, अधिवेशन संपण्याच्या आत प्रधान समितीच्या अहवालावरील ॲक्शन टेकन रिपोर्ट सभागृहाला सादर करु.

श्री. नारायण राणे : अधिवेशन संपण्यास अजून दोन दिवस बाकी आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यास दोन दिवस शिल्लक आहेत हे मला माहीत आहे पण त्याचबरोबर एक विसंगती निर्माण झालेली आहे. हायकोर्टाने श्रीकृष्ण कमिशनच्या नावाने त्याची चौकशी सुरु केलेली आहे. त्यामुळे श्रीकृष्ण कमिशनची चौकशी आणि पुन्हा राम प्रधान समिती आणि त्यामधील विसंगती तसेच त्यावरील चर्चा अशी परिस्थिती आहे. हायकोर्ट एक वेगळी कारवाई करीत आहे आणि राज्य सरकार काय करणार हे आम्हाला माहीत नाही. मी हे का मांडतो तर माझा सरकारवरचा विश्वास उडत चालला आहे. तो विश्वास का उडत चालला आहे याबाबत सभापती महोदय, आपल्यालाही अनुभव आहे आणि आम्हालाही अनुभव आहे. मला अशी भीती वाटते की, मंगळवारी घाईगडबडीत चहाला बोलवून ....

श्री. नारायण राणे : आपण माननीय सभापतींच्या बाबतीत तसे बोलणे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : आपण अनेक वेळा त्यांचे ऐकत नाही.

**सभापती** : सदनातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आणि शासन सभापती जे सांगतील किंवा सूचना देतील ते निश्चित ऐकतात.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या अधिवेशनात आपण 9 वेळा आदेश दिल्यावर एक मंत्री उपस्थित राहतात. सभापती महोदय, आपण उदार दृष्टीकोनाचे आहात. आपण सहिष्णू

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

आहात, त्याबाबत मला काही म्हणावयाचे नाही पण आमच्या मनात संशय आहे. माझी आपल्याला एकच विनंती आहे की, हे अधिवेशन समाप्त होण्याच्या आधी ती चर्चा कधी होणार आहे याची तारीख आणि वेळ आपण सांगावी. आपण ती चर्चा सोमवारी घेणार असाल किंवा मंगळवारी घेणार असाल तर तसे सांगावे. ए.टी.आर. सदनाला कधी सादर करणार त्याबाबत आपल्याकडे माहिती असेल तर आपण आम्हाला सांगावी म्हणजे आम्ही विथ्ड्रॉ होऊ. त्यामुळे आज माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगावे की, आम्ही सोमवारी किंवा मंगळवारी ते सादर करणार आहोत. आम्ही त्यांच्यावर विश्वास ठेऊन खाली बसू. पण त्याबाबत काय होणार आहे यासंदर्भात आमच्या मनामध्ये कंफ्युजन आहे. दुसरी बाब अशी की, सिंचनाच्या बाबतीत आमची एक महत्वाची चर्चा आपण स्वीकारलेली आहे. बजेटमध्ये दिशाभूल करणारी वक्तव्ये झालेली आहेत. त्यामुळे ती चर्चा सुध्दा आपण मान्य केलेली आहे. चटावरील श्राध्द उरकतात त्याप्रमाणे शेवटच्या दिवशी लवकर चहाला चला, कामकाज संपवा असे करुन हे महत्वाचे विषय येऊ नयेत म्हणून सोमवारी आणि मंगळवारी त्यासाठी नीट वेळ दिला जावा आणि हे येणार की नाही याबाबतीत आपले कार्यालय काळजी घेतच आहे आणि पुन्हा एकदा त्यावर शिक्का मारुन घ्यावा म्हणून आम्ही विषय मांडलेला आहे. तेव्हा जर माननीय उपमुख्यमंत्री श्री. भुजबळ साहेबांना जर असे सांगावयाचे असेल की, आम्ही ते आजच सादर करतो तर तसे सांगण्यास माझी काही हरकत नाही. कारण ते सुध्दा या विषयावर चांगला प्रकाश पाडू शकतात. या विषयामध्ये त्यांची भूमिका महत्वाची होती. ते जर म्हणत असतील तर तेही आम्हाला चालेल. त्यांनी तसे आम्हाला सांगावे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा यापूर्वी सभागृहात सांगितलेले आहे की, हे अधिवेशन संपण्याच्या आत हा ए.टी.आर. आम्ही सभागृहासमोर सादर करु. अधिवेशन चालू आहे आणि ते संपण्यास अजून वेळ आहे. त्यामुळे मनात असा काही हेतू, किंतू बाळगण्याचे कारण नाही किंवा हेत्वारोप सुध्दा करण्याचे कारण नाही की, आम्हाला हे काही तरी घाईघाईत करावयाचे आहे आणि निघून जावयाचे आहे. अजून सोमवार आणि मंगळवार असे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

श्री. छगन भुजबळ .....

दोन दिवस बाकी आहेत. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, एवढी महत्वाची घटना झाल्यानंतर त्यासाठी दोन, तीन, चार महिने राम प्रधान समितीने वेळ घेतल्यानंतर त्यांचे काय म्हणणे आहे यासंदर्भात प्रशासनाला सुध्दा स्वतःची मते मांडावयाची आहेत. त्यामुळे संबंधित खात्याला आपण थोडा वेळ द्यावयास पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : आपणच ते कबूल केले आहे. आता फक्त त्या ए.टी.आर.वर सोमवारी किंवा मंगळवारी चर्चा करु असे सांगावे.

श्री. छगन भुजबळ : आम्ही ज्याप्रमाणे कबूल केले त्याप्रमाणे तो शब्द पाळू. माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, आज सभागृहापुढे बरेच कामकाज आहे तसेच पुरवणी मागण्यांवर खातेवार चर्चा सुध्दा आहे. हे सर्व करीत असताना आपण परत असे म्हणाल की, 12 मंत्री नाहीत आणि मग परत गडबड होईल. म्हणून आपण पुढचे कामकाज लवकर सुरु करु या.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ...

या विषयावरील चर्चा थांबविण्यात यावी, घाईघाईने अहवाल सादर केला जाईल किंवा सरकार चर्चेपासून पळून जात आहे असे समजण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्यांच्या भावना मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालतो. प्रधान समितीचा अहवाल ए.टी.आर.सहित सभागृहासमोर येईल यासाठी प्रयत्न करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमचा वेळ जात नाही म्हणून आम्ही अशाप्रकारचे प्रस्ताव देतो, काही तरी करावयाचे म्हणून करतो अशाप्रकारची सरकारची भावना आहे असे यावरुन दिसते. विधिमंडळाच्या कामकाजाबाबत जाणीव ठेवून सरकारच्यावतीने सभागृहात वक्तव्ये झाली पाहिजेत अशी विरोधी पक्षाची अपेक्षा आहे. आज शनिवार आहे. आज सकाळच्या सत्रातील कामकाजाचे काय झाले ते आपण पाहिले आहे. आज पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार आहे, सोमवारी सुध्दा पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार आहे. विरोधी पक्षाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होईल, तसेच सिंचनाची चर्चा व्हायची आहे. या सर्व कामकाजाचा विचार करता प्रधान समितीचा अहवाल ए.टी.आर.सहित केव्हा पटलावर ठेवणार, आम्ही तो केव्हा वाचणार आणि त्यावर चर्चा कधी करणार ? विधिमंडळाचे अधिवेशन संपल्यानंतर अहवाल सादर केल्यावर तो वर्तमानपत्रात छापून येईल. या अहवालाबाबत शासनाला गांभीर्य असावयास पाहिजे तेवढे ते दिसत नाही. शासनाला या अहवालावर अभ्यास करावयाचा आहे असे सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले. त्या समितीने अहवाल सादर करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी घेतला. त्यामुळे आम्ही शासनावर विश्वास का ठेवावयाचा ? ज्या दिवशी ही दुर्दैवी घटना घडली त्याच्या सुरुवातीच्या दिवसापासून यासंबंधी चर्चा सुरु झाली होती. परंतु सरकारने नागपूरच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अगदी वंदे मातरम् म्हणण्यापूर्वी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रधान समितीची घोषणा केली. त्यानंतर बाहेर किती रणकंदन माजले त्याची सर्वांना माहिती आहे. सरकार अहवाल सादर करण्याबाबत चालढकल का करीत आहे ते आम्ही समजू शकत नाही. सरकारने असे ठामपणे सांगितले पाहिजे की, आम्ही सोमवारी हा अहवाल सभागृहाला सादर करु, त्यावर एक तासाची चर्चा करु. परंतु यातील काहीही सरकार सांगण्यास तयार नाही. मंगळवारपर्यंत अधिवेशन चालू

श्री.दिवाकर रावते...

आहे, अधिवेशन संपण्यापूर्वी अहवाल देणार म्हणजे काय ? या सभागृहात ए.टी.आर.सहित चर्चा झाली पाहिजे ही आमची मागणी आहे. त्याशिवाय सभागृहात कोणतेही कामकाज होऊ नये अशी आमची मागणी आहे. सभापती महोदय, मंत्रिमंडळासमोर ए.टी.आर.अहवाल कधी सादर करावयाचा ते आलेले नाही. मंत्रिमंडळाची बैठक कधी होणार ते सांगता येत नाही. सोमवारी मंत्रिमंडळाची बैठक होणार आहे काय ? मंत्रिमंडळाने त्याला मंजुरी दिल्याशिवाय सभागृहासमोर तो अहवाल येणार नाही. सगळे हवेत चालले आहे. या अहवालावर चर्चा करण्याची सरकारची मानसिकता नाही. त्या अधिका-यांना लपवावयाचे असेल ते लपवावे. मग त्यात श्री.अनामी रॉय असतील की आणखी कोणी असतील. आम्ही सरकारवर विश्वास ठेवला आहे, आताही विश्वास ठेवण्यास तयार आहोत. परंतु शासन स्पष्टपणे सांगत नाही. आता केवळ दोन दिवस अधिवेशन उरले आहे. या दोन दिवसातील कामकाज पाहता या अहवालावर चर्चा कधी होईल ते निश्चितपणे सरकारने सांगावे....

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी यासंबंधी 15-20 मिनिटांमध्ये माहिती घेऊन हा अहवाल सभागृहाला केव्हा सादर केला जाईल ते सांगतो. त्यासाठी सभागृहाचा वेळ घेण्याचे कारण नाही.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी नियम 289 अन्वये देण्यात आलेला प्रस्ताव नियमामध्ये कसा बसतो हे सांगण्यासाठी निवेदन केले आहे. त्याबाबत या सभागृहाचे नेते आणि सन्माननीय उपमुख्यमंत्री यांनी शासनाची यासंबंधीची भूमिका विशद केली आहे. त्याचबरोबर त्यांनी हेही सांगितले आहे की, हा अहवाल सभागृहाला केव्हा सादर केला जाईल आणि त्यावर चर्चा कधी होईल याबाबत 15-20 मिनिटांत माहिती देतो. मी नियम 289 च्या प्रस्तावाला अनुमती नाकारीत आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना मी विनंती करतो की, त्यांनी 15-20 मिनिटांमध्ये प्रधान समितीचा अहवाल व ए.टी.आर.हे दोन्ही अहवाल सभागृहात केव्हा सादर केले जातील याबाबत शासनाची भूमिका विशद करावी.

-------



अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ SBT/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.नारायण राणे ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 चा 28 वा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:45

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा सन 2002-2003चा द्वितीय वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : द्वितीय वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

डॉ. सुनील देशमुख (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादितचा सन 2006-2007चा 11 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : 11 वा वार्षिक अहवाल सभागृहामोर ठेवण्यात आला आहे.

---

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी "मुंबईतील पवई आणि तिरंदाज या पूर्वीच्या दोन महसुली गावांमध्ये गेल्या 3 पिढया राहणा-या आदिवासींच्या जमिनी फसवणुकीने आणि महसुली अधिका-यांच्या संगनमताने लुबाडण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी व पांडुरंग फुंडकर यांनी "विमुक्त जाती, भटक्या जमाती व मागास प्रवर्गातील अधिकारी/कर्मचा-यांच्या पदोन्नतीचा अनुशेष पूर्ण भरलेला नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर, डॉ. नीलम गो-हे, ॲड. अनिल परब व श्री. अरविंद सावंत यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कळणे येथील मेटल्स ॲण्ड मिनरल्स कंपनीने केलेल्या अंतर्गत करारानुसार शेतक-यांच्या जमिनीवर अतिक्रमण करुन सदर जमिनीवरील झाडांची अवैधरीत्या कत्तल करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविद सावंत यांनी "सन 2004 ते 2008 मध्ये पुण्यातील गणेशोत्सवाच्या काळामध्ये क्षुल्लक कारणावरुन गणेश मंडळाच्या पदाधिका-यांवर अनेक केसेस दाखल केल्या असून सदर केसेस मागे घेण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "वरवडे, जि. सिंधुदुर्ग येथील अंकुश रामचंद्र राणे हे दिनांक 17.4.2009 रोजी बेपत्ता झाल्यानंतर व त्यांचा मृतदेह आढळून आल्यानंतरही त्यांच्या मृत्यूबद्दल अद्यापही कोणताही तपास न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...3..



MSS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती....)

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल, व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र. पाटील यांनी "राज्यातील 174 माध्यमिक शाळांना 1.11.2007 च्या शासन निर्णयानुसार अनुदान पात्र घोषित करण्यात येणे, मात्र मार्च 2009 पासून सदर शाळांचे अनुदान बंद करण्यात येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व जयंत प्र. पाटील यांनी "दादर (प) येथील जैन हेल्थ सेंटर असलेली जागा, बाजूचा परिसर आणि मोकळी जागा खाजगी बिल्डरच्या घशात घालण्याचा प्रयत्न मुंबई मनपा अधिका-यांनी करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री अशोक मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे व मधुकर चव्हाण यांनी "राज्य सरकारने 15 हजार बंदुकीची काडतुसे आणि तितकेच कार्बनवर्थ खरेदी करण्याकरिता जयसन्स इंडस्ट्रीज, मुंबई यांचे सोबत करार करणे, खरेदी कलेले काडतूस बोगस निघाल्याची पोलिसांनी तक्रार करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते व चंद्रकांत पाटील, यांनी "कळणे, जिल्हा सिंधुदुर्ग येथे एका मायनिंग कंपनीची यंत्रसामुग्री अनधिकृत जागी असल्यामुळे प्रशासनाने जप्त केलेली असणे, सदर यंत्रसामुग्री मुक्त करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी दिलेल्या 93च्या सूचनांविषयी आपण पहिल्या दिवशी शासनास निवेदन करण्यास सांगितले होते. परंतु अद्याप निवेदन करण्यात आलेले नाही. अधिवेशनाचे आता दोन दिवस उरलेले आहेत. मी दिलेल्या तीन-चार सूचनांची निवेदने अजून आलेली नाहीत.

**सभापती** : मी त्याबाबतीत सूचना देतो.

...नंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**............

या अनुषंगाने सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे मी याकडे लक्ष वेधीन की, दररोज नियम 93 च्या सूचना, विशेष उल्लेख किंवा औचित्याचा मुद्दा या आयुधांच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी एखाद्या महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधले असेल तर त्याबाबत शासनाने निवेदन करण्याबाबतच्या सूचना दिल्या जातात. अशा पध्दतीने निवेदन करण्याबाबत दिलेल्या सूचना त्या त्या विभागाच्या मंत्र्यांनी तातडीने पूर्ण कराव्यात. अधिवेशनाचे आता सोमवार आणि मंगळवार हे दोनच दिवस शिल्लक आहेत. आज फक्त सात-आठ निवेदने माझ्याकडे आलेली आहेत. याच वेगाने आपण गेलो तर अनेक निवेदने, जी सभागृहात सादर होणे आवश्यक आहेत, ती होणार नाहीत. सोमवार आणि मंगळवार या दोन दिवशी, प्राथम्याने सोमवारी, जास्तीत जास्त निवेदने माननीय मंत्र्यांमार्फत बिनचूक आली पाहिजेत, अशी सभागृहाच्या माध्यमातून, सभागृहाच्या नेत्यांना मी जरुर सूचना करीन.

----------

...2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शिरंगे तालुका दोडामार्ग येथील संरक्षित वनात होणारी अवैध वृक्षतोड

**मु.शी.**: शिरंगे तालुका दोडामार्ग येथील संरक्षित वनात होणारी अवैध वृक्षतोड बाबत सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर, अरविंद सावंत, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्याबाबत आजच शासनाने दिलगिरी व्यक्त केली होती. परंतु, आताही सभागृहात नियम 93 च्या निवेदनाशी संबंधित माननीय वन मंत्री किंवा माननीय वन राज्यमंत्री उपस्थित नाहीत.

**सभापती** : काल सभागृहात हे निवेदन पुकारले होते त्यावेळी सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते म्हणून ते आज ठेवले होते. ठीक आहे. हे निवेदन सोमवारी घेण्याची व्यवस्था होईल.

त्याचप्रमाणे पुढील नियम 93 चे निवेदन सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे असून ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे हेही निवेदन सोमवारी चर्चेला घेण्यात येईल.

....3.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यातील तुळस प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिका-यांनी युवतीशी केलेले असभ्य वर्तन

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यातील तुळस प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिका-यांनी युवतीशी केलेल्या असभ्य वर्तन याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

डॉ.शोभा बच्छाव (आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले तालुक्यातील तुळस प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिका-यांनी युवतीशी केलेले असभ्य वर्तन" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

....4........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : अध्यक्ष महोदय, श्री.कांबळे नावाच्या डॉक्टरने प्रथम मालवण तालुक्यात गोळवण प्राथमिक आरोग्य केंद्रात विनयभंगाचा प्रकार केल्यामुळे त्याला जिल्हयाबाहेर काढले होते. आता परत आरोग्य विभागाच्या सचिव श्रीमती अय्यंगार यांनी ज्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा आदर्श प्राथमिक आरोग्य केंद्र म्हटले आहे त्याच प्राथमिक आरोग्य केंद्रात श्री.कांबळे यांची नेमणूक करण्यात आली आणि त्या ठिकाणी त्याने पुन्हा तोच प्रकार केला. ही परिस्थिती लक्षात घेऊन डॉ.कांबळे यांची जिल्हयाबाहेर बदली करुन त्यांना निलंबित करण्यात येईल का ?

डॉ.शोभा बच्छाव : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याअनुषंगाने ही गोष्ट बरोबर आहे की, रुग्णाशी कशा पध्दतीचे वर्तन करावे, यासंदर्भात प्रत्येक वैद्यकीय अधिका-यांसाठी एक आचारसंहिता असते. तुळस प्राथमिक आरोग्य केंद्रात जी घटना घडली आहे त्यासंदर्भात डॉ.कुलकर्णी, अतिरिक्त आरोग्य अधिकारी यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे व चौकशी सुरु आहे. डॉ.कांबळे यांनी असे कृत्य केले असेल तर निश्चितपणे त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल आणि त्यांची जिल्हयाबाहेर बदली करण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : अध्यक्ष महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातून हे डॉक्टर पुण्यात बदली होऊन आले तरी तेच करणार आहेत. त्यामुळे केवळ बदली करुन उपयोग होणार नाही. प्रश्न असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी डॉ.कांबळे यांच्यासंदर्भातील मागील घटनाही सभागृहासमोर आणलेल्या आहेत. डॉ.कांबळे यांनी पूर्वी असे प्रकार कले असतील तर त्याबाबतची नोंद त्यांच्या गोपनीय अभिलेखामध्ये असली पाहिजे. त्यामुळे ज्या डॉक्टरांचा गतइतिहास वाईट आहे, अशा डॉक्टरांवर निलंबित करण्याची कारवाई शासन करणार काय ?

सभापती महोदय, माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांनी डॉक्टारांच्या आचारसंहितेचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. राज्यातील अनेक रुग्णालयात आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात अशा प्रकारे चुकीचे, असभ्य वर्तन केल्याच्या घटना समोर येत आहेत. माननीय सर्वोच्च न्यायालयाने व महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात स्वतंत्र मार्गदर्शक तत्वे निश्चित केलेली आहेत. माननीय आरोग्य राज्यमंत्री डॉ.शोभा बच्छाव यांनी महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्ष असतांना स्वत:

....5........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.......

शासनाला शिफारशी केल्या आहेत. कामाच्या ठिकाणी होणारे महिलांचे शोषण रोखण्यासाठी प्रत्येक विभागांनी अंतर्गत समिती नियुक्त केली पाहिजे. आरोग्य विभागामध्ये महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अंतर्गत समिती नेमण्याचा निर्णय माननीय आरोग्य राज्यमंत्री घेतील का ?

डॉ.शोभा बच्छाव : सभापती महोदय, अंतर्गत समिती नेमण्याबाबत निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल. तसेच, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सांगितल्याप्रमाणे डॉ.कांबळे यांच्याकडून पूर्वी असेच गैरकृत्य झाले असल्यास त्यासंदर्भातही चौकशी करण्यात येईल, त्यांची जिल्हयाबाहेर बदली करण्यात येईल आणि चौकशीमध्ये जर ते दोषी आढळले तर त्यांना निलंबित करण्यात येईल.

यानंतर श्री.गिते.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सरकारचे या बाबतीत काय म्हणणे आहे ते निवेदनाच्या माध्यमातून आणि माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या तोंडी उत्तरातून रेकॉर्डवर आलेले आहे. आम्ही काही आरोप केला आहे अशातला भाग नाही. लक्षेवधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, वैद्यकीय अधिकारी डॉ.कांबळे यांनी एका युवतीशी अश्लिल संभाषण केल्याची बाबमी पसरल्याने जनक्षोभ होऊन संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना ग्रामस्थांना कोंडून ठेवल्याची घटना घडली. निवेदनाच्या दुस-या परिच्छेदात असे म्हटले आहे की, सदर घटनेची माहिती कळताच जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग व आरोग्य सभापती यांनी तातडीने तुळस येथे भेट देऊन झालेल्या प्रकाराबाबत ग्रामस्थांशी चर्चा केली. प्रस्तुत प्रकरणी डॉ.कांबळे, वैद्यकीय अधिकारी हे यापुढे सिंधुदूर्ग जिल्हयात राहता कामा नये अशी एकमुखी ग्रामस्थानी मागणी केली. त्यांना तेथून ताबडतोब काढले पाहिजे होते. परंतु तुम्ही त्यांना काढले नाही. ते रजेवर गेले आहेत. त्यानंतर निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, सध्या तेथील कामकाज सुरळीत चालू असूनगावातील वातावरण शांत झाले असून ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेला संताप निवळलेला आहे. अश्लिलतेचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. ठपका सिध्द होईल हा नंतरचा भाग आहे. कोर्टामध्ये बलात्काराची प्रकरणे सिध्द होण्यास कठीण जाते. शेवटी महिलांना काही मर्यादा असतात. महिलांवर अत्याचार करुनही त्या प्रकरणातील आरोपी निर्दोष सुटतात त्याला काही कारण आहे. ती कारण माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांना सांगावयास नको. ती कारणे त्यांना देखील माहिती आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांची चौकशी करण्यात येऊन ते दोषी असतील तर त्यांचे विरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात येईल. या बाबतीत माझी अशी मागणी आहे की, सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांना निलंबित करुन नंतर या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येईल काय ? कामावर असताना असे असभ्य वर्तन केले तर तातडीने निलंबित केले जाते अशा प्रकारचा महाराष्ट्रात संदेश जाऊ द्यावा. या वैद्यकीय अधिका-यांना प्रथम निलंबित करावे आणि त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करावी अशी आमची मागणी आहे.

डॉ.शोभा बच्छाव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत. याबाबतीत मी एवढेच सांगू इच्छिते की, जी महिला रुग्ण आहे तिने वा त्यांच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.शोभा बच्छाव...

नातेवाईकाने वैद्यकीय अधिका-यांच्या संदर्भात लेखी तक्रार केलेली नाही. तथापि सभागृहाच्या भावना लक्षात घेता सदर वैद्यकीय अधिका-यांना निलंबित करण्यात येईल. तद्नंतर चौकशीअंती त्यांचे विरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : माननीय आरोग्य राज्यमंत्री यांनी सकारात्मक निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

--------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सहकार पतसंस्थांचे लेखापरीक्षण शुल्क कमी करणे

**मु. शी.** : सहकार पतसंस्थांचे लेखापरीक्षण शुल्क कमी करणे याबाबत सर्वश्री. रामनाथ मोते,विनोद तावडे,संजय केळकर,मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री.रामनाथ मोते, विनोद तावडे,संजय केळकर,मधुकर चव्हाण यांनी "सहकार पतसंस्थांचे लेखापरीक्षण शुल्क कमी करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या राज्यातील हजारो पतसंस्थांच्या संदर्भातील हा विषय होता. त्यांच्या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्य मंत्री महोदय, माननीय सहकार राज्य मत्री महोदय यांचे बरोबर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. परंतु या पतसंस्थांचे प्रश्न अद्यापही मार्गी लागलेले नाहीत म्हणून नियम 93 अन्वये सूचना मी दिली होती. आम्ही नियम 93 च्या अनुषंगाने जे प्रश्न विचारले होते, त्याला अतिशय हास्स्यास्पद अशी उत्तरे देण्यात आलेली आहेत. पतसंस्थांच्या थकबाकी वसुली संबंधीचा महत्वाचा प्रश्न होता. रेकॉर्ड ऑफ राईट्ची अंमलबजावणी होत नाही यासंदर्भातील देखील आम्ही प्रश्न विचारला होता. या संदर्भात शासनाने निवेदनात असे उत्तर दिले आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे नियम 65 अन्वये सहकारी संस्थांना त्यांच्या कामकाजाच्यादृष्टीने आवश्यक असलेले रेकॉर्ड नष्ट करण्याबाबत विहित कालमर्यादा ठरवून दिलेली आहे. त्यानुसार सस्थेच्या कार्यकारी मंडळाने तसा ठराव करुन जबाबदार पदाधिकारी व अधिका-यांसमोर निबंधकांच्या परवानगीने रेकॉर्ड नष्ट करण्यात येते. याचा काही संबंध येत नाही. प्रश्न वेगळा आहे आणि उत्तर वेगळे आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. सर्वात महत्वाचा प्रश्न लेखा परीक्षण शुल्कासबंधीचा आहे. यांचे लेखा परीक्षण शुल्क आहे ते नागरी सहकारी बँकाच्या दुपटीने घेतले जात आहे. शासनाने यासंदर्भात असे म्हटले आहे की, पतसंस्थांच्या लेखापरीक्षण शुल्काबाबत वित्त विभागाच्या सहमतीने निर्णय घेण्यात येईल. हा प्रश्न विशिष्ट कालमर्यादेमध्ये सोडविला जाणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी पंतसंस्थेच्या ऑडीटच्या बाबतीत आणि ऑडीट फी च्या बाबतीत विषय उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात एक महिन्याच्या आत निर्णय घेऊ.

-------------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: प्रधान समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे

**मु.शी.**: प्रधान समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवणे यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

या अगोदर या सभागृहात आर.डी.प्रधान समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली आणि या सभागृहात अहवाल केव्हा सादर होणार अशा प्रकारची विचारपूस करण्यात आली. म्हणून मी या सभागृहात मुद्दाम सन्माननीय सदस्यांना याबाबत या सरकारची भूमिका अवगत करण्यासाठी उभा आहे.

मी सुरुवातीलाच खालच्याही सभागृहात, विधानसभेमध्ये घोषित केले होते की, शासन या अहवालाच्या अनुषंगाने जी कृती करावयाची आहे, "Action to be taken", त्या एटीआरबाबतची संपूर्ण माहिती या सभागृहाला हे अधिवेशन संपण्याच्या आत आम्ही सादर करु अशा प्रकारची घोषणा या अगोदरच मी खालच्या सभागृहात केली होती. आजही तीच भूमिका आहे. हे अधिवेशन संपण्याच्या आत एटीआरसह या सभागृहात प्रधान समितीचा अहवाल सादर केला जाईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सहकारी पतसंस्थांचे लेखापरीक्षण शुल्क कमी करणे

**मु. शी.** : सहकारी पतसंस्थांचे लेखापरीक्षण शुल्क कमी करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

(चर्चा पुढे सुरु......

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, या पतसंस्थांच्या संबंधात दोन वर्षापूर्वी आंदोलने झाली. मला मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, लेखापरीक्षण शुल्क कमी करणार आहात का? लेखीपरीक्षक नेमण्याचा त्या त्या पतसंस्थांना अधिकार देणार का? नफ्याच्या 25 टक्के गंगाजळी जिल्हा बँकांमध्ये भरावी लागते त्यामुळे पतसंस्थांना ती रक्कम कर्ज देण्यासाठी वापरता येत नाही. ही नफ्यातील गंगाजळी म्हणून ठेवावयाची रक्कम 25 टक्क्याऐवजी 10 ते 15 टक्के करणार आहात का? कर्जदार आणि ठेवीदार यांना आपण अ वर्ग सभासद करण्याची अट घातली आहे ती अट शिथील केली जाईल का?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : अनेक संस्था आज अडचणीत जात आहेत. ब व क वर्ग सभासद करुन कर्ज दिले जात असल्यामुळे संस्था अडचणीत येत आहेत. 462 पतसंस्था अडचणीत आल्याची आपणा सर्वांना माहिती आहे. त्यामुळे अ वर्ग सभासदत्वाची अट ठेवली आहे. दोन-तीन प्रश्न आहेत या संदर्भात नुकतीच माननीय सहकार मंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्यासमवेत शिष्टमंडळाने भेट घेऊन चर्चा केली. या सगळ्या विषयांच्या संदर्भात पतसंस्थांच्या कामकाजामध्ये सुधारणा करणे, ऑडिट या बाबत एका महिन्यात बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, वैद्यनाथन समितीच्या शिफारशीनुसार सहकारी पतसंस्थांचे ऑडिट करण्याचा अधिकार जनरल बॉडीला असतो. तो अधिकार शासन या सहकारी पतसंस्थांना देणार आहे का? या सभागृहात मी अनेकदा मुद्दा मांडला की, पतसंस्थांना डिपॉझिट घेण्यासाठी मर्यादा घालणे आवश्यक आहे. सध्या यावर कोणाचेही नियंत्रण नाही. रिझर्व्ह बँक किंवा सहकार खात्याचे देखील नियंत्रण नाही. 10 किंवा 5 कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम कोणत्याही पतसंस्थेला डिपॉझिट म्हणून घेता येऊ नये. याबाबत मर्यादा निश्चित करण्याबाबत शासन गंभीरपणे विचार करणार आहे काय?

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-4....

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : डिपॉझिटवर काही बंधन नाही. परंतु व्याज दिले जाते ते कमी केले. 15 ते 18 टक्क्यापर्यंत व्याज देण्याच्या नावाखाली डिपॉझिट घेतले जात होते. म्हणून व्याज दर कमी करणे आवश्यक ठरले. गंगाजळीबाबत आणि सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला, त्या जिल्हा बँकेबाबत जिल्हा बँकेच्या प्रतिनिधींना बोलावून या बैठकीमध्ये त्याचाही निकाल करण्यात येईल.

श्री.विलासराव शिंदे : पतसंस्थांच्या कर्ज वसुलीबाबत सध्या अत्यंत अडचण येत आहे. यासाठी शासनाने पोलीस संरक्षण देण्याचे यापूर्वी मान्य केले आहे. परंतु प्रत्यक्षात अर्बन बँका आणि पतसंस्था यांची कर्ज वसुली करताना संरक्षण दिले जात नाही. याबाबत शासन ठोस पावले उचलून तशा प्रकारचे पोलीस संरक्षण देणार आहे का?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, दिनांक 14.1.2008 रोजी याबाबत आदेश काढण्यात आले आहेत. एखाद्या पतसंस्थेच्या वसुलीसाठी पोलीस संरक्षणाची पतसंस्थेने मागणी केली आणि त्याची अंमलबजावणी होत नसेल तर फेरसूचना देण्यात येतील.

---

..4..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शहीद जवानांच्या शासकीय इतमामाने होणाऱ्या अंत्यसंस्काराचे वेळी शासकीय मानवंदना देण्यास झालेला विलंब

**मु. शी.** : शहीद जवानांच्या शासकीय इतमामाने होणाऱ्या अंत्यसंस्काराचे वेळी शासकीय मानवंदना देण्यास झालेला विलंब याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.नितीन राऊत (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील "यांनी शहीद जवानांच्या शासकीय इतमामाने होणाऱ्या अंत्यसंस्काराचे वेळी शासकीय मानवंदना देण्यास झालेला विलंब" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी जाणीवपूर्वक नियम 93 च्या सूचनेद्वारे हा मुद्दा उपस्थित केला आहे. विधीमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. आपल्या सीमेवर जवान रक्षणासाठी गस्त घालतात. या प्रकरणामध्ये काही जवानांचा ते गस्त घालत असताना त्यांच्या वाहनावर बर्फाचा डोंगर कोसळून मृत्यू झाला, ते शहीद झाले. निवेदनामध्ये म्हटले आहे की, ऐनवेळी कळले, विलंब झाला. सभापती महोदय, जवान शहीद झाल्यानंतर प्रत्यक्ष त्यांचे शव त्या जवानांच्या घरी येईपर्यंत 48 तासाचा अवधी लागतो. परंतु माहिती लगेच कळविली जाते. या प्रकरणात ती माहिती जिल्हा मुख्यालयाला नव्हती. रात्रीच्या वेळी शव आले.

..वाय.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .......

सकाळी 10.30 वाजता माहिती मिळाली अशा प्रकारचे बरेच लूप होल्स दिसतात. शहीद जवानाला जी मानवंदना शासनाच्या वतीने दिली पाहिजे परंतु मानवंदनेच्या बाबतीत अधिकाऱ्यांची अशा प्रकारे संवेदनहीनता असेल तर त्याची गंभीर दखल शासनाने घेतली पाहिजे. अशा प्रकारे उगाचच चुकीच्या गोष्टींना आपण पाठीशी घालतो हे योग्य नाही. म्हणून शहीद जवानांचा योग्य तो आदर ठेवलाच पाहिजे तरच त्या जवानाचे कुटुंबिय आणि ग्रामस्थांनाही विश्वास वाटेल. असे या उत्तरात कुठेही दिसत नाही. म्हणून शासन याबाबत उचित कारवाई करणार काय ?

श्री. नितीन राऊत : पोलादपूर येथील जवान श्री. राकेश सावंत हे जम्मू-काश्मिर मधील कृष्णाकाठावरील सीमेवर गस्त घालताना शहीद झाले. त्यांचा मृत्यू दि. 6.6.2009 रोजी झाला व त्यांचे प्रत त्यांचे गावी दि. 9.6.2009 रोजी सकाळी 5.30 च्या सुमारास आले. तशी सूचना पोलीस मुख्यालयाला दि. 9.6.2009 रोजी सकाळी 8.45 वाजता मिळाली आणि स्थानिक रहिवाशांनी त्यांना 10.30 वाजता अग्नी दिला आणि पोलीस मानवंदना सकाळी 10.45 वाजता दिली.

श्री. विनोद तावडे : महोदय, ज्या गावातील शहीद असेल त्या गावातील पोलिसांना समजले पाहिजे की, अशा प्रकारची घटना घडलेली आहे. तसेच मानवंदना देताना जेवढे पोलीस नियमात आहेत तेवढे नव्हते. त्यात 12 फैऱ्या आणि 21 फैऱ्या असा प्रकार असतो परंतु असे घडले नाही. म्हणून जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी जेणेकरुन जे कोणी देशासाठी प्राणाची आहुती देताा त्यांनाही वाटले पाहिजे की, आपल्याला कोणीतरी विचारतो.

श्री. नितीन राऊत : महोदय, जी माहिती पोलीस मुख्यालयाला समजली ती सकाळी 8.45 वाजता समजली आणि 9 वाजता प्रेतयात्रा सुरु झाली.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांची भावना अशी आहे की, जो सीमेवर लढणारा सैनिक असतो, शुरवीर असतो त्याची अंत्ययात्रा सुध्दा तेवढीच प्रतिष्ठेने, शासकीय इतमामाने निघाली पाहिजे. तसेच मानवंदना ज्याबरहुकूम होणे आवश्यक असते त्यादृष्टीने पुढील काळात त्याची नोंद घेण्यात यावी.

श्री. नितीन राऊत : होय, याची काळजी पुढील काळात घेण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : शहीदांना मानवंदना देण्याच्या संदर्भात जो प्रोटोकॉल ठरलेला आहे त्याचे पालन झाले पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वाशिम जिल्ह्याचा विकास आराखडा अद्यापही पुन:प्रसिध्द न होणे

**मु. शी.** : वाशिम जिल्ह्याचा विकास आराखडा अद्यापही पुन:प्रसिध्द न होणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी "वाशिम जिल्ह्याचा विकास आराखडा अद्यापही पुन:प्रसिध्द न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

यानंतर श्री. जुन्नरे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, नगरपरिषदेने कलम 37 अन्वये फेरबदलाच्या संदर्भात विनंती केलेली आहे व शासनाने 37(1)अन्वये नगरपालिकेला निर्देश देतात आणि सांगतात की, नगरपालिका यामध्ये अकार्यक्षम असल्यामुळे 37(1) (अ) मध्ये शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम 162 अन्वये अधिका-याची नियुक्ती केलेली आहे. खरे म्हणजे शासनाने 5-6 वर्षापूवी नगरपालिकेचे अधिकार काढून घेऊन ते अधिकार स्वत:कडे घेतलेले आहेत. शासनाने 162 अन्वये अधिकारी नियुक्त करुन वाशिम शहराचा एक सर्वंकष आराखडा 61 आर आणि 30 आर समाविष्ट करुन तयार करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे 90 हेक्टर जमिनीचा प्लॅन तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना एकच विनंती आहे की, ज्या प्रमाणे शासनाने 90 हेक्टरचा सर्वंकष आराखडा तयार केलेला आहे त्या प्रमाणे इतर प्रभागात, वाशिम शहरामध्ये गुंठेवारी विकास सुरु आहे. त्यामुळे यासंदर्भात स्थानिक आमदरांची बैठक घेऊन आमदारांच्या सूचना मान्य करुन त्या सूचना संर्वकषमध्ये समाविष्ठ केल्या जातील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 16.5.2000 रोजी हा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आणि सर्वंकष फेरबदलासाठी जमिनीचे स्थानमान आणि विकास क्षमता विचारात घेऊन 36(1) च्या प्रस्तावावाच्या संदर्भात निर्देश देण्यात आले होते. या प्रस्तावावर 61.91 हेक्टर क्षेत्र हे फेरबदलासाठी विचारात घेतलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांनी यामध्ये अजून काही क्षेत्र घ्यावे अशी सूचना केली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया साहेबांबरोबर एक बैठक घेऊन यामधून निश्चितपणे मार्ग काढण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "37(1) अन्वये एक सर्वंकष फेरबदल प्रस्ताव तयार करण्याबाबत निदेश 11.3.2005 रोजी वाशिम नगरपरिषदेस देण्यात आले." याचा अर्थ हा सर्वंकष फेरबदल प्रशासकीय यंत्रणेला देण्यात आले. निवडून आलेल्या नगरसेवकांना यासंदर्भातील निदेश देण्यात आलेले नव्हते. पुढे असे म्हटले आहे की, "वाशिम नगरपरिषदेने उपरोक्त शासन निदेशाची कार्यवाही न केल्यामुळे शासनाने दिनांक 8.6.2005 रोजी अधिनियमाच्या कलम 37(1)अन्वये उक्त सर्वंकष फेरबदल प्रस्तावित सूचना निर्गमीत करुन अधिनियमाच्या कलम 162(1) अन्वये सहाय्यक संचालक नगर रचना म्हणून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

नियुक्ती करण्यात आली आहे". आता माझ्यापुढे प्रश्न असा आहे की, आपले जे नियम आहेत त्यातील कोणत्या नियमानुसार आपल्याला कारवाई करता येते ? अकार्यक्षमतेचा ठपका कोणत्या नियमाने ठेवता येतो ? तसेच हा ठपका कोणावर ठेवता येतो ? याचा परिणाम त्या अधिका-याच्या सर्व्हीस बुकामध्ये केला जातो काय ? त्यामुळे यासंदर्भात शासनाने कोणाला जबाबदार धरलेले आहे ? संबंधित अधिका-याच्या अकार्यक्षमतेबद्दल आपण कोणती कारवाई केलेली आहे?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती 36(1) अन्वये शासनाने फेरबदल प्रस्ताव नगरपरिषदेला कळविला होता. यामध्ये नगरपरिषदेच्या अधिका-याने चूक केली की, जनरल बॉडीनेच ठराव केला नाही यासंदर्भातील माहिती तपासून ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. ज्यावेळेस नगरपालिका अशा प्रकारचे निदेश पाळत नाहीत त्यावेळेस 37 (1) (ख) नुसार शासन सहाय्यक संचालकाची नेमणूक करुन कारवाई करीत असते.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदन क्रमांक 7 बाबत.**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सातव्या क्रमांकावर माझे निवेदन आहे परंतु संबंधित माननीय मंत्रीमहोदय उत्तर देण्यासाठी उपस्थित नाहीत.

**सभापती** : ठीक आहे. आपले निवेदन सोमवारी घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपण आमची विनंती मान्य करुन शासनाने 9 निवेदने करावेत असे निदेश दिलेले आहेत. 2 जून, 2009 पासून आज पर्यंत एकही निवेदन आलेले नाही.

**सभापती** : सभागृहाच्या कामकाजाचे आता दोन दिवस शिल्लक राहिलेले आहेत. सोमवारी जास्तीत जास्त निवेदने कशी घेता येतील हे पाहिले जाईल.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हीच केविलवाणी अवस्था आमची आहे. तसेच आपलीसुध्दा तीच अवस्था आहे.

**सभापती** : माझी तशी अवस्था नाही.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, शासनाला वारंवार निवेदन करण्यासाठी आपल्याला विनंती करावी लागत आहे. याच कारणासाठी आम्ही सकाळी खाली बसलो होतो. सरकारला कोणत्याही कामकाजाचे गांभीर्यच राहिलेले नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, विशेष उल्लेखाच्या संदर्भात आपण आपल्या सहीने शासनाला जवळजवळ सात पत्रे लिहिली आहेत .त्याचप्रमाणे विधिमंडळ सचिवालयातील अधिकारीसुध्दा त्याबाबतीत सतत पाठपुरावा करीत असतात. परंतु त्याला जर कोणी दाद देत नसतील तर त्यांना जाणीव करुन द्यावी एवढेच आमचे म्हणणे आहे.

**सभापती** : मघाशी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री येथे उपस्थित असतांना सभागृहाच्या माध्यमातून मी त्यांना आठवण करुन दिलेली आहे. तसेच केवळ नियम 93 च्या सूचनेच्या बाबतीतच नव्हे तर विशेष उल्लेखाच्या सूचना आणि अन्य सूचनांच्या बाबतीत त्वरित निवेदन करण्यात यावे अशी सूचना मी आपल्या समोरच दिली आहे. या व्यतिरिक्त हे अधिवेशन संपल्यानंतर मुख्य सचिवांना बोलावून माझ्या दालनात मी एक बैठक घेणार आहे.

श्री.दिवाकर रावते : त्यामुळे काय होणार आहे. ? मी आपल्याला अत्यंत नम्रपणे सांगतो की,हे शेवटचे अधिवेशन आहे याची जाणीव सर्वांनाच आहे. त्यानंतर निवडणुका होणार आहेत . निवडणुका नंतर नवीन सरकार येणार आहे. ते सरकार कोणत्याही पक्षाचे असू शकेल परंतु त्यावेळी आपण येथे असणार की नसणार, आपण येथे बसणार आहोत किंवा नाही हे कोणीही सांगू शकत नाही त्यामुळे त्यासंबधी आपल्याला कोणत्याही प्रकारचे उत्तरदायित्व नाही असे त्यांना वाटते. त्यामुळे अधिवेशनातील शेवटचे दोन दिवस कसे तरी ढकलावयाचे असेच त्यांना वाटत आहे. सभापती महोदय, निवेदने लवकर यावीत यासाठी आपण सर्व प्रयत्न कराल. निवडणुकीनंतर कोणतेही सरकार आले तरी सुध्दा सभापती पदावर आपण राहणारच अहात. या संदर्भात आपण काही निष्कर्ष काढणार आहात आणि तंबी देणार आहात परंतु नवीन सरकार आल्यानंतर ज्यांचा त्यामध्ये काहीही दोष नाही अशा व्यक्तिंना तंबी देण्याची वेळ येईल आणि आताचे सगळेजण सुटून जातील. या दोन दिवसामध्ये जी काही समज द्यावयाची आहे ती यांनाच द्यावी.असे माझे म्हणणे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

आहे. मघाशी असे सांगण्यात आले होते की, कर्मचा-याकडून काही चूक झाली की त्याची नोंद सर्व्हिस बुकमध्ये घेण्यात येते.परतु आताचे जे मंत्री आहेत त्यांच्या सर्व्हिस बुकमध्ये आपण नोंद करावी म्हणजे ती नोंद आम्हाला लोकांना दाखवता येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, या दृष्टिकोनातूनच मी मघाशी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना आपल्यासमोरच सांगितले होते. तेव्हा सबंधित मंत्री महोदय ही सूचना काटेकोरपणें पाळतील अशी माझी अपेक्षा आहे व त्यामुळे सोमवारी, मंगळवारी जास्तीत जास्त निवेदने येतील .

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नव्या मुंबईसाठी जमीन दिलेल्या भूमिपुत्रांनी वाढीव एफ.एस.आय. मिळण्याची केलेली मागणी

**मु. शी.** नव्या मुंबईसाठी जमीन दिलेल्या भूमिपुत्रांनी वाढीव एफ.एस.आय. मिळण्याची केलेली मागणी यासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे,वि.प.स. दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधान सभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" नवी मुंबई शहराची आखणी व बांधणी करतांना सिडकोने सन 1970 मध्ये सुमारे 95 गावांची जमीन संपादन करणे, जमिनी संपादित करतांना प्रत्येक गावांच्या गावठाण जमिनी पडून राहणे, प्रकल्पग्रस्तांना नियमाप्रमाणे 12.5 टक्के भूखंड न देता 8.75 टक्के भूखंड देणे परिणामी रिकाम्या गावठाण जमिनीवर स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी नियोजन न करता घरे बांधलेली असल्याने रस्ते अतिशय अरुंद असणे त्यामुळे वाहनांची वाहतूक देखील न होणे, परिणामी तेथील लोकवस्तीमध्ये सर्वच नागरी सोयी सुविधांचा अभाव असणे, आजूबाजूच्या परिसराचा विकास होऊनही अद्याप तेथील गावठाण भागाचा विकास न होणे, तेथील मूळ जमीन मालक भूमिपूत्रांना 3.5 वाढीव एफ.एस.आय. देऊनही जमिनीचा विकास करण्यासाठी स्थानिक भूमिपूत्र नागरिकांनी सिडकोकडे मागणी करणें, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

श्री.हसन मुश्रीफ ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** :: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4...





**- निवेदना नंतर -**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सर्व प्रथम मी आपले अभिनंदन करीत आहे. गेल्या पाच वर्षापासून प्रकल्प ग्रस्तासंबंधीचे तसेच भूमिपूत्रासंबंधीचे प्रश्न सभागृहात मांडल्यानंतर आपण नेहमीच त्यांना न्याय दिलेला आहे. आपण आदेश दिल्यामुळे त्यांचे अनेक प्रश्न सुटलेले आहेत आजसुध्दा ही लक्षवेधी सूचना स्वीकारल्याबद्दल सर्व प्रकल्पग्रस्ताच्या वतीने मी आपले अभिनंदन करते.

सभापती महोदय,वेगवेगळी आयुधे वापरुन या सभागृहामध्ये मी लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेखाची सूचना मांडून प्रकल्पग्रस्ताचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की," शासनाने त्यांना साडेबारा टक्के भूखंड दिलेला आहे. त्याचबरोबर सिडकोच्या निधीतून त्या ठिकाणी रस्ते,गटार इत्यादीची कामे केली जातात. सिडकोने चांगले नियोजन केलेले आहे हे मला मान्य आहे. त्या ठिकाणी आय.टी.पार्क, मोठी हॉटेल्स आणि हॉस्पिटल्स आलेली आहेत. त्याबद्दल मला काहीही म्हणावयाचे नाही परंतु त्या जमिनीचे जे मूळ मालक आहेत त्याच्या बाबतीत काय केले आहे ? याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. त्या ठिकाणी सेव्हन स्टार्स हॉटेल येणार असल्यामुळे त्यांना साडे तीन एफएसआय दिला आहे. आयटी पार्कला 3 एफएसआय दिला आहे. अशा प्रकारे निरनिराळया विकासकांना जास्त एफएसआय देण्यात आला आहे परंतु मूळ मालकांना मात्र दीड एफएसआय दिला आहे. प्रत्येक कुटुंबातील व्यक्तिची संख्या आता वाढलेली आहे. 1970 साली ज्यांनी सिडकोला जमिनी दिल्या त्यांची चौथी् व पाचवी पिढी आता तेथे राहत आहे.

नंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे . . . .

गरजेपोटी बांधलेली घरे सुध्दा कायम स्वरुपी करीत नाहीत. माजी मुख्यमंत्री माननीय श्री.विलासरावजी देशमुख यांच्याकडे देखील प्रस्ताव सादर करण्यात आला होता, तो त्यांच्याकडे आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे, यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, लोकांनी गरजेपोटी बांधलेली घरे केव्हा कायम करणार आहात ? आम्ही यासाठी अल्प दर देखील देण्यास तयार आहोत. ही घरे मोफत द्यावी असे आमचे म्हणणे नाही. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, ही घरे अल्प दर घेऊन कधी कायम स्वरुपी केली जाणार आहेत ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांकडे या घरांच्या संबंधातील प्रस्ताव सादर करण्यात आला होता.तो किती दिवसामध्ये मंजूर करण्यात येणार आहे ? तसेच नवी मुंबईतील मूळ भूमिपूत्रांना, विकासकाला नव्हे 3.5 एफ.एस.आय. देणार आहात काय ? आपल्याला जर यासंदर्भात बैठक घ्यावयाची असली तरी आम्हाला अधिवेशन काळामध्ये यासंबंधातील उत्तर मिळावयास पाहिजे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 1970 मध्ये नवी मुंबईच्या प्रकल्पबाधितांसाठी एकूण 95 गावांची जमीन संपादन करण्यात आली. त्या 95 गावांतील गावठाण वगळून त्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या. त्यावेळी आपण त्यांना विकसित केलेला साडेबारा टक्के भूखंड देण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे टाईम बाऊंड प्रोग्रॅम आखून भूखंड देण्याचा कार्यक्रम सुरु आहे. जी गावठाणे होती, त्याला नियोजन नाही. तेथे रस्ते नाहीत, गटारे नाहीत, त्यामुळे आता त्यांना 1.5 इतके चटई क्षेत्र अनुज्ञेय आहे. पण जर 3.5 चटई क्षेत्र दिले तर त्या गावातील पायाभूत सुविधांच्या बाबतीत काय होणार ? त्यांना नागरी सुविधा कशा देणार ? हा प्रश्न आहे. त्यांची गावठाणातील घरे नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तो माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. त्याबाबतीत ताबडतोब एक बैठक बोलावून, त्यावेळी सन्माननीय सदस्यांनाही बोलाविण्यात येईल आणि त्यावेळी नवी मुंबईतील या 95 गावांचे जे काही प्रश्न असतील ते सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करु.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मला असे वाटते की, माननीय मंत्री महोदयांना प्रश्न समजला नाही.याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी विचारले की,शासन

. . . .2बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

साडेबारा टक्क्यातील जमिनीचा एफ.एस.आय.वाढवून देणार आहे काय ? साडेबारा टक्क्याच्या गावठाणाचे प्लॉटस् प्रकल्पग्रस्तांना दिले जातात. त्याठिकाणी सिडको रस्ते, पाणी, वीज इ.सुविधा जाणुनबुजून उपलब्ध करुन देत नाही. तशा प्रकारे सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संबंधात निर्णय राज्य शासन सिडकोला निर्णय घ्यावयास सांगणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे या मला अनेक वेळा भेटलेल्या आहेत आणि त्यांचा गावठाणाच्या बाबतीत, तेथील घरे नियमित करण्याच्या बाबतीत मुद्दा आहे. याठिकाणी चटई क्षेत्राच्या बाबतीत सांगण्यात आले. साडेबारा पैकी 8.75 टक्के त्याला जात आहे आणि बाकीचे सगळे इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये जात आहे. त्याला आपण 1.5 इतके चटई क्षेत्र दिलेलेच आहे. पण सन्माननीय सदस्यांचा मूळ गावठाणाच्या बाबतीत जो विषय आहे, तो मी लवकरात लवकर बैठक धेऊन सोडवतो.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मूळ गावठाणाचा विकास करण्यासाठी बरेच लोक येतात.पण जर तुम्ही एफ.एस.आय. वाढवून दिला तर विकासकांना तेथे विकास करणे सोपे जाईल. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, तेथे आय.टी.पार्कसाठी एफ.एस.आय.दिला आहे. त्याप्रमाणे आय.टी.पार्क बांधलेले आहे, परंतु विकासकाने ते संपूर्ण विकले आहे. शिवाय आय.टी. पार्कच्या नावावर 3 एफ.एस.आय.घेतला. तसेच श्री.नवीन शहा हे मोठे हॉटेल बांधत असून त्यांना देखील 3.5 एफ.एस.आय.दिला. अशा वेळी जर भूमीपूत्राला देखील एफ.एस.आय.वाढवून दिला तर विकासक त्या गावाचे मूळ स्वरुप बदलून तेथील लोकांना रस्ते, पाणी इ.सुविधा उपलब्ध होऊ शकतील. पण आज अशी स्थिती आहे की, त्या भागामध्ये अरुंद रस्ते असल्यामुळे आग लागली तर बंब जाऊ शकत नाही, ॲम्ब्युलन्स जाऊ शकत नाही, प्रेतयात्रा देखील काढता येत नाही. तेव्हा माझी अशी विनंती आहे की, जे मूळ मालक आहेत, त्यांना एफ.एस.आय.वाढवून देण्यात यावा.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी याबाबतीत सांगितले की, आपण एक बैठक घेऊन यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊ.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, आपण साडेबारा टक्के आणि एफ.एस.आय.अशा पध्दतीने जमीन देणार आहात काय ? ही मूळ प्रश्नाच्या संदर्भातील महत्वाची बाब आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आपण 1.5 इतका एफ.एस.आय.दिलेलाच आहे. नवीन देणे अनुज्ञेय नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबईमध्ये झोपडपट्टी बेसुमार वाढली आणि मग ती परिस्थिती हाताबाहेर गेली. म्हणून एस.आर.ए.योजने अंतर्गत एफ.एस.आय.दिला, तो नियमित करीत आहोत. याठिकाणी ठाण्यातील एक प्रकरण मांडण्या आले होते, त्यावर सदनामध्ये चर्चा झाली. तेथील सगळया इमारती बेकायदेशीरपणे बांधलेल्या आहेत, पण त्या आता तोडता येत नाहीत. आता या इमारती पडावयास आल्या आहेत. म्हणून आपण त्यांचा एफ.एस.आय.2.5 इतका केला, म्हणजे ठाणे बेकायदेशीर लोकांना 2.5 एफ.एस.आय.दिला आणि ते बरोबर केले आहे. कारण ज्यांनी या इमारती बांधल्या ते लोक बदमाश होते. तेथे जागा घेणाऱ्यांचा काही दोष नाही. त्यामुळे ज्यांनी तेथे घरे घेतलेली आहे, तेथील कुटुंबे उध्वस्त व्हावयास नको म्हणून त्याबाबतीत विचार करुन तुम्ह निर्णय घेतला. या सदनामध्ये उल्हासनगरच्या संदर्भात दोन तास चर्चा सुरु होती.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.. 13:25

श्री. दिवाकर रावते....

श्री. मोडक त्यावेळी उपस्थित होते. उल्हासरनगरचा तो प्रश्न होता. त्याठिकाणी रस्ते वगैरे सगळे बांधले होते. कोर्टाने आदेश देऊन 900 इमारती पाडा असे संगितले. ते काम अद्याप झालेले नाही. त्यासंदर्भात या सभागृहात एक विधेयक आणण्यात आले. म्हणजे बेकायदेशीर बांधकाम पाडता येत नसेल तर ते रेग्युलराईल करण्यासाठी काय करता येईल यासंदर्भात एक कायदा करण्यात आला. सभापती महोदय, याठिकाणी ही परिस्थिती निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी भुमिपूत्रांचा प्रश्न या याठिकाणी मांाडला आहे. ज्यांच्या जमिनीवर नवीन मूंबई विकसित झाली. ज्यांच्या जमिनीवर आज 3.5 एफ.एस.आय. देण्यात येत आहे, ते ठीक आहे. त्याबद्दल सन्माननीय सदस्यांची तक्रार नाही. कारण तुमच्या विकासामध्ये ते बसते. त्या ठिकाणी आय.टी.पार्क हे सगळे केले पाहिजे. पण हे भुमिपूत्र ज्या ठिक्राणी रहातात त्याठिकाणी चिंचोळया गल्ल्या आहेत. त्यांनी त्यांचे हे सगळे काढावे आणि बेकायदेशीर बांधावे अशी शासनाची इच्छा आहे काय? त्यांनी ते सगळे काढावे, बेकायदेशीर बांधावे, मग लोकप्रतिनिधीनी शासनाकडे यावे, मागणी करावी मग शासन एफ.एस.आय.वाढवून देणार, असे काही आहे काय? या ठिकाणी जी सगळी गावठाणे आहेत, त्यांच्या जीवावर ही नवी मुंबई उभी राहिली आहे. त्यांच्या जमिनी शासनाने घेतलेल्या आहेत. आता त्यांचे घर हाच त्यांचा आधार राहिलेला आहे. त्यांच्या उपजीविकेचे साधन असलेली शेती गेलेली आहे.हा विषय आहे. शासनाने त्यांना किमान चटई निर्देशांक वाढवून दिला पाहिजे. महानगरपालिका कायद्यातील कलम 339 अन्वये मुंबईमध्ये क्लस्टर डेव्हलपमेंन्टचा फॉर्म्युला आणलेला आहे. सगळे एकत्र आले तर आम्ही चार एफ.एस.आय.देऊ. नाहीत तर त्याठिकाण एुफ.एस.आय. 2.5 आहे, तो कमी आहे. तो तीन ते साडे तीन करावयाचा आहे. पण अशाच प्रकारे या गावठाणाला चटईनिर्देशांक वाढवून दिला पाहिजे. त्यां ठिकाणी 1.5 देण्यात आलेला आहे तो 2 पर्यंत करण्यात यावा किंवा त्यांची जी मागणी असेल त्याप्रमाणे तो करण्यात यावा, पण तो अशा पध्दतीने देण्यात यावा की, त्या गावठाणाचा विकास होईल आणि भविष्यात ती गावठाणे सुध्दा नवीन मुंबईच्या योग्यतेप्रमाणे विकसित होतील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, गावठाणाच्या जमिनीवरचे अतिक्रमण नियमित करण्याचा प्रस्ताव शासनाकडे आहे. या गावठाणाला एफ.एस.आय. वाढवून द्यावा, अशी सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे. बैठकीमध्ये या दोन्ही विषयाचा विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

## लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्याबाबत

**सभापती** :लक्षवेधी सूचना क्रमांक 2 च्या याबाबतीत सामान्य प्रशासन विभाग व विधी व न्याय विभाग या दोन्ही विभागांच्या मंत्रिमहोदयांनी मला विनंती केली होती. त्याबाबतीत मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुडकर यांनाही कल्पना दिली होती. त्याप्रमाणे ही लक्षवेधी सूचना सोमवार, दिनांक 15 जून, 2009 रोजी घेण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

**पृ. शी.** : नागपूर येथील शासकीय दूध योजना कार्यालयातील रोजंदारीवरील शेकडो कामगारांना शासन सेवेत कायम करणे.

**मु. शी.** : नागपूर येथील शासकीय दूध योजना कार्यालयातील रोजंदारीवरील शेकडो कामगारांना शासन सेवेत कायम करणे यासंबंधी सर्वश्री अरविंद सावंत,दिवाकर रावते,गोपीकिसन बाजोरिया, परशुराम उपरकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" नागपूर येथील शासकीय दूध योजना कार्यालयातील गेली 20 ते 25 वर्षे रोजांदारीवर शेकडो कामगार काम करीत असून त्यांना शासन सेवेत कायम करावे म्हणून वेळोवेळी व सातत्याने निवेदन देऊन पाठपुरावा करणे, शासकीय दूध योजना नागपूर येथील रोजंदारी कामगारांचा विधानपरिषदेत हा विषय दिनांक 27 डिसेंबर,2008 रोजी उपस्थित केला असताना राज्यमंत्री,दुग्धविकास यांनी नागपूर दुग्धविकास योजनेतील रोजंदारी कामगारांना तीन महिन्याच्या आत कायम करुन कामावर घेण्यात येईल, अशी सभागृहात केलेली घोषण त्यानंतर रोजंदारी कामागारांचा प्रस्ताव शासनाकडे दुग्धविकास आयुक्तांनी सादर केलेला असून तो प्रस्ताव मंत्रालय पातळीवर आज सहा महिने निर्णयासाठी प्रलंबित असणे, सदर कामगारांना कामावर कायमस्वरुपी नेमण्याबाबत औद्योगिक न्यायालयाने दिलेला निर्णय, त्याविरुध्द राज्य शासन उच्च न्यायालयात गेले असताना उच्च न्ययालयाने खालच्या कोर्टाचा निर्णय कायम केला, सदर प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले असताना सर्वोच्च न्यालयानेही निर्णय कायम ठेवला, नागपूर शासकीय दूध योजनेतील सर्व उर्वरित रोजंदारी कामगारांना शासकीय सेवेत कायम करण्यास निर्णय त्यांची अंमलबजावणी पाच महिने झाली नसल्याने तेथील कामगारांत पसरेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता. "

13-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील( दुग्धविकास मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : कोर्टात काय गेले आहे, काय गेले नाही याचा उहापोह आम्ही केलेला आहे तसेच या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये देखील करण्यात आलेला आहे. शेवटी हा प्रश्न 108 रोजंदारी कामागारांपुरताच मर्यादित आहे. त्या डेअरीमध्ये हजारो कामगार आहेत. शसनाने निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "या 208 रोजंदारी कामगारांना नियमित करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे." अशा प्रकारे या ठिक्राणी सांगितलेले आहे परंतु याबाबतीत खात्रीलायक एका शब्दात सांगावे की, या बाबतीत शासन निर्णय घेणार आहे. मग तो कधी घेण्यात येणार आहे ते सांगावे. मग त्यापुढचा प्रश्न मला विचारता येईल. मला माहीत आहे याबबतीत माननीय मंत्रिमहोदयांचा प्रसताव तयार झालेला आहे. पण शासन या ठिकाणी रेकॉर्डवर काय आणणार आहे याला महत्व आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

मला श्री. विलासराव पाटील-उंडाळकर यांनी येऊन सांगितले की, आपण एवढे भावनात्मक पत्र दिलेले आहे. ते स्वत: मला भेटावयास आले. स्वत: अध्यक्ष या ठिकाणी आले आणि त्यांनी सांगितले की, याचा निर्णय घेतलेला आहे आणि त्यांना पेन्शन मिळेल. त्या कामगारांचे वय 80-90 वर्षे आहे. त्या पत्रात माझे शेवटचे शब्द असे होते की, आपल्या वयाच्या अंतामध्ये अस्ताला जात असताना मागे वळून पाहताना किमान माझा पेन्शनचा हक्क मिळाला असे समाधान त्यांना मरताना मिळू द्या. पेन्शन म्हाडा देणार तसेच निधीही त्यांचाच होता. त्यामध्ये सरकारचे काही नाही. दिलेले आश्वासन पाळले गेले नाही. त्या वयोवृध्द कर्मचाऱ्यांची संख्या कमी होत आहे आणि कालांतराने ते संपणार आहेत. या सभागृहामध्ये निर्णय घेतल्यानंतर सुध्दा ते घडत नाही हा अनुभव लक्षात घेऊन तो लढा मी अजून लढत आहे.म्हणून मी विनंती करतो. आपण निर्णय घेत आहात असे सांगितले त्याप्रमाणे ते करावे. हे फक्त या ठिकाणी नोंदवावे म्हणून मी आपल्याला विनंती करीत आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 व 5 बाबत**

**सभापती** : यानंतर लक्षवेधी सूचना क्रमांक 4 घेण्यात येईल्.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेशी संबंधित माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत. आताच काही वेळापूर्वी सभागृहात माफी मागण्यात आली. हे आज दुसऱ्यांदा झाले आहे. संबंध नसताना मघाशी एका माननीय मंत्रिमहोदयांनी सरकारची सगळी जबाबदारी घेतली. मी म्हणजे सरकार अशा पध्दतीने ते बोलले. ते असे म्हणाले की, ही माझी जबाबदारी आहे आणि यापुढे असे होणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : पाचव्या लक्षवेधी सूचनेशी संबंधित मंत्री सुध्दा उपस्थित नाहीत.

**सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 5 पुढे ढकलण्यात आलेली आहे. पाचव्या लक्षवेधी सूचनेचा क्रम आल्यानंतर मी ते सांगणार होतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 4 शी संबंधित माननीय मंत्रिमहोदय श्री. राजेश टोपे सभागृहात उपस्थित झालेले आहेत. ते नेहमी उपस्थित असतात. त्यामुळे मी माझे म्हणणे मागे घेतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया विभाग बंद होण्याच्या मार्गावर असणे

**मु. शी.** : कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातील हृदय शस्त्रक्रिया विभाग बंद होण्याच्या मार्गावर असणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयातील (सी.पी.आर) हृदयशस्त्रक्रिया विभाग सन 2001 मध्ये सुरु होणे गेली आठ वर्षे कोल्हापूर तसेच सांगली, सातारा व कोकणातील हृदयरोग असणाऱ्या रुग्णांना हा विभाग वरदान ठरल्याने दारिद्र्य रेषेखालील रुग्णांवर हृदयाच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत व इतरांसाठी कमी खर्चात शस्त्रक्रिया होणे, सदर विभाग बंद होण्याच्या मार्गावर असणे, प्रशासन जाणीवपूर्वक सदर विभागांकडे दुर्लक्ष करित असणे, या विभागात कर्मचाऱ्यांची संख्या कमी असणे, प्राथमिक सुविधा उपलब्ध नसणे, या विभागांसाठी लागणारे साहित्य पुरविण्यात न येणे तसेच संबंधित रुग्णांलयातील तृतीय व चतुर्थ कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे डॉक्टरांच्या कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होत असल्यामुळे गोरगरीब रुग्णांची होणारी अत्यंत गैरसोय परिणामी सर्व सामान्य जनतेमध्ये पसरलेले तीव्र संतापाचे वातावरण, याप्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. राजेश टोपे ( वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कोल्हापूर येथील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयामध्ये 2001 साली हृदय शस्त्रक्रिया विभाग सुरु केला तेव्हापासून त्या विभागामध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा तसेच कोकण या भागातील गरीब रुग्णांना, दारिद्र्यरेषेखालील रुग्णांना मोफत आणि काही लोकांना स्वस्त दरात हृदय शस्त्रक्रिया करुन मिळाल्या. परंतु गेल्या वर्षभरामध्ये हा विभाग बंद करण्याच्या हालचाली सुरु झालेल्या आहेत. हा विभाग सुरु झाल्यापासून दारिद्र्य रेषेखालील तसेच गरीब रुग्णांना जो फायदा मिळाला तो बंद होण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. म्हणून मी या लक्षवेधी सूचनेव्दारे माननीय सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. एका अर्थाने अतिशय महत्वाचा असणारा हा विभाग बंद करण्याचा विचार शासन करीत आहे काय ? दुसरा प्रश्न असा की, काळाच्या ओघात त्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांची किंमत कमी झालेली आहे. 2001 साली साधनांचा जो दर होता तो दर कमी झाल्यामुळे सरकार शस्त्रक्रियेचा दर कमी करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून कोल्हापूरच्या हॉस्पिटलच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न असा उपस्थित केला की, तो विभाग बंद करणार काय ? तो विभाग अजिबात बंद करण्याचा विचार नाही. मी या ठिकाणी आकडेवारी सुध्दा सांगू शकतो. त्या ठिकाणी 2008-09 मध्ये जी एकूण प्रोसीजर झालेली आहे त्यामध्ये ऑपरेशन आणि ॲजिओग्राफी, अँजिओप्लास्टी असेल त्याची संख्या 1080 होती. 2007-08 मध्ये 1082 व 1006-07 मध्ये 1023 एवढी संख्या होती. हा जो काही प्रोसीजरचा भाग आहे त्यामध्ये दरवर्षी बऱ्यापैकी संख्या आहे आणि यावर्षी सुध्दा तीच संख्या आहे. परंतु ही गोष्ट नक्की आहे की, त्या ठिकाणी जे ऑपरेशन केले जातात ते ऑनररी डॉक्टर्सच्या माध्यमातून केले जातात आणि ऑनररी डॉक्टरचा अर्थ असा की, त्या ठिकाणी फुलफ्लेज डॉक्टर्स नाहीत. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभाग त्याबाबत निश्चितपणे विचार करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

सीव्हीटीएस डिपार्टमेंट आहे, त्या डिपार्टमेंटला फुलफ्लेज काम करण्याच्या दृष्टीने किंवा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करण्यासाठी साधारणपणे 102 पदे लागतात. 102 पदे मंजूर करुन घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे. ही 102 पदे मंजूर झाल्यानंतर तेथे फुलफ्लेज विभाग सुरु होईल, त्यात स्वत:चे सर्जन असतील, पूर्ण नर्सिंग स्टाफ असेल. पॅरा मेडिकल स्टाफ असेल, हे सर्व उपलब्ध झाल्यानंतर आज जी अडचण येते ती येणार नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : आजकाल साधनांचे दर कमी झालेले आहेत. त्यामुळे शस्त्रक्रियेचे दर कमी केले जातील काय ?

श्री.राजेश टोपे : त्या रुग्णालयात शस्त्रक्रिया केल्या जातात. या शस्त्रक्रियांचा खर्च 2-3 मार्गाने मिळणा-या निधीतून केला जातो. जीवनदायी योजना किंवा एनजीओकडून मिळणा-या निधीतून या शस्त्रक्रिया केल्या जातात. दराच्या संदर्भातील बाब आरोग्य विभागाकडे आहे. सन्माननीय सदस्यांनी दरासंबंधी उपस्थित केलेला मुद्दा तपासून घेऊन सहानुभूतिने विचार करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, किती कालावधीमध्ये स्टाफ देऊन हॉस्पिटल सुरु करणार ते सांगावे.

श्री.राजेश टोपे : सध्याचे ते सर्व्हिस सेंटर आहे. त्याठिकाणी केवळ 24 कर्मचारी काम करीत आहेत. तरीही तेथे दररोज शस्त्रक्रिया केल्या जातात. त्याठिकाणी फुलफ्लेज हॉस्पिटलच्या स्टॅण्डर्डप्रमाणे स्टाफ नेमावा लागतो. यासाठी लागणा-या कर्मचा-यांची पदे लवकरात लवकर मंजूर करुन हॉस्पिटल फुलफ्लेज सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.विलासराव शिंदे : या हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्याची सुरुवात झाल्यापासून या हॉस्पिटलचा नावलौकिक सुरु झाला होता. परंतु अलिकडच्या काळात तशी वस्तुस्थिती राहिलेली नाही. या हॉस्पिटलमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून शस्त्रक्रिया व्हाव्यात अशी अपेक्षा असते. पण तसे घडत नाही अशा बातम्या पसरत आहेत. ही वस्तुस्थिती आहे की नाही ते सन्माननीय मंत्री महोदयांनी तपासून पहावे. तेथे नवीन डॉक्टरांकडून एनजीओप्लास्टी केली जाते अशाप्रकारची

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विलासराव शिंदे....

माहिती पसरलेली आहे. त्यामुळे सामान्य गरीब माणूस तेथे शस्त्रक्रिया करण्यासाठी जात नाही. त्या भागातील रुग्ण बेळगावमध्ये जातात. अशा परिस्थिती शासन काय करणार आहे त्याची माहिती देण्यात यावी.

श्री.राजेश टोपे : त्याठिकाणी ऑनररी डॉक्टरांकडून सेवा दिली जाते. ऑनररी डॉक्टर तज्ज्ञ असतात. काही ऑनररी डॉक्टर मुंबईहून येऊन शस्त्रक्रिया करतात. तेथे असिस्टंण्ट सर्जनही असतात. या ऑनररी डॉक्टर्सकडून लॉंग टर्म शस्त्रक्रिया केल्या जातील असे नाही तर तेथे स्वत:चे मेडिकल कॉलेज असेल, स्वत:चा नर्सिंग स्टाफ असेल, पॅरा मेडिकल स्टाफ असेल अशी व्यवस्था करुन तेथे तत्पर सेवा देऊन जास्तीत जास्त शस्त्रक्रिया केल्या जातील. तसेच जीवनदायी या योजनेतून अधिक बजेट उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केले जातील. तेथील हॉस्पिटलमधील इक्विपमेंटच्या दुरुस्तीसाठी किंवा नवीन विकत घेण्यासाठी निधीची आवश्यकता असते तो देखील देण्याचा प्रयत्न केला जाईल.

------

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 5 पुढे ढकलण्याबाबत**</u>

**सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवरील क्रमांक 5 वर दाखविलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे**

**सभापती** : औचित्याचे मुद्दे शुक्रवारी घेण्यात येतात. परंतु आज 2-3 सन्माननीय सदस्यांना महत्वाच्या विषयासंबंधी औचित्याचे मुद्दे मांडण्यास मी परवानगी देत आहे. त्यांनी ते मांडावेत.

यानंतर श्री.शिगम....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगली मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. या राज्याला सानेगुरुजींची फार मोठी परंपरा आहे आणि ही सानेगुरुजींचीपरंपरा असल्यामुळे या महाराष्ट्रामध्ये शिक्षकाला अत्यंत मानाचे स्थान आजही समाजामध्ये आहे. शिक्षकाबद्दल आदर, आपुलकी आणि जिव्हाळा आजही शहरी भागात आहे. त्याही पेक्षा ग्रामीण भागामध्ये तो फार मोठ्या प्रमाणावर आहे. काल "मास्तर एके मास्तर" या नावाचा चित्रपट प्रदर्शित झालेला आहे. हा चित्रपट सेन्सॉर बोर्डासमोर गेल्यानंतर सेन्सॉर बोर्डाने चित्रपट प्रदर्शित करण्यास नकार दिला. पुढे याबाबतीत काय घडले हे मला माहीत नाही. परंतु हा चित्रपट प्रदर्शित करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. या चित्रपटाचे कथानक, त्यातील प्रसंग, शिक्षकाबद्दल घेतलेली भूमिका, शिक्षकांचा अवमान करणारी आक्षेपार्ह दृश्ये यामुळे हा चित्रपट प्रदर्शित करण्यास न्सेन्सॉर बोर्डाने नकार दिलेला आहे. या चित्रपटामध्ये शिक्षकांचे विकृत असे चित्रिकरण करण्यात आलेले आहे. प्रौढ शाळेचे शिक्षक मटका खेळतात, दारुची दुकाने चालवितात अशी दृश्ये दाखविण्यात आलेली आहेत. इतकेच नाही तर स्वातंत्र्य सैनिकांचा अवमान करणारी दृश्ये देखील दाखविलेली आहेत. असा हा शिक्षकांची बदनामी करणारा चित्रपट असून काल पासून हा चित्रपट प्रदर्शित झालेला असल्यामुळे अनेक प्रकारची आंदोलने सुरु झालेली आहेत. काल कोल्हापूर येथील पद्मा सिनेमागृहात सुरु असलेल्या या चित्रपटाचा खेळ त्या ठिकाणच्या लोकांनी बंद पाडलेला आहे. या चित्रपटामुळे नागरिकामध्ये उद्रेक होण्याची शक्यसता आहे. तेव्हा या चित्रपटाच्या बाबतीत पुनश्च पडताळणी होऊन तो चित्रपट आक्षेपार्ह असेल तर त्याबातीत योग्य ती दखल घेण्याची आवश्यकता आहे. तेव्हा अशा प्रकारच्या चित्रपटामुळे या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था अडचणीत येणार नाही या दृष्टीने शासनाने तातडीने गंभीर दखल घ्यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी "शिक्षक एके शिक्षक" या चित्रपटाच्यो अनुषंगाने या ठिकाणी ज्या पध्दतीने विचार मांडले त्यानुषंगाने त्या चित्रपटाची पाहणी व्हावी, तपासणी व्हावी यासाठी आपण सांस्कृतिक मंत्री महोदयांना सांगावे.

श्री. रविशेठ पाटील : होय. ---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील कळणे येथील गावातील जनसुनावणीमध्ये शंभर टक्के लोकांनी खनिज उत्खननास विरोध केला असताना खनिज उत्खननाचे काम चालू असल्यामुळे गावातील लोकांनी आंदोलन केले. या आंदोलनानंतर एका सुरक्षा रक्षकाचा मृत्यू गावापासून दूर अंतरावर झाला. असे असताना गावातील आंदोलनकर्त्यांवर 302 कलमाखाली गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. सर्व्हे नं.160 येथे 144 कलम लावलेले असताना तसेच मशिन्सच्या सहाय्याने उत्खनन चालू असताना गावातील लोकांनी आंदोलन केले व त्यावेळी पी.एस.आय. श्री. देशमुख यांनी 60 वर्षाच्या निवृत्त पोलीस कर्मचा-याच्या थोबाडीत मारले. तसेच महिलांना धक्काबुक्की केली, त्या ठिकाणी बंदोबस्तासाठी महिला पोलीस नवहत्या. याबाबतीत पोलीस स्टेशनवर तक्रारही दाखल करुन घेण्यात आली नाही. तेव्हा या प्रकरणी गावक-यांची तक्रार नोंदवून घ्यावी आणि संबंधीत पी.एस.आय.वर कारवाई करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, नोंद घेतलेली आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:40

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मागच्या आठवडयामध्ये दादोजी कोंडदेव यांचे नाव धड्यातून काढल्याबद्दल संपूर्ण महाराष्ट्रातून तो विषय गाजत होता. त्यामुळे जातीयतेचे विषारी वातावरण निर्माण होऊ पहात आहे. आधुनिक भारताचा इतिहास या इयत्ता 8वीच्या पुस्तकातील 15व्या धडयातून डॉ. हेगडेवार व पंडित मदन मोहन मालवीय यांचे नांव काढलेले आहे.

...नंतर श्री. खर्चे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

एखाद्या व्यक्तिच्या विचारसरणीबद्दल मतभेद असू शकतात. जसे या देशाच्या माजी पंतप्रधान कै.इंदिरा गांधी यांच्याबद्दल मतभेद असू शकतात. पण एक कर्तृत्ववान स्त्री म्हणून त्यांच्या नावाचा पाठयपुस्तकात धडा घातला तर त्याला आमचा कधीच विरोध राहणार नाही. तसेच कॉ.डांगे यांच्या विचारसरणीला विरोध होता, पण त्यांचे कामगार क्षेत्रातील कर्तृत्व वेगळे होते. डॉ.हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यापूर्वी त्यांनी महात्मा गांधींबरोबर आंदोलनात भाग घेतला होता, त्यावेळेस ते कॉंग्रेसचे स्वयंसेवक होते, त्यांच्याबरोबर जेलमध्ये गेले होते. म्हणून डॉ.हेडगेवारासारखा महापुरुष, ज्यांनी आर.एस.एस. सारखी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारखी संस्था निर्माण केली, त्यांचे नाव पाठयपुस्तकातून वगळणे, हे कितपत योग्य आहे ? पंडित मदनमोहन मालवीय यांच्या बाबतीत तर कुठल्याही कार्यकर्त्याच्या मनात अनादराची भावना असण्याचे कारणच नाही. अशा परिस्थितीत पाठ्यपुस्तक मंडळाचे जे अध्यक्ष आहेत त्यांचीच संपूर्ण चौकशी झाली पाहिजे. कारण अशा प्रकारे महापुरुषांची नावे पाठयपुस्तकातून वगळून ते या देशात वेगळे वातावरण निर्माण करु पाहत आहेत. स्वातंत्र्याच्या 60 वर्षानंतर महापुरुषांची नावे पाठयपुस्तकातून अशा प्रकारे काढण्यात येत असतील तर अशा प्रवृत्ती या राज्यात निर्माण होणे हे योग्य नाही. राज्यात अशा प्रकारे विषारी वातावरण, द्वेषाचे वातावरण निर्माण होईल आणि त्यामुळे समाजात विद्वेष निर्माण होईल म्हणून या गंभीर मुद्याकडे या औचित्याच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

श्री. रविशेठ पाटील : महोदय, यासंबधींची नोंद घेण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दरवर्षी इतिहासाचा एक एक धडा अशा प्रकारे वगळला जात आहे आणि त्याकडे मात्र शासनाचे व इतरांचेही लक्ष नाही. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याची नोंद घेण्यात येईल, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. "नोंद घेतली जाईल" म्हणजे माननीय मंत्री नेमके काय करणार आहेत ? त्यासंबंधीची चौकशी करणार आहेत का ?

**सभापती** : आठवड्यातून फक्त शुक्रवारीच औचित्याचे मुद्दे मांडण्याची परवानगी आपण देतो. काल विनंती केल्यानुसार मी दोन-तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित करण्यासाठी परवानगी देईन,

....2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**..........

असे सांगितले होते. यासंबंधीचे रेकॉर्ड सभागृहाकडे उपलब्ध आहे. मी संबंधित मंत्री महोदयांना एवढेच सांगतो की, मंत्री महोदयांनी संबंधित खात्याच्या मंत्र्यांच्या निदर्शनास ही बाब आणावी व त्यांनी यामध्ये लक्ष घालावे, असे मी निदेश दिले आहेतच.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, गेल्या वर्षीच्या पाठयपुस्तकात पंडित मदनमोहन मालवीय यांचा पाठ आहे परंतु यावर्षी तो पाठ काढून टाकण्यात आला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडे असलेली माहिती माझ्याकडे द्यावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्हाला फक्त दोनच मिनिटे बोलण्याची संधी द्यावी. अशी जर शासनाची मानसिकता असेल तर उद्या कदाचित ते छत्रपती शाहू महाराजांचाही धडा काढून टाकतील, वगळतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी दोनच मिनिटे बोलणार आहे. आपण स्वातंत्र्याचा लढा पाहिलेला आहे. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी मी समजू शकत होतो. काही वर्षांनी यामध्ये आणखी खूप बदलही होतील. परंतु स्वातंत्र्यापूर्वी "हा देश माझा आहे आणि मी देशाचा आहे" अर्थात विचारसरणी कोणतीही असली तरी हाच विचार सर्वापुढे होता. काल दादोजी कोंडदेव यांचे नाव काढल्याची तक्रार करण्यात आली. संबंधित पाठ्यपुस्तकातून दादोजी कोंडदेव यांचा धडा काढला. शिवाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास करणा-या संशोधकांनी नवीन संशोधन करुन जुन्या काळातील दाखले मिळविले आणि शासनाकडे सादर केले म्हणून बदल करण्यात आला आहे, असे तरी शासनाने स्पष्ट करावे. अशा प्रकारचा जो पुरावा पुढे आला आहे त्या पुराव्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. आता जो बदल करण्यात आला आहे, त्याव्दारा आपल्यासमोर जे येणार आहे, त्यात असे लिहिलेले आहे, पंडित मदनमोहन मालवीय यांचा पाठ छापला त्यात असे लिहिलेले आहे की, मुस्लीम लीगच्या जमातवादी काळात सन 1915 साली हिंदू महासभा ही संघटना स्थापन झाली.

यानंतर श्री. गिते ....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. रोझेकर 13:50

श्री. दिवाकर रावते....

पंडित मदनमोहन मालवीय हे हिंदु महासभेचे नामांकित नेते होते. त्यांनी विभक्त मतदार संघाच्या तत्वाचा निषेध केला आणि त्या विरुध्द हिंदु धर्म जागृत करण्याचा प्रयत्न केला. धर्मांतरीत हिंदुना पुन्हा हिंदु धर्मात प्रवेश देण्याची मोहिम त्यांनी हाती घेतली. पुढे डॉ. हेगडेवार यांचा संदर्भ आलेला आहे. पंडित मदनमोहन मालवीय यांनी राष्ट्रीय काम केलेले नाही. यात जो बदल आणलेला आहे तो महत्वाचा आहे. जो बदल करण्यात आला आहे त्यामुळे सभापती महोदय, आपल्याला देखील यातना होतील. त्याचे कारण आपण स्वातंत्र्याचे लढे प्रत्यक्षपणे बघितलेले आहेत. आपण त्यावेळेचे सर्व नेते पाहिले आहेत, त्यांचे विचार आपण ऐकले आहेत. त्यांच्या विचारातून आपण घडलेला आहात. आम्ही लोकांना सांगावयाचे टाळतो. 1915 सालातील पंडित मदनमोहन मालवीय, 1930 साली डॉ. महंमद इकबाल या प्रसिध्द कवीने स्वतंत्र मुस्लीम राष्ट्राचा विचार मांडला. रहमत अली चौधरी यांनी पाकिस्तानाची कल्पना मांडली. बॅ. महमंद अली जिना यांनी बहुराष्ट्रीय सिध्दांत मांडून पाकिस्तान या स्वतंत्र मुस्लीम राष्ट्राची मागणी केली. राष्ट्रीय महासभा हिंदुची संघटना आहे व तिच्या पासून मुसलमानांना काही फायदा होणार नाही असा प्रचार बॅ.जिना यांनी केली. वगैरे वगैरे असे पुढे लिहीले आहे. मला असे सांगा की, दोन धडे बदल करुन विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर काय निर्माण करावयाचे आहे? अशा प्रकारचे पाठ्यपुस्तकातील धडे बदलले जाणे ही अतिशय गंभीर बाब आहे. शिक्षण मंडळावर कोणी मॅडम आल्या आहेत. त्या अतिशय मनमानी कारभार करीत आहेत. त्यांना वाटेल तो धडा, वाटेल तो इतिहास ते बदलावयास निघाले आहेत. त्या कमिटया वैगरेना बाजूला ठेवतात. आमची सत्ता आहे म्हणून तसेच सर्व धर्म समभावाच्या नावाखाली सर्वांना चिरडणार असाल ते सहन केले जाणार नाही. हिंदुंचा एवढा व्देश का आहे ? मला खेद होतो की, तुम्हाला हिंदु बाबत एवढा व्देश असेल तर एकदाचे सर्वाचे धमांतर करुन टाका आणि आपली सगळी पित्रे एकदा उध्दारुन मोकळे व्हा. हिंदुबाबत सत्ताधाऱ्यांना एवढा तिरस्कार का ? या गोष्टी कॉग्रेस पक्षाला अभिप्रेत नाही. त्यावेळच्या कॉग्रेसच्या व्यासपीठावरची भाषणे आम्ही आजही वाचतो आहोत. त्यावेळी एकमेकाच्या मनात अशा प्रकारचा व्देश पेरला गेला नव्हता. या गोष्टी थांबवा. पुन्हा असे प्रकार महाराष्ट्रात होता कामा नये

अशी आमची मागणी आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2...

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, बरे झाले की, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी हा विषय औचित्याच्या मुद्याव्दारे या सभागृहात उपस्थित केला. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, आज महाराष्ट्रात अशा प्रकारच्या घटना घडता आहेत त्या दुर्देवी आहेत. उदाहरणार्थ इतिहासाची जुनी पाने काढून त्या ठिकाणी नवीन इतिहास घालण्याचे काम झालेले आहे. माननीय शाहीर बाबासाहेब पुरंदरे त्यांचे वय जवळपास 85 वर्षे एवढे झाले आहे. त्या व्यक्तीच्या बाबतीत तुम्ही चांगले शब्द बोलू नका. तुम्हाला जर पटत नसेल तर तुम्ही बोलू नका. पण दादाजी कोंडदेव हे छत्रपती शिवाजी महाराजांचे शिक्षक नव्हते, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना शिकविले नाही, त्याच्यावर प्रवचन करताना, जे आपल्या पक्षातील एक आमदार चिखली, जि.बुलढाणा येथून निवडून येतात. त्या ठिकाणचे एक गृहस्थ ....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

( गोंधळ )

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी माझे शब्द परत घेतो. चिखलीच्या आमदार महोदयांचे पती बाबा पुरंदरे, बाबा पुरंदरे असा वारंवार उल्लेख करतात. अशा गोष्टी मिडीयासमोर आणल्या जातात. तुम्ही त्यांना सांगितले पाहिजे की, जी व्यक्ती अशा प्रकारचे अविचाराने विष ओकते आहे, त्या व्यक्तीच्या घरात त्यांची पत्नी जरी तुमची कार्यकर्ती असली तरी आम्ही त्यांना निवडणुकीचे तिकीट देणार नाही. तुम्हाला निवडून आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार नाही. ही भूमिका तुम्ही घेतली पाहिजे. .....

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

यानंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. दादोजी कोंडदेव यांचा धडा वगळण्यात आला याबद्दल आपले मत काय ते सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी सांगावे. त्यानंतर बाबासाहेब पुरंदरेचे बघू.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : जो इतिहास लिहिला आहे तो इतिहास आम्ही लहानपणापासून शिकत आलो आहोत. त्या इतिहासामध्ये बदल करण्याचा, 4-5 संघटनांच्या माध्यमातून विषारी प्रचार केला जातो म्हणून तो इतिहास बदलला पाहिजे या मताच्या मी विरुध्द आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, शिवाजीपार्केवर ही मंडळी एकाच व्यासपीठावर बसतात. सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे तेथे जातात आणि भाषण करतात.....(गोंधळ)...

श्री.मधुकर चव्हाण : तो मुद्दा वेगळा आहे. मराठा आरक्षणाचा तो मुद्दा आहे. मेटे हे तुमच्या पक्षातील विष आहे. त्यांना आर्थिक सवलत द्यायला बीजेपीचा पाठिंबा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण मला हरकतीच्या मुद्यावर बोलण्याची संधी दिली आहे. औचित्याच्या मुद्यावर बोलत असताना या सभागृहात सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी उल्लेख केला की, भारतीय जनता पक्षाचे चिखलीचे आमदार....(गोंधळ)...यांनी आक्षेप घेतला तो अत्यंत दुर्दैवी आहे. या देशामध्ये भारतीय घटनेने प्रत्येकाला मुलभूत हक्क आणि स्वातंत्र्य दिले आहे. या प्रश्नाबाबत नवऱ्याचे मत वेगळे असू शकते, त्याच्या पत्नीचे मत वेगळे असू शकते. ज्या न्यायाने श्री.पद्मसिंह पाटील यांना काढले त्याच न्यायाने श्री.जगजितसिंह पाटील यांनाही पक्षातून काढा. भारतीय जनता पक्षाच्या आमदार श्रीमती रेखा खेडेकर या इतिहासाबद्दल काहीही बोललेल्या नाहीत. आरक्षणाबाबत बोलल्या असतील. परंतु इतिहासाबाबत त्यांनी कोणतेही वक्तव्य केलेले नाही. दादोजी कोंडदेव यांच्या धड्याबाबत मत व्यक्त केले. बाबासाहेब पुरंदरे यांच्याबाबत मत व्यक्त केले नाही. जे मत व्यक्त केले ते त्यांच्या पतींनी व्यक्त केले आहे. जो न्याय तुम्ही श्री.पद्मसिंह पाटील यांना लावला तोच न्याय श्री.जगजितसिंह पाटील यांना लावा, मग बोला अन्यथा तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने एका मिनिटासाठी मी परवानगी देतो त्यापैकी दिलेली ही परवानगी आहे. या अनुषंगाने बोलत असताना सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मंत्रीमहोदय श्री.रविशेठ पाटील यांना प्रश्न विचारला की, आम्ही जे सांगितले ते निश्चित काय सांगितले. त्यांनी जे उत्तर दिले त्याने सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही. म्हणून मी मघाशी सन्माननीय मंत्री श्री.रविशेठ पाटील यांना सांगितले की, शिक्षण विभागाचे मंत्री आहेत, त्या विभागाच्या मंत्रीमहोदयांना या अनुषंगाने आपण ही बाब सांगावी. क्रमिक पुस्तकात ज्या पध्दतीने बदल होत आहे त्याबाबत तपासून घ्यावे आणि ॲक्शन घ्यावी असे सांगितले. त्यानंतर आपण पुढे गेलो. मला वाटते ते औचित्याच्या पुढे गेलेले आहे. या अनुषंगाने सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी बोलले, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर बोलले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ KGS/ MAP/ MMP/ पूर्वी श्री. भोगले..... 14:00

**सभापती** .......

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते बोलले आणि मला वाटते सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी जे बोलले, त्याबाबतीत मी एवढेच सांगेन की, त्यांचे भाषण सुध्दा मी तपासून बघतो. अन्य सन्माननीय सदस्य बोलत असतांना ते काय म्हणाले, हे सुध्दा जरुर तपासून पाहणार आहे. एखादा शब्द चुकीचा असेल तर त्यासंबंधीचा निर्णय मी देईन. तसेच यापूर्वी केवळ शुक्रवारीच आपण औचित्याचे मुद्दे घेत होतो. अपवादात्मक परिस्थितीत तसेच महत्वाचा विषय असल्यामुळे मी आज ते मुद्दे उपस्थित करण्यास परवानगी दिली होती. परंतु यापुढच्या काळात मात्र शुक्रवार व्यतिरिक्त इतर दिवशी औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यासाठी परवानगी देणे बरोबर होणार नाही, असे मला वाटते. या निमित्ताने सदनात प्रत्येक वेळी अर्धा अर्धा तास वाद घालावयाचा असेल तर ते बरोबर नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण अशा प्रकारचा निर्णय तडकाफडकी देऊ नये, अशी आमची विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी केलेल्या वक्तव्याची शिक्षा आम्हाला देणे योग्य नाही.

**सभापती** : आपण या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहात. एखादा औचित्याचा मुद्दा महत्वाचा असतो आणि तो दोन्ही बाजूने मांडला जाऊ शकतो. परंतु एक-दोन मिनिटापेक्षा जास्त वेळ औचित्याच्या मुद्यावर बोलणे उचित नाही. म्हणून ही चर्चा आपण येथेच थांबवावी, अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, हरकतीच्या मुद्याच्या अनुषंगाने मला हे सांगावयाचे आहे की, डॉ.पद्मसिंह पाटील यांचा कसलाही संदर्भ नसताना माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या नावाचा उल्लेख केला....अडथळा......तुम्ही महात्मा गांधींचा खून केला....डॉ.पद्मसिंह पाटलांचा येथे संदर्भ नसताना त्यांच्या नावाचा कशासाठी उल्लेख करीत आहात ?

श्री. मधुकर चव्हाण : महात्मा गांधीचा खून कोणी केला ? तुम्ही का आम्ही ?

**सभापती** : या अनुषंगाने मी प्रत्येकाचे भाषण तपासून घेणार आहे. त्यामुळे जी वक्तव्ये चुकीची असतील ती दुरुस्त करण्यात येतील अन्यथा काढून टाकण्यात येतील.

....2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे सर्वच काढून टाकावे. कारण "तुम्ही केले म्हणून मी केले" असा हा प्रकार आहे.

------------

....3.......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या मॉलमध्ये चीनी बनावटीच्या वस्तुंची विक्री होणे

**मु. शी**. : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या मॉलमध्ये चीनी बनावटीच्या वस्तुंची विक्री होणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी येथे उभारण्यात आलेला वादग्रस्त अस्तित्व मॉल, सदर अस्तित्व मॉलमध्ये चीनी बनावटीच्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत. मॉलच्या अंतर्गत रचनेत परस्पर बदल करण्यात आला असून अस्तित्व मॉल सुरुवातीपासूनच वादग्रस्त ठरले असून सदर मॉलमध्ये महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री करण्यास जागा उपलब्ध करुन देण्याची महिला बचत गटाने केलेली मागणी, सदर अस्तित्व मॉलच्या नियोजनासाठी शासनाने ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंटच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली. सदर मॉलबाबतची नेमकी वस्तुस्थिती व भूमिकेबाबत शासनाने चौकशी करुन तसे निवेदन करावे."

महोदय, नगरविकास विभागाशी संबंधित हा विषय असून संपूर्ण राज्याच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. तथापि, माननीय मंत्री महोदयांना मात्र वेळ नाही. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी येथे "अस्तित्व" मॉल उभारण्यात आला असून त्यामागचा हेतूच वादग्रस्त आहे. महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तुंना बाजारपेठ मिळावी म्हणून जागेची मागणी करण्यात आली होती. गेल्या दोन वर्षांपासून ही इमारत उभी राहून देखील व्यवस्था झाली नाही म्हणून वारंवार शिवसेनेच्या नगरसेविका श्रीमती सुलभाताई उबाळे यांनी महापालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ KGS/ MAP/ MMP/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

होता. त्यानंतर माझ्याकडे अशी माहिती आली की, हा मॉल लवकरच सुरु होणार आहे. महिला बचत गटाला तो मिळणार आहे. म्हणून मी या अस्तित्व मॉलमध्ये काय ठेवले आहे, हे पाहण्यासाठी तेथे गेले असताना तेथील सेवक कुलूप लावून पळून गेला होता. तो दुपारी सव्वा वाजता गेला आणि सायंकाळी पाच वाजता परत येईल, असे मला उत्तर देण्यात आले. त्यानंतर तेथे मला 100 मोठया बॉक्समध्ये चीनी बनावटीच्या वस्तू ठेवण्यात आल्याचे, निदर्शनास आले. याबाबत मी महापालिका आयुक्तांकडे तक्रार केली होती. अस्तित्व मॉलचे व्यवस्थापन पिंपरी चिंचवड महापालिकेने स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्याकडे दिले होते. त्यांच्याकडून दुर्लक्ष झाल्याने माजी महापौर श्रीमती मंगला कदम या समन्वयक असलेल्या महिला बचत गटासाठी ही इमारत देण्यात आली होती. परंतु, तेथे चीनी बनावटीच्या वस्तू विकण्यासाठी ठेवण्यात आल्या आहेत. या संस्थेकडे जी जबाबदारी शासनाने दिली आहे, ती जबाबदारी रद्द करावी आणि या मॉलमध्ये महिला बचत गटाने तयार केलेल्या वस्तू विकण्यासाठी गाळा उपलब्ध करुन देण्यात यावा, याकडे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

यानंतर श्री. गिते ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोल्हापूर जिल्हयातील ऊसावर लोकरी माव्याचा झालेला प्रादुर्भाव

**मु. शी.** : कोल्हापूर जिल्हयातील ऊसावर लोकरी माव्याचा झालेला प्रादुर्भाव याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "भारनियमाच्या विळख्यातून शेती वाचविण्याचे आव्हान पेलतांना असतांनाच कोल्हापूर जिल्हयातील 50 ते 60 हजार एकर शेतातील ऊसावर लोकरी माव्याने आक्रमण केले असणे, त्यामुळे करवीर, कागल, पन्हाळा, शिरोळ, हातकणंगले तालुक्यातील शेतक-यांना चिंतातूर व्हावे लागणे, प्राथमिक अवस्थेत असणा-या शेतकरी मिळेल त्या किमतीला औषधे खरेदी करुन पवारत असणे, तसेच पावसाळी वातावरण होत असल्याने माव्याच्या वाढीसही पोषक वातवरण ठरत असणे, परिणामी शेतक-यांना जिल्हा कृषी विभाग पंचायत समितीकडून अनुदानावर दिल्या जाणा-या औषधांची प्रतीक्षा करावी लागणे, सर्वच शेती व्यवसाय धोक्यात आला असल्याने ओढविलेल्या आर्थिक संकटामुळे शेतकरी वर्गात व कुटुंबात निर्माण झालेले भितीचे सावट, शासनाने हेतुपुरस्सरपणे याकडे केलेली डोळेझाक, शेतक-यांना माव्याच्या जाळयातून शेतीला वाचविण्याबाबत तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

सदर विषय सार्वजनिक हिताचा असल्याने "विशेष उल्लेखाद्वारे" सदर विषय उपस्थित करीत आहे.

--------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत

**मु. शी.** : सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक महाराणी अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत श्री. प्रकाश शेंडगे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, राज्यात अनेक विद्यापीठांना संत महात्मे यांची नावे देण्यात आलेले असणे, त्याच प्रमाणे सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देऊन अहिल्यादेवी यांचाच सन्मान करण्यात यावा. राज्यातील जनतेची ही मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित असून आता या विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव द्यावे, असा ठराव महानगरपालिका सोलापूरने मंजूर केला असून मी पुन्हा एकदा सोलापूर विद्यापीठास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नावे द्यावे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

सभापती महोदय्, महाराष्ट्र राज्यात अनेक विद्यापींठांना संत महात्मे तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणा-या अनेक समाज धुरीणांची नावे देण्यात आलेली आहेत. अशा प्रसंगी महाराष्ट्रातील जनतेची कोल्हापूर विद्यापीठास पुण्यश्लोक राज माता अहिल्याबाई होळकर यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यात यावा अशी मागणी करण्यात येत आहे. त्याच प्रमाणे अशा प्रकारचा ठराव सोलापूर महानगरपालिकेने करुन महाराष्ट्र शासनाकडे पाठविलेला आहे. त्यामुळे माझी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी आहे की, महाराष्ट्र सरकारने या बाबतीत त्वरीत निर्णय घेऊन सोलापूर विद्यापीठास महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांचे नाव देण्यात यावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राष्ट्रीयत्वाच्या दाखला सादर न केल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेत अपात्र ठरविणे

**मु. शी.** :राष्ट्रीयत्वाच्या दाखला सादर न केल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेत अपात्र ठरविणे याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य डॉ. नीलम गो-हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, तांत्रिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक (सीईटी) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना समूह चर्चा व वैयक्तिक मुलाखती आदी प्रक्रिया पार पाडाव्या लागतात. पुण्यातील एमआयटी महाविद्यातील प्रवेश छाननी केंद्रात काही प्रवेश घेऊ इच्छिना-या विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी केली असतांना सदर छाननीत अपात्र ठरविण्यात आले आहे. सदर प्रवेशच्छूक विद्यार्थ्यांकडे शाळा तसेच महाविद्यालय सोडल्याचे` दाखले, दहावी-बारावीच्या बोर्डाच्या गुणपत्रिका, जातीचा, जन्मातारखेचा, जन्मस्थळाचा उल्लेख असलेली कागदपत्रे असूनही ती कागपत्रे स्वीकारली जात नाही. माध्यमिक शिक्षण ज्या शाळेत झाले त्या शाळेचे नाव, ज्या मंडळामार्फत परीक्षा घेतली गेली त्या मंडळाच्या प्रमाणपत्रावर उल्लेख असतो. एवढे सारे सक्षम लेखी पुरावे असूनही प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी त्यांचे राष्ट्रीयत्व भारतीय असल्याचा पुरावा सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. पासपोर्ट, रहिवाशी दाखला, जन्म दाखला असे काही पुरावे असतील तरच प्रवेश अर्ज स्वीकारला जाईल असे सांगण्यात येत आहे. शाळा सोडल्याचा दाखला, जन्मस्थळाचा, राज्याच्या उल्लेख असला तरी तुम्ही भारतीय आहात हे सिध्द केल्याशिवाय प्रवेश अर्ज स्वीकारले जात नाहीत. राष्ट्रीयत्वाचा दाखला सोडून सर्व दाखले विद्यार्थ्यांनी दिलेले आहेत त्यावरुन राष्ट्रीयत्व आपोआप सिध्द होत असल्याने आणखीन पुरावे मागून विद्यार्थ्यांची अडवणूक करणे योग्य नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे......

वरील सविस्तर दाखले, पुरावे आदी असतांना प्रवेश अर्ज नाकारु नयेत याबाबत राज्य शासनाने संबंधित तंत्रशिक्षण महाविद्यालयांना आदेश देऊन तसे निवेदन शासनाने ताडीने करावे ही विनंती."

सभापती महोदय, पुण्यामध्ये तांत्रिक शिक्षण संचालनालयाचा अजब कारभार चालला आहे. त्याकडे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे दाद मागण्याचा प्रयत्न करीत आहे. पुण्यामध्ये एमबीए आणि बीबीएच्या परीक्षा होतात त्याच्या अभ्यासक्रमासाठी केंद्रीय प्ररीक्षा घेण्यात येत असतात व त्यासाठी वेगवेगळी कागदपत्रे दाखल करावी लागतात. यामध्ये शाळेचा दाखला, दहावी-बारावीच्या गुणपत्रिका, प्रमाणपत्र, जातीचा दाखला, जन्मतारखेचा आणि जन्मस्थळाचा उल्लेख असे सर्व कागदपत्रे स्वीकारली जातात. विशेष म्हणजे भारतात जरी जन्मलेला विद्यार्थी असेल आणि त्याच्याकडे जन्माचा दाखला, शाळेचा दाखल्यामध्ये गावाचे नाव असले तरी देखील तुमचे राष्ट्रीयत्व कोणते आहे यासंदर्भातील पुरावा दिल्याशिवाय परीक्षेला बसू दिले जात नाही. राष्ट्रीयत्वाचा पुरावा दिला नाही तर बाद केले जाते. अनेक विद्यार्थ्यांकडे राष्ट्रयत्वाचा दाखला नाही परंतु शाळेचा दाखला, जातीचा दाखला सर्व दाखले आहेत परंतु राष्ट्रीयत्वाचा दाखला नाही म्हणून बाद करण्यात आलेले आहे. जर भारतामधील जन्मस्थळ असेल, भारतातील शाळेत शिकत असल्यासंदर्भातील दाखले असले तर राष्ट्रीयत्व आपोआप सिध्द होते. त्यामुळे अशा पध्दतीचे तांत्रिक शिक्षण संचालनालयाने आदेश देऊन विद्यार्थ्यांच्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करण्याची गरज आहे. घन्यवाद.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO.VI OF 2009**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.)**

श्री. हसन मुश्रीफ : ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 6, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 6 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.जुन्नरे . . . . 14:10

<u>कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या शासकीय विधेयकासंबंधी</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी सन 2009 चे वि.प.वि.क्रमांक 6 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (दुसरी सुधारणा) हे विधेयक पुर:स्थापनार्थ सदनासमोर सादर करण्यात आलेले आहे. त्याबाबत नंतर चर्चा होणार आहे. तसेच त्यानंतर सात विधेयके विचारार्थ दाखविण्यात आली आहेत. ही विधेयके विधानसभेमध्ये मंजूर झाल्यानंतर विधान परिषदेमध्ये मंजुरीसाठी येतील. आता सात विधेयकांपैकी पहिल्या क्रमांकाचे विधेयक विधान परिषदे मध्ये चर्चेसाठी आलेले आहे. सभापती महोदय, आम्ही यावर चर्चा कधी करणार आहोत. मग आम्हाला सांगणार की, आता चर्चा करता येणार नाही. परंतु तसे होणार नाही यादृष्टीने आपण आम्हाला संरक्षण द्यावे. जेवढी विधेयके चर्चा करुन संमत करता येतील, तेवढी निश्चित करु. परंतु हे विधेयक मंजूर झालेच पाहिजे, अशा प्रकारे आमच्यावर लादले जाऊ नये एवढीच आपल्या माध्यमातून रास्त विनंती करीत आहे आणि सरकारने देखील याबाबतीत तसे करु नये. कारण हा आमचा दोष नाही. मी याबाबतीत पहिल्या दिवसापासून सांगत आहे आणि कामकाज सल्लागार समितीमध्ये सुध्दा सुचविले की, पहिल्या दिवसापासून शासकीय कामकाज दाखविण्यात यावे. जेणेकरुन सभागृहामध्ये विधेयके आल्यानंतर त्यावर चर्चा करता येईल. पण तसे घडले नाही आणि याला सरकार जबाबदार आहे असे मी म्हणत नाही. कारण विधानसभेमधून संमत झाल्याशिवाय ते विधान परिषदेमध्ये येणार नाही, नाहीतर अधिवेशन एक आठवडा वाढवावे. तेव्हा याबाबतीत काय करता येईल ते करावे. एवढेच मला सांगावयाचे आहे.

-----

2 एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. XI OF 2009.

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT,THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPALS CORPORATIONS ACT,1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT,,1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL CONCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIP ACT,1965.)

श्री.हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे,मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 11- मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.स.वि.क्रमांक 11 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, मी या विधेयकाच्या संदर्भात पाच-दहा मिनिटांमध्ये मांडणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक विधानसभेमध्ये मंजूर झाल्यानंतर, ते आताच विधान परिषदेमध्ये आलेले आहे. मग ते लगेच चर्चेसाठी कसे घेता येईल ? हे विधेयक आता आम्हाला मिळालेले आहे, ते अजून वाचलेले देखील नाही. आमच्यावर एवढा अत्याचार करु नका.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी विधेयक नुसते मांडतो, मग आपण त्यावर . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बिल न वाचताच कसे मंजूर करता येईल ? माननीय मंत्री महोदय, असे कसे करता येईल ?

. . . .2 एल-2



APR/ MAP/ SBT/ 14:10

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला या बिलाची प्रत मिळाल्यावर, हे विधेयक आता आलेले आहे या अथाने मी त्यावर सर्कल केले आहे. परंतु माननीय मंत्री महोदय बिल मांडण्यासाठीच उभे राहिले, म्हणजे तुम्ही आम्हाला गृहीत धरत आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी विधेयक मांडलेले आहे. त्यासंदर्भात फक्त दोन-तीन मुद्दे मांडतो. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

सभापती महोदय, आपण हे विधेयक मागच्या अधिवेशनामध्ये आणले होते.हे बिल आपण....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण ही चर्चा थांबवावी. हे चुकीचे होईल .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, बिलांची चर्चा करावयाची नाही काय ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिवेशन सुरु होऊन दहा दिवस झाले आहेत. मग आतापर्यंत शासन करीत होते ? शासनाने अगोदर बिले आणली नाहीत आणि आज आठवडयाच्या शेवटच्या दिवशी विधेयके कशी आणली जात आहेत ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला आता विधेयक मिळालले आहे. मग ते वाचण्यासाठी तरी वेळ देणार आहात की नाही ? आता आमच्याकडे एक कागद देण्यात आलेला आहे. मग मी बिलाच्या नावापुढे सर्कल मारले आणि पुढे असे म्हटलेले आहे की, "विधानसभेने मंजूर केलेले बिल तुमच्याकडे येणार आहे." म्हणून मी 11 क्रमांकाचे बिल मागितले तर तेवढयात माननीय मंत्री महोदय विधेयकावर बोलण्यासाठी उभे राहिले. हे बरोबर आहे काय ?

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आता 2 वाजून 13 मिनिटे झालेली आहेत. मी सदनाचे कामकाज अर्ध्या तासासाठी तहकूब करीत आहे. सदनाची बैठक 2 वाजून 45 मिनिटांनी सुरु होईल.

(सभागृहाची बैठक 2 वाजून 14 मिनिटांनी, 2 वाजून 45 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नतर )**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.**: महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XI OF 2009.

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT,THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPALS CORPORATIONS ACT,1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT,1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIP ACT,1965.)

( चर्चा पुढे चालू....)

**सभापती** :मी सन्माननीय सदस्य दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्रिमहोद श्री. हसन मुश्रीफ यांचे विधेयक आता पूर्ण् करु या.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कुठलेही विधेयक चर्चेसाठी आल्यानंतर त्याचा थोडा अभ्यास करावा लागतो. माननीय मंत्रिमहोदय, हे विधेयक समजून सांगतील परंतु ते खंडश: वाचणे, खंडश: त्याच्यावर भाष्य करणे अशा अनेक गोष्टी आहेत. माननीय मंत्रिमहोदय, श्री. हसन मुश्रीफ यांच्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. त्यांनी आतापर्यंत त्यांच्याकडे असलेली खाती चांगल्या तऱ्हेने सांभाळलेली आहेत. आताही त्यांच्याकडे असलेले खाते ते चांगल्या रीतीने सांभाळीत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांपेक्षा चांगले उत्तर त्यांनी काल या सभागृहात दिलेले आहे, त्याबद्दल काही प्रश्न नाही. पण या विभागात जे अधिकारी आहेत त्यांच्या कामाबद्दल आम्हाला साशंकता आहे. मुंबई महानगरपालिकेतील उपनगरांची कशा रीतीने वाट लागेल अशा प्रकारचे नियोजन ते करीत आहेत. सत्ता त्यांच्या हातात आहे. काय करायचे ते करतील. ते दुरुस्त करतील नाही तर सत्ता बदलेल तो त्यांचा भाग आहे. पण आम्हाला यावर जागता पहारा ठेवणे आवश्यक आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी या विधेयकातील प्रत्येक गोष्टीबाबतचा खुलासा या ठिकाणी करावा. प्रत्येक विधेयक सभागृहासमोर आल्यानंतर आम्ही ते वाचावे आणि या ठिकाणी मांडावे एवढे कुशाग्र बुध्दीचे आम्ही नाहीत, आमचा तो प्रॉब्लेम आहे. आय.ए.एस. अधिकारी वाचल्यानंतर झटकीपट करतात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : हा तुमचा विनय आहे.

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महोदय, हे आदर्श नगररचना विधेयक गेल्या अधिवेशनात चर्चेसाठी आणले होते पण त्यावेळी काही त्रुटी होत्या म्हणून त्यावेळी परत घेऊन पुन्हा याठिकाणी आणलेले आहे.खालच्या विधानसभेत ते मंजूर झालेले आहे.

श्री. दिवाकर रावते : विधानसभेत मंजूर झाले असे कृपया येथे सांगण्यात येऊ नये. विधानसभेमध्ये गोंधळामध्ये चर्चा न करता विधेयक भराभर मंजूर करुन घेऊन ती या ठिकाणी चर्चेसाठी आणण्यात येतात. विधानसभेत ते मंजूर झालेले आहे असे त्याबाबत कसले कौतुक सागण्यात येत आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी फक्त इंट्रोडक्शन करीत आहे. त्यांनी केले म्हणून आपणही करावे असे माझे म्हणणे नाही. परंतु विधानसभेत चर्चा होऊन हे विधेयक मंजूर झालेले आहे. महानगरपालिका आणि नगरपालिका कामकाजामध्ये लोकांचा सहभाग असावा असे राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने ठरविलेले आहे. यापूर्वी सुध्दा ग्रामीण भागामध्ये ग्रामसभा 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीला बोलावण्याचा नियम केला. सरपंच हा त्या ग्रामसभेचा अध्यक्ष असतो. त्या गावाच्या विकासाची कामे कशी व्हावयास पाहिजेत, याबाबतीत पहारेकऱ्याची भूमिका जनतेने स्वीकारावयास पहिजे आणि जनतेचा सहभाग त्यामध्ये असला पाहिले म्हणून हे विधेयक या ठिकाणी आणण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या ज्या अनेक योजना आहेत विश्षेत जेएनएनयुआरएन सारख्या ज्या योजना असतील त्या योजनांच्या बाबतीत रिफॉर्म सूचविले होते. अशा योजना केंद्र शासन देणार असेल तर अशा ग्रामसभा, अशा क्षेत्रियसभा आवश्यक आहेत म्हणून त्या बाबतीतील कायद्यामध्ये दुरुस्ती करावी. म्हणून आदर्श नगरराज्य विधियक आणत असताना प्रभाग क्षेत्रामध्ये त्याची विभागणी केलेली आहे. मतदानाचे बूथ आहेत त्यामध्ये दोन ते पाच मतदान केंद्राच्या एका भौगोलिक प्रदेशाचा समावेश, अशी ही क्षेत्रीय सभा राहील. या क्षेत्रीय सभेचा अध्यक्ष हा त्या प्रभागाचा नगरसेवक राहील. या पूर्वी आपण त्या क्षेत्रिय सभेचा अध्यक्ष त्या भागातील एखाद्या नागरिकाला करणार होतो. नगरसेवक आणि तेथील प्रभागाचा अध्यक्ष यामध्ये एक पॅरलल सरकार चालू होईल, त्यातून अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतील त्या प्रभागाचा नगरसेवक अध्यक्ष असेल या विधेयकात दुरुस्ती करण्यात येत आहे.

यानतर श्री. बरवड..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .....

क्षेत्र समितीचा सचिव हा त्या नगरपालिका आणि महानगरपालिकेचा अधिक्षक दर्जाचा कर्मचारी असेल. नगरसेवक सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी नसलेल्या वर्षातून दोन सभा बोलविण्यासाठी त्या अधिक्षकाला सूचना करील. त्या क्षेत्रामध्ये असलेल्या हॉल, बगीचा, मैदान या ठिकाणी ती बैठक होईल. विशेषत: आम्ही नियम बनविताना लोकांना याबाबत समजले पाहिजे यादृष्टीने विचार करुन नियम करणार आहोत. आता मतदानाला सुध्दा लोक येत नाहीत. आपला लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार सुध्दा लोक बजावत नाहीत मग अशा बैठकीला लोक येतील काय, त्यांना याबाबत समजेल काय किंवा नगरसेवक आपल्याच लोकांना बोलवून ती बैठक घेईल काय यादृष्टीने विचार करुन आपण महानगरपालिका आणि नगरपालिकेच्या अशा क्षेत्र बैठकीसाठी पोस्टाने त्यांच्या घरच्या पत्त्यावर नोटीस पाठविण्याची व्यवस्था नियमामध्ये करणार आहोत. अशा दोन सभा घेतल्या नाहीत तर त्या नगरसेवकाला आयुक्त अपात्र करतील अशी तरतूद आधी होती परंतु विधानसभा सभागृहामध्ये ही अट काढून टाकावी अशी मागणी झाली. म्हणून याबाबत दुरुस्ती केली. आता सलग चार सभा त्या नगरसेवकाने घेतल्या नाहीत तर त्यांचे नगरसेवकपद अपात्र ठरेल अशा प्रकारची दुरुस्ती करुन हे विधेयक विधान परिषदेमध्ये आणलेले आहे. हे अतिशय चांगले विधेयक आहे. या सर्व कामांमध्ये लोकांचा सहभाग वाढविणारे विधेयक आहे. लोकांनी पहारेकऱ्याची भूमिका बजवावी यासाठी विधान परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी हे विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय माहिती देत असताना त्यांनी विषय अर्धवट मांडू नये. जेएनएनयुआरएम या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत आपण विविध शहरातील पायाभूत सुविधांकरिता काय करार केलेला आहे ? भारत सरकार आणि आपल्यामध्ये कोणता करार झाला ? हा करार काय आहे ? त्या करारानुसार आपल्याला काय फायदा होणार आहे. क्षेत्र सभेचा विषय नंतर चर्चेमध्ये येईल परंतु यामध्ये आपल्याकडे किती पैसे येणार आहेत, या कराराच्या अंतर्गत त्यांनी अशा अटी का घातलेल्या आहेत, त्यांचे काय म्हणणे आहे याबाबत मंत्रिमहोदयांनी सांगावे. एमएमआरडीए आणि महानगरपालिका यांच्या बाबतीत काय चालले आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. दिवाकर रावते ....

हे आपण पाहतो. आपण छाती फुगवून सांगता की, एमएमआरडीएमुळे विकास झाला. आता आणखी किती छाती पुढे काढणार आहात हे कळू द्या.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासनाने हा कंसेप्ट स्वीकारलेला आहे आणि गावामध्ये, ग्रामीण भागामध्ये ग्रामसभा सुरु केली. आता नगरपालिका आणि महानगरपालिका अशा एकत्र सभा घेऊ शकत नाहीत. यामध्ये लोकांचा सहभाग पाहिजे. जेएनएनयुआरएम आणि केंद्राने जे रिफॉम सुचविले त्यामध्ये क्षेत्र समिती करुन लोकांना यामध्ये सहभागी करुन घ्यावे असा एक मुद्दा आहे. हे या बिलामध्ये अंतर्भूत आहे आणि एमओयूमध्ये सुध्दा तेच अंतर्भूत होते.

प्रश्न प्रस्तुत झाला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, विधिमंडळाचे अवमूल्यन कसे करता येईल अशी परिस्थिती वारंवार पाहून खेद होतो. असे करु नका. आपण जे सरकार चालवित आहात ते सन्मानाने चालवावे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनिय, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता हे विधेयक आणलेले आहे. खरे म्हणजे या विधेयकाचा आत्मा समजलेला नाही अशातील भाग नाही. महाराष्ट्रामध्ये आता जिल्हा परिषदेकडे थेट निधी येतो. मग तो निधी पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींकडे जातो. म्हणून त्याच्या अंतर्गत आपण ग्रामसभा वर्षातून दोन वेळा घेतल्या पाहिजेत असा कायदा केला. त्या ग्रामसभा 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी या दिवशी घ्याव्यात अशा तारखा ठरवून दिलेल्या आहेत. ग्रामसभेच्या बाबतीत काय होते हे आपल्याला माहीत आहे. ग्रामसभेची दादागिरी आपण अनुभवतो. त्या ठिकाणी कसे प्रस्ताव होतात, काय चालते, कसे चालते याबाबतीत त्या ग्रामसभेचे स्वरुप आपण पाहिलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

त्यातील महत्वाचा भाग व गाभा असा होता की, जिल्हा परिषदेचा विकासाचा आराखडा, ग्रामपंचायतीचा आराखडा असतो तो सर्वांनी मिळून मंजूर करावयाचा. आता जिसकी लाठी उसकी भैंस अशी परिस्थिती आहे. त्याप्रमाणे त्यांचे प्राबल्य असते, हडेलहप्पीपणा चालू असतो. तेथे प्रस्ताव कसे मंजूर होतात ते आपण पाहतो. त्याच्या धर्तीवर हे आणले आहे. मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये वेगळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पूर्वी मुंबई महानगरपालिकेमध्ये प्रभाग समित्या नव्हत्या, परंतु कायद्यात दुरुस्ती करुन त्या निर्माण करण्यात आल्या. पूर्वी विधी समिती, स्थायी समिती, सुधार समिती अशा तीन महत्वाच्या समित्या होत्या, कायदा समिती, बाजार व उद्यान समिती अशा समित्या होत्या. परंतु या समित्यांच्या अंतर्गत प्रभाग समित्या निर्माण झाल्या आहेत, त्यासाठी बजेट आले, निधी आला. या प्रभाग समित्यांना ठराविक मर्यादेपर्यंत निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. त्यानंतरचे अधिकार स्थायी समितीला व त्यानंतर महापालिकेला निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. प्रभाग समित्यांचा सचिव विभाग अधिकारी असतो. अशाप्रकारची मांडणी झाल्यानंतर प्रभाग समितीच्या अध्यक्षांनी त्या त्या भागातील नगरसेवकांना बरोबर घेऊन विकासासंबंधी चर्चा करावयाची असते. ही 22 सदस्यांची समिती असते. त्यांचे प्रस्ताव येतात. एखाद्या रस्त्याला नाव द्यावयाचे असेल तर त्याचा प्रस्ताव समितीचे सदस्य मंजूर करतात. त्यानंतर तो प्रस्ताव महानगरपालिकेकडे येतो, प्रस्तावात सुचविलेल्या नावाची छाननी आयुक्तांमार्फत केली जाते. त्यांनी त्याला मान्यता दिल्यानंतर ती प्रस्ताव उपसमितीकडे मंजुरीसाठी जातो आणि शेवटी महानगरपालिकेडे जातो अशी एकंदर प्रक्रिया होती. आता ती पध्दत बाद झाली आहे. आता प्रभाग समितीकडून सर्व काही घडते. सध्या प्रभाग समित्या असताना नव्याने क्षेत्र समित्यांची आवश्यकता का आहे ते मंत्रिमहोदयांनी विधेयक मांडताना सांगितले नाही. परंतु त्यांना एकदा हे विधेयक मंजूर कधी होते त्याची घाई लागलेली आहे. हे विधेयक मांडत असताना ते का व कशासाठी मांडत आहे ते स्पष्ट केले पाहिजे. जेएनयुआरएम अंतर्गत मुंबई आणि नागपूर या शहरांसाठी किती निधी मिळणार आहे, त्यासाठी केंद्राने कोणते निर्बंध घातले आहेत, आलेला निधी राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये कसा बसविला जाणार आहे, तो खालपर्यंत कसा झिरपणार, हा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ MMP/ SBT/

श्री.दिवाकर रावते...

निधी तांत्रिकदृष्टया कोण सांभाळणार आहे, त्या निधीपैकी विकासात्मक निधी किती असेल अशाप्रकारचे विश्लेषण सांगणे आवश्यक होते. केंद्राकडून निधी मिळणार आहे असे सांगितले जाते त्याबाबतची माहिती मंत्रिमहोदयांनी सांगितली नाही. केवळ पुनर्निर्माण असा शब्द वापरला आहे. म्हाडा ही संस्था केवळ मुंबईपुरती मर्यादित नाही. म्हाडा अंतर्गत विभागीय अध्यक्ष नियुक्त केले जातात. त्यांच्यामार्फत गरीबांसाठी घरे बांधली जातात. परंतु ग्रामीण भाग जेएनयुआरएम या योजनेंतर्गत येत नाही. घरबांधणीसाठी म्हाडा सारखी स्वायत्त यंत्रणा उभी आहे, त्यावर श्री.शेख नावाचे अधिकारी आहेत. त्यांना काय निर्णय घ्यायचे ते घेतील. पूर्वी म्हाडामध्ये श्री.टी.चंद्रशेखर नावाचे अधिकारी होते. आता एमएमआरडीएमध्ये श्री.गायकवाड नावाचे अधिकारी आहेत. श्री.टी.चंद्रशेखर यांना केंद्रात मंत्री व्हावयाचे होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 15:00

(श्री. दिवाकर रावते....)

त्या टी. चंद्रशेखरचे किती कौतुक केले. चंद्रशेखर हा विकासात्मक माणूस असे सांगण्यात येऊ लागले. सभापती महोदय, तो एकदम बोगस माणूस. त्याने ठाण्याचा विकास केल्याचे फोटो काढले. ठाण्याचा काय विकास केला हे मी पहायला गेलो. ठाण्यामध्ये प्रचंड मोठा पूल बांधलेला आहे. ठाण्याच्या हायवेवर गेल्यानंतर लगेच बाहेर पडता येते. त्या ठिकाणी आजूबाजूला मोकळी जमीन होती. त्या जमिनीवर टी. चंद्रशेखर याने सुंदर गार्डन केले. बर्ड आय व्ह्यू ज्याला म्हणता येईल असा एक सुंदर कलर फोटो त्या उद्यानाचा घेतला. त्या फोटोने लोकांचे डोळे दिपले. ते काम आज कोणीही करु शकतो. छोट्या छोटया शहरामध्ये सुध्दा फूटपाथ बांधली तरी रस्ते व्यवस्थित दिसतात. रस्त्यावरुन फेरीवाले वेगैरे असतात त्यामुळे रस्ते ओंगळ दिसतात. हा चंद्रशेखर नागपूरला गेला . नागपूरला फूटपाथ नव्हते, ते त्याने बांधले, त्यांचे लादीकरण केले. हे लादीकरणाचे काम कोणाला दिले, हे काम कोणी केले ? तुम्ही त्याला शोधा, म्हणजे तो सापडेल. या मुंबईमध्ये करोडो रुपयाच्या लाद्या का बसविल्या जात आहेत ? कोणाला तरी श्रींमत करायचे आहे. या लाद्या बसविल्यामुळे फूटपाथ चकाचक दिसतात. आमच्या स्थानिक विकास निधीतून सुशोभीकरण केले अशा प्रकारचे बोर्ड नरगरसेवकही लावतात. संपूर्ण मुंबईभर हे लाद्या बसविण्याचे कंत्राट दिलेले आहे. या बाबतीत कोणाला जबाबदार धरलेले नाही. मी जर माननीय मंत्री महोदयांच्या जागी असतो तर आतापर्यन्त महानगरपालिकेच्या चार-पाच अधिका-यांना घरी पाठविलेले असते. डॉकयॉर्डच्या रस्त्याने गेल्यानंतर जे.जे. हॉस्पिटलच्या समोर झोपडपट्टी आहे. त्या ठिकाणी कोप-यावर छोटे छोटे फूटपाथ राहिलेले आहेत. त्या छोटया जागेवरही लाद्या बसविलेल्या आहेत. माटुंगा ते माहीम पर्यन्तच्या फूटपाथवर झोपड्या होत्या. त्या ठिकाणी चेकर टाईल्स बसविण्यात येत आहेत. मी तेथील एका माणसाला सहज विचारले की, या ठिकाणी झ
ोपड्या होत्या, त्या कुठे गेल्या ? त्याने सांगितले की, चेकर टाईल्सचे म्हणजे इंटेरिअर डेकोरेशनचे काम चालू आहे म्हणून येथील फूटपाथवरील लोक बाजूला गेलेले आहेत.

सभापती महोदय, क्षेत्रसभा म्हणजे काय हे मला समजलेले नाही. एका मतदारसंघामध्ये 35 ते 40 हजार मतदार असतात. 5 हजार मतदारांचे युनिट करण्याचे आपण ठरविलेले होते. परंतु ते विधेयक आपण परत घेतले. सभापती महोदय, या बाबतीत एकाच शब्दात सांगता येईल की, हा

(श्री. दिवाकर रावते....)

कार्यकुशलतेचा आचरटपणा आहे. म्हणजे एका नगरसेवकाच्या पोटामध्ये 5-5 हजार जनतेने निवडून दिलेले उपनगरसेवक असणार. मग या सर्व उपनगरसेवकांचे वेगवेगळया कार्यक्रमाचे होर्डिंग्ज, त्यांच्या वाढदिवसाचे बाराशे-बाराशे होर्डिंग्ज लागतील. अशा प्रकारे होर्डिंग्ज लागल्यानंतर या मुंबईचे काय होईल याची चिंता मला लागली आहे. पुन्हा नगरसेवक आणि उपनगरसेवक होण्यासाठी होर्डिंग्ज लावावेच लागतात. मग हा उपनगरसेवक त्या 5 हजार लोकांचा बाप.

....नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते............

सर्व नागरिकांना पोस्टकार्ड पाठवावे लागणार आहेत. सर्वांना पोस्टकार्ड पाठवायचे असतील तर खर्च किती येईल ? 1 पोस्टकार्ड गुणिले मुंबईची लोकसंख्या, किती खर्च होईल, हा खर्च कोण करेल ? या सरकारने पूर्वीचे उपनगरसेवकाचे बिल रद्द केले आणि आता हे नवीन बिल आणले. हे लक्षात घ्या की, पोलिंग बुथवाईज सभा होणार आहेत. म्हणजे एक सभा घ्यायची असेल तर प्रत्येक मतदाराला पोस्टकार्ड पाठवावे लागेल. 40 ते 45 हजार लोकसंख्येचा एका नगरसेवकाचा मतदारसंघ आहे. एकत्रित एवढया लोकांची सभा घेणे शक्य नसल्यामुळे साधारणपणे 8 सभा घ्याव्या लागतील आणि वर्षातून दोन वेळा सभा घेणे बंधनकारक होणार असल्यामुळे एकूण 16 सभा होतील. आता चार वेळा सभा घ्यायचे ठरविले आहे. त्यांना फायदा करण्याकरिता हे केले आहे. परंतु, हे लक्षात घ्या की, 40 हजार लोकांना वर्षातून दोन वेळा पोस्टकार्ड पाठवायचे म्हणजे 40000 गुणिले पोस्टकार्डाचे 8 रुपये, म्हणजे 32 हजार रुपये होतील. पुन्हा असेही होऊ शकेल की, काही लोक असे म्हणतील की, आम्हाला पोस्टकार्ड मिळाले नाही त्यामुळे आम्ही सभेला येणार नाही. कारण, पोस्टाची हमी कोण देणार ? हल्ली अण्णा हजारे खूप झाले आहेत, सगळे 'उप अण्णा हजारे' आहेत. मी हे चांगल्या अर्थाने बोलतो आहे. समाजसेवेचे काम आहे. म्हणून त्यांचे नाव घेतले. हे सगळेच विचार करण्यासारखे आहे. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना मी सांगू इच्छितो की, आपल्याला तर निश्चित विचार करण्यासारखे आहे. 9 रुपयांचे पोस्टकार्ड मिळाले नाही म्हणून लोक सर्वोच्च न्यायालयापर्यन्त लढतील आणि त्या सभेतील निर्णयांना आव्हान देतील, त्या निर्णयांना स्थगिती आणतील. आज नगरसेवकामार्फत जो विकास होतो आहे तो थांबेल आणि हे सरकार काहीही करु शकणार नाही. या बिलामध्ये सरकारने असे म्हटलेले आहे की, आवश्यक ते नियम तयार केले जातील. राज्य शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाव्दारा क्षेत्रासंबंधीचा अध्यक्ष हा निवडून आलेला नगरसेवक असणार आहे. हे नगरसेवक बैठका किती घेणार, कुठे घेणार ? त्यांनी जर एखाद्या उद्यानात सभा लावली तर त्यांना परवानगी कोण देणार ? 5 हजार लोकांपैकी 2 हजार लोक आले तर ते त्या ठिकाणी मावले पाहिजेत. 2 हजार लोक जरी सभेला पोहोचले तरी सभा कशी चालेल ? सभापती महोदय, हे बिल तयार करतांना शासनाने सगळयांना गृहित धरले आहे. हा कायदा करतांना माननीय मंत्र्यांनी जनतेला गृहित धरले

....2......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते............

आहे. सर्वसमावेशक विकासाची चर्चा जनतेमधून व्हावी आणि जो विकास होत आहे त्याची जबाबदारी जनतेवर असावी, अशी या मागील संकल्पना आहे. आपल्या भागातील कचरा, घाण सरकारने काढली नाही, महापालिकेने झक मारावी, अशा प्रकारची ही प्रवृत्ती आहे. त्यामध्ये लोकांचा सहभाग असावा, ही भूमिका आहे. मला एक सांगा. मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, एका प्रभागाची बैठक लावली तर अध्यक्ष नगरसेवक असणार आहे. सभेला 5 हजार लोक येणार नाहीत, कमीत कमी 2 हजार तरी येतील. माननीय कामगार मंत्री श्री.नवाब मलिक यांना मी सांगू इच्छितो की, आपल्यालाही पोस्टकार्ड येईल. कारण येथे जरी आपण मंत्री असला तरी त्या ठिकाणी नागरिक आहात आणि तुमच्या सभेचा अध्यक्ष नगरसेवक असेल.

यानंतर श्री.गिते.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

एवढे सर्व लोक येणार नाहीत. ते नेहमी सारखे होईल. ग्रामसभेसारखी ही बैठक होईल. ग्रामसभा कशा पध्दतीने चालतात, तेथे गुंडगिरी, दादागिरी कशा प्रकारे चालते याची सर्व सन्माननीय सदस्यांना माहिती आहे. ग्रामपंचायतीमध्ये ज्याचे प्राबल्य असते, त्यांचे लोक अशा ग्रामसभेला मोठया प्रमाणात जमा होतात. ज्याचे प्राबल्य नसते ते लोक एका कोपऱ्यात जाऊन गुपचुप बसतात. आपण या गोष्टी डोळयांनी पाहतो. मुंबई शहरात असे होईल काय ? नागपूर, संभाजीनगर, नांदेड या महानगर क्षेत्रात असे होईल काय ? जेथे नगरपरिषदा आहेत तेथे सुध्दा असे होणार नाही. मघाशीच आपण वाशीम नगरपरिषदेच्या संदर्भात चर्चा केली. वाशीम शहर बाळवट राहिले आहे काय ? आपण कल्पना करा की, 2 हजार माणसे सभेसाठी आली ती एकेका प्रस्तावावर बोलावयास उभी राहिली तेथे आपापसात मारामा-या, वादंग, भांडणे होतील, त्या ठिकाणी चार पक्ष असतात, त्यात याचा गट, त्याचा गट असे वाद निर्माण होतील. यासंदर्भात आपण जे गृहीत धरले आहे तसे होणारच नाही. प्रमुख चार पक्ष आहेत. पक्ष कसा मान्यताप्राप्त असतो, तो पक्ष. तसे आपल्याकडे जवळ जवळ महाराष्ट्रात 200 ते 250 पक्ष आहेतच. असे हौशे, गौशे पक्ष अनेक आहेत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा एक पक्ष आहे. या ठिकाणी त्यांचा दुसरा कोणीही सदस्य नाही. तो एकच माणूस आहे. त्याला रजिस्ट्रेशन नाही, त्यांना सभापतींचे रजिस्ट्रेशन आहे. मी अधिकृतपणे बोलतो आहे. रेकॉर्डवर यावे म्हणून बोलतो आहे. मी काय म्हणतो आहे की, तुमच्या एकटयाचा पक्ष आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, पक्ष काढण्यासाठी सभापतींचे रजिस्ट्रेशन लागत नाही. आता स्वाभाविक आहे की,त्यांना माहिती नाही, कारण माननीय श्री. रावते साहेब हे त्यांच्या पक्षाचे नेते असले तरी पदाधिकारी नाहीत. त्यामुळे पक्ष कसा रजिस्टर होतो. पक्ष रजिस्ट्रेशनसाठी काय करावे लागते ही गोष्ट मी समजू शकतो. कृपया त्यासंबंधी त्यांनी माहिती करुन घ्यावी. परंतु पक्षाचे रजिस्ट्रेशन सभापती करतात असा त्यांनी कृपया आरोप करु नये. पक्षाच्या रजिस्ट्रेशनसाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. त्यांना माहिती नाही, ती माहिती त्यांना मी करुन देतो. ते ज्येष्ठ सदस्य आहेत, त्यांच्या अज्ञानापोटी चुकीचे रेकॉर्डवर राहू नये.

**सभापती** : पक्षाची नोंदणी करणारी ही स्वतंत्र यंत्रणा असते. त्यामध्ये सभापतींचा संबंध येण्याचा प्रश्न येत नाही.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी कोणत्याही प्रकारचा आरोप केलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे गुरुजी आहेत. श्री.कपिल पाटील यांना सांगतो. रामदास स्वामी असे म्हणाले की, "अज्ञाने प्रकट व्हावे हाती झाकुनी असावे, प्रगट होऊन नासावे हे बरे नव्हे" अज्ञानाने प्रकट होऊ नका. स्वत:चे ज्ञान नासवून घेऊ नका. सन्माननीय सदस्यांनी मी अज्ञानी आहे असे सांगण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला. ते अज्ञान प्रकट करण्याचा मी प्रयत्न करतो. मी काय म्हणालो की, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा कुठला तरी पक्ष आहे. त्या पक्षाला मान्यता नाही. अन रेकनाईज्ड आहे. ज्याला कोणीही स्वीकारलेले नाही. मी मराठी भाषांतर करुन सांगतो आहे असा माझा पक्ष आहे. त्याचे इंग्रजीमधील शुध्द भाषांतर असे आहे की, It is unrecognised party, परंतु मी शिक्का मारुन घेतला आहे. हे माझे नाव आहे. पक्षाला मान्यता मिळविण्यासाठी काही कसोटया पूर्ण कराव्या लागतात. जोपर्यंत आई-बापाचे नाव लागत नाही तोपर्यंत मुलाला मान्यता नसते.

**सभापती** : आपण विधेयकाच्या मूळ विषयावर बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला माननीय कामगार मत्री श्री. नवाब मलिक यांनी मार्गदर्शन केल्यामुळे मी असे म्हणतो आहे. मी असे म्हणालो की, चार, पाच पक्ष आहेत. तसे खूप पक्ष आहेत. एवढे जीवंत उदाहरण आपल्याकडे असताना आपण बाहेर कशासाठी जावयाचे ? म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचे उदाहरण या ठिकाणी दिले. माननीय सभापती यांच्या सदशीलतेमुळे, त्यांच्या सद्‌भावनेमुळे आमच्या सभागृहात तुम्हाला मान मिळतो आहे. तुमच्या मागे कोणी नसले तरी तुम्हाला आमचे अधिकार मिळाले आहेत. माझ्या पक्षात 12 नेते आहेत, त्यातील मी एक नेता आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 15:15

श्री.दिवाकर रावते......

आमच्या पक्षात निवडणुका होतात. नेत्यांची रितसर निवड होते. सगळे काय होते. विषय असा आहे की, ज्यावेळी 5 हजार लोकांची एक क्षेत्रसभा होईल, ही बैठक होत असताना तिथे 2 हजार लोक आले आणि मान्यता असलेले 4 पक्ष आणि बाकीचे सगळे एकत्र आले तर तेथे जे काही होईल, सभेचे काय होईल हे आज सांगता येणार नाही. या सभागृहात आदरणीय सभापती यांचे नियंत्रण असले, प्रतिष्ठा असली तरी कधीकधी असंभव अशी परिस्थिती निर्माण होते. त्या क्षेत्र सभेमध्ये काय होईल? तेथे सॅक्टिटी काही नाही. नगरसेवक हाच अध्यक्ष असणार आहे. त्याला तुम्हाला पोलिसांचे संरक्षण द्यावे लागेल. हे विधेयक शासनाने आणल्यामुळे पोलिसांचे काम वाढणार आहे. त्या पलिकडे काहीही होणार नाही. त्या सभेत जे काही होईल त्यामुळे पोलिसांचे काम वाढणार आहे. सभापती महोदय, या सभागृहात आपण बस म्हटले तर आम्ही बसतो आणि उठ म्हटले तर उठतो. तो पीठासीन अधिकाऱ्यांचा सन्मान आहे. हे विधेयक आहे त्यातून महानगरपालिका क्षेत्रामध्ये विकासाचा खेळखंडोबा कसा करायचा याचेच मार्गदर्शन केले जाणार आहे. हा गंमतीचा भाग नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या विधेयकान्वये 5 हजार लोकसंख्येची क्षेत्र सभा अशी संकल्पना करुन एक प्रभाग केला आणि नगरसेवक त्या क्षेत्रसभेचा अध्यक्ष असेल असे अभिप्रेत आहे. 25 हजार लोकसंख्या असेल तर एका वॉर्डमध्ये असे किती बूथ असतील? एका नगरसेवकाला वर्षातून 2 सभा घ्याव्यात असे म्हटले आहे. 5 हजाराची क्षेत्र सभा म्हणजे वर्षाला किती सभा घ्याव्या लागतील?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे नेहमीच चांगले मार्गदर्शन करतात म्हणून आम्हाला आनंद वाटतो. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे देखील चांगले मार्गदर्शन करतात म्हणून आम्हाला आनंद वाटतो. मी मघाशी सांगितले त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे सभागृहात उपस्थित नव्हते. मुंबईमध्ये 25 ते 40 हजार लोकसंख्येमागे एक नगरसेवक असतो. 5000 लोकसंख्येची क्षेत्रसभा म्हणून 8 बूथ झाले. प्रत्येक बूथमध्ये 2 सभा घ्यायच्या म्हणजे वर्षाला 16 सभा घ्याव्या लागतील. एका प्रभागाच्या 2 सभा घेतल्या नाहीत तर नगरसेवक पद रद्द होईल. परंतु सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, आम्ही खालच्या सभागृहात अमेंडमेंट केली आहे. 4 सभा घेतल्या पाहिजेत. अन्यथा नगरसेवक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

पद रद्द होईल. त्यामुळे त्या नगरसेवकाला सभा घ्याव्याच लागतील. 3 अपत्ये झाल्यानंतर तो काय करतो. एका मुलाला दुसऱ्या बापाचे नाव लावतो. एवढा बेशरमपणा पुढे आला आहे. मी या मुलाचा बाप आहे हे सांगण्यास लाज वाटते अशी प्रवृत्ती निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांना मंत्रीमहोदयांकडे बोलावले होते त्यावेळी ते मला सोबत घेऊन गेले. सिंधुदुर्ग जिल्हयात एका नगरसेवकाला 3 अपत्ये आहेत, तरी देखील राजकीय दबावामुळे त्याच्यावर कारवाई होत नाही. कायदा पायदळी तुडविला जात आहे. मंत्रीमहोदय म्हणाले, आजच्या आज फोन करतो. परंतु प्रकरण सिंधुदुर्ग जिल्हयातील आहे. तिथे काहीही घडते. काहीही केले जाते. सरकार अस्तित्वातच नाही.

सभापती महोदय, मी मंत्रीमहोदयांना सांगू इच्छितो की, आपला जो मूळ उद्देश आहे त्या उद्देशापलिकडे चालले आहे. आता नवीन प्रकार सुरु झाला आहे. क्षेत्रसभा भरली. मुंबईत सध्या दोन महान नेते निर्माण झाले आहेत.

2टी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-06-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) TT

PFK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. भोगले....... 15:20

श्री. दिवाकर रावते ....

त्यातले आमचे कृपाशंकर सिंह यांनी तर सांगितले की, "हम है" हे क्षेत्र सभेमध्ये 5-50 भैय्ये काठ्या घेऊन .....आले नगरसेवक....अडथळा.....फक्त 50 समोसे आणि एक टॅक्सी फुटली तर हतबल सरकार दिल्लीला गेले. सांगा तुम्हाला काय होते आहे काय त्याने ? आपणच असे गर्भगळित झााला आणि वरुन दांडका आला ....येथे "गल्लीत गोंधळ आणि दिल्लीत मुजरा" हे परफेक्ट लागू पडते. आम्हाला सांगा ते जर या सभेत आले, दुसरीकडून आणखी आले, तिसरीकडून "हम है" आणि "अल्ला हो अकबर" करीत तेथे आले आणि "कसम राम की खाते है" असे चारही बाजूंनी आले तर त्या क्षेत्रसभेचे काय होणार हो ? ...अडथळा...."जय भवानी" नगरसेवक आहे. हे नक्कीच घडणार आहे. कारण त्या सभेमध्ये त्याच भागाच्या विकासाच्या संदर्भातील चर्चा होणार आहे. कुठली चर्चा होणार आहे ? तर या क्षेत्रसभेची कार्ये आणि कर्तव्ये यांच्या संदर्भात प्रभागांची परिस्थिती विचारात घेऊन पुढील कार्ये पार पाडता येतील व कर्तव्याचे पालन करता येईल. क्षेत्र सभेमध्ये, राबवावयाच्या योजना व विकास कार्यक्रम ...अडथळा....माननीय मंत्री महोदय श्री. नवाब मलिक आपण या खात्याचे मंत्री होता त्यावेळेस आम्हाला डेमो वगैरे दाखवित होता. क्षेत्र सभेमध्ये राबवावयाच्या विकास योजना व कार्यक्रम यांचा प्राथम्यक्रम सुचविणे "प्राथम्यक्रम सुचविणे" हा एकच शब्द आहे. म्हणजे हॅलोजनचा दिवा बसवावयाचा असेल तर तो गल्लीच्या या टोकावर की त्या टोकावर, सुरुवात दोन्ही बाजूने होते परंतु माझ्या भागात लावावयाचा की तुझ्या भागात लावावयाचा ? अशा प्रकारे प्राथम्यक्रम सुचवावयाचा आहे. मुंबई महापालिकेच्या क्षेत्रात येणाऱ्या विविध कामांच्या संदर्भात मग गटार लाईन असेल, स्टॉर्म वॉटर असेल, पाणीपुरवठा, कचरा यासंसबंधीचे विषय असतील, ही सर्व कामे करताना प्राथम्यक्रम सुचवावयाचे आहेत. म्हणजे प्रभाग समितीच्या किंवा यथास्थित विकास योजनांमध्ये अंतर्भूत करण्यासाठी प्रभाग समितीकडे व ठराव मंजूर करावयाचा आणि तो प्रभाग समितीकडून अर्थसंकल्पात येण्यासाठी महापालिकेकडे येईल. परंतु पाच हजाराच्या बुथमध्ये हा सर्व गोंधळ लक्षात घेतला तर मुंबईत घरातघरात मतामतांची वैविध्यता आहे. असे असताना त्या सभेत विकासात्मक चर्चा, विकासात्मक कार्याकरिता मान्यता आणि ही मानयता देत असताना प्राथम्यक्रम ठरविणे....अडथळा....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

(अडथळा) सभापती महोदय, हे सर्व चिंतेचे विषय आहेत. आमची महानगरपालिका स्वायत्त आहे. आमच्या महानगरपालिकेकडे पैशाचा तुटवडा नाही. आमच्या महानगरपालिकेला भीक लागलेली नाही. मुंबई महानगरपालिकेने जग थक्क होईल अशी मोठ मोठी कामे केलेली आहेत. जग थक्क होईल अशा पाणी पुरवठयाच्या योजना मुंबई महानगरपालिकेने राबविलेल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेचा पाणी पुरवठा विभाग फार मोठा आहे. मुंबई पाणी पुरवठा विभागात जे अधिकारी आहेत ते अतिशय चांगल्या दर्जाचे आहेत. या अधिका-यांना पाणी पुरवठयाच्या संदर्भात प्रचंड ज्ञान आहे. जे जगाला जमले नाही ते काम आमच्या महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने करुन दाखविले आहे. हाजीअली येथे जे काम केलेले आहे ते युनीक असे काम आहे. मी मुंबई महानगरपालिकेचा महापौर असतांना या योजनेच्या कामाच्या संदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळेस हजीअलीच्या कामाच्या संदर्भात कन्सल्टंट नेमण्यात आले होते. त्यानंतर 4 कन्सल्टंट नेमण्यात आले. मुंबईच्या पाण्याचा निचरा कसा करावयाचा हे आता तुम्ही आम्हाला सांगणार आहात काय ? गिरगाव, दादर, परळ खासकरुन गिरगाव खेतवाडी, कामाठीपुरा, गोल देऊळ, भेंडी बाजार या ठिकाणी आपण गेला तर दोन इमारतीच्यामध्ये दोन मजल्या एवढा ढीग पडलेला आपल्याला दिसून येईल. त्यावेळी हाऊसगल्ली साफ करण्याची कायद्यात तरतूद नव्हती. हाऊस गल्लीचा विषय हा श्री. पडवळ यांच्या खास आवडीचा विषय होता. हाऊस गल्लीच्या विषयामुळेच ते नेहमी नगरसेवक म्हणून निवडून येत होते. आता ते स्वर्गवासी झालेले आहेत. हाऊस गल्लीचा विषय आपण जेवढा सोपा समतजतो तेवढा काही सोपा नाही. गिरगाव, भेंडी बाजार, नागपाडा विभागात 5000 वस्तीमध्ये क्षेत्र सभा आपण घेत आहोत. आता या क्षेत्रीय सभेमध्ये या विषयावरुन मारामारी होईल, लोकांची डोकी फोडली जातील हे आपण विसरु नका. आता आपण क्षेत्र सभेचे ओपनींग करणार आहात. मुंबईमध्ये 15-20-25 वर्षापूर्वी पाण्याच्या पाईपलाईन्स टाकण्यात आलेल्या आहेत. दोन इमारतीमधून पाण्याची पाईप लाईन्स, गटाराची पाईप लाईन, सांडपाण्याची पाईपलाईन जाते. जर पाण्याची पाईप लाईन फुटली तर त्या पाण्यात गटाराचे पाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

मिक्स होत असे व रोगराई पसरत असे. या पाईप लाईन्स कोणी बदलावयाच्या यांसदर्भात वाद होत असे. परंतु आता या पाईप लाईन्स आता आमदार फंडातून बदलवल्या जातात. आमदार फंडातून या कामासाठी पैसे उपलब्ध करुन दिले जातात. घर दुरुस्ती मंडळ तसेच जुन्या इमारतीच्या संदर्भात पुढे-मागे चर्चा होणारच आहे. गटार दुरुस्ती हे फार महत्वाचे काम आहे. हा विषय जेव्हा माझ्या समोर आला होता त्यावेळी माननीय मनोहर जोशी हे मुख्यमंत्री होते त्यांना मी सांगितले की, गटार दुरुस्तीच्या कायद्यात बदल करणे फार आवश्यक आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

ही कामे करण्याकरिता महानगरपालिकेकडे कोणत्याही प्रकारचा निधी नाही. तसेच आमदाराचा फंड नाही. सभापती महोदय, श्री.अशोक पडवे हे लोकसत्तेचे संपादक होते आणि ते दादर मधील घामट टेरेस या इमारतीमध्ये लोकसत्ता वर्तमानपत्रात ते नेहमी असे लिहावयाचे की, मी ज्या इमारतीमध्ये राहतो ती इमारत चांगल्या अवस्थेत आहे परंतु त्या इमारतीच्या बाजूला असलेल्या इमारतीची मलनिस्सारणाची लाईन फुटल्यामुळे मला त्रास होतो. मी नगरसेवक झाल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्या घरी गेलो होतो. त्यावेळी मी् त्यांना असे सागितले की, तुम्ही संपादक आहात म्हणून मी आपल्याला भेटावयास आलो नाही. ते ज्या ठिकाणी राहत होते तो भाग माझ्या वार्डात येत नव्हता तरी सुध्दा त्यांच्या इमारतीची अवस्था मी त्यावेळी पाहून आलो होतो. त्या इमारतीची जी गटार लाईन फुटलेली होती ती दुरुस्त करण्यासाठी कायद्यात तरतूद नसतांना महानगरपालिकेत मी नगरसेवक झाल्यानंतर पहिल्यांदा त्यांचे काम करुन दिले याचा मला अभिमान वाटतो. ही गटार लाईन दुरुस्त करण्यासबंधी कायद्यात तरतूद नव्हती म्हणूनच ती वाहत होती आणि त्या पाईप लाईनच्या दुरुस्तीचे काम मी करुन दिले होते. त्यावेळी श्री. पडवे हे लोकसत्ता या वर्तमनपत्रात काम करीत होते. सामना या वर्तमानपत्रामध्ये ते काम करीत नव्हते. चांगल्या आणि ज्ञानी माणसाला होणारा त्रास थांबविण्याचे काम केल्याबद्दल मला समाधान मिळाले होते.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या रस्त्याला जोडणा-या ज्या जोडण्या होत्या त्याची दुरुस्ती कोण करणार आहे ? पाच सहा वर्षापूर्वी मुंबई महानगरपालिकेने अशा प्रकारचा निर्णय घेतला होता व त्या निर्णयानुसार स्थायी समितीने निधीची उपलब्धता करुन घेतली होती. त्यावेळी श्री. वाईकर चेअरमन असतील वा त्यांच्या अगोदरचे चेअरमन असतील असे मला वाटते. मुबई शंहरामध्ये रस्त्यापर्यंत येणा-या सर्व जोडण्या त्यावेळी नवीन टाकण्यात आल्या होत्या आणि आता त्या पुन्हा पुनरुज्जीवित केल्या आहेत त्यामुळे पाणी पुरवठयात थोडा फरक पडला आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातील लहान लहान बाबी या क्षेत्रीय सभेशी निगडीत आहेत. शहरातील घरगल्ली कोण साफ करणार आहे,गटार लाईन कोण साफ करणार आहे, फुटलेली गटार लाईन कोण दुरुस्त करणार आहे , पाणी पुरवठा करणा-या पाईप लाईनमध्ये काही दुरुस्ती

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

करावयाची असेल तर ती कोण करणार आहे, कचरा पेटीतील कचरा कोण साफ करणार आहे , कच-याची विल्हेवाट कशी लावावयाची अशा प्रकारे लोकांच्या दैनंदिन जीवनातील अनेक गोष्टीशी निगडीत ही क्षेत्रीय सभा आहे.

सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, हा विषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. आपण हे विधेयक मंजूर करणार आहात की आणखी गोंधळाची परिस्थिती निर्माण करणार आहात हे माननीय मंत्री महोदयांनी पहावे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर मोठया प्रमाणावर गोंधळ निर्माण होणार आहे . आपल्याला मात्र कोठला तरी कायदा केल्याचे समाधान आपल्याला लाभेल. मुंबई महानगरपालिकेमध्ये मी काम केलेले असल्यामुळे मला हा सर्व अनुभव आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांनीसुध्दा महानगरपालिकेमध्ये काम केलेले असल्यामुळे त्यांनाही चांगला अनुभव आहे.त्यामुळे पुढे काय होणार आहे हे आम्हाला अनुभवावरुन समजून येते. या विधेयकामध्ये क्षेत्र सभेची कार्य व कर्तव्यासबंधी 66 (ड) कलम असून त्यात असे म्हटलेले आहे की, क्षेत्र सभेच्या क्षेत्रात राबवावयाच्या योजना व विकास कार्यक्रमाध्ये प्राथम्यक्रम सूचविणे " त्यामुळे किती भानगडी होणार आहेत. त्यानंतर पुढे असे म्हटलेले आहे की, अशा योजना व कार्यक्रम मंजूर झाल्यानंतर प्रभाग समिती त्या विभागातील स्थानिक अधिका-यांना घेऊन तात्रिक दृष्टया प्रस्ताव तयार करील,अंदाजपत्रक तयार करील. त्यासंबंधी नियोजन करील त्यानंतर महानगरपालिकेच्या विकास योजनेअंतर्गत ती योजना अंतर्भूत करण्याकरिता प्रभाग सामतीकडून मंजुरीसाठी जाईल आणि ते अर्थसंकल्पात येईल. पुरवणी मागण्याच्या संदर्भात बोलत असतांना आपण कशा प्रकारची पुरवणी मागणी केलेली आहे हे मी सांगणार आहे.विधिमंडळाच्या इतिहासात पहिल्यांदा अशा प्रकारची पुरवणी मागणी आलेली आहे. तुम्ही काय करीत आहात हे मी त्यावेळी सांगणार आहे. त्यानंतर पुढे असे म्हटले आहे की, " क्षेत्रसभेच्या क्षेत्रात रस्त्यावर दिवे लावण्यासाठी, रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी पाण्याचे नळ बसविण्यासाठी,सार्वजनिक विहिरी बांधण्यासाठी, सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधण्यासाठी अशा इतर सार्वजनिक सोयी सुविधासाठी जागा सुचविणे " पाच हजार व्यक्तिच्या क्षेत्र सभेमध्ये हे ठरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर अशा आठ सभा घ्यावयाच्या आहेत.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

त्यामुळे तो नगरसेवक राजीनामा देईन आणि मला नगरसेवक पद नको असे सांगेल. एवढया लोकांना घेऊन निर्णय करावयाचा असल्यामुळे पुढच्यावेळी त्याला मतदान होणारच नाही. नगर सेवकाला ही सभा घ्यावयाची म्हणजे आपले आयुष्य बरबाद करुन घेण्यासारखे आहे. या संदर्भात त्याच्या घरावरच हल्ले होतील. काही चाळीमध्ये गॅंगस्टर राहतात त्यामुळे त्या ठिकाणी अशी सभा घेण्याची नगरसेवकामध्ये हिंमतच राहणार नाही. श्री.कपिल पाटील सारखा सन्माननीय सदस्य मात्र तेथे सभा घेऊ शकेल परंतु गॅन्गस्टर असलेल्या भागात नगरसेवक ही सभा घेऊ शकणार नाही त्यामुळे त्याचे नगरसेवक पद रद्द होणार आहे. गॅन्गस्टरचा माणूस जर नगरसेवक असेल तरच तो तेथे सभा घेऊ शकेल.

नंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

हे मुंबईचे जीवन आहे. अंगावर शहारे यावेत अशा प्रकारच्या घटना निर्माण होतील असे या विधेयकामध्ये दिसत आहे. माननीय मंत्री डॉ.सुनील देशमुख येथे आलेले आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की, त्यांचा मतदार संघ पूर्णपणे शहरी भागातील आहे. आपले महापौर आहेत, त्यामुळे तेथे काय चालते ते आपल्याला सगळे माहिती आहे, म्हणजे तुमच्या पक्षाचे असताना सुध्दा त्यांच्या सभेमध्ये यांची माणसे आणि यांच्या सभेमध्ये त्यांची माणसे जातील की नाही ? जाणार.

श्री.विलासराव शिंदे (खाली बसून) : कायद्याने गेलीच पाहिजेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, हे विधेयक मागे घेण्यात यावे. खरेच मागे घेण्यात यावे, नाहीतर हे विधेयक चिकित्सा समितीकडे पाठवावे. कारण हे अत्यंत गंभीर आहे. या विधेयकामध्ये असे म्हटलेले आहे की, "रस्त्यावर दिवे लावणे, रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी पाण्याचे नळ लावणे" आपल्याकडे बाहेर आहे की नाही ? सार्वजनिक ठिकाणी विहीर बांधणे, स्वच्छतागृह बांधणे इ.सार्वजनिक सोयी करण्यासाठी 5 बुथ मधील माणसांनी एकत्र यावयाचे. त्यासाठी सभा घ्यावयाची, त्यांना पोस्ट कार्ड पाठवावयाचे. त्यांनी सभेसाठी यावयाचे आणि मग ते जाहीर सभेसारखे होणार आणि मग त्यामध्ये कामाच्या बाबतीत प्राथमिकता सुचवावयाची. अशा वेळी तेथे काय होईल ? ते मला सांगावे. अहो, शहरा-शहरामध्ये हाणामाऱ्या, गटबाजी होणार. आधीच लोक राजकारणातल्या गटबाजीने हैराण झालेली आहेत. "आयबीएन-लोकमत" या चॅनेलवर काल जो पोल दाखविण्यात आला, तो पहावा, रोज जे पोल दाखविले जातात ते पहा म्हणजे त्यावरुन आपल्याला लोकांची मानसिकता काय आहे, ते समजते. यापुढे लोकशाहीमध्ये लोक प्रामाणिक माणसानांच जगवतील असे दिसते. लोक या माध्यमातून असे सांगत आहेत की, भविष्यामध्ये या लोकशाहीमध्ये कोण टिकणार आहे ? याबाबत तुम्हाला वॉर्निंग देत आहेत. तसेच आता झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये सुध्दा प्रलोभन,पैसा,दारु इत्यादी गोष्टी दिल्या तरी लोकांनी जुमानले नाही आणि आपल्या पध्दतीनेच मतदान केलेले आहे. तेव्हा आता लोक शहाणी झालेली आहेत. त्यामुळे तुम्ही याठिकाणी काय निर्माण करीत आहात याचा विचार करावा आणि हे सर्व करण्यासाठी हट्टाला पेटू नका. तसेच हे करावयाचेच म्हणून करु नका. यामधील एकही अधिकाऱ्याला मुंबई शहराचा अनुभव नाही. त्यांना यासंबंधात काही जाणीव नाही. तो भविष्यामध्ये जगणारा आहे आणि येथून निवृत्त झाल्यानंतर त्याचा येथे काही संबंध येणार नाही

. . . .2डब्ल्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

कारण त्याने स्वत:साठी सर्वकाही व्यवस्थित करुन ठेवलेले आहे. तेव्हा शहरातील सर्वसामान्य माणसाच्या हिताच्यादृष्टीने हे विधेयक आणत असताना, आपण अशा प्रकारची जी व्यवस्था निर्माण करीत आहात.

सभापती महोदय, याठिकाणी विधेयकाची जी मराठी प्रत आहे, त्यामध्ये पान क्र.3 वर "50टयू, 50टव्ही, 50 टडब्ल्यू"असे म्हटलेले आहे. म्हणजे काय ? ते मला समजलेले नाही. तर मराठी विधेयकाचे इंग्रजीमध्ये ट्रान्सलेशन व्हावयाचे तर इंग्रजी विधेयकाचे मराठीमध्ये ट्रान्सलेशन केले आहे असे दिसते. हे कसले अधिकारी आहेत ? या राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेचा सन्मान ठेवा असा आम्ही आग्रह धरीत आहोत. पण हे काय आहे ? ते कळत नाही. तेव्हा माझे असे म्हणणे आहे की, पहिल्यांदा या भाषेचे शुध्दीकरण करण्यासाठी हे विधेयक मागे घ्यावे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

हे विधेयक इंग्रजीमध्ये आणलेले असल्यामुळे यासाठी ते मागे घेण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये असे म्हटले आहे की, "क्षेत्रसभेचा कार्याध्यक्ष क्षेत्रसभेची बैठक बोलावील. यानंतर क्षेत्रसभेचा सचिव कार्याध्यक्ष निश्चित करील त्याप्रमाणे दिनांक, वेळ व ठिकाण नक्की करील.बैठक्ीची नोटीस काढील. अशा प्रत्येक बैठकीस क्षेत्रसभेच्या क्षेत्रात विस्तृत प्रसिध्दी देण्यात येईल." प्रसिध्दी देण्यात येईल याबद्दल यामध्ये काहीच सांगण्यात आलेले नाही? प्रसिध्दीचे माध्यम सांगण्यात आलेले नाही. कोणत्या पध्दतीने प्रसिध्दी करण्यात येणार आहे?वर्तमानपत्रात जाहिराती देणार काय? मुंबईत जाहिरात द्यावयाची असेल तर त्यासाठी खर्च किती येईल?किती वर्तमानपत्रात जाहिरात देणार, त्या कशा देणार,?क्षेत्रसभेच्या दोन बैठकीमध्ये लोटलेला कालावधी हा 6 महिन्याहून अधिक असणार नाही, हे ठीक आहे. या प्रसिध्दी माध्यमांपैकी एखादी गोष्ट जनतेपर्यंत पोहचविण्याचे माध्यम कोणते? या बाबतीत माननीय मंत्रिमहोदय, काय सांगणार आहेत ते आम्हाला माहीत आहे. ते असे सांगतील की आम्ही ते नियमात करु. नियमामध्ये काय तरतूद करण्यात येणार आहे, ते लोकांपर्यंत कशा रीतीने पोहचविण्यात येणार आहे याबाबतीत या सदनामध्ये विधेयक आणताना सांगितले पाहिजे. सभापती महोदय, हे सगळे सूचविण्याकरिता सगळया लोकांना बोलावण्यात येणार आहे. कलम 3 मध्ये असे म्हटले आहे की, "क्षेत्रसभेच्या क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा व्यवस्था." हे अत्यंत गाभीर आहे. "मलप्रवाहाची विल्हेवाट, सिव्हरेज डिस्पोजल, सार्वजनिक स्वच्छता. वादळपावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन, रस्ते, मार्गावरील दिव्यांची व्यवस्था यातील त्रुटी शोधून काढणे व त्या त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे" पाणीपुरवठा व्यवस्था हा तांत्रिक भाग आहे. या मुंबईमध्ये करण्यात येणारा पाणीपुरवठा चावी किती उघडावयाची यावर अवलंबून आहे. एक आटा जास्त,एक आटा कमी अशा प्रकारे या आटयावर किती प्रेशरने पाणी सोडावयाचे ते अवलंबून आहे. दादरमध्ये तीन ते चार मजल्यापर्यंत पूर्वी सहज पाणी येत होते. आता तळमजल्यावर जेमतेम पाणी येते. लोकांनी प्रत्येक घरामध्ये पाणी खेचणारे पंप बसवले आहेत. यावरुन शेजाऱ्यांमध्ये भांडणे चालू असतात. तुमचा पंप कधी बंद करणार,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

आमच्या घरातील पंप चालू करावयाचा आहे असे एकमेकांना विचारण्यात येते.त्यावरुन भांडणे होतात.कारण सगळेच पंप एका वेळी चालू झाले तर काय होईल? सभापती महोदय, गोखले रोडवर महाराष्ट्र कॉलनी आहे. त्याठिकाणी सर्व उच्च विद्याविभुषित लोक रहातात. मी एका दौऱ्यावरुन घरी पारत आलो होतो. त्यामुळे कॉलनीत काय चालले आहे हे मला माहीत नव्हते. गाडीचा सायरन वाजला म्हणून मी माझ्या घरातून खाली उतरुन बघितले. रात्रीचे 9.30 वाजले होते. सगळीच्या सगळी सुशिक्षित मंडळी रास्तारोको करीत होती. मी त्यांना त्याबाबत विचारले. तेव्हा त्यांनी सांगितले की, कॉलनीत महापलिकेचे काम चालू आहे. गेले पधंरा दिवस झाले खड्डे खणलेले आहेत. आम्ही एवढे दिवस झाले पाण्याशिवाय आहोत. आमच्याकडे कोणीच लक्ष देत नाही. त्यावेळी मी ताबडतोब तेथील सर्व अधिकाऱ्यांना बोलावून घेतले. सभापती महोदय, मी याठिकाणी खात्रीने सांगतो की, चार तासात तो प्रश्न सुटला, मार्गी लागला. कारण ज्या ठिक्‌ाणी प्रॉब्लेम होता तेथे कोणीच पोहचले नव्हते. रातोरात ते काम झाले. हा तांत्रिक विषय आहे. पाणी पाहिजे म्हणून लोक रास्ता रोक करतात, निदर्शने करतात, आंदोलने करतात. पण लोक तांत्रिकदृष्टया पाण्याचे व्यवस्थापन कसे करणार ते सांगावे. मलनि:सारण, सिव्हरेज डिस्पोजल याबाबत ती सभा कशी काय मार्गदर्शन करणार आहे.?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

यामध्ये सार्वजनिक स्वच्छतेचा विषय तर फार गंभीर आहे. मी खाऊन पिऊन झाल्यावर खिडकीतून कचरा बाहेर टाकला की मी स्वच्छ ही वृत्ती वाढलेली आहे. आपण परदेशात जातो आणि तेथील स्वच्छतेबाबत कौतुकाने सांगतो की, त्या ठिकाणी लहान मुलगा चॉकलेट खाल्यावर त्याचा कागद आपल्या खिशात ठेवतो. या ठिकाणी त्याचे कौतुक करतो परंतु आपण या ठिकाणी चॉकलेट खाल्यावर त्याचा कागद खाली टाकूनच त्याबाबत बोलतो. आपल्या घरातील कचरा खिडकीतून बाहेर टाकणारी मंडळी यामध्ये येतील. मग ते काय मार्गदर्शन करणार ? यामध्ये 'वादळी पावसाच्या पाण्याचे व्यवस्थापन' असा उल्लेख केलेला आहे. आता 1100 कोटी रुपये ब्रिमस्टोवॅड प्रकल्पासाठी मंजूर झालेले आहेत. त्यातील 500 कोटी रुपये आलेले आहेत आणि 600 कोटी रुपये यावयाचे आहेत. त्या कामामध्ये अतिशय उच्च तांत्रिक दर्जा आहे. तो प्रकल्प राबविण्याच्या बाबतीत हे लोक काय सांगणार ? त्यानंतर रस्ते व मार्गावरील दिव्यांची व्यवस्था यातील त्रुटी शोधून काढणे आणि त्या त्रुटी दूर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे याबाबत उल्लेख केलेला आहे. म्हणजे काय उपाययोजना करावयाची ते त्या सभेने सूचवावयाचे आहे. त्यानंतर क्षेत्र सभेच्या क्षेत्रातील सार्वजनिक आरोग्य केंद्रामध्ये राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमांना, विशेषकरुन रोग प्रतिबंधक कार्यक्रमांना तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रमांना सहाय्य करणे हे काम त्यांनी करावयाचे आहे. याबाबतीत ही क्षेत्र सभा सांगणार आहे काय ? तेथील सचिव सांगणार की, आरोग्य केंद्राचा कोटा नक्की केलेला आहे आणि कुटुंब कल्याणाच्या एवढ्या शस्त्रक्रिया झाल्या पाहिजेत अशी अट आहे आणि त्यासंदर्भात सहाय्य करण्यास सांगितले आहे. सचिवांनी असे सांगितल्यावर मग याबाबतीत कोण हात वर करणार ? यामध्ये वेगवेगळे प्रकार आहेत. पुढे असे म्हटले आहे की, "साथीचे रोग व नैसर्गिक आपत्ती याबाबतच्या घटनांची माहिती कळवण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे." त्यानंतर पुढे असे म्हटले आहे की, "क्षेत्र सभा सदस्यांना महापालिका कर व वापर आकार भरण्याबाबतच्या त्यांच्या कर्तव्याची आठवण करुन देणे." लोकांनी टॅक्स भरला की नाही याची यादी त्या ठिकाणी वाचणार काय ? याबाबत हजर आणि गैरहजर लोकांची यादी त्यांना वाचावी लागेल. एका बुथवर 1000 ते 1100 लोक असतात त्यानुसार अशा प्रभाग क्षेत्रामध्ये सरासरी 5 हजार लोक असतील

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यांनी कर भरला की नाही हे त्यांना सांगावे लागेल. त्यांच्या कर्तव्याची जाणीव सभेमध्ये करुन द्यावी लागेल. असे केले तर लोक मारतील. महापालिका सुधारणेच्या बाबतीत फार विचित्र व्यवस्था आहे. यामध्ये अनेक गोष्टी आहेत. अशा प्रकारे कामांची व्याप्ती असलेली ही सभा आहे. क्षेत्र सभेचा सचिव वॉर्डातील एखादा अधिकारी असणार आहे. हे विधेयक पुढे वाचावयाचे की नाही असा प्रश्न पडला आहे. या विधेयकामध्ये क्षेत्र सभेचे हक्क व अधिकार यामध्ये क्षेत्र सभेस पुढील हक्कांचा व अधिकारांचा या बाबतीत विहित केलेल्या कार्यपध्दतीला अधीन राहून वापर करता येईल असे म्हटले आहे. यामध्ये पुडे असे म्हटले आहे की, "महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून, महानगरपालिकेकडून देण्यात येणाऱ्या सेवांची आणि क्षेत्रामध्ये पार पाडण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांची माहिती मिळवणे." त्यानंतर पुढे असे म्हटले आहे की, "प्रभाग समितीकडून - क्षेत्र सभेने केलेल्या सूचनांवर केलेल्या कार्यवाहीसह क्षेत्र सभेच्या अधिकारितेच्या संबंधात प्रभाग समितीने किंवा महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयांची माहिती मिळवणे." आमची प्रभाग समिती काय काय काम करते, कोणते प्रस्ताव पास करते, त्यांना किती बजेट दिलेले आहे याची माहिती त्यांनी घ्यावयाची आहे. त्या ठिकाणी किती अण्णा हजारे उभे राहतील ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

म्हणून "क्षेत्र सभेच्या अधिकारासंबंधी निर्णय प्रक्रियेसंबंधीची माहिती मिळविणे, स्वच्छता राखणे, प्रदूषणास आळा घालणे यासारख्या सार्वजनिक हिताच्या बाबींविषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करणे, क्षेत्र सभेच्या बैठकींमध्ये पाणीपुरवठा, रस्त्यांवर व मार्गांवर दिवे लावणे, साफसफाई, मलप्रवाह विल्हेवाट, सार्वजनिक स्वच्छता, वादळी पावसाचे पाणी व घनकचरा व्यवस्थापन व इतर नागरी सोयीसुविधा यांच्याशी संबंधित प्रभाग स्तरावरील अधिकारी यांनी उपस्थित राहणे," म्हणजे अधिका-यांची तेथे फौजच्या फौज उपस्थित ठेवावी लागेल. त्या अधिका-यांच्या अंगावर लोक जाणार, तेथे विशिष्ट परिस्थिती निर्माण करणार, त्या अधिका-यांना प्रश्न विचारणार, त्याचे उत्तर मिळाले नाही तर तेथे जे निर्माण करावयाचे ते करणार. या कायद्यामध्ये कलम 4 मध्ये असे म्हटले आहे की, "पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, मलप्रवाह विल्हेवाट लावणे" हे सर्व मुंबई शहराकरिता झाले. पण मुंबई प्रांतिक अधिनियम सुधारणा हा विषय नागपूरकरिता लागू होतो, संभाजीनगर व नांदेडकरिता आहे. एका नगरसेवकाच्या वार्डात 2000 ते 2500 मतदार असतात म्हणजे दोन बूथ असतात. एवढया मर्यादेपुरताच तो वॉर्ड असतो. परंतु या विधेयकात 5 बूथ असे नमूद केले आहे ते तर येथे लागूच होत नाही. केंद्र सरकारकडून या माध्यमातून पैसा उपलब्ध करुन घ्यावयाचा आहे असे म्हटले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात सुधारणा केली जात आहे. परंतु नगरपरिषदा लहान असतात. तेथे प्रभाग समित्या अस्तित्वातच नाहीत, तरीही या कायद्यामध्ये तरतूद केलेली आहे. कशासाठी ही तरतूद केली आहे. या कायद्यातील त्रुटी तरी शासनाने दूर कराव्यात. त्यातील त्रुटी दूर झाल्या किंवा नाही ते समजले पाहिजे. म्हणून मी मघाशी विनंती केली होती की, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे. त्या समितीमध्ये एक आठवडयात निर्णय होऊन ते पुन्हा सभागृहासमोर आणावे. परंतु अशाप्रकारच्या गोष्टी कारण नसताना या कायद्यात घालण्याचे काम करु नये. केंद्राकडून पैसे मिळणार आहेत म्हणून हे विधेयक आणले आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे राज्य सरकार आणि केंद्र सरकारमध्ये काय सामंजस्य करार झाला आहे. त्याची माहिती सभागृहाला देणे ही घटनात्मक जबाबदारी नाही काय ? केंद्रीय नगरविकास विभागाच्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाचे कामकाज चालते. त्यासाठी राज्य सरकारला त्यांच्याशी करार करावा लागला. त्याचे कारण आम्ही समजू शकत नाही. केंद्रीय कायद्याच्या अंतर्गत आपले कायदे असतात. कन्करन्स लिस्ट 1, 2 प्रमाणे कायदे तयार होतात. म्हणून केंद्राकडून राज्याला किती निधी मिळणार आहे त्यासंबंधी मंत्रिमहोदयांनी खुलासा केला नाही. यासंबंधी मी परवा एका विषयावर बोलताना भीती व्यक्त केली होती.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

इतर प्रांतातील लोकांचे मुंबईत येणारे लोंढे थांबवायचे नाहीत, त्यांना येऊ द्यायचे, त्यांच्या व्यवस्थेकरिता इन्फ्रास्टक्चर उभे करा अशा इशारा जागतिक बँकेने केन्द्र सरकारच्या माध्यातून दिला आहे. सभापती महोदय, जागतिक बँकेने केवळ मुंबईकरिता असे आदेश दिलेले आहेत. आपण घटनेचे कौतुक करतो. परंतु त्या घटनेच्या पलीकडे जाऊन, आमची ही घटना परप्रांतीयांचे लोंढे मुंबईत आणण्यासाठी अपुरी पडत आहे की काय म्हणून जागतिक बँकेने ही तंबी दिलेली आहे, असे वाटते. जागतिक बँकेने दिलेल्या तंबीनुसार या देशातील सगळे परप्रांतीय या मुंबईत आलेच पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे. त्यांना राजकीय संधी उपलब्ध करुन द्या अशा प्रकारची अट देखील जागतिक बँकने घातलेली आहे. तसेच त्यांच्याकरिता सुविधा निर्माण करा अशी अट टाकलेली आहे. हे सर्व करण्याकरिता निधी कोठून उभा करणार ? मला जी भीती वाटत आहे त्याच करिता हे विधेयक आणलेले आहे. या मुंबईचा सत्यानाश कसा होईल हे पाहणारे मुनुकुमार श्रीवास्त नगरविकास खात्याच्या प्रमुख पदी असल्यामुळे ते मुंबईची बरोर काळजी घेत आहेत. त्यांच्या बद्दल माझा असा समज झालेला आहे की ते मुंबईचे सरळ सरळ वाटोळे करीत आहेत. आतापर्यन्त त्यांनी तशीच परिस्थिती निर्माण केलेली आहे. भविष्यामध्ये मराठीसाठी कोणी झगडू शकणार नाही, मराठी बोलण्यासाठी कोणी शिल्लक राहाणार नाही याची काळजी वाहणारे हे सगळे अधिकारी आहेत. जवाहर नेहरु नागरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत सामंजस्य करार करण्यात आला. हा करार कशासाठी केला ? केन्द्र सरकार या मुंबईवर मेहरबानी करीत आहे काय ? एकट्या मुंबई शहरातून 33 टक्के महसूल केन्द्र सरकारला जातो. त्यामुळे केन्द्र सरकार मुंबईवर मेहरबानी करीत आहे असे कोणी समजू नये. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की तुम्ही मुस्लिमधर्मीय असलात तरी तुम्ही पिढीजात मुंबईचे आहेत. ही पिढीजात मंडळी उद्ध्वस्त करण्याचे कारस्थान अशा या विधेयकाच्या माध्यातून केले जात आहे. मुंबईच्या संदर्भात अशा प्रकारच्या अटी घालून तुम्ही पैसे उभे करीत आहात. परप्रांतीयासाठी तुम्ही इन्फ्रास्ट्रक्चर तयार करा, उद्योग तयार करा, देशातील सर्वांनी मुंबईत आले पाहिजे अशी अट जागतिक बँकेने घातलेली आहे. जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत म्हणजे नेहरुंच्या नावाने मुंबई उद्ध्वस्त करण्याचे काम आपल्या पक्षाकडून होत असेल तर आमच्यासाठी ती दुर्दैवाची बाब आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलण्यासाठी आणखी किती वेळ लागेल ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अजून अनेक मुद्यांवर मला बोलायचे आहे. तरी देखील आपण सांगत असाल तर मी थांबतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, विधेयकावर बोलण्यासाठी वेळेचे बंधन नाही. परंतु आज पुरवणी मागण्यावर चर्चा आहे. त्या आधी घ्याव्यात व नंतर विधेयकावरील चर्चा सुरु करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

...नंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : मी असा निर्णय घेतो की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, You will be on leg. सोमवार, दिनांक 15 जून, 2009 रोजी मी शासकीय विधेयकांसाठी अधिकच्या वेळेचे नियोजन करतो आणि या विधेयकासकट शासकीय विधेयकांवर सोमवारी आपण चर्चा करु.

आता सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु करु.

-----------

....2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.**: नियम स्थगित ठेवण्याबाबत वित्तमंत्र्यांचा प्रस्ताव

डॉ.सुनिल देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या सभागृहाने मान्य केलेल्या शिफारशीस अनुलक्षून महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये पूरक मागण्या सादर केल्यानंतर तीन दिवसांच्या आत त्यावरील चर्चा घेऊ नये अशा आशयाची तरतूद पूरक मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी, असा प्रस्ताव नियम 230 (2) अन्वये मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

-------------

....3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे

डॉ.सुनिल देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009-2010 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2009-2010 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे.

------

....4........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी.**: सन 2009-2010 च्या पूरक विवरण पत्रावर चर्चा

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेसाठी दोन दिवस म्हणजे शनिवार, दिनांक 13 जून, 2009 आणि सोमवार, दिनांक 15 जून, 2009 हे दिलेले आहेत. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रिनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व सोमवार, दिनांक 15 जून, 2009 करिता असलेल्या सर्व मागण्यांवरील चर्चा सोमवार, दिनांक 15 जून, 2009 रोजी पूर्ण करावी लागेल.

**<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या</u>**

**सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :

मुख्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक : ए-1, ए-2, ए-4, ए-5, ए-6, ए-7, एफ-2, एफ-3, एफ-5, क्यू-3,

उप मुख्यमंत्री, उद्योग, बंदरे व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक:एच-1, एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9,

उद्योग,बंदरे व खारजमीन मंत्री यांच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक : बी-7, आय-3, आय-5 ,के-3, के-7, के-9, के-10,

परिवहन, विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक : बी-3, एन-3, एम-4,

....5........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**........

महसूल मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक: सी-1, सी-4, सी-6,

शालेय शिक्षण व विधि व न्याय मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक: ई-2, जे-1, जे-4,

सहकार, पणन, सांस्कृतिक कार्य व संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक व्ही-2, झेड-डी-1, झेड-डी-2

राज्य उत्पादन शुल्क व पर्यावरण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक: बी-2, यू-1,

वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक जी-1, ओ-1, ओ-4, ओ-5, ओ-6, ओ-7 ,ओ-8, ओ-9, ओ-10, ओ-11, ओ-13, ओ-15, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47,

अल्पसंख्यांक विकास, वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण, रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक व्ही-2 ,झेड-ए-1, झेड-ई-1

कृषी, जलसंधारण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक डी-3, एल-3, एल-7

सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक सामाजिक न्याय व व्यसन मुक्ती कार्य मंत्री : एन-2, एन-3, एन-3, एन-4 चर्चेला घेण्यात येतील. या मागण्यांचा तपशील कार्यक्रम पत्रिकेबरोबर वितरित केला आहे.

....6........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्वप्रथम मी बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 25 व बाब क्रमांक 35 यावर माझे विचार मांडणार आहे. सभापती महोदय, मुंबईतील दहशतवादी कृत्याच्या विरोधात कारवाई करणा-या पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि व्यक्ती यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याबाबत तरतूद करण्यासाठी बाब क्रमांक 32 ची पुरवणी मागणी मांडण्यात आली आहे. तर बाब क्रमांक 35 अन्वये मुंबईतील दहशहतवादी हल्ल्यात जखमी झालेल्या होमगार्डच्या कर्मचा-यांना नुकसान भरपाईसाठी तरतूद करण्यात आली आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. तथापि, मी आपल्या माध्यमातून माननीय गृहमंत्र्यांच्या हे लक्षात आणून देणार आहे की, ज्या दिवशी हल्ला झाला त्या दिवशी बोरीबंदर स्टेशनमध्ये सुमारे 52 ते 54 लोक मृत्युमुखी पडले. परंतु, त्यांची कोणीही दखल घेतलेली नाही. त्यांचे नातेवाईक त्या ठिकाणी आले, मृतदेह मूळ गावी नेऊन त्यांनी मृतदेहांची विल्लेवाट लावली. आपल्या माध्यमातून शासनाला माझी अशी विनंती आहे की, शासनाने वीर मरण आलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्यासाठी आर्थिक तरतूद केली आहे. त्यांना आर्थिक मदत देणे आवश्यकच होते. कारण, या जवानांनी आपल्या देशासाठी आपले प्राण दिले आहेत. परंतु, जे निरपराध नागरिक दहशतवाद्यांच्या हल्ल्यामध्ये बळी पडले, त्यांची दखल कोणी घेतलेली नाही. त्यांच्या गावी जाऊन, त्यांचा पत्ता शोधून काढून, त्यांचे नेमके किती नुकसान झाले आहे, याची माहिती काढून, त्यांना मदत दिली गेली पाहिजे. कारण, ही राष्ट्रीय आपत्ती होती. आपण दहशतवाद्यांच्या कारवाईला आळा घालण्यासाठी, त्यांचा पायबंद करण्यासाठी कमी पडलो आहोत. आपण कशामुळे कमी पडलो, याबाबतची कारणमिमांसा मी पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळी करणार नाही. मर्यादित स्वरुपात एवढेच लक्षात आणून देणार आहे की, बोरीबंदर आणि अन्य ठिकाणी एकूण 52 सर्वसामान्य नागरिक मृत्युमुखी पडले आहेत, त्यांच्या नातेवाईकांना कोणीही विचारणारे नाही. त्यांना मदत करण्यासाठी आणखी अशी किती रक्कम लागणार आहे ? या हल्ल्यात जे परदेशी नागरिक मृत्युमुखी पडले आहेत, त्यांच्या नातेवाईकांनी सहानुभूती म्हणून शासनाकडे नुकसान भरपाई मागितलेली नाही. परंतु, या देशातील, महाराष्ट्रातील जे निरपराध माणसे बळी पडली आहेत, ज्यांचा काहीही गुन्हा नव्हता,

.....7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.....

अशा लोकांचे पत्ते शासनाने शोधून काढले पाहिजेत, नातेवाईक शोधून काढले पाहिजेत आणि त्यांना आवश्यक असणारी मदत दिली पाहिजे. या हल्ल्यात किती लोक अपंग झाले, किती लोकांचे हात, पाय, डोळे गेले, याचाही तपास केला पाहिजे आणि त्यांना मदत दिली पाहिजे. त्याचप्रमाणे जे लोक मृत झाले असतील त्यांच्या नातेवाईकांनाही मदत देणे आवश्यक आहे, अशी या निमित्ताने माझी मागणी आहे.

यानंतर श्री.गिते........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

कोणाचा हात तुटला आहे काय ? कोणाचा डोळा फुटला आहे काय ? अशा लोकांना आर्थिक मदत देणे आवश्यक आहे. ज्याची नोंद घेतली गेली, त्यांनाच सर्व प्रकारच्या सवलती मिळतील. परंतु ज्यांची नोंद कोणी घेतली नाही, त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या सवलती मिळणार नाहीत. सभापती महोदय, गृह विभागाच्या मागण्यांच्या अनुषंगाने मी दोन, तीन गोष्टी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. मुंबईतील ऑर्थर रोड जेलमध्ये जे अतिरेकी ठेवण्यात आलेले आहेत, कुविष्यात गुंड ठेवण्यात आले आहेत, ज्या गुन्हेगारांना कोर्टाने शिक्षा सुनावलेल्या आहेत, अशा कैद्यांना ऑर्थर रोड जेलमध्ये ठेवण्यात आले आहे. त्या जेलमध्ये बाहेरच्या देशातून मनीऑर्डर येतात. यासंदर्भात अनेक वृत्तपत्रात बातमी छापून आलेली आहे. यासंदर्भात शासनाने गंभीर नोंद घेतलेली नाही. त्यांची गंभीर नोंद शासनाने ध्यावी.

श्री.हसन मुश्रीफ : आज गृह विभागाच्या मागण्या नाहीत.

श्री.मधुकर चव्हाण : मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांच्या विभागाच्या आज मागण्या सभागृहासमोर मांडण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री हे सर्व विभागांचे प्रमुख असतात. अंतिम गृह खाते हे माननीय मुख्यमंत्र्यांकडे असते...

**सभापती** : नाही. या ठिकाणी गृह विभाग वेगळा आहे.

श्री.मधुकर चव्हाण : ठीक आहे. सभापती महोदय, पान क्रमांक 92, बाब क्रमांक 83, शालेय शिक्षण विभागाच्या मागणीवर मी माझे विचार व्यक्त करतो. शालेय शिक्षण विभागाच्या अनुषंगाने दोन, तीन बाबी प्रकर्षाने सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सभापती महोदय, आपल्या परवानगीने दोन औचित्याचे मुद्दे मी सभागृहात उपस्थित केले होते. दरवर्षी अभ्यासक्रम बदलला जातो याबाबतीत गांभीर्याने चर्चा करण्याची गरज आहे.सभापती महोदय, एन.सी.आर.टी.च्या अभ्यासक्रमातील पुस्तकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची माहिती केवळ सहा ओळीमध्ये दिलेली आहे. मोगलांचा इतिहास सन 1526 पासून म्हणजे बाबर यांच्यापासून ते सन 707 मध्ये राजा दाहिरद मृत्यू होऊन आक्रमण झाले तेथपर्यंतचा इतिहास दिलेला आहे. मोगलांचा इतिहास देण्यास हरकत नाही. जो इतिहास आहे तो दिला पाहिजे. शहाजी यांच्या कामगिरीचा इतिहास दिला पाहिजे. अकबर बादशहाचा इतिहास दिला पाहिजे. परंतु त्यांनी जे अन्याय केले त्याचा देखील इतिहास त्यानी दिला पाहिजे. त्या एका वादाच्या विषयात मी जात नाही. पण या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

देशात नव्हे तर संपूर्ण जगामध्ये अव्दितीय असा राजा होऊन गेला. त्या महापुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल एन.सी.आर.टी.च्या अभ्यासक्रमामध्ये केवळ सहा ओळीमध्ये इतिहास सांगितला गेला आहे. परंतु औरंगजेब किती चांगला होता. शहाजींचे गोल्डन एज किती चांगले होते. यासंबंधीचा इतिहास त्या अभ्यासक्रमांत नमूद करण्यात आला आहे. यासंदर्भात मी फक्त चारच ओळी आपल्या निदर्शनास आणून देतो. "मराठा" बाकी काही नमूद केलेले नाही. शिवाजी महाराज असा काही उल्ल्‍ेख नाही. फक्त शिवाजी असा उल्लेख त्या अभ्यासक्रमात केलेला आहे. "कक्षा 7 वीं के लिए इतिहास की पाठ्यपुस्तक " हमारे अतीत - 2 " में मराठा शीर्षक के अन्तर्गत यह लिखा है कि, "मराठा राज्य एक अन्य शक्तिशाली क्षेत्रीय राज्य था, जो मुगल शासन का लगातार विरोध करके उत्पन्न हुआ था. शिवाजी (1627-1680 ) ने शक्तिशाली योध्दा परिवारों (देशमुखों) की सहायता से एक स्थायी राज्य की स्थापना की. अत्यंत गतिशील कृषक - पशुचारक (कुनबी) मराठों की सेना के मुख्य आधार बन गए. शिवाजी ने प्रायद्वीप में मुगलों को चुनौती देने के लिए इस सैन्य बल का प्रयोग किया. शिवाजी की मृत्यु के पश्चात् मराठा राज्य में प्रभावी शक्ति, चितपावन ब्राह्मणों के एक परिवार के हाथ में रही ". हे तुम्ही विद्यार्थ्यांना शिकविणार आहात काय ? आम्ही औचित्याच्या निमित्ताने एखादा विषय काढतो त्यावेळी सगळयांना वाटते की, आम्ही राजकीय अभिनिवेषाने बोलतो आहे. आपल्यावर टीका करण्यासाठी बोलतो आहे. आम्ही मुस्लीमव्देष्टे आहोत म्हणून बोलतो आहे. परंतु या अभ्यासक्रमात महापुरुषांचा एकेरी नावाने उल्लेख केला गेला आहे. चितपावन ब्राम्हणाच्या हातात शिवाजी महाराजांनी सत्ता दिली. लॉड मेकॅले या ठिकाणी उदगार काढले होते. देशावर तुम्हाला राज्य करावयाचे असेल तर कशाला आक्रमण करता ?

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ 16:10

श्री.मधुकर चव्हाण....

कशाला लढाया करता? कशाला डलहौसीला पाठविता? येथील लोकांच्या इतिहासाबद्दल, महापुरुषांबद्दल यांच्या मनात संभ्रम निर्माण करा, संस्कृतीबद्दल येथील माणसांच्या मनात द्वेष निर्माण करा, यांच्या रितीरिवाजाबद्दल गोंधळ निर्माण करा मग यांच्यामध्ये नपुसकत्वाची मानसिकता आली तर यांना गुलाम बनविणे सहज शक्य आहे. यासाठी केवळ द्वेषाचे राजकारण केले. सन्माननीय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे साहेब, आपण डॉ.बाबासाहेब आबेडकर यांना मानतो. त्या महापुरुषाने द्वेषाचे राजकारण कधी केले नाही. सामाजिक क्रांती व अभिसरण रक्ताचा एक थेंबही न सांडता केले. आज तुम्ही किती द्वेषाचे राजकारण करता? सभापती महोदय, काळा राम मंदिराचे प्रकरण आपल्याला जरुर माहिती आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे काळा राम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून आपल्या अनुयायांना घेऊन त्याठिकाणी गेले. मंदिरात प्रवेश दिला जात नाही म्हणून मंदिरावर शेण मारा असे ते आपल्या अनुयायांना सांगू शकले असते. परंतु त्यांनी असे केले नाही. जसे तुम्ही देवाचे दर्शन घेता तसा आम्हालाही देवाचे दर्शन घेण्याचा अधिकार आहे अशा प्रकारची उच्च कोटीची चळवळ त्यांनी निर्माण केली. परंतु कधी द्वेष केला नाही. चवदार तळयाचा सत्याग्रह केला. त्यावेळीही तळ्यात घाण टाका असे त्यांना म्हणता आले असते. त्यावेळी प्रचंड संताप अनुयायांच्या मनात होता. आपणही चूक केली. अमानुषपणे त्यांना वागणूक दिली. परंतु त्यावेळी त्यांनी द्वेषाचा इतिहास लिहिला नाही. त्याची आठवण करुन दिली नाही. यांनी असे केले, त्यांनी असे केले असा खोटा इतिहास ते सांगू शकले असते. परंतु तुम्ही या तळयाचे पाणी पिता त्याप्रमाणे आम्हालाही या तळयाचे पाणी पिण्याचा अधिकार आहे हे त्यांनी ठासून सांगितले. महाराजांच्या मृत्यूच्या पश्चात एका चित्पावन ब्राम्हणाच्या हाती सत्ता दिली, त्यानंतर दोन गाद्या झाल्या. पहिले बाजीराव आले, तो इतिहास मी सांगू इच्छित नाही. सभापती महोदय, आज सकाळी औचित्याच्या मुद्याद्वारे आम्ही प्रश्न मांडला होता. चर्चा अधिक झाली असेल परंतु पाठ्यपुस्तकातील हेडगेवार यांचे नाव वगळले. केवळ ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक होते म्हणून नाव वगळले? मदनमोहन मालवीय, हेडगेवार यांच्याबद्दल तुमच्या मनात द्वेष असेल तर तो चुकीचा आहे. मदनमोहन मालवीय यांच्याबद्दल धड्यामध्ये केवळ चार ओळी लिहिल्या आहेत. हिंदू धर्मातून मुस्लिम धर्मात धर्मांतर केले व पुन्हा हिंदू धर्मात गेले, त्यांनी द्विराष्ट्रवादाला विरोध केला म्हणून. पंडित मदनमोहन मालवीय यांच्याबद्दल विरोध आहे म्हणून आठवीच्या पुस्तकातील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

त्यांचे नाव काढून घेतले. पैठणला गागाभट्ट हजर होते ते सुध्दा काढून टाकले. महाराष्ट्रात काय निर्माण करणार आहात? तो एक इतिहास आहे. ताजमहाल हा शहाजहानने बांधला नाही असे आम्ही म्हणू शकतो. "Taj Mahal is not a Taj Mahal. It was a Tejomahal" असेही लिहिले आहे. आजही ताजमहालला भेट दिली तर तेथे दरवाजाजवळ एक तांब्या ठेवलेला दिसून येतो. आंब्याची पाने आहेत आणि भाग्योदयाचे ते देणे आहे. पुढच्या पिढीवर संस्कार करताना आपला चुकीचा इतिहास सांगू नका. जो आपले अतित विसरतो तो भविष्य घडवू शकत नाही. जो आपला इतिहास विसरतो तो उज्ज्वल भवितव्य घडवू शकत नाही. या गोष्टीची जाणीव करुन दिली पाहिजे. या पुढच्या पिढीला योग्य अयोग्यतेची जाणीव करुन दिली पाहिजे. आज कोणीही उठतात, शिष्टमंडळ घेऊन जातात आणि आठवीच्या धड्यामधील, दुसरीच्या, तिसरीच्या पुस्तकातील भाग काढला जातो. हे काय चालविले आहे? गेल्या वर्षी पाचवीत जो मुलगा शिकला असेल तर वेगळे जाऊन सांगणार. त्यानंतर मागून आलेला चौथीतील विद्यार्थी पाचवीत आल्यानंतर तो तुम्हाला वेगळे सांगणार. शालेय शिक्षणाच्या माध्यमातून माझी मंत्रीमहोदयांना आणि शासनाला विनंती आहे की, अशा तऱ्हेची सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठी इतिहास बदलू नका.

सभापती महोदय, मी मधुकर चव्हाण विधानपरिषदेचा 2004 ते 2010 पर्यंत सदस्य आहे. ही फॅक्ट आहे. This is a fact. However , you can not change the History. तुम्ही याचे विश्लेषण कसे करु शकता? ती फॅक्ट बदलू शकत नाही. असे सांगू शकता की, ते सभागृहात चांगले काम करु शकत नव्हते. ते सभागृहात कमी हजर रहात असत. परंतु तुम्ही फॅक्ट बदलू शकता का? तुम्ही इतिहासातील फॅक्ट बदलत आहात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

तुम्ही तर वस्तुस्थितीच बदलून टाकत आहात. अशा प्रकारे जर विद्यार्थ्यांना वस्तुस्थितीचीच माहिती नसेल तर मागील काळात 1200 वर्षे आपण का पारतंत्र्यात राहिले तसेच पूर्वी या देशात एक भयानक असा जातीय वाद होता हे त्यांना समजणारच नाही. अशा प्रकारे वैभवशाली, दु:खी व आनंदी तसेच सम आणि सम्यक दृष्टीकोन ठेवला नाही तर एक बेजबाबदार पिढी, बेभरवशाची पिढी निर्माण होईल. नंतर त्याच लोकांना विचारले की "Who is Rama" ते त्यांना समजणारही नाही. ज्या शाळांना शासन परवानगी देते त्यातील काही शाळांमध्ये मुलींना टिकली लावण्यासाठी, बांगड्या भरण्याची किंवा गजरा माळण्याची परवानगी नाही मग आम्ही काय त्याबाबत आंदोलने करावयाची काय ? मग मिशनऱ्यांच्या शाळेत का घालतो आणि घातले तरी त्यांच्यावरही तेच संस्कार होतील. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, अशा प्रकारे चुकीचे शिक्षण जर शाळांमधून मिळणार असेल तर त्यावर प्रतिबंध घालावा. त्याचप्रमाणे मला असेही लक्षात आणून द्यावयाचे आहे की, ग्रामीण भागात ज्या जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत त्या ओस पडत चालल्या आहेत. कारण खाजगी शैक्षणिक संस्था पहिली ते चौथी आणि पाचवी ते सातवी अशा प्रकारचे वर्ग सुरु करीत आहेत. प्राथमिक शिक्षणाची जी शासनाची जबाबदारी आहे अशा खाजगी प्राथमिक शाळांना वेतनेत्तर अनुदान म्हणजेच नॉन सॅलरी ग्रांट अद्यापही मिळालेले नाही. मागील वर्षी कोकणाला 20 कोटी रुपये देण्यात आले होते. त्यातून प्रत्येक शाळेसाठी एक-एक, दोन-दोन लाख मिळाले. कारण अशी ग्रांट न मिळाल्यामुळे अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त कुठलेही उपक्रम त्या शाळा करु शकत नाही. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, केवळ परीक्षार्थ शिक्षण दिले जाऊ नये तर मुलांच्या अंगीभूत असलेल्या गुणांना चालना द्यावयाची असेल तर खेळ वगैरे सुध्दा आवश्यक आहे, तसेच काही ठिकाणी संगीत कला सुध्दा निर्माण झाली आहे. आजूबाजूच्या परिसरात झाडे लावावयाची असतील वा इतर उपक्रम असतील यासाठी त्यांच्याकडे एक पैसाही नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, या शाळांना त्वरित नॉन सॅलरी ग्रांट मंजूर करावी.

....2

श्री. मधुकर चव्हाण .....

महोदय, यानंतर बाब क्र. 89 आणि पृ.क्र. 100 च्या संदर्भात मला बोलावयाचे आहे. मघाशी विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब बोलले त्या मुद्यांची मी पुनरावृत्ती करणार नाही. परंतु बाब क्र. 89 व 90 मध्ये सांगितलेले आहे की, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियाअंतर्गत नागरी विकास क्षेत्रासाठी अनुदान देण्याची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. यातच बाब क्र. 90 मध्ये पाणीपुरवठा व मननि:सारण क्षेत्रासाठी अनुदानाची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. मी शासनाला अशी विचारणा करु इच्छितो की, जागतिक बँकेकडून हे पैसे मिळालेले नाहीत. इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि जागतिक बँक यांच्या निधी देताना अत्यंत जाचक अटी असतात. त्यात मग एफएसआय वाढवा अशाही अटी असतात. मागे जेएनयुआरएम मधून आपण पैसा घेतला होता. या बाबीच्या अंतर्गत जे पैसे दिले त्यावर भारत सरकार व राज्यसरकार यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारानुसार इतर गोष्टींबाबत महानगरपालिकेच्या नागरी सहभागाचा योग्य वापर करुन घेणे आवश्यक झालेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. हेमंत टकले)**

श्री. मधुकर चव्हाण....

या प्रयोजनासाठी नागरी विकास मंत्रालय भारत सरकार यांनी आदर्श नगर राज विधेयक सर्व राज्यांना विचारार्थ पाठविले आहे." हे विधेयक जसेच्या तसे घ्यावयास सांगितलेले नाही. ते तुमच्यावर मेहरबानी करीत नाही. जागतिक बँक आपल्याला अटी घालते कारण ती आपल्यावर मेहरबानी करते. जागतिक बँक आणि जागतिक नाणे निधीवर अमेरिका दादागिरी करीत आहे. जगातील सर्व देश, अविकसित देश हे अमेरिकेच्या मुठीत रहावेत, त्यांचे बगलबच्चे बनून रहावेत, त्यांच्या आधीन रहावे, त्यांच्यावर अवलंबून रहावेत, त्यांचे आश्रित बनून रहावेत, आर्थिक गुलाम बनून रहावेत यासाठी जागतिक बँकेच्या माध्यमातून आणि जागतिक नाने निधीच्या माध्यमातून राज्यावर, देशावर वेगवेगळया अटी घालीत असतात. आपल्याला आठवत असेल की, जागतिक बँकेने आपल्याला आयडीया टू च्या माध्यमातून पाण्यासाठी पैसे दिले होते त्या कर्जामुळे महानगरपालिकेने पाण्याचे रेट वाढविण्याचे ठरविले. आपण जागतिक बँकेच्या आधीन रहावे यासाठी जागतिक बँकेने अटी घातल्या तशा पध्दतीने केंद्रशासनाने महाराष्ट्रातील मुंबई बटीक रहावी म्हणून या अटी घातलेल्या आहेत काय ? केंद्रशासनाशी आपला सामंजस्य करार कशा प्रकारे झालेला आहे त्याची माहिती या सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. जवारलाल नेहरु योजनेच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी, पायाभूत सोयींसाठी पैसा मिळणार आहे म्हणून तुम्ही आमच्यावर काय मेहरबानी करता काय ? मुंबई शहरातून वेगवेगळया कराच्या माध्यमातून 34-35 टक्के पैसे केंद्रसरकाला जातात त्यासाठी केंद्रसरकारने सुध्दा मुंबईसाठी निधी देणे हे त्यांचे काम आहे. मुंबईचे लोंढे कोठे तरी थांबले पाहिजेत. मार्गदर्शक तत्त्वानुसार त्या त्या राज्यातून जे पैसे येतात त्या पैशांचे न्याय वाटप केंद्रसरकारने केले पाहिजे. ज्या राज्यातून केंद्रसरकारला 33 टक्के कर मिळतो त्या राज्यातील शहरांच्या विकासासाठी तेवढयाच प्रमाणात पैसे मिळणे आवश्यक आहे. हॉस्पिटल्स वाल्यांनी कोर्टात प्रतिज्ञापत्र लिहून दिलेले आहे. हॉस्पिटल्सने चॅरीटी कमिशनरला दोन टक्के पैसे द्यावयास पाहिजे. आता आपण यामध्ये त्यांना सवलत दिलेली आहे. त्या उरलेल्या पैशातून ते लोकांना सेवा देतात आणि आपल्याला सांगतात की, तुमच्या नियमाप्रमाणे आम्ही गरीब लोकांची फुकट सेवा केलेली आहे असे सांगून ते आपल्याला मिसगाईड करतात. जवाहरलाल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

नेहरु योजनेमधून विकासासाठी जे पैसे येतात त्या संदर्भात आपण कशाला अटी घातल्या आहेत ? यामुळे मुंबई शहरात रक्तपात होईल, मुंबई शरात मारामा-या होतील. क्षेत्रीय सभेत कचरा पेटी या ठिकाणी राहील असे ठरवले तर दुसरा ग्रुप येईल आणि सांगेल की, माझ्या इमारतीसमोर कचरा पेटी ठेवायची नाही. त्यामुळे सभापती महोदय, यादवीच निर्माण होईल असे मला वाटते. जवाहर लाल नेहरु योजनेतून जे काही पैसे येणार आहेत त्यासंदर्भात ज्या अटी घातलेल्या आहेत त्या अटी मुंबईतील जनतेला आणि महाराष्ट्रातील जनतेला समजल्या पाहिजेत.

सभापती महोदय, खर्चाच्या पुरक विवरणपत्रातील पृष्ठ क्रमांक 100, बाब क्रमांक 89 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. महाराष्ट्राचे नागरीकरण 47 टक्के झालेले असून देशाचे नागरीकरण 27 टक्के आहे. पोट हातावर घेऊन परप्रांतामधून तसेच आपल्या राज्यातील शहरातून सुध्दा लोक मुंबईकडे धावत सुटलेले आहेत. गावे ओस पडत चालली आहे. महाराष्ट्रात 22 नगरपालिका असून 222 नगरपरिषदा आहेत त्यामुळे याबाबीचा नगरविकास खात्याने गांभीर्याने विचार केलेला आहे काय ? आज पासून 25 वर्षानंतर शहरांची रचना कशी होणार आहे ? प्रत्येक वेळेस जवाहरलाल नेहरु योजनेतून यासाठी आपण पैसे आणणार आहात काय ? आज पुणे, नाशिक, कोल्हापूर, नगर या ठिकाणी सिमेंटची जंगले तयार झालेली आहेत, महाराष्ट्रातील सर्व शहरे बकाल होत चालली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील शहरांचा आपण विचार करणार आहात की, नाही ?

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .........

त्या ठिकाणी पायाभूत सुविधा देण्याकरिता सर्वकष योजना आखणार आहात किंवा नाही, त्यासाठी श्वेतपत्रिका आणणार आहात किंवा नाही ? चिंताजनक अशाप्रकारचे शहरीकरण संपूर्ण राज्यामध्ये होत आहे. सर्व शहरामध्ये एफएसआय वाढवून देण्यात आला आहे. पूर्वी फक्त मुंबई शहरामध्ये एफएसआय वाढवून दिला जात होता पंरतु आता मुंबई शहराबरोबरच इतरही शहरासाठी एफएसआय वाढवून दिला जात आहे. पूर्वी मुंबई शहर वगळता इतर शहरासाठी एफएसआय वाढवून दिला जात नव्हता परंतु आता महाराष्ट्रातील 22 महानगरपालिका आणि 222 नगरपालिकांमध्येसुध्दा एफएसआय वाढवून दिला जात असल्यामुळे त्याठिकाणी बिल्डर्स मोठ मोठया इमारती उभ्या करतील, लाखो रुपये मध्यमवर्गीयाकडून घेतील परंतु कनव्हीएन्स डीड करणार नाहीत. त्या ठिकाणी जे लोक राहण्यास येतील त्यांच्या पाण्याची काय व्यवस्था करण्यात येणार आहे , पार्कींगची काय व्यवस्था करण्यात येणार आहे.? आता टाटा कंपनीने एक लाख रुपयात नवीन गाडी आणली आहे. पूर्वी एखाद्या मुलाने हट्ट केल्यानंतर पालकाकडून त्याला सायकल वा मोटार सायकल घेऊन दिली जात होती परंतु आता मुलाने हट्ट केल्यावर त्याला गाडी घेऊन दिली जाईल. ही गाडी रस्त्यावर आल्यानंतर ती चालविण्यासाठी पुरेसे रस्ते आहेत काय याचा विचार करावयास पाहिजे. वाढलेल्या शहरासाठी पाणी पुरवठा कशा पध्दतीने करण्यात येणार आहे, सांडपाण्याची व्यवस्था कशी करण्यात येणार आहे, पावसाळयातील पाणी वाहून जाण्याची व्यवस्था कशी करण्यात येणार आहे, कच-याची विल्हेवाट कशी लावणार आहात.? आता काही ठिकाणी डम्पींग ग्राऊन्डची समस्या निर्माण झाली आहे. ठाणे शहरातील लोक असे म्हणतात की ठाणे शहराच्या सीमेवरील आणि मुलुंड जवळ जे डम्पीग ग्राऊन्ड आहे ते तेथून हलविण्यात यावे अशा प्रकारे डम्पीग ग्राऊन्डचे प्रश्न अनेक शहरात निर्माण होणार आहेत. शहराची लोकवस्ती वाढल्यानंतर इतरही काही प्रश्न निर्माण होणार आहेत. डम्पीग ग्राऊन्डसाठी जागा मिळाली नाही तर तेथे नरकपुरी सारखी सर्व शहरे होतील.या सर्व बाबींचा शासनाने विचार करावयास पाहिजे असे मला यानिमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, श्रीवास्तव सारखा एखादे अधिकारी जगातील काही गोष्टी पाहून येतात आणि त्या गोष्टी ते आम्हाला येथे येऊन सांगतात. परंतु जगातील अनेक शहरात कचरा सापडत नाही अशी व्यवस्था आपल्याकडे असावी याकरिता कोणतीही योजना मात्र आमच्यासमोर ते आणत

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .........

नाहीत . या नगरविकास विभागाच्या मागण्यांवर बोलत असतांना माझी शासनाला अशी विनंती आहे की, केवळ एफएसआय आणि टीडीआर वाटणारे आपले शासन असता कामा नये शासनाने दिलेला एफएसआय आणि टीडीआर फक्त एकाच माणसाकडे जात नाही . त्या माध्यमातून गगनचुंबी इमारत उभ्या राहतात व काही समस्या निर्माण होतात. कालच्या लोकसत्तेमध्ये एक भयानक बातमी प्रसिध्द झाली होती. फायर ब्रिगेडच्या अधिका-यांनी ही बातमी दिली होती. नोव्हेंबर महिन्यामध्ये मुंबई शहरावर जो दहशतवादी हल्ला झाला होता त्या दिवशी ताजमहाल हॉटेलमध्ये चौथ्या मजल्यावर जे मॅनेजर होते त्यांची पत्नी जळून मरण पावली होती. त्यांनी असेही सांगितले की 26 27 नोव्हेंबरच्या पहाटे 3.00 वाजता तेथे आग लागली होती परंतु ताजमहाल हॉटेलच्या दक्षिणेच्या बाजूला तिस-या मजल्याच्यावर आम्ही पोहोचू शकलो नाही. त्यामुळे या अधिका-याची पत्नी व मुलगी होरपळून मरण पावली. त्यांचे जळालेले मृतदेह दुस-या दिवशी बाहेर काढावे लागले. शासनाकडून गगनचुंबी इमारती बांधण्यास परवानगी देण्यात येणार आहेत परंतु अशा प्रकारच्या इमारतीवर श्री.अंबानी यांना हेलिकॉप्टर ठेवण्याचीच फक्त परवानगी दिलेली आहे.एखाद्या उंच इमारतीला जर आग लागली तर फायर ब्रिगेडची व्यवस्था असलेले इंजिन आकाशातून येईल आणि पाण्याचा मारा करील तसेच अशा प्रकारचा दुर्देवी प्रसंग आला तर माणसाचे प्राण वाचवतील अशी व्यवस्था आपल्याकडे आहे काय ? एफएसआय वाढवून देत असतांना आणि 100 मजली इमारती बांधण्यास परवानगी देत असतांना आपण या गोष्टीचा विचार केला होता काय ? त्यांच्या पार्कीगचा विचार केला होता काय ? 100 मजली इमारत बांधण्यात आल्यानंतर एका मजल्यावर दोन फ्लॅटस असे गृहित धरुन त्यांठिकाणी राहणा-या व्यक्तिच्या गाडया पार्कीग करण्यासाठी अंडर ग्राऊन्ड व्यवस्थां जर सबंधित बिल्डरने केली तरच त्याला सी.सी. मिळेल असे त्यांना सांगण्यात आलेले नाही. नगर विकास खाते म्हणजे केवळ एफएसआयचे आणि टीडीआरचे पैसे खाण्यासाठी आणि बिल्डरला वाचविण्यासाठी आहे काय ? शासनाकडून फक्त एवढयाच दृष्टिकोनातून विचार केला जातो . नगरविकास खात्यामध्ये नगराची रचना आणि त्याचा विकास करण्यासाठी दूरगामी विचार केला जात नाही. 25 वर्षानंतर त्या त्या शहराची लोकसंख्या किती होईल याचा विचार करुन सरकारने व्हाईट पेपर काढावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .........

सभापती महोदय, यानंतर मला गृह निर्माण विभागातील बाब क्रमांक 286 पान नंबर 373 सबंधी मला बोलावयाचे आहे. गृहनिर्माणाच्या संदर्भात शासनाने मोठा गोंधळ घातलेला आहे राज्यातील लोकांसाठी शासनाने काहीही दिलेले नाही. शासन आता 225 स्क्वे अर फुटा ऐवजी आता 330 स्क्वेअर फुटाची घरे देणार आहे. आज शहरामध्ये शासकीय निवासस्थाने फार कमी आहेत. म्हणून शासकीय कर्मचा-यांच्या गृह निर्माण सोसायटयांसाठी एक योजना तयार केली गेली पाहिजे त्याचबरोबर ज्यांनी आयुष्यभर सेवा केलेली आहेत असे अनेक कर्मचारी बांद्रा मधील शासकीय वसाहतीमध्ये वर्षानुवर्षे राहत असून आपल्या मालकीचे घर व्हावे असे त्यांना वाटत आहे . मुंबई शहरामध्ये अभ्युंदय नगर, टिळकनगर, मोतिलाल नगर, जवाहर नगर, विक्रोळी येथील कन्नमवार नगर इत्यादी ठिकाणी राहणा-या कामगारांना प्रथम घरे दिली होती व नंतर ज्याप्रमाणे त्यांच्या नावावर नंतर केली गेली त्याप्रमाणे जेथे जेथे शासकीय वसाहतीमध्ये हे शासकीय कर्मचारी राहत असतील तेथील घरे त्यांच्या नावावर करुन दिली पाहिजेत. मुंबई शहरामध्ये बाहेरच्या राज्यातून येणा-या माणसाला शासनाने मोफत घरे दिली आहेत.

नंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.गायकवाड . . . . 16:30

श्री.मधुकर चव्हाण . . . .

आणि तुमची आयुष्यभर सेवा केलेल्या माणसांना, नोकरी पूर्ण झाल्यानंतर शासकीय क्वॉर्टरमध्ये तीन महिने किंवा सहा महिने रहाण्यासाठी परवानगी देणार आणि मग नंतर त्याचा संसार रस्त्यावर आणणार अशी स्थिती आहे. एकतर त्याला कर्ज उपलब्ध करुन देणार नाही, कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देणार नाही म्हणून मला असे वाटते की, या कर्मचाऱ्यांच्या हौसिंगच्या योजनेबाबत सुध्दा शासनाने सर्वंकष विचार करावा एवढेच मला सांगावयाचे आहे. धन्यवाद.

-----

. . . .3 एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, समाजकल्याण विभागाच्या बाब क्र.240, 6225, अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणासाठी कर्जे यासंदर्भात मी प्रथम बोलणार आहे. सामाजिक विकासाअंतर्गत जी महामंडळे येतात उदाहरण द्यावयाचे तर महात्मा फुले विकास महामंडळ, रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ या सर्वांची कर्ज माफी शासनाने केली आहे याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो आणि माननीय समाजकल्याण न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनीही याबाबतीत भरपूर पाठपुरावा केलेला आहे आणि वर्षभर प्रयत्न केले आहेत. त्याबद्दल मी त्यांचे सदनामध्ये आवर्जून अभिनंदन करतो. परंतु याची रुपरेषा ठरविताना, तसेच कर्ज माफ करीत असताना, ती कोणत्या महामंडळांची किती कर्जे माफ केली आहेत ? यासाठी मार्गदर्शक तत्वे काय आहेत ? त्याचे कोणते निकष ठरविलेले आहेत? याबाबतीत तीन महिन्यामध्ये आराखडा तयार करुन सादर करावा. त्याचप्रमाणे आदिवासींसाठी 200 कोटीच्या कर्ज माफ केली आहेत. तर त्याचेही आराखडे आणि नॉर्म्स ठरवून या कर्जाची विभागणी करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे जी उर्वरित महामंडळे आहेत उदाहरण द्यावयाचे तर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, अल्पसंख्यांक महामंडळ यांच्या बाबतीत देखील करण्याचे मान्य केले आहे. देशामध्ये महाराष्ट्र राज्य एकमेव राज्य आहे की ज्याठिकाणी मागासवर्गीयांसाठी जास्तीतजास्त निधी देण्यात आलेला आहे. या राज्याने आपले पुरोगामित्व सिध्द करुन दाखविले आहे. त्यामुळे यापुढच्या काळात नुसती कर्ज भागवून चालणार नाही तर ही मोठी-मोठी महामंडळे आहेत, उदाहरण द्यावयाचे तर चर्मोद्योग विकास महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ यांच्या बीजभांडवलामध्ये देखील वाढ केली पाहिजे. सध्या आपण फक्त 86 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे, ती किमान 500 कोटी रुपये आणि जास्तीतजास्त 1000 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी मी यानिमित्ताने सूचना करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांना जसे कौतुक आहे, तसे मलाही आहे. फक्त मला आपल्याकडून मार्गदर्शन हवे आहे. महामंडळ स्थापन केले, त्याला बीजभांडवल दिले. ते त्या-त्या समाजातील तरुणांना उद्योजक बनविण्यासाठी दिलेले आहे. त्यांना व्यवसाय उपलब्ध व्हावा, त्यातून ते मोठे व्हावेत याकरता हे सगळे दिले जाते आणि आपण दरवेळेस ते वाढविण्याची मागणी करीत असतो. याठिकाणी कर्ज माफ झाले, आनंद आहे. पण या माध्यमातून उद्योजक किती निर्माण झाले ? याचा आराखडा आमच्यासमोर येत नाही.

. . . .3 एच-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .. . .

मी टी.व्ही.वर आमचे माननीय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांच्या जाहिराती पहातो. कर्ज माफ केले, मोकळे केले, चला. खाऊन-पिऊन हात पुसून आम्ही मोकळे, असे आहे काय ? तर यामध्ये त्या तरुणांची बदनामी आहे. म्हणून एकतर तुमच्या भाषणातून मार्गदर्शन हवे आहे किंवा माननीय मंत्री महोदयांकडून मार्गदर्शन हवे आहे की, आम्ही एवढया हजार तरुणांना अमुक इतके कर्ज दिले, त्या कर्जातून त्यांनी अमुक-अमुक उद्योग निर्माण केले आणि या उद्योगाच्या माध्यमातून अमुक इतक्या लोकांना नोकऱ्या उपलब्ध करुन दिल्या. कारण त्यांनी उद्योग सुरु केल्यानंतर त्यांच्याकडे चार लोक काम करु शकतील अशी ही सायकल आहे. त्याप्रमाणे झालेले आहे काय ? नाहीतर कर्ज घेतले, पुढे काहीच केले नाही आणि ते आता वसूल होत नाही म्हणून सुखटणकर समितीचा अहवालच आहे की, आता जवळजवळ सगळीच महामडंळे कोणतेही कर्ज परत देणार नाहीत, म्हणून ते माफ केले. म्हणजे ही राज्याची गतीशीलता होऊ शकत नाही आणि यातून तरुण घडविले जाणार नाहीतच पण आपण भविष्यामध्ये बुडवेगिरी करणाऱ्यांची मानसिकता निर्माण केली तर कोणताच समाज घडविता येणार नाही. तेव्हा आपण त्यांचे अभिनंदन केले, त्याबद्दल मला आनंद झाला, मी देखी्ल करीन. पण यातून काय निर्माण झालेले आहे, ते माननीय मंत्री महोदयांनी सांगितले पाहिजे. याबाबतीत आपल्याला काहीच माहिती मिळत नाही. धन्यवाद.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, नियोजन विभागाची बाब क्रमांक 252, वर बोलू इच्छितो. आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम. आम्ही विधानपरिषदेचे सदस्य आहोत. विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत त्यामुळे विधानसभेच्या आमदारांना ऑगस्ट पर्यंत त्यांचा निधी अदा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे विधानपरिषदेच्या आमदारांचा ...

काही सन्माननीय सदस्य : दोन्ही सभागृहाच्या आमदारांसाठी अशा प्रकारच्या डायरेक्शन्स देण्यात आलेल्या आहेत.

श्री. सुभाष चव्हाण : ठीक आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करु इच्छितो. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, आमदारांच्या निधीचे विशिष्ट नॉर्म्स ठरविण्याची गरज आहे. आमदारांचा निधी देण्याबाबत पत्र गेल्या पासून ते वर्ष संपेपर्यत त्याची पूर्तता होत नाही त्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी, त्याचा क्लार्क, ज्युनियर इंजिनियर, डिव्हिजनल इंजिनियर, एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, डेप्युटी इंजिनियर यांना असंख्य वेळा भेटावे लागते. निधी मिळण्यासाठी जी कार्यपूर्ती करावी लागते, एन.ओ.सी. मिळवावी लागते, ती मिळत नाही. त्यामुळे आमदार व खासदारांचे फंड लॅप्स होतात. आजच भारताचे नियंत्रक व महलेखापरीक्षक यांचा सीएजीचा रिपोर्ट लोकसत्ता या वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावरच छापून आलेला आहे. त्यामध्ये असे म्हटल् आहे की, काही खासदारांची, खासदार निधीच्या बाबतीत अनास्था असताना 24 अमादारांनी मात्र नियमात तरतूद नसताना विशेष बाब म्हणून कामे मंजूर करुन घेतली आहेत असे भारताचे नियंत्रक आणि महालेखा परीक्षकांनी आक्षेप घेतला आहे त्यात श्री. शरद पवार, श्री. गुरुदास कामत, श्री. संजय राऊत आदिनी दक्षिण भारतातील त्सुनामीग्रस्तांना पुनर्वसनासाठी आमदार व खासदार निधी दिला असला तरी त्याची पूर्तता झाल्याबद्दल संबंधित राज्यांकडून अद्याप पत्र प्राप्त झालेले नाही. त्यामुळे तो संबंधित निधी लॅप्स होण्याची जास्तीत जास्त शक्यता आहे. म्हणून यासंदर्भातील सिस्टिम बदलण्यात यावी, जेणेकरुन आमदारांना सहजासहजी निधी प्राप्त होईल.

सभापती महोदय, मी म्हटल्याप्रमाणे सीएजीचा खासदारांनी कामे सुचविल्याप्रमाणे 2003 ते 2008 या काळात राज्याला 204 कोटी 83 लाख रुपयाचा निधी कमी मिळाल्याचे सीएजीच्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ SBT/

श्री. सुभाष चव्हाण....

अहवालामध्ये म्हटलेले आहे. त्यामध्ये श्री. सुशीलकुमार शिंदे यांचे एक नाव आहे. श्री. सुशीलरकुमार शिंदे हे एक कार्यक्षम मंत्री आहेत. (अडथळा) सभापती महोदय, 2003 ते2004 या वर्षामध्ये ते या राज्याचे मुख्यमंत्री होते. 2005 मध्ये ते आंध्र प्रदेशचे राज्यपाल होते. यासंदर्भात मी आज सकाळी त्यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधला होता त्यावेळी त्यांनी आपला सर्व निधी त्यांच्या मतदारसंघात कामासाठी वापरलेला आहे असे मला सांगितलेले आहे. सभापती महोदय, ते एक कार्यक्षम मंत्री आहेत. केंद्रात ऊर्जा मंत्री आहेत. जास्तीत जास्त निधी महाराष्ट्रासाठी आणण्याचा त्यांनी प्रयत्न केलला आहे. मुख्यमंत्री असतांना त्यांनी पॅकेज दिलले आहे.

श्री. अरविंद सावंत (बसून) याचा पुरवणी मागण्यांशी काय संबंध आहे?

श्री. सुभाष चव्हाण : खासदारांच्या निधीच्या अनुषंगाने मी हे बोलण्याची संधी घेत आहे.सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. खासदारांचा निधी लॅप्स होतो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य बोलत असताना आम्ही याठिकाणी आम्हाला काही तरी शिकायला मिळेल या उद्देशाने शांतपणे बसून लक्षपूर्वक ऐकतो. पण सत्ताधारी पक्षातील सदस्य बोलत असतांना त्याचे मुद्दे खोडण्याचा प्रयत्न करण्यात येतो, हे बरोबर नाही.

श्री. दिवाकर रावते : मुख्यमंत्री म्हणून श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी जी कामे केलेली आहेत ती पुरक मागण्यांशी जोडा एवढेच ते बोलले.

श्री. सुभाष चव्हाण : आमचे सरकार असतानाही तुम्हाला पॅकेज दिले. त्यावेळी श्री. नारायण राणेसाहेब आमदार होते तरी तुमच्याक डे पॅकेज दिलेले आहे.

( वेळ संपल्याची घंटा वाजविण्यात आली.)

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा सागण्याचा उद्देश एवढाच आहे की, आमदारांच्या निधीचे आणि खासदारांच्या निधीचे वितरण करत असताना त्याचे नॉर्म्स शासनाने ठरवावेत आणि तो जास्तीत जास्त निधी वापरावयास मिळावा एवढीच विनंती करुन मला याठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

---

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सगळे सन्माननीय सदस्य बोलत असताना ऑडिटर जनरलच्या रिपोर्टचा उल्लेख करीत आहेत. सीएजीचा अहवाल आला असे सांगत आहे. पण त्यातील जर बाबी पाहिल्या तर त्यासंदर्भात इंग्रजीमध्ये "A cat has come out of the bag " अशी म्हण आहे. सरकारचे मांजरासारखे काय म्यॉव म्यॉव चालले होते ते सगळे त्या रिपोर्टमधून समोर आलेले आहे. त्यातील अनेक बाबी जनतेच्या समोर आलेल्या आहेत. या पुरवणी मागण्या वाचत असताना अनेक विषय दृश्य स्वरुपात दिसत आहेत आणि अनेक विषय अदृश्य आहेत. मी सर्वप्रथम सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक 401 बाबत सांगू इच्छिते. यामध्ये लिटिल चॅम्पसाठी प्रत्येकी 2 लाख रुपयांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. गेल्या वेळी विधान परिषदेमध्ये तसेच विधानसभेमध्ये आम्ही सन्माननीय सदस्यांनी मागणी तसेच विनंती केली होती आणि जनतेचीही तशी इच्छा होती. त्याची दखल घेतली गेली आहे. या मुलांच्या शिक्षणासाठी आणि संगीताच्या आराधनेसाठी 10 लाख रुपयांची तरतूद केली त्याबद्दल कोणाचेही मतभेद नाहीत आणि त्याबद्दल निश्चितपणे मला समाधान वाटते. साहित्य आणि सांस्कृतिक कार्य यामध्ये साहित्य हा विषय सुध्दा सांस्कृतिक कार्यामध्येच आहे असे आपण गृहीत धरतो. या ठिकाणी मला असे नमूद करावेसे वाटते की, साहित्य सम्मेलन महाबळेश्वरला झाले. साहित्यामध्ये सरकारचा हस्तक्षेप नसावा हे आपण सातत्याने म्हणत असतो. परंतु ज्या प्रकारे महाबळेश्वरचे साहित्य सम्मेलन झाले त्याचा विचार करावयास लागलो तर पहिल्यांदाच अशी ऐतिहासिक घटना घडली की, साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षांना त्यांचे भाषण वाचणे सुध्दा शक्य झाले नाही. इतरांना त्यांचे भाषण वाचावे लागले. दोन सम्मेलने होणार एक होणार किंवा अध्यक्षांचा अवमान होतो की होत नाही असे सगळे चालले होते. माझी एवढीच अपेक्षा आहे की, साहित्यिकांना निदान संरक्षण तरी मिळाले पाहिजे. कोणी तरी वरुन दगड मारतो, त्या माणसाला आपण घाईघाईने रिक्षामध्ये बसवतो असा प्रकार आहे. साहित्यिक या विषयावर सरकारला फार काही समजत नाही असे जरी गृहीत धरले तरी सांस्कृतिक विभाग शासनाकडे आहे म्हटल्यानंतर या साहित्य सम्मेलनामध्ये ज्यावेळी ऐतिहासिक स्वरुपाचे वादविवाद तयार होतात त्यावेळी काही मान्यवर साहित्यिकांची मदत घेऊन शासनाने स्वत:च्या जबाबदारीची भूमिका बजावली पाहिजे याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

अन्यथा आपण जे अनुदान देतो त्यावर कोणताही साहित्यिक अवलंबून नाही. परंतु आपण जे अनुदान देतो त्यातून साहित्य रसिकांची आणि जे साहित्यिक तेथील राजकारणामध्ये नाहीत, जे वाचक आहेत, रसिक आहेत, सामान्य लोक आहेत त्यांच्यासमोर मात्र एक वेगळ्या प्रकारचे राजकीय विवादाचे प्रदर्शन साहित्य सम्मेलनामध्ये गेल्या दोन तीन वर्षाचे चित्र पाहिले तर आपल्याला दिसते. म्हणून दोन सम्मेलने होणार की एक सम्मेलन होणार यावर सुध्दा प्रकाशक विरुध्द साहित्यिक असा सगळा वाद पेटला होता. म्हणून सांस्कृतिक विभागाने याबद्दल अधिक सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे, याकडे मला लक्ष वेधावेसे वाटते. याचबरोबर सांस्कृतिक कार्य विभागाबद्दल आम्ही वृत्तपत्रात बातम्या वाचतो की, सांस्कृतिक धोरण तयार करण्यात येणार आहे. हे धोरण काय असणार आहे ? संस्कृतीचा आणि आमदारांचा काही सबंध नाही असे सरकारला वाटते काय ? यामध्ये केवळ सरकारशी संबंधित आमदारांचा प्रश्न नाही तर जे कोणी विधानसभा आणि विधान परिषदेमधील लोकप्रतिनिधी आहेत त्यांचे मत सरकारने विचारात घेतलेले दिसत नाही. माझ्या माहितीप्रमाणे महिला धोरण असो, खेळाडूंबद्दलचे धोरण असो किंवा कोणतेही धोरण ठरविताना लोकप्रतिनिधींचे मत विचारात घेतले पाहिजे. परंतु सांस्कृतिक धोरण ठरवित असताना आमची अशी अपेक्षा आहे की, त्याबाबतीत लोकप्रतिनिधींचे काय म्हणणे आहे ते विचारात घेतले पाहिजे. ज्यांना रस नसेल, ज्यांना यावयाचे नसेल तो त्यांचा प्रश्न आहे. परंतु ज्यांना असे वाटते त्याचे म्हणणे विचारात घेतले पाहिजे. विशेषत: विधान परिषदेमधील तसेच विधानसभेमधील कोणीही आमदार असे म्हणणार नाही की, आम्हाला सांस्कृतिक धोरणाशी काहीच देणे घेणे नाही. म्हणून माझी अशी सूचना आहे की, सांस्कृतिक धोरण जाहीर होण्याच्या अगोदर लोकप्रतिनिधी आणि विधानसभा तसेच विधान परिषदेचे सदस्य यांचे त्याबद्दलचे काय मत आहे ते विचारात घेतले पाहिजे. आपण सांस्कृतिक धोरण कशा पध्दतीचे करणार आहात हे आम्हाला कळले पाहिजे. यामध्ये दुसरा एक महत्वाचा भाग असा आहे की, आपण सांस्कृतिक कार्य विभागामध्ये असे म्हटले आहे की, कलाकारांना मदत दिली जाईल. दर महिना दोन महिन्यांनी एखादी बातमी वर्तमानपत्रामध्ये येत असते की, अमूक चित्रपट कलावंत किंवा नाट्य कलावंत अतिशय हलाखीच्या

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे.....

परिस्थितीत जीवन जगत आहेत आणि त्यांना मदत झाली पाहिजे म्हणून त्यासाठी काही नियमितपणे् वृध्द कलाकार, वृध्द साहित्यिक किंवा संकटामध्ये सापडलेले लोक यांच्या मदतीसाठी म्हणून आपण काय कार्यपध्दती वापरणार आहोत हे अजिबात स्पष्ट नाही. याकडे मी लक्ष वेधू इच्छिते. काल या सभागृहामध्ये अशासकीय कामकाजामध्ये मी ज्यावेळी मालिकांच्या बाबतीत मुद्दा मांडला की, स्वत:ची जबाबदारी स्वत: निश्चित करुन त्यातून कशा पध्दतीचे प्रक्षेपण केले जाईल याच्यासाठी स्वनियंत्रण करणारी अशा पध्दतीची एक तज्ज्ञ समिती असावी. त्याला त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्याच्यासाठी देखील आर्थिक व्यवस्था करावी लागेल. जसे नाटय सेन्सॉर बोर्ड आहे तसे मालिकांसाठी बोर्ड निर्माण केले तर त्याचा उपयोग होईल.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागणी क्रमांक 236, पृष्ठ क्र.268 यावर मी बोलू इच्छिते. यासाठी मोठया प्रमाणावर तरतूद केल्याचे दिसत आहे. मला यानिमित्ताने शासनाला स्मरण करुन द्यावयाचे आहे की, भूमिहीन दलित योजना घोषित केली होती. भूमिहीन दलित या योजनेखाली फायदा झालेल्या लोकांची संख्या केवळ 45 इतकी आहे. 45 लोकांसाठी दलित स्वाभिमान योजना तयार केली. त्या योजनेद्वारे भूमिहीन लोकांना जमीन दिली गेली. त्यावेळी मला सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी असे सांगितले होते की, हळूहळू या योजनेत प्रगती होईल, परंतु त्याबाबत अद्याप प्रगती झालेल्याचे दिसत नाही. राज्यात भूमिहीन दलितांची संख्या मोठी आहे. आपण कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नाव घेतो. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी कसेल त्यांची जमीन असे घोषित केले होते. परंतु कर्मवीरांनी नसेल त्याचे काय असा प्रतिप्रश्न विचारला होता. ज्याच्याकडे नाही तो तसाच राहिला आहे. यासंदर्भात अर्थसंकल्पात किंवा या पुरवणी मागण्यांमध्ये त्या योजनेसाठी काही तरतूद केली आहे का ते बघत होते, परंतु त्या योजनेसाठी एकाही रुपयाची तरतूद करण्यात आलेली नाही असे मला खेदाने नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, यानंतर मी पर्यावरण विभागाच्या बाब क्रमांक 334 व 335 वर बोलणार आहे. या मागणीद्वारे सरदार सरोवर प्रकल्पासाठी तरतूद केलेली आहे. सरदार सरोवर प्रकल्पग्रस्त आहेत. त्यांच्या सन्माननीय नेत्या श्रीमती प्रतिभा शिंदे यांनी एक निवेदन दिलेले आहे. या प्रकल्पासाठी किती निधी आला, प्रत्यक्षात किती वापरला आणि प्रकल्पाची अंमलबजावणी किती झाली त्याची माहिती सरकारकडून प्रकल्पबाधित लोकांपर्यंत पोहोचत नाही. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न आहेत त्याचाही विचार झाला पाहिजे. अन्यथा कोटयवधी रुपयांचा निधी दलालांपर्यंत पोहोचेल. बाब क्रमांक 335 वर बोलताना मी असे म्हणेन की, पर्यावरणाचा चांगला कायदा आहे. ग्लोबल

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

वार्मिंग संबंधी सभागृहात चांगली चर्चा झाली होती. पर्यावरणामध्ये होणा-या बदलासंबंधी त्यासाठी मोठा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे अशी चर्चा झाली होती. त्याबाबत शासनाने विचार करावा.

यानंतर महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 63 वर मी माझे विचार मांडते. नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी भरपूर प्रमाणात तरतूद केल्याचे दिसत आहे. केंद्र सरकारकडून या कामासाठी पैसे आलेले आहेत. पण दरवर्षी आपण पाहतो की, ग्रामीण भागामध्ये पूर येवो, कोठे आग लागो, नैसर्गिक आपत्ती निवारणाची यंत्रणा असते असे आपण गृहित धरतो परंतु त्याच्या अंमलबजावणीत काय अडथळे येतात ते समजत नाही. महानगरपालिकेवर जबाबदारी असेल तर जिल्हाधिका-यांशी समन्वय नसतो. जिल्हाधिका-यांनी पुढाकार घेतला असेल तर त्याची नगरपालिकेला माहिती नसते. कधी कधी रात्रीच्या रात्री नदीचे पाणी सोडल्यामुळे गावेच्या गावे पाण्याखाली जातात असे सातत्याने घडते. म्हणून नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात जिल्हानिहाय आराखडयाची माहिती मिळण्याची मी सातत्याने मागणी करते. त्याबाबत श्वेतपत्रिका काढून त्याची माहिती प्रत्येक जिल्हयाला असावयास पाहिजे. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये आपत्ती निवारणाच्या आराखडयाचा प्रश्न मी वारंवार विचारलेला आहे. त्याची सविस्तर रुपरेषा मांडण्याबाबत व त्यावर चर्चा करण्यासाठी कोणाला वेळही नसतो. निदान विभागीय स्तरावर नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासंबंधी श्वेतपत्रिका काढून संबंधित लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले पाहिजे असे मला सुचवावेसे वाटते.

कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या बाब क्रमांक 74 वर मी बोलू इच्छिते. पीक विमा योजनेसाठी तरतूद केलेली आहे. या सभागृहात यासंबंधी वारंवार चर्चा झाली आहे. शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत पैसा मिळतो. पण आयसीआयसीआय लोंबार्ड या कंपनीच्या कार्यपध्दतीबद्दल लोकांची नाराजी आहे. (अडथळा)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

सभापती महोदय, बाब क्र. 78 मध्ये भूजल मत्स्यव्यवसायाला चालना देण्याच्या दृष्टीकोनोतून आपण पावले उचललेली आहेत. त्याबाबतीत निश्चितपणे आणखी काम होऊ शकते असे मला वाटते.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृ.क्र. 134 वरील बाब क्रमांक 122मध्ये पुणे कुटुंब न्यायालयासाठी इमारत बांधण्याचा आपण निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय खूप वर्षापासून प्रलंबित होता. राज्यातील अनेक विश्रामधामांचे बांधकाम झालेले आहे. जळगाव, नांदेड आणि नाशिक येथील विश्रामगृहे चांगल्या प्रकारे बांधली गेली आहेत. परंतु पुण्यातील इन्स्पेक्शन बंगलो हे विश्रामधाम मुंबईतील राणीच्या बागेसारखे आहे. राणीच्या बागेची जशी परिस्थिती आहे तशी त्या पुण्यातील विश्रामधामची परिस्थिती आहे. त्या राणीच्या बागेत वेगळेच प्रकार चालतात, मला त्या विषयात जायचे नाही. मला हे सांगायचे आहे की, पुणे सारख्या ठिकाणी व्यवस्थित आणि चांगले विश्रामगृह बांधले पाहिजे. नाशिकच्या विश्रामगृहामध्ये सेवक वर्ग कमी आहे. त्याबाबतीत मी स्वत: अनुभव घेतलेला आहे. जळगावला देखील मला हीच परिस्थिती दिसली. त्या ठिकाणी 15-16 नवीन रुम्स बांधून देखील पूर्वीचेच दोन सेवक होते. आमदार त्या ठिकाणी आल्यानंतर प्रत्येक जण दोन-दोन तीन-तीन वेळा बेल वाजवतात आणि नंतर तेथील सेवकाला शिव्या खाव्या लागतात. मग तो सेवक सांगतो की, मी एकटाच आहे, माझ्या बरोबर कोणी सहकारी नाही. विश्रामगृह वाढवत असताना तेथील सेवकवर्ग तरी वाढवला पाहिजे किंवा ते चालवायला दिले तर त्यांच्याकडून योग्य ती व्यवस्था केली जाते की नाही हे बघणे आवश्यक आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या पृ.क्र.222 व 223 वरील बाब क्रमांक 182, 183 व 184 संबंधी मी बोलू इच्छिते. आपण घरगुती कामगार म्हणजे मोलकरणीसाठी स्मार्टकार्ड योजना तसेच राष्ट्रीय विमा योजनेची व्यवस्था केलेली आहे. घरेलू कामगार मंडळाची व्यवस्था केलेली आहे. परंतु मला असे सुचवावयाचे आहे की, त्यांच्या प्रतिनिधींचे मंडळ करुन त्याच्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. आपण डिसेंबर महिन्यामध्ये यासंदर्भातील विधेयक पारित केले. ठिकठिकाणी तुम्ही केन्द्रातले लोक बोलावून स्वत:चे सत्कार करुन घेतलेत. मोलकरणींचे मोर्चे निघत आहेत. त्यांच्यासाठी प्रतिनिधी मंडळ नसेल तर या कायद्याची अंमलबजावणी कशा प्रकारे होणार आहे हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे.....)

कुणालाही कळणे शक्य नाही. महाराष्ट्राच्या निरनिराळया भागातील अतिगरीब लोकांना जेव्हा कायमस्वरुपी एकटे राहाण्याची वेळ येते अशा लोकांसाठी, शारीरिकदृष्टया अपंग झालेल्या लोकांसाठी एखादे सॅनिटोरियम करावे असे मला सुचवावयाचे आहे. घरेलू कामगारांच्या संदर्भात आपण पक्षीय विचार करता कामा नये. या घरेलू कामगारांच्या प्रश्नावर काम करणा-या सर्व संघटना मग त्या कोणत्याही विचाराच्या असोत, त्या शिवसेनेच्या असतो, समाजवादी पक्षाच्या असोत किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या असोत, या सर्वांना त्यामध्ये प्रतिनिधीत्व दिले पाहिजे. ह प्रश्न अतिशय व्यापक आहे. यामध्ये सुरक्षिततेचा प्रश्न जोडून घ्यावयाचा असेल तर बरेचसे काम हे सामाजिक संघटनांबरोबर करणे गरजेचे आहे.

नगरविकास विभागाच्या पृ.क्र.101 वरील बाब क्रमांक 91, 92, 93 आणि 94 च्या संदर्भात मी बोलू इच्छिते. सभापती महोदय, मुंबईच्या संदर्भात देखील मी मुद्दा मांडला होता. आमचा नेहमीचा अनुभव हा आहे की, आम्ही जे मुद्दे मांडतो ते एका भाषेत मांडल्या नंतर दुस-या भाषेत उत्तर दिले जाते. त्यामुळे आम्ही मांडलेल्या मुद्यांची उत्तरे वेगळीच मिळतात. जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत पैसे आले असे आपण म्हटलेले आहे. महाराष्ट्रातील प्रकल्प पूर्ण झालेले नाहीत. केवळ पुण्याचा एकच प्रकल्प पूर्ण झाला. त्यामुळे तुम्हाला पैसे देणार नाही अशी केन्द्र सरकारने तंबी दिलेली आहे. तेव्हा आपण पुन्हा तरतूद करीत असताना त्याची प्रतिपूर्ती कशी करणार याचा मंत्री महोदयांनी खुलासा करणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निधीबाबत मी एवढेच सांगेन की त्यांच्यासाठी दरवेळी कोटयवधी रुपयांची तरतूद दिसते. परंतु ते पैसे वेळेवर दिले जात नाहीत. संभाजीनगर महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, यांना हा निधी मिळण्यासाठी एवढा वेळ का लागतो? आता आचारसंहिता लागली की त्या महानगरपालिका या निधीची वाट बघत बसतील. हा निधी शासनाने वेळेवर वितरित करणे आवश्यक आहे.

बाब क्रमांक 94 मध्ये सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रामध्ये वेगाने शहरीकरण होत आहे. शहरातील गरीब भूमिपुत्रांसाठी आम्ही योजना राबवित आहोत असे आपण सातत्याने सांगत आहात. या संदर्भात मला असे सुचवावयाचे

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...

आहे की, खास करुन मुंबई, पुणे, नाशिक, सोलापूर, संभाजीनगर या शहरामध्ये डोमिसाईल बरोबरच जे लोक त्या शहरामध्ये किमान 25 वर्षापासून राहात आहेत किंवा तेथील जे स्थानिक द्रारिद्र्य रेषेखाली रहात आहेत त्यांच्यासाठी सुवर्ण जयंती रोजगार योजनेचे काही टारगेट ठेवता येईल का यादृष्टीने आपण विचार करावा.

...नंतर श्री. रोझेकर...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

सभापती महोदय, शासनाने ज्याप्रमाणे शिर्डी, पंढरपूर या शहरांना तीर्थक्षेत्राचा दर्जा दिला आहे त्याचप्रमाणे जेजुरी, आळंदी या शहरांना देखील तीर्थक्षेत्राचा दर्जा द्यावा, अशी विनंती मी या निमित्ताने करणार आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण आणि क्रीडा या विभागाच्या संदर्भात दु:खद बाब अशी आहे की, क्रीडा धोरणाची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही. जे क्रीडापटू लहाणपणापासूनचा काळ क्रीडा सरावासाठी, क्रीडा प्रकारांसाठी घालवतात, पुरस्कार मिळवितात, सर्वदूर त्यांचे नाव होते. परंतु, दुर्देवाची बाब ही आहे की, वीरधवल खाडे सारखा उत्कृष्ट क्रीडापटू दुस-या राज्यातून प्रतिनिधित्व मिळविण्यासाठी जातो. ही किती दु:खद बाब आहे. हे शासन किती संवेदनाहीन झाले आहे, हे यावरुन दिसून येते. एका बाजूला शासन म्हणते की, खेळांना प्रोत्साहन देत आहोत. पण प्रत्यक्षात नोकरीअभावी म्हणा किंवा वेगळया कारणासाठी म्हणा. परंतु, महाराष्ट्रातील एका क्रीडापटूला दुस-या राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची पाळी येते.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे क्रीडा विभागाशी संबंधित मुद्दा मांडत आहेत. आज क्रीडा विभागाच्या पुरवण्या मागण्या नाहीत.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, असा अनुभव आहे की, आदल्या दिवशी सांगितले जाते की, आज अमुक एका विभागाच्या पुरवणी मागण्या नाहीत आणि दुस-या दिवशी सांगितले जाते की, त्या विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या आहेत. काही विभाग लपवून ठेवले जातात, सभागृहासमोर येत नाहीत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आमचे सर्व खुले आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी गांभीर्याने चर्चा करावी. त्यांना लवकर जायचे आहे, हे मी समजू शकते. आम्ही विनाकारण त्यांना थांबविणार नाही. परंतु, अशा प्रकारे त्यांनी भाषणात अडथळा आणला तर मी आणखी दहा मिनिटे बोलेन.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर शिक्षक मतदारसंघातील सन्माननीय सदस्य आणि इतर सन्माननीय सदस्य यांच्यामध्ये अनेक प्रश्नांवर मतभीन्नता दिसून येते. मला या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित करावयाचा आहे की, सर्वशिक्षा

....2......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे............

अभियानासाठी एवढया मोठया प्रमाणात निधी खर्च केला जात असतांना विद्यार्थ्यांची गळतीदेखील मोठया प्रमाणात सुरु आहे. त्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागात जबाबदारीने, संवेदनशीलतेने या योजनेची अंमलबजावणी आपण करीत आहोत का ? हा एक फार मोठा प्रश्न मला उपस्थित करावासा वाटतो.

सभापती महोदय, शासनाने अल्पसंख्याकांसाठी बचत गट आणि पाण्याच्या योजना सुरु केल्या आहेत. त्याबरोबरच कसेही करुन शिक्षणाच्या बाबतीत शासनाने विशेष लक्ष पुरविले पाहिजे, एवढी विनंती करते आणि माझे दोन शब्द पूर्ण करते. धन्यवाद.

---------------



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, शिक्षण विभागाचे मंत्री किंवा राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे आमचे मुद्दे कोण लिहून घेणार आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपले बोलणे सुरु करावे, आम्ही त्यांचे मुद्दे लिहून घेत आहोत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय श्री.हसन मुश्रीफ हे माजी शालेय शिक्षण राज्यमंत्री आहेत. त्यामुळे हरकत नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 3, पृष्ठ क्रमांक 7 ही पुरवणी मागणी सहयाद्री, नंदगिरी या राज्य अतिथीगृहातील राज्याच्या अतिथींचा पाहुणचार, सुरक्षा आणि बिनतारी यंत्रणा इत्यादिंची व्यवस्था करण्याकरिता तरतूद करण्यासाठी सभागृहासमोर ठेवलेली आहे. राज्यामध्ये आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून दौरा करतो, मतदारसंघात दौरा करतो. माझा मतदारसंघ तर एवढा मोठा आहे की, 8 जिल्हे आणि 78 तालुक्यांचा त्यात समावेश आहे. म्हणजे 45 आमदार आणि 8 खासदार यांच्या एकत्रित मतदारसंघाएवढा मोठा मतदारसंघ आहे. या मतदारसंघामध्ये दौरा करीत असतांना सातत्याने शासकीय विश्रामगृहावर जाण्याचा योग येतो. आताच आदरणीय डॉ.नीलम गो-हे यांनी लक्षात आणून दिले आहे की, नांदेडमध्ये उच्चप्रतीचे शासकीय विश्रामगृह बांधण्यात आलेले आहे. हे विश्रामगृह अत्याधुनिक पध्दतीचे आहे. ज्याला आपण बी.ओ.टी. पध्दतीवर म्हणतो तसे नसले तरी हे विश्रामगृह खाजगी पध्दतीने बांधण्यात आले आहे तसेच त्याचे व्यवस्थापन खाजगी ठेकेदाराकडे दिलेले आहे. पंचतारांकित हॉटेलला लाजवेल असे शासकीय विश्रामगृह नांदेड येथे बांधण्यात आले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, नांदेड येथे बांधण्यात आलेले शासकीय विश्रामगृह मॉडेल समजून प्रत्येक जिल्हयामध्ये तशा प्रकारचे शासकीय विश्रामगृह बांधण्याचा निर्णय शासनाला भविष्यकाळात घ्यावा लागणार आहे. कारण, आजही फार मोठा निधी खर्च करुन शासकीय विश्रामगृहे बांधली जातात, त्यासाठी कोटयावधी रुपये खर्च येतो, परंतु, त्या शासकीय विश्रामगृहांची देखभाल व दुरुस्ती योग्य वेळी व चांगल्या पध्दतीने होत नाही.

यानंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ SBT/ KGS/ प्रथम श्री. रोझेकर 17:00

श्री. विक्रम काळे ...

काही विश्रामगृहावर वॉचमन आढळून येतात. काही ठिकाणी तर वॉचमन कामावर नसतो. त्याच्या जागेवर त्याचा मुलगा वॉचमनचे काम बघत असतो. वॉचमन कुठे तरी गावाला गेलेला असतो, अशी परिस्थती शासकीय विश्रामगृहांची आहे...

**तालिका सभापती (श्री. हेमंत टकले )** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 5.00 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ किती वाजेपर्यंत वाढवावयाची यासंबंधी मला सभागृहाने सांगावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सभागृहाची वेळ 6.00 वाजेपर्यंत वाढवावी.

( सभागृहाची वेळ 6.00 वाजेपर्यंत वाढवावी असे अनेक सन्माननीय सदस्य सांगतात.)

**तालिका सभापती (श्री. हेमंत टकले )** : सभागृहातील सन्माननीय सदस्यांची मागणी लक्षात घेता सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील. त्यानंतर माननीय मंत्र्यांची उत्तराची भाषणे होतील. सन्माननीय सदस्यांनी मागणीशी संबंधितच मुद्दे उपस्थित करावेत. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी अपूर्ण भाषण पुढे करावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग, बाब क्रमांक 7, पान क्रमांक 8, स्मारकांचे बांधकाम करण्याकरिता तरतूद करणेसंबंधीची आहे. या राज्यातील थोर, निष्णांत, कार्यकुशल, कार्यतत्पर माजी मुख्यमंत्री कै.वसंतदादा पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील, हुतात्मा बाबू गेनू यांची स्मारके उभी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने तरतूद उपलब्ध करुन दिली, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 18, पान क्रमांक 12- महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस विमानतळाच्या विकासाकरिता सहाय्यक अनुदान शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहे. विमानतळाचा विकास करण्याचे अतिशय चांगले काम या राज्यात होत आहे. केंद्रीय उड्डान मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल हे महाराष्ट्राचे सुपुत्र असल्यामुळे विमानतळांच्या विकासाचे चांगले काम त्यांनी केले आहे. लातूर सारख्या जिल्हयात चांगल्या प्रकारचे विमानतळ उभारण्याचे काम त्यांनी केले आहे. औरंगाबाद येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारले आहे. सोलापूर जिल्हयात चांगल्या प्रकारचा विमानतळच उभारण्याचे काम केले आहे. त्यांनी फक्त विमानतळे निर्माण केली नसून तेथे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

विमान प्रवास देखील सुरु केलेला आहे. नांदेड-मुंबई असे विमान सुरु केले. सोलापूरला देखील विमान सुरु झाले आहे. उद्योगाला चालना मिळावी, राज्यात इन्फ्रास्ट्रक्चर वाढले पाहिजे, लोकांना सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्या दृष्टीकोनातून विमान वाहतूक सुरु करण्यात आली आहेत. विमान प्रवासाचे तिकीट लोकांना पडवडली पाहिजेत या दृष्टीने शासनाला विचार करावा लागेल. शासनाकडून इंधनावर कर आकारला जातो, तो कर कमी करता येतो काय? याचा विचार शासनो केला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 52, पान क्रमांक 42- राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमासाठी तरतूद करण्यात आली आहे. सदर कार्यक्रम हा केंद्र शासन पुरस्कृत आहे. पुणे, सिंधुदूर्ग,नाशिक, लातूर, बुलढाणा व नागपूर या जिल्हयात हा कार्यक्रम राबविण्याचे शासनाने ठरविले आहे. हा कार्यकम राबवून अतिशय चांगली गोष्ट होणार आहे. शेतीची मोजणी करुन घेणे ही बाब शेतक-यांच्या दृष्टीने सर्वात महत्वाची आहे. महाराष्ट्रात आपल्याला एकही गाव असे आढळून येणार नाही की, तेथे शेत जमिनींचे वाद नाहीत. प्रत्येक गावात शेत जमिनींचे वाद मोठया प्रमाणात सुरु आहेत. एकीकडे चार एकर शेत रिकामे ठेवतील, परंतु तेथील शेतीच्या बांध मिळावा म्हणून शेत जमीन मालकांमध्ये आपापसात भांडणे होतात. खून होईपर्यंत भांडणे होत असतात. शेतजमीन मोजणी करणे हे शेतक-यांचे मुख्य काम आहे. शेतजमीन मोजणी करण्यासाठी शेतक-यांना भूमि अभिलेख कार्यालयात अनेक वेळा फे-या माराव्या लागतात.

**( सभापतीस्थानी श्रीमती अलका देसाई )**

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती अलका देसाई)**

श्री.विक्रम काळे....

चकरा माराव्या लागतात. पैसे भरुनही त्यांच्या जमिनीची मोजणी होत नाही. म्हणून जी राष्ट्रीय भूमी अभिलेखाचे आधुनिकीकरण करण्याची केंद्र सरकारने योजना आणली आहे ती फक्त 6 जिल्हयात न राबविता राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये लागू करावी. या योजनेमध्ये नवीन मशिन वापरली जात आहे. पूर्वीप्रमाणे टेप लावून जमिनीची मोजणी होत नाही. मशिनद्वारे जमीन मोजली जाते. प्रत्येक जिल्हयाच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी या मशिनद्वारे जमिनीची मोजणी करता येईल का याचा राज्य सरकारने भविष्यकाळात विचार केला पाहिजे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक-70, पृष्ठ क्रमांक 74 पीक विमा योजना या राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने 1999-2000 मध्ये सुरु करण्यात आली. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय चांगला निर्णय घेतला गेला. अनेक जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचे प्रिमियम भरले. राज्यातील अनेक जिल्हयांमध्ये नैसर्गिक आपत्ती आली, प्रत्येक वर्षी पाऊस होतो किंवा होत नाही, पिकांवर रोगराईचा प्रादुर्भाव होतो त्यामुळे पीक वाया जाते. अशा वेळेला प्रिमियम भरुनही नुकसान भरपाई दिली जात नाही. प्रत्येक जिल्हयामध्ये पीक विमा योजनेचा फायदा मिळत नाही अशा सातत्याने तक्रारी येतात. ज्या ज्या जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले, महाराष्ट्रात असा कोणताही जिल्हा नाही ज्याठिकाणी आपत्ती आली नाही, शेतकऱ्यांचे नुकसान झाले नाही. पीक विमा योजना राबवित असताना राज्यात सगळ्या ठिकाणी एकाच वेळेला शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा मिळाला पाहिजे यादृष्टीने शासनाने दक्षता घ्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 84, पृष्ठ क्रमांक 93 वर राष्ट्रीय छात्रसेना अधिकाऱ्यांसाठी साहित्यसामुग्री खरेदी करण्यासाठी मागणी सादर केलेली आहे. राष्ट्रीय छात्रसेना योजना शाळांमध्ये सुरु झाली. आपण शाळेमध्ये शिकत असताना एनसीसी होती, एनएसएस असायची. पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे यादृष्टीने नवनवीन योजना महाराष्ट्र सरकार लागू करते. एनसीसी योजना आणली. मध्यंतरी चार वर्षे चालविली. सहाय्यक अनुदान शाळांना दिले गेले. नंतर अचानकपणे ही योजना बंद केली. केवळ कागदोपत्री योजना सुरु ठेवली. अनुदान मात्र बंद केले. विद्यार्थ्यांसाठी चांगली योजना आणायची, विद्यार्थ्यांनी ती

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

अंगिकारली, योजना रुळली की पैसा नाही म्हणून योजना बंद करायची असे होऊ नये म्हणून शासनाने या संदर्भात दक्षता घ्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 203, पृष्ठ क्रमांक 228 वर मराठवाड्यातील जिल्हयामध्ये मधुमक्षिका पालन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्हयाला हे केंद्र स्थापन करणार का याचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा. तसे असेल तर अत्यंत चांगला निर्णय ठरणार आहे. मराठवाड्यातील आठही जिल्हयांमध्ये मधुमक्षिका पालन केंद्र स्थापन केले तर शेतकऱ्यांच्या दृष्टीने ती अतिशय चांगली बाब ठरणार आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 237, पृष्ठ क्रमांक 269 वर सामाजिक न्याय विभागातील शासकीय आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक सुविधा वाढविण्यासाठी मागणी सादर केली आहे. केंद्र शासनाने ज्या आश्रमशाळा मंजूर केल्या त्या आश्रमशाळांना अद्याप अनुदान मिळालेले नाही. म्हणून केंद्र शासनाने मंजूर केलेल्या आश्रमशाळांना प्रथम अनुदान दिले जाईल यादृष्टीने शासनाने उपाययोजना करावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 336, पृष्ठ क्रमांक 450 वर रेशीम उद्योजकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने मागणी सादर केली आहे. रेशीम उद्योगाकडे शेतकरी वळू लागले आहेत. चांगला उद्योग म्हणून पर्याय निर्माण झाला आहे. पाऊस पडला किंवा पडला नाही तरी रेशीम उद्योगाच्या माध्यमातून चांगल्या पध्दतीने शेतकऱ्यांना उत्पन्न मिळू लागले आहे. या उद्योगाला अधिक प्रोत्साहन देण्याची गरज आहे. शेतकऱ्यांपर्यंत रेशीम उद्योग पोहोचला पाहिजे यादृष्टीने विभागामार्फत शेतकऱ्यांचे जिल्हावार मेळावे आयोजित केले पाहिजेत आणि ही शासकीय योजना कोणत्या पध्दतीने राबविली जाते याचे ज्ञान शेतकऱ्यांना अवगत होण्यासाठी शासनाने अधिकाधिक प्रोत्साहन देऊन योजनेचा प्रसार करावा एवढी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3पी.1....

श्री. विक्रम काळे .....

त्याचबरोबर शिक्षण विभागाचे माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत त्याबाबत मी खेद व्यक्त करतो. गेल्या तीन चार अधिवेशनांपासून आणि आजही "कायम" हा शब्द वगळण्याबाबत आमळी मागणी करीत आहोत. माननीय शिक्षण मंत्र्यांनी "कायम" शब्द वगळून या शाळांना अनुदान द्यावे आणि ते देखील हे अधिवेशन चालू असताना हा निर्णय घ्यावा. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नावर अत्यंत आक्रमक भूमिका घेतली कारण अत्यंत तीव्र प्रश्न यासंदर्भात निर्माण झालेला आहे. आज हजारो शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आझाद मैदानावर आंदोलन करीत आहेत आणि त्यांचे म्हणणे आहे की, जोपर्यंत "कायम" हा शब्द काढून शासन अनुदान देणार नाही तोपर्यंत आम्ही उठणार नाही अशा प्रकारची भीष्मप्रतिज्ञा त्यांनी घेतलेली आहे. म्हणून दोन दिवसात संपणाऱ्या अधिवेशनातच यासंदर्भातील निर्णय शासनाने घ्यावा आणि या शाळांना अनुदान देण्याची भूमिका घ्यावी, एवढी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बाब क्र. 7, पृ.क्र. 8 - राष्ट्रपुरुष व थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे यासाठी 3.91 कोटीचा निधी प्रस्तावित आहे. या अनुषंगाने एक गंभीर प्रकरण मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, चर्चगेट येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने चौक आहे. या चौकात पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचा पुतळा बसविण्याचा प्रयत्न गेली 25 वर्षे आमचे वडील श्री. शिवाजीराव शेंडगे करीत होते. त्यांच्या पश्चात ही जमीन अधिग्रहित करण्यामध्ये यश आले. त्यासाठी शासनाने परवानगी सुध्दा दिली, बांधकामाची परवानगी मिळाली, आराखडा मंजूर झाला तसेच आमदार निधीतून मी पाच लाख रुपये सुध्दा दिले. या पुतळ्याचे बांधकाम पूर्ण झाले, चबुतरा बांधण्यात आला, सुशोभिकरणाचे बांधकाम सुध्दा झाले, त्यासाठी महापालिकेने परवानगी दिली परंतु अचानक महापालिकेकडून स्टॉप वर्क नोटीस आली आणि एका दिवशी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी हे बांधकाम पाडून टाकले. हे बांधकाम कशासाठी पाउण्यात आले हे मात्र समजू शकले नाही. हेरिटेज समितीने ऑब्जेक्शन घेतले म्हणून बांधकाम पाडण्यात आल्याचे समजले. परंतु माझा असा मुद्दा आहे की, या कामाचे कंत्राट कार्पोरेशननेच दिले, बांधकाम सुध्दा कार्पोरेशनकडूनच झाले त्यासाठी मी निधी दिला आणि त्याचे पेमेंटही अदा केले परंतु अचानक बांधकाम पाडून थोर व्यक्तिची विटंबना का करण्यात आली हेच समजत नाही. अशा प्रकारे शासन महापुरुषांची विटंबना करणार असेल तर या सरकारला काय म्हणावे यासाठी माझ्याकडे शब्द नाहीत. म्हणून मी या शासनाचा निषेध व्यक्त करतो. कारण यासाठी महापालिकेने ठराव केला, शासनाने परवानगी दिली, आमदार निधी दिला तरी देखील बांधकाम पाडण्यात आले....

श्री. दिवाकर रावते : महोदय, विषय अतिशय गंभीर आहे. यासाठी महापालिकेने ठराव पास केला, पुतळ्यासाठी शासनाची परवानगी मिळाली आणि आमदार निधी सुध्दा अदा करण्यात आला. पण हेरिटेज कमिटीने कोणते ऑब्जेक्शन घेतले, त्याला पर्याय म्हणून शासन काही देणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, व्ही.टी.स्टेशनसमोर प्रसाधनगृह बांधण्यात आल्या त्याला हेरिटेज कमिटीने ऑब्जेक्शन घेतले नाही.

श्री. सुरेश वरपुडकर : हेरिटेज डिपार्टमेंटचा यामध्ये काही संबंध नाही. हेरिटेज डिपार्टमेंटने तसे काही केलेले नाही.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदया, यासंदर्भातील माहिती मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात द्यावी अशी विनंती आहे. वर्ध्यामध्ये 35 वर्ष जुने असलेले स्मारक नगरपालिकेने पाडलेले आहे. महाराष्ट्र शासन जर थोर पुरुषांची स्मारके उध्वस्त करीत असेल तर त्याला काय म्हणावयाचे ?

सभापती महोदय, आता मी बाब क्रमांक 7, पृष्ठ क्रमांक 8 वरील स्मारकांचे बांधकाम करण्याकरिता तरतूद करणे या बाबीवर विचार व्यक्त करणार आहे. माझी मागणी आहे की, चर्चगेट समोरील पुतळयाचे जे बांधकाम पाडण्यात आलेले आहे ते बांधकाम सरकार आपल्या खर्चाने बांधून देणार आहे काय ?

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 127, बाब क्रमांक 105, सार्वजनिक बांधकाम या वरील मार्ग व पलू यांचे परिक्षण व दुरुस्तीकरिता अतिरिक्त निधीची तरतूद करणे यासाठी 202.58 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केलेला आहे.

डॉ. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्य कोणत्या विभागावर बोलत आहेत हे जर सांगितले तर बरे होईल.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, उपमुख्यमंत्र्याच्या विभागावर बोलत आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर "पुरवणी मागण्यांवर चर्चा" असे हेडींग असून त्याच्या खाली "खालील मागण्यांवर चर्चा होईल." असे लिहिले जाते. मग मुख्यमंत्री, उपमुख्य मंत्री आणि मंत्री असे लिहिले

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

जाते. नंतर आम्हाला एक पुरवणी दिली गेली. त्या पुरवणीमध्ये 12 जून रोजी कोणत्या बाबीवर चर्चा होईल असा उल्लेख आहे. एकाच खात्याच्या काही बाबीवर आज चर्चा आहे आणि काही बाबीवर उद्या चर्चा आहे. शालेय शिक्षण विभागाच्या काही बाबीवर आज चर्चा आहे आणि उर्वरित 4 बाबीवर सोमवारी चर्चा ठेवलेली आहे. त्यामुळे कार्यक्रम पत्रिकेत खाते नमूद केले तर ते जास्त सोयीस्कर होईल. असे केले तर गोधळ होणार नाही त्यामुळे माझी विनंती आपण मान्य करावी ही विनंती.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, बाब क्रमांक 105, सार्वजनिक बांधकाम, मार्ग व पूलासांठी 202.58 कोटी रुपये प्रस्तावित केलेले आहे. भटक्या विमुक्तांच्या ज्या वाडया वस्त्या आहेत

त्या ठिकाणी वीज, पाणी, शाळा, रस्ते नाहीत अशा अवस्थेत भटक्या विमुक्त जातीचे हे लोक आपल्या वाडयांमध्ये राहत आहेत. कोकणातील साडेतीन हजार वाडया वस्त्यांना रस्ते नाहीत अशी परिस्थिती आहे. त्यामुळे या हेडवरील निधी आपण भटक्या व विमुक्त जातीच्या वाडया वस्त्यावंर खर्च करणार आहात काय ? या बाबीच्या संदर्भातील उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 242 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या ठिकाणी भटक्या विमुक्तांच्या अशासकीय संघटनांनी चालविलेल्या संस्थांना शैक्षणिक सुविधा पुरवण्यासाठी फक्त 1 लक्ष रुपयांचा निधी प्रस्तावित केलेला आहे. त्याच प्रमाणे भुमिहिनांना कर्ज देण्यासाठी भटक्या जमातीतील लोकांसाठी केवळ 1 लक्ष् रुपये कर्ज दिलेले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, सामाजिक न्याय विभागाचा हा जो निधी आहे हा 98-99 टक्के निधी एस.सी. आणि एस.टी. साठी खर्च करतो परंतु भटक्या व विमुक्तांना आपण सवतीची वागणूक देत आहात.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 17.20

श्री.प्रकाश शेंडगे ..

विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी पुरेसा खर्च केला जात नाही असा माझा आक्षेप आहे. याबाबतीत मला माननीय मंत्री महोदयांसमोर एक मुद्दा मांडावयाचा आहे. सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यासाठी काही निधी दिला जातो. सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत जो निधी मिळतो तो तीनही प्रवर्गातील लोकांसाठी खर्च् करण्यात यावा अशी माझी मागणी आहे. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या विकासासाठी वेगळा निधी मागवून घेण्यात यावा. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी ज्याप्रमाणे वेगळा निधी दिला जातो त्याप्रमाणे भटक्या जाती व विमुक्त जमातीसाठी देखील वेगळा निधी दिला जावा तसेच त्यांच्यासाठी वेगळा विभाग आणि मंत्री देण्यात यावा अशी मी या निमित्ताने विनती करतो. युती शासनाच्या काळात भटक्या जाती व विमुक्त जमातीसाठी वेगळा निधी दिला जात होता तसेच त्यांच्याकरिता स्वतंत्र मंत्रालय दिले गेले होते परंतु आघाडी सरकार आल्यानंतर त्यांनी वेगळे मंत्रालय रद्द केले आणि विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या समाजाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. असा माझा आक्षेप आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाचे मंत्रीपद माझ्याकडे आहे आणि विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी श्री.सुरुपसिंग नाईक हे मंत्री वेगळे आहेत .

श्री.प्रकाश शेंडगे : त्यांच्यासाठी वेगळा मंत्री आहे.परंतु युती शासनाच्या काळात विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी वेगळे मंत्रालय देण्यात आले होते.तसेच त्यांच्याकरता वेगळा निधी दिला जात होता परंतु आता त्यांच्यासाठी वेगळा निधी दिला जात नाही.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी मी पुन्हा सांगतो की, सामाजिक न्याय विभागाचे मंत्रीपद माझ्याकडे असून . भटक्या जाती व विमुक्त जमातीसाठी वेगळे मंत्री आहेत आणि त्याकरता वेगळी तरतूद आहे. रेकॉर्डवर चुकीचे राहता कामा नये म्हणून मी हा खुलासा केलेला आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : ठीक आहे. भटक्या जाती व विमुक्त जमातीच्या समाजासाठी वेगळी तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मला अल्पसंख्याक विभागातील बाब क्रमांक 411 संबंधी बोलावयाचे आहे अल्पसंख्याकासाठी वेगळे खाते तयार करण्यात आलेले आहे. या पूरक मागणीमध्ये

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 17.20

श्री.प्रकाश शेंडगे ..

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी 75 कोटी प्रस्तावित केलेले आहे, जो न्याय मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला देण्यात आला आहे तोच न्याय भटक्या व विमुक्त समाजाच्या आर्थिक विकासाकरिता स्थापन करण्यात आलेल्या वसंतराव नाईक महामंडळला देण्यात यावा त्याचबरोबर इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळासाठी सुध्दा लोकसंख्ेच्या प्रमाणात निधी देण्यात यावा अशी माझी मागणी आहे. एक महामंडळ आवडते असल्यामुळे त्यांच्यासाठी भरपूर निधी द्यावयाचा आणि इतर नावडत्या महामंडळासाठी कमी निधी द्यावयाचा अशा प्रकारे शासनाने भेदभाव करता कामा नये .

सभापती महोदय, गृह निर्माण विभागातील बाब क्रमांक 286 सबंधी मला बोलावयाचे आहे या पुरवा्णी मागणी मध्ये विडी कामगारांसाठी घरे बांधण्याकरता अनुदान देण्यात आलेले आहे. या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, म्हाडाने नुकतेच 3 हजार 863 घरांसाठी सोडत काढली परंतु त्यात कामगारासाठी घरे राखीव ठेवण्यात आलेली नाहीत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी मात्र काही घरे राखून ठेवण्यात आली होती तेव्हा येथून पुढच्या काळात कामगारासांठी काही घरे राखून ठेवण्यात यावी. माथाडी कामगाराच्या गृहनिर्माण सोसायटीसाठी राज्य सरकारने 58 एकराचा भूखंड दिला आहे. त्यांच्याप्रमाणे बंदर कामगाराच्या घरासाठीसुध्दा भूखंड देण्यात यावा. मुंबई ही आर्थिक राजधानी चे शहर असून मुंबई बंदर हे महत्वाचे आहे परंतु त्या ठिकाणी जे कामगार आहेत त्यांना सरकारने आतापर्यत वा-यावर सोडलेले आहे.

नतर श्रीमती रणदिवे ..

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.गायकवाड . . .. 17:25

श्री.प्रकाश शेंडगे . . . .

शासन या कामगारांच्या घरासाठी भूखंड देणार आहे काय ? तसा तो देण्यात यावा अशी मी गेल्या दोन अधिवेशनापासून मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र.172, पान क्र.211 विधी व न्याय विभागाच्या संदर्भात सूचना करावयाची आहे. यामध्ये उच्च न्यायालयाचे माननीय मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश यांना वेतन व इतर भत्ते यांचे प्रदान करण्यासाठी 4,44,50,000 रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. मी याठिकाणी शासनाच्या निदर्शनास एक बाब आणून देऊ इच्छितो की, लवाद नेमले जातात. परंतु सध्या अशी परिस्थिती आहे की, तीन-तीन वर्षे झाली तरी केसेस बोर्डावर येत नाहीत. कारण त्यांच्याकडे न्यायाधीश नसतात. त्यामुळे लोकांना न्याय मिळत नाही. जर तीन-तीन, चार-चार वर्षे केस बोर्डावर आली नाही तर लोकांना न्यायापासून वंचित रहावे लागते, म्हणून मला विधी व न्याय विभागाच्या माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, आर्बीट्रेशनसाठी वेगळे न्यायाधीश नेमण्यात यावेत आणि या केसेससाठी लवाद नेमावेत जेणेकरुन लोकांच्या केसेस लवकर निकाली काढाव्यात अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय,बाब क्र.402,पान क्र.513 बाबत सांगावयाचे आहे. याठिकाणी सांस्कृतिक कार्य विभागातर्फे माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील चित्रपट तयार करण्याकरता 3 लाख रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. ज्याप्रमाणे आपण माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर चित्रपट निर्माण करीत आहात, त्याचप्रमाणे इतर ज्या थोर व्यक्ती आहे, उदाहरण द्यावयाचे तर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आहेत, अशा मोठमोठया ज्या थोर व्यक्ती आहेत. त्यांच्या जीवनावर देखील चित्रपट तयार करण्यात यावेत अशी मागणी करतो. धन्यवाद.

------

. . .. 3 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी 2009-2010 या वर्षाच्या सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्र.7, पान क्र.8 यामध्ये राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांची स्मारके किंवा पुतळे यांचे बांधकाम करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये सांगली जिल्हयामध्ये कै.वसंतदादा पाटील, कै.क्रांतीसिंह नाना पाटील आणि हुतात्मा बाबू गेनू यांचे जन्मठिकाणी म्हणजे महालुंगे, पडवल, तहसील आंबेगाव, जिल्हा पुणे यांचा विकास करण्यासाठी यांची स्मारके बांधण्यासाठी निधी ठेवण्यात आला आहे याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे कोकणातील गांधी कै.आप्पासाहेब पटवर्धन यांच्या स्मृती जागविण्यासाठी त्यांचे स्मारक उभारण्याकरता देखील तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, बाब क्र.18, पान क्र.12 "नागरी विमानचालन" याअंतर्गत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस विमानतळाच्या विकासाकरिता सहाय्यक अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. यासंदर्भात माझी अशी मागणी आहे की, सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी ग्रीन फिल्ड एअरपोर्टच्या बोर्डाची संकल्पना शासनाने आणलेली आहे, त्याप्रमाणे होईल. परंतु ते कधी पूर्ण होणार आहे ? याची शासनाने निश्चित तारीख जाहीर केली तर बरे होईल. तसेच रत्नागिरी येथील विमानतळाच्या दुरुस्तीसाठी देखील शासनाने प्रयत्न करावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.48, पान क्र.30 बंदरे व दीपगृहे यासंदर्भात सांगावयाचे तर कोकणातील सर्व बंदरांमध्ये मोठया प्रमाणात गाठ साठलेला आहे.म्हणून माझी या निमित्ताने मागणी आहे की, कोकणामध्ये जेवढी बंदरे आहेत, तेथील गाळ काढण्यासाठी मोठया प्रमाणात तरतूद करण्यात यावी आणि कोकणातील बंदरे विकसित करण्यासाठी या निमित्ताने प्रयत्न करण्यात यावेत अशी विनंती करतो.पूर्वी कोकणामध्ये मोठया प्रमाणात जल वाहतूक होत असे. तशी ती सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न करावेत अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र.52, पान क्र.42 राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम 50 टक्के केंद्र पुरस्कृत योजना याकरता तरतूद करण्यात आली आहे. कोकणामध्ये किंवा महाराष्ट्र राज्यामध्ये मोठया प्रमाणात महसूल विभागामध्ये संबंधित मोडी भाषेतील जुने दस्तऐवज आहेत. म्हणून माझी अशी मागणी आहे की, मोडी लिपीतील जे दस्तऐवज आहेत,त्याचे मराठीमध्ये भाषांतर

. . . .3 एस-3

करण्यासाठी मोठया प्रमाणात निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्र.58, पान क्र.43 बाबत सांगावयाचे तर या सदनामध्ये सातत्याने वन संज्ञेचा प्रश्न उपस्थित केला जातो. महसूल व फॉरेस्ट विभागाच्या अधिकाऱ्यांनी चुकून महाराष्ट्रातील एकंदर 62 हजार वन क्षेत्रे वनसंज्ञेखाली येत आहेत असे दाखविले आहे. विशेष करुन सिंधुदूर्ग जिल्हयातील 42 हजार वनक्षेत्रे यामध्ये येतात असे दाखविले आहे. याबाबतीत तीन वेळा सर्व्हे झाल्यानंतर आता हे क्षेत्र फक्त 1800 हेक्टर आहे. म्हणून ज्या-ज्या वेळी प्रश्न उपस्थित केला, तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, याबाबतीत राज्य सरकारने सुप्रीम कोर्टामध्ये ॲफीडेव्हीट दाखल केलेले आहे. तेव्हा खऱ्या अर्थाने हा प्रश्न कधी सुटणार आहे ? कारण कोकणातील सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या संबंधातील हा विषय आहे. तेथे मोठया प्रमाणात इरिगेशनची, विकासाची कामे सुरु आहेत. परंतु या सगळया गोष्टींमुळे तेथील कामांना खीळ बसत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/ प्रथम सै. रणदिवे.. 17:30

श्री. राजन तेली.....

म्हणून या निमित्ताने माझी माननीय मंत्रिमहोदयांकडे आग्रही मागणी आहे की लवकरात लवकर सोडविण्याचे प्रयत्न या ठिक्राणी करावेत.

सभापती महोदया, महसूल आणि फॉरेस्टच्या ज्या अधिकाऱ्यांनी हा चुकीचा सर्व्हे केला होता त्या सगळयांवर कारवाई करावी अशा प्रकारची विनंती मी या ठिकाणी करतो.

सभापती महोदया, बाब क्रमांक 92 पृष्ठ क्रमांक 47. नैसर्गिक आपत्ती या विषयी मी बोलू इच्छितो. चक्रीवादळ आणि नैसर्गिक आपत्ती कोकणात आणि महाराष्ट्रात सगळया ठिकाणी येते. दोन वर्षापासून या आपत्तीमुळे शेतकऱ्यंचे प्रचंडप्रमाणात नुकसान होत आहे. अतिवृष्टीमुळे सुध्दा शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होते. माझी शासनाला अशी विनंती आहे की, कोकणातील काही परमनन्ट गावे ठरलेली आहेत.त्याच गावात दर वर्षी पूर येतो. अशा आयडेन्टीफाय झालेल्या गावांमध्ये कायमस्वरुपी सोय करण्याची आवश्यकता आहे. महापूर वर्षातून दोनवेळा किंवा तीनवेळा येतो त्यावेळी चार ते आठ दिवस लोकांना घरा बाहेर रहावे लागते. त्यावेळी त्यांना आपली गुरेही घेऊन जावे लागते. तेव्हा माझी याबाबतीत मागणी अशी आहे की, अशा गावांमध्ये एखादे समाज मंदिर उभे करण्यात यावे. अतिवृष्टीच्या वेळी या ठिकाणी होडया पुरवाव्या लागतात. पूर आल्यानंतर व त्या पुरात लोक अडकल्यानंतर शासन जागे होते. आणि तहसिलदार, प्रांत आणि केलक्टर हे सगळे अधिकारी त्या ठिक्राणी मदत पुरविण्यासाठी धावत असतात. त्यावेळी डिझेलवर मोठया प्रमाणात खर्च होतो आणि त्याचा उपयोगही होत नाही. म्हणून या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, कोकणातील पूरग्रस्त गावांचा सर्व्हे करुन त्याठिकाणी कायम स्वरुपी काही व्यवस्था करता येईल काय या दृष्टिकोनातून शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदया, बाब क्रमांक 82, पृष्ठ क्रमांक 91. शालेय शिक्षण या विषयी मी बोलू इच्छितो. या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी आणि विशेषत: कोकणातील बऱ्याच भागांमध्ये शिक्षण अधिकारी नाहीत. याबातीत मी सिंधुदुर्ग जिल्हयाचे उदाहरण देऊ इच्छितो. या ठिकणी आठ तालुक्यामध्ये 7 गट शिक्षणाधिकारी नाहीत. माध्यमिक शिक्षणाधिकारी नाहीत. प्राथिमिक शिक्षणाधिकारी नाहीत. ही पदे भरण्याच्या संदर्भात शासनाने प्रयत्न करावेत, अशी मी याठिकाणी मागणी करतो. कोकणामध्ये इयत्ता पाचवी, सहावी आणि सातवीसाठी विषयवारी चालते. त्यासाठी 15 ते 20 पटसंख्या लागते. सिंधुदुर्ग जिल्हयातील एक

...2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KGS/

श्री. राजन तेली....

मतदारसंघ कमी झाला आहे तसेच रत्नागिरीतील दोन विधानसभाक्षेत्र कमी झाले आहेत. कोकणामध्ये 100टक्के फॅमिली प्लॅनिंग झालेले आहे. हा कोकणातील लोकांचा गुन्हा आहे काय? निदान डोंगरी भागातील गावांसाठी निकष बदलण्यात यावेत. कारण या ठिकाणी पदवीधर शिक्षक मिळत नाहीत. 15 ते 20 पटसंख्या नसेल तर शिक्षक देण्यात येत नाहीत.

श्री.रामनाथ मोते :सभापती महोदया, त्यासंबंधीचे निकष बदलण्यात आलेले आहेत आणि त्यासंबंधीचा जी.आर.सुध्दा निघालेला आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदया,तसा जी.आर. काढला असला तरी अद्याप तो अमलात आलेला नाही तेव्हा त्यादृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात यावेत. सभापती महोदया, माननीय शिक्षण मंत्र्यांकडे माझी दुसरी एक मागणी आहे. महाराष्ट्रात प्रांतवाईज काही विषय महत्वाचे आहेत. जसे कोकणात पर्यटनाला संधी आहे.पर्यटनाच्या माध्यमातून वेगवेगळा विकास त्याठिकाणी करता येईल. त्याठिकाणी फळ बागायतीला संधी आहे. तेव्हा यासंदर्भातील शिक्षणाचा अंतर्भाव त्या ठिकाणी करता येईल काय याष्टिकोनातून शासनाने प्रयत्न करावेत. (अडथळा) कोकणात मोठया प्रमाणात पर्यटनाला वाव आहे. येथे सागरी किनारा आहे. त्यामुळे त्याठिकाणी कोणत्या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करता येईल या दृष्टिकोनातून विचार करावा.

सभापती महोदया, बाब क्रमांक 94, पृष्ठ क्रमांक 102. नगरविकास विभाग. याबाबत मी बोलू इच्छितो. माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, कणकवली नगरपरिषद नव्याने झालेली आहे. त्याठिकाणच्या जागा विकसित करावयाच्या आहेत.

श्री. हसन मुश्रीफ (बसून) : याबाबतीत चर्चा करण्याचे ठरलेले आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदया, ती चर्चा लवकरत करण्यात यावी आणि निरनिराळया संवर्गातील पदे भरण्यात यावीत. तसेच त्यासाठी जास्तीत जास्त निधी कसा देता येईल या दृष्टिकोनातून प्रयत्न करावेत.

सभापती महोदया, बाब क्रमांक 105, पृष्ठ क्रमांक क127. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाबतीत मी बोलू इच्छितो. विश्रामगृहाच्या संदर्भात याठिकाणी बरेचसे सदस्य बोलले. कोकणाला पर्यटनाच्या दृष्टिकोनातून फार मोठे महत्व आहे.

यानंतर श्री. बरवड....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ....

म्हणून ही सगळी विश्रामगृहे चांगल्या पध्दतीची करण्याचा प्रयत्न करावा. सागरी महामार्ग पूर्ण करण्याच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदय सातत्याने आश्वासने देतात. सागरी महामार्गाची मागणी सातत्याने होत आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करावा. आपल्या खात्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार आहे. कोकणातील अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता कोणाच्या नावाखाली काय करतात, कोठे किती द्यावे लागतात याबाबत बघावे. श्री. मंडपे नावाचे अधीक्षक अभियंता होते त्यांच्या काळातील भ्रष्टाचाराची चौकशी करावी. श्री. खोब्रागडे नावाचे कार्यकारी अभियंता आहेत त्यांच्या काळातील भ्रष्टाचाराची चौकशी करावी. कोठल्या माध्यमातून भ्रष्टाचार झाला याची यादी मी आपल्याला देईन. या निमित्ताने या सगळ्यांची चौकशी करावी. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील घोडगे सोनवडे घाटासाठी तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 131 वरील बाब क्रमांक 115 बाबत बोलावयाचे आहे. कला व संस्कृतीच्या संदर्भात ही बाब आहे. कोकणामध्ये दशावतार, कळसूत्री बाहुल्यांचा खेळ अशा वेगवेगळ्या कला मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये कणकवली आणि कुडाळ या ठिकाणी कला अकॅडमी स्थापन करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदया, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 135 वरील बाब क्रमांक 124 बाबत बोलावयाचे आहे. न्यायाधीशांसाठी निवासस्थाने यासंदर्भात ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. दोडामार्ग या ठिकाणी न्यायालय बांधावयाचे आहे. वैभववाडीला न्यायाधीशांसाठी निवासस्थाने बांधली परंतु त्या ठिकाणी जे न्यायालय बांधावयास पाहिजे ते बांधलेले नाही. ते बांधण्यासाठी सुध्दा तरतूद करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदया, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 360 वरील बाब क्रमांक 280 बाबत बोलावयाचे आहे. जिल्हा नियोजनाच्या संदर्भात ही पुरवणी मागणी आहे. दोडामार्ग तालुका 1998 मध्ये स्थापन झाला. आज तालुका होऊन दहा वर्षे झाली तरी त्या तालुक्याला डोंगरी विकासचा निधी मिळत नाही. माझी अशी विनंती आहे की, त्या तालुक्याला तसेच वेंगुर्ला तालुक्याला डोंगरी विकासचा निधी मिळावा.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. राजन तेली .....

सभापती महोदया, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 74 वरील बाब क्रमांक 71 बाबत बोलावयाचे आहे. कृषी आणि जलसंधारणाच्या संदर्भात कोकणामध्ये नॉर्म्स बदलण्याची आवश्यकता आहे तसेच त्यासाठी त्या ठिकाणी जास्तीत जास्त तरतूद करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, सभागृहासमोर चर्चेला असलेल्या पुरवणी मागण्यांवर माझ्या सूचना मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदया, प्रथम मला पृष्ठ क्रमांक 129 वरील बाब क्रमांक 111 बाबत बोलावयाचे आहे. इमारतीच्या परिरक्षण व दुरुस्तीकरता अतिरिक्त निधीची तरतूद करण्यासाठी यामध्ये 55 कोटी 90 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मी गेल्या वर्षी सुध्दा विनंती केली होती आणि आता सुध्दा विनंती करते. सिडकोने आमच्याकडे मोठे शासकीय बचत भवन बांधले आहे. त्याची फार वाईट अवस्था झालेली आहे. ज्यावेळी सिडकोची निर्मिती झाली त्यावेळी ते बचत भवन तयार होऊन त्या ठिकाणी गेस्ट रुम वगैरे तयार केलेल्या आहेत. आज मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र किंवा कोकणातून जे लोक मुंबईमध्ये येतात त्यांना मध्ये कोठेही रेस्ट घेण्यासाठी विश्रामगृह नाही. ती इमारत पूर्णपणे मोडकळीस आलेली आहे. शासनाने किंवा सिडकोने ती इमारत दुरुस्त केली तर कोकण भवन येथे मोठे विश्रामगृह होऊ शकते. त्यासाठी माझी अशी मागणी आहे की, या सर्व इमारतींसाठी आपण जी 55 कोटी 90 लाख रुपयांची मागणी केलेली आहे त्यामध्ये नवी मुंबईतील ॲग्रो येथील बचत भवनचा विचार करावा.

सभापती महोदया, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 224 वरील बाब क्रमांक 192 बाबत बोलू इच्छिते. यामध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यासाठी वसतिगृह व निवासी इमारतीचे नुतनीकरणासाठी 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. हंडोरे साहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. गेल्या दोन वर्षापासून माझी मागणी आहे की, शिक्षणासाठी किंवा कामासाठी ज्या महिला येतात त्यांच्यासाठी वसतिगृह पाहिजे. नवी मुंबई सिडकामध्ये मोठमोठे भूखंड पडलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खंदारे ...

श्रीमती मंदा म्हात्रे....

त्या वसतिगृहात दलित मुली असतील किंवा मागासवर्गीय मुली असतील त्यांच्यासाठी वसतिगृह झाले पाहिजे अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 96, पृष्ठ क्रमांक 103 वर माझे विचार मांडत आहे. या मागणीद्वारे पुणे, नागपूर या शहरांसाठी 100 कोटींची तरतूद केली आहे. त्याबरोबर नवी मुंबईसाठी सुध्दा तरतूद करणे आवश्यक आहे. शासनाने सर्वसामान्य माणसांचे काही वस्त्यांमध्ये पुनर्वसन केलेले आहे. तेथे नागरी सुविधांचा अभाव असल्यामुळे त्यांच्यासाठी थोडाबहुत निधी मिळावा अशी मी विनंती करीत आहे. माझ्या मतदार संघात महानगरपालिका किंवा सिडको असली तरी तेथे अनेक लोकवस्त्या दिवसेंदिवस वाढत आहेत. झोपडपट्टयांची वाढ होत आहे. त्याठिकाणी नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 9, पृष्ठ क्रमांक 10 वर मी प्रथम बोलतो. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये विमानतळ होणार आहे असे आम्ही 10 वर्षापासून ऐकत आहोत. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या विमानतळाचे दोन वेळा उद्‌घाटन केलेले आहे. तेथे उद्‌घाटनाचे दगड लावण्यात आले आहेत. हे विमानतळ 2-3 महिन्यामध्ये सुरु होईल अशी घोषणा झाली आहे. पण खरोखरच सिंधुदुर्ग जिल्हयात विमानतळ होणार आहे का अशी शंका आमच्या मनात येते. ही आश्वासने केवळ निवडणुकीपुरती असतात काय असेही मला शासनाला विचारावयाचे आहे. याबाबत शासनाने उत्तरात उल्लेख करावा.

सभापती महोदय, यानंतर मी गृह विभागाच्या बाब क्रमांक 28, पृष्ठ क्रमांक 232 वर बोलू इच्छितो. शासनाने समुद्रतरीय सुरक्षेकरिता 18 मच्छिमार होडया भाडयाने घेण्यासाठी तरतूद केली आहे. यासंबंधी सभागृहात चर्चा झाली आहे. त्यावेळी उत्तर सुध्दा दिले आहे. पण तेथे मच्छिमारी न होणा-या व गस्तीसाठी उपयोगी नसलेल्या होडया घेतल्या जातात. त्याचे उदाहरण मी देईन की, 15 दिवसापूर्वी देवगडजवळ कर्नाटक राज्यातून 200 बोटी आल्या होत्या. त्यापैकी 29 बोटींना पकडले होते. त्यांच्याकडून 18 लाख रुपयांचा माल पकडला होता. या बोटींना 18 लाखाच्या पाच पट दंड वसूल करण्याऐवजी कोणत्या तरी मंत्रिमहोदयांच्या आशिर्वादामुळे फक्त 3 लाखांचा दंड ठोठावला आणि त्यांना सोडून देण्यात आले. त्यामुळे या गस्ती नौकांमध्ये स्पीड नौका असणे आवश्यक आहे. या गस्ती नौकांमुळे मच्छिमारांना मासे मिळत नाही. त्यामुळे या गस्ती नौकांना अटकाव घातला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 47 वर बोलणार आहे. या मागणीमध्ये रेल्वेचा उल्लेख आहे. सिंधुदुर्ग जिल्हा पश्चिम महाराष्ट्राला जोडण्यासाठी वैभववाडी-कोल्हापूर या मार्गाचे सर्वेक्षण करण्याची मागणी सातत्याने होत आहे. हे सर्वेक्षण तातडीने करण्यात यावे. त्याचप्रमाणे कोकण रेल्वे होऊन 12-13 वर्षे झालेली आहेत. हा मार्ग दुहेरी करण्यासाठी शासनाने त्वरित पावले उचलावीत अशी मी मागणी करतो.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.परशुराम उपरकर...

सभापती महोदय, यानंतर महसूल व वन विभागाच्या बाब क्रमांक 60 वर मी बोलू इच्छितो. आकार पडित व वन संज्ञा बाबत तत्कालीन महसूल मंत्र्यांनी सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल केले जाईल असे सांगितले होते. परंतु अद्याप सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र दाखल केले नसल्यामुळे हा प्रश्न सुटत नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 62 वर मी माझे विचार मांडत आहे. अवेळी पाऊस पडल्यामुळे हवामानामध्ये बदल होतो. त्यामुळे कोकणातील आंब्याचे पीक 20 टक्क्यांपर्यंत खाली आले आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. परशुराम उपरकर....)

तेव्हा आंब्याच्या आणि काजूच्या पिकाच्या झालेल्या नुकसानीबाबत नुकसान भरपाई देण्याची गरज असून त्यासाठी तरतूद करावी अशी मी सूचना करतो.

पर्यावरण विभागाच्या पान क्रमांक 443 वरील बाब क्रमांक 334, बाब क्रमांक 335मध्ये पर्यावरणासंबंधी योजना कार्यान्वित करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. आमच्या कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. परंतु पर्यावरणाचा ऱ्हास होईल अशा प्रकारचे उद्योग आज कोकणामध्ये येत आहेत. केन्द्र सरकारने 1998 मध्ये केलेल्या कायद्यानुसार जनसुनावणी घेतल्या शिवाय कोणताही खनिज उद्योग सुरु करता येत नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कळणे येथील जनसुनावणीमध्ये तेथील शंभरटक्के लोकांनी खनिज उद्योगास विरोध केलेला आहे. हा उद्योग तेथे येऊ नये यासाठी आंदोलनकर्त्यांना खुनाच्या प्रकरणात गोवण्यात आलेले आहे. स.नं. 60 मध्ये 144 कलम लावून तेथील मशिनरी काढण्याचा प्रयत्न शासनाने केला. ती मशिनरी काढत असताना तेथील देशमुख नावाच्या पोलीस इन्स्पेक्टरने महिलांना धक्काबुक्की केली. तसेच 65 वर्षाच्या वृध्दाच्या थोबाडीत मारले. अशा प्रकारे खाण उद्योगास विरोध करणा-या लोकांना दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. लोकांचा विरोध असेल तेथे हे खाण उद्योग सुरु करु नयेत असा कायदा असताना, लोकांनी जनसुनावणीमध्ये शंभर टक्के विरोध केलेला असताना देखील या खाण उद्योगास परवानगी दिली जात आहे.

श्री. राजन तेली : माझा हरकतीचा मुद्दा आहे. खाण उद्योगास कोणाकडून परवानगी मिळते ?

श्री. परशुराम उपरकर : जनसुनावणी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली घेतली जाते आणि त्याचे सचिव हे पर्यावरण आणि प्रदूषण मंडळाचे अध्यक्ष असतात. त्यामुळे पर्यावरण विभागांतर्गत हा विषय येतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक बंदरे विकसित करण्याचा कार्यक्रम हाती घेतला जात आहे. कोकणतील बंदरांचा विकास करण्यासाठी अधिक निधीची तरतूद करण्याची आवश्यकत आहे. तेव्हा या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने मी केलेल्या सूचना शासनाने विचारात घ्याव्यात अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...नंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 81 ते 86, पृष्ठ क्रमांक 90 ते 93 यासंदर्भात मी माझे मनोगत व्यक्त करणार आहे. अधिवेशन सुरु झाल्यापासून या सभागृहामध्ये कायम विनाअनुदानितमधील 'कायम' शब्द वगळण्यासंबंधी, कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासंबंधी सातत्याने प्रश्न चर्चेला येत आहेत. शासनाने पुरवणी मागण्यांमध्ये माध्यमिक व प्राथमिक शाळांना अनुदान देण्याबाबत पुरवणी मागणी आणली आहे. या शाळांना काही-ना-काही अनुदान देण्यासंबंधी शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. राज्य शासनाने या राज्यामध्ये अंशदायी निवृत्ती वेतन योजना सुरु केली आहे. पण नोव्हेंबर, 2005 पासून नव्याने लागलेल्या शिक्षकांना ही योजना लागू झालेली आहे. नोव्हेंबर, 2005 नंतर ही योजना लागू झाली असली तरी त्यापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षण सेवकांना ही योजना लागू होत नाही, असा शासनाचा निर्णय असतांना वित्त विभागाने छेद देणारा निर्णय घेतला आहे, त्यात दुरुस्ती करण्याचाही निर्णय झाला, तथापि, अद्याप त्यासंदर्भात कार्यवाही झालेली नाही. याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, अनेकवेळा या शासनाने सांगितले आहे की, 1 तारखेला वेतन दिले जाईल. परंतु, अजूनही 1 तारखेला वेतन दिले जात नाही. 1 तारखेला वेतन देण्यासंबंधीची योजना आम्ही शासनाकडे सादर केलेली आहे. सहकारी बँकांच्या पदाधिका-यांशी चर्चा करुन वेतन देण्यासंबंधी जी योजना सादर केली आहे त्याचाही शासनाने जरुर विचार करावा व तातडीने निर्णय घ्यावा.

सभापती महोदया, सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी शासन निर्णय काढला जाईल, असे सांगण्यात आले होते. तथापि, अद्याप तो निघालेला नाही. शासन निर्णय तातडीने काढण्याबाबत कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, विनाअनुदान शाळांना पोषण आहार योजना लागू करण्यासंबंधी शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात शासनाने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

....2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........

सभापती महोदया, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासंबंधीचा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु, त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविले जातात. त्यांना येणारा खर्च आणि प्रत्यक्ष त्या विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम यामध्ये प्रचंड तफावत आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी, अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदया, विनाअनुदान तुकडयांना अनुदान देण्यासंबंधी शिक्षण संचालकांकडून ज्या शाळा पात्र आहेत, ज्या तुकडयांना अनुदान देणे आवश्यक आहे, त्यांची यादी शासनाकडे आलेली असतांना शासनाने ज्या तुकडया अनुदानास पात्र आहेत, अशा तुकडयांना अनुदान दिलेले नाही. हजारो तुकडयांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. अनुदानास पात्र आहेत अशा तुकडयांपैकी काही मोजक्याच तुकडयांना अनुदान देण्यात आले आहे. सर्व पात्र तुकडयांना अनुदान देण्यासंबंधी शासनाने विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, गेल्या 4 वर्षांपासून प्रलंबित असलेला एक महत्वाचा विषय आहे. शासन दरवर्षी शिक्षकांच्या पगारापोटी कोटयावधी रुपये खर्च करते. हा खर्च करीत असतांना आज राज्यातील उच्च माध्यमिक शिक्षण विभागातील 4 विषयांची 200 पेक्षा अधिक पदे विना वेतनावर काम करणा-यांची आहेत. 4 वर्षापासून पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देऊन या शिक्षकांना वेतन देण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, वेतनेतर अनुदानाचा विषय, शिक्षण सेवकांचा विषय, रात्र शाळांचा विषय याबाबत शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.गिते.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा उपस्थित करुन माझे भाषण संपविणार आहे. राजीव गांधी अपघात विमा योजना ही अनुदानित शाळांना लागू करण्यात आलेली आहे. ही योजना विना अनुदानित शाळांना लागू करण्यात आलेली नाही...

डॉ.सुनील देशमुख : सन्माननीय सदस्यांचे मुद्दे अतिशय गुळगुळीत झालेले आहेत. तेच तेच मुद्दे ते सभागृहात उपस्थित करीत आहेत.

श्री. रामनाथ मोते : आमचे प्रश्न सुटत नाहीत म्हणून आम्हाला वारंवार ते मुद्दे उपस्थित करावे लागतात. सभापती महोदय, राजीव गांधी अपघात विमा योजना ही अनुदानित शाळांनाच फक्त लागू आहे, विना अनुदानित शाळांना ती योजना लागू नाही. विना अनुदानित शाळांना देखील ती योजना लागू करावी अशी माझी या निमित्ताने शासनाकडे मागणी आहे.

सभापती महोदय, शिक्षण विभागाला गेल्या दोन वर्षापासून शिक्षण संचालक म्हणून माणूस मिळत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. शिक्षण संचालक, उप संचालक, या पदांचा दुस-या अधिका-यांकडे कार्यभार सोपविलेला आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, शिक्षण विभागात जी पदे रिक्त आहेत, ती पदे भरण्यासंदर्भात शासनाने तातडीने उपाययोजना करावी अशी विनंती करतो आणि मला आपण बोलण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, पूरक मागणी के ऊपर चर्चा करते हुए सब से पहले मुझे यह कहना है कि अगर मंत्री महोदय यह चाहते हैं कि हम कम शब्दों में बोलें तो वे हमारी मांगों को पूरा करें. सामाजिक न्याय विभाग से संबंधित बाब क्रमांक 233 के बारे में बोलते हुए मेरी यह मांग है कि स्पेशल बॅकवर्ड क्लास के लिए स्वतंत्र आश्रमशालाएं देने का धोरण महाराष्ट्र शासन बनाए, क्योंकि हमें छोटी छोटी जातियों को न्याय देने की जरुरत है.

सभापति महोदय, बाब क्रमांक 411 अल्पसंख्यक विकास विभाग से संबंधित है. मेरे तारांकित प्रश्न क्रमांक 52536 के तहत जब मैंने यह पूछा कि मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल में कर्ज इतनी धीमी गति से क्यों बाँटे जा रहे हैं, तब मुझे बताया गया कि स्टाफ की कमी है, 105 पद भरने की आवश्यकता है और ये पद भरने की कार्यवाही शुरु है. 15 अगस्त को आचार संहिता लगने के पहले ये पद भरे जाएं, इससे कर्ज का बँटवारा जल्दी हो सकेगा. मुझे मंत्री महोदय का ध्यान इस ओर आकर्षित करना है कि इसमें दलाल आ गए हैं, इसमें जितना पैसा बाँटा जा रहा है, उसमें भी गलत तरीके से लोगों को कर्ज मंजूर किए जा रहे हैं. इसलिए मेरी मांग है कि एपलीकेशन्स की यादी और लाभार्थियों की यादी लोक-प्रतिनिधियों के पास दी जाए, जिससे इसमें ट्रान्सपरेन्सी रह सकती है.

सभापति महोदय, अल्पसंख्यक समाज को भर्ती से पहले पूर्व प्रशिक्षण देने के बारे में बाब क्रमांक 412 में उल्लेख किया गया है. शासन ने बहुत अच्छे कार्य के लिए निधि देने का प्रावधान किया है और इससे अल्पसंख्यक समाज को फायदा हो रहा है. इसके लिए मैं शासन को अभिनंदन देना चाहती हूँ.

सभापति महोदय, बाब क्रमांक 410 के माध्यम से मैं यह कहना चाहूँगी कि उर्दू मीडियम से पढ़ने वाली लड़कियों के लिए होस्टल्स और क्लास देने के लिए बजट में ज्यादा तरतूद करनी चाहिए, क्योंकि इस स्कीम के माध्यम से अल्पसंख्यक समाज का विकास हो सकता है.

सभापति महोदय, मुझे यह पता नहीं कि वक्फ बोर्ड का मामला किस खाते की पूरक मांगणी के अन्तर्गत आता है. वक्फ बोर्ड का मामला अल्पसंख्यक विकास मंत्रालय के अन्दर नहीं आता है, इसलिए मैं इस बात को मुख्यमंत्री के सामान्य प्रशासन विभाग की बाब क्रमांक 11 के अन्तर्गत अपनी बात आपके सामने रखना चाहती हूँ. वक्फ बोर्ड की जमीन की इन्क्वायरी करने

3..



ABG/ SBT/ KGS/ प्रथम श्री. रोझेकर 17:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान....

के लिए 2 साल पहले एक इन्क्वायरी कमीशन बनाया गया था. पिछले साल इसके लिए निधि दी गई थी, लेकिन इस साल के बजट में इसके लिए तरतूद नहीं की गई है. इसके लिए बजट में तरतूद करना बहुत जरुरी है. इस कमीशन के लिए कुछ न कुछ बजट होगा, तभी इस कमीशन का काम हो सकता है.

सभापति महोदय, जहां तक वक्फ बोर्ड की बात है, वह डिफंक्ट हो गया है, उसका कार्यकाल खत्म हो गया है. इसमें आज चेयरमेन नहीं हैं, मेम्बर्स नहीं है और इसके अन्दर जो वेकेन्सी हैं, वे कन्सटिट्यूशनल तरीके से ही भरी जा सकती. वक्फ बोर्ड को रिवाइव और रि-कन्सटिट्यूट करना जरुरी है. शासन ने वेकेन्सी भरने के लिए नोटिफिकेशन निकाला है, लेकिन कानूनी तौर पर सरकार ऐसा नहीं कर सकती. यह जरुरी है कि बोर्ड को रि-कन्सटिट्यूट किया जाए और तब तक के लिए डिवीजनल कमिश्नर को एडमिनिस्ट्रेटिव के रुप में अपाइंट किया जा सकता है. यह मेरी शासन से मांग है.

सभापति महोदय, बाब क्रमांक 66 के अन्तर्गत मैं परभणी जिले के वन की बात करना चाहूँगी. परभणी जिले में वन का क्षेत्र केवल 1.5 प्रतिशत है और वन क्षेत्र में फोरेस्ट कंजर्वेशन का काम बहुत कम होता जा रहा है. हम फोरेस्ट को सुरक्षित नहीं रख रहे हैं और अगर वाटर कंजर्वेशन का काम हाथ में नहीं लेते हैं तो फिर वन का प्रतिशत 1.5 भी नहीं रहेगा. जिंतूर में वन का यह क्षेत्र है, और इसको सुरक्षित रखने के लिए मैं इसके लिए स्पेशल पेकेज की मांग करती हूँ.

सभापति महोदय, नगर विकास विभाग की बाब क्रमांक 93 के अन्तर्गत मैं यह कहना चाहती हूँ कि परभणी नगर परिषद के अन्तर्गत एक व्यापारी संकुल बनाया गया है.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ SBT/ पूर्वी श्री शर्मा.. 18:00

श्रीमती फौजिया खान .....

गुजरी बाजार के इस व्यापारी संकुल को झूठे दस्तावेज के आधार पर किसी को बेच दिया गया है और उस प्रापर्टी की रजिस्ट्री भी हो गई है. चूंकि यह प्रापर्टी नगरपरिषद के मालकी की है, झूँठे दस्तावेज के आधार पर 2 दुकानें बेच दी गईं. इसे कैसे बेचा जा सकता है ? लेकिन इसके बावजूद भी यह व्यापारी संकुल बेच दिया गया है. अब यह प्रापर्टी सय्यद जाकिर, पिता सय्यद इमाम ने सय्यद समी पिता सय्यद साहेब जान के नाम से झूँठी रजिस्ट्री कर दी गई है. 10.07.2007 को इस प्रापर्टी की रजिस्ट्री की गई है. यह जानकारी 09.06.2007/357/09 इस क्रमांक के अन्तर्गत नगरपरिषद के रिकार्ड में आऊट वर्ड की गई है. यह आऊट वर्ड नंबर रहने के बावजूद नगरपरिषद के अलाटमेंट के बिना 09.07.2007 को रिवीजन रजिस्टर में इस व्यक्ति का नाम कैसे दर्ज किया गया है और किसी प्रकार से टॅक्स लगाया गया ? यह बहुत गंभीर मामला है. इसलिए इस मामले की उच्च स्तरीय जांच की जाए.

तालिका सभापती : आपका समय समाप्त हो गया है.

श्रीमती फौजिया खान :सभापति महोदया, मंत्री जी की ट्रेन चली गई, प्लेन का समय हो गया, तो हम क्या करें ? हमें तो यहां अपनी बात रखनी है. अगर आज समय नहीं है तो सोमवार को इस विषय पर चर्चा रखी जाए. हम इस विषय पर सोमवार को बोल सकते हैं. इसलिए समय खत्म हो गया है, भाषण जल्दी समाप्त करो, यह कहकर हम पर दबाव डालना ठीक नहीं है.

सभापति महोदया, मैं बहुत ही गंभीर मामले के बारे में चर्चा कर रही हूं. इसलिए इस मामले को केज्युअल लिया जाएगा तो यहां बोलने का क्या फायदा, हम क्यों बोले ? नगरपरिषद की प्रापर्टी कोई अपने नाम पर कर लेता है. यह बहुत गंभीर मामला है. इसलिए इस मामले की उच्च स्तरीय जांच की जाए और संबंधित गुनेहगार के खिलाफ सीईओ की तरफ से पुलिस स्टेशन में गुनाह दर्ज किया जाए. सरकार इस मामले की तरफ गंभीरता से देखे. नगरपरिषद की प्रापर्टी कोई व्यक्ति अपने नाम पर कर लेता है तो यह बहुत गंभीर मामला है.

सभापति महोदय, मैं बाब क्रमांक 252 के अंतर्गत के अंतर्गत यह कहना चाहती हूं कि स्थानिक विकास कार्यक्रम के अन्तर्गत हमने यह देखा है कि खासदारों को प्राईवेट अनएडेड सोसायटी को स्थानिक विकास निधि से मदद करने की इज़ाजत मिलती है. चूंकि प्राईवेट अनएडेड सोसायटी को शासन से अनुदान नहीं मिलता है लेकिन उनको परमीशन मिली है,

. . . 3Z 2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान .....

ऐसी सोसायटी को आमदार स्थानिक विकास निधि से किसी प्रकार की मदद देने की इज़ाजत नहीं है. इसलिए मेरी सरकार से विनती है कि जिस प्रकार से खासदार स्थानिक विकास निधि से प्राईवेट अनएडेड सोसायटी को मदद देने की इज़ाजत है उसी प्रकार से आमदार स्थानिक विकास निधि से मदद देने की इज़ाजत दी जाए. कई ऐसी प्राईवेट संस्थाएं है, जिनकी आर्थिक स्थिति अच्छी नहीं है, उन संस्थाओं को मदद करने के लिए कोई दूसरा रास्ता नहीं है. ऐसी संस्थाओं को आर्थिक मदद कर सकते हैं. उदाहरण के लिए कम्प्युटर खरीदने के लिए, वर्ग खोलने के लिए कमरे का निर्माण करने के लिए आमदार स्थानिक विकास निधि से मदद की जा सकती है.

इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करती हूं. आपने मुझे बोलने के लिए समय दिया, इसके लिए धन्यवाद.

..........

इसके बाद श्री चंद्रकांत पाटील का भाषण.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बाब क्र. 7, पृ.क्र. 8, सामान्य प्रशासन विभाग-स्मारकांचे बांधकाम करण्याकरिता तरतूद करणे या संदर्भात मी असे निदर्शनास आणून देणार आहे की, पद्मश्री ग.गो.जाधव यांच्या जन्मशताब्दीचे हे वर्ष असून त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी पद्मश्री ग.गो.जाधव यांच्या नावाने "पत्रकारिता अभ्यासक्रम" शिवाजी विद्यापीठात सुरु करण्याचे घोषित केले होते व त्यासाठी 311 कोटीची तरतूद करण्याचे मान्य केले होते पण या अर्थसंकल्पात त्यासंबंधीचा उल्लेख करणे विसरुन गेले की काय हे समजत नाही. म्हणून माझी विनंती अशी आहे की, पद्मश्री ग.गो.जाधव यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पत्रकारिता अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठात सुरु करावा व त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात यावी.

नगरविकास विभागाच्या संदर्भात औषधांवरील ऑक्ट्राय माफ करण्याच्या संदर्भात माजी मुख्यमंत्र्यांनी केमिस्ट असोशिएशनच्या सभेत सांगितले होते परंतु बजेटमध्ये त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही, त्यासंदर्भात शासनाने विचार करावा व त्यासाठी आवश्यक ती तरतूद करावी. असे दोनच मुद्दे या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मांडतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, खर्चाचे पूरक विवरणपत्र 2009-2010 च्या बाब क्रमांक 102, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मागणीवर मी माझे विचार व्यक्त करु इच्छितो. शासकीय निवास इमारतींचे परीक्षण व दुरुस्ती यासाठी 150 कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेली आहे. दुरुस्तीचे कारण असे दिले आहे की, "गेल्या काही वर्षामध्ये जी अतिवृष्टी झाली त्या अतिवृष्टीमुळे इमारती खराब झाल्या व त्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी पूरक मागण्यांमध्ये 150 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे."

सभापती महोदय, 26 जुलै, 2005 रोजी जी अतिवृष्टी झाली होती त्यासाठी सन 2006-2007 मध्ये तरतूद करण्यात आली होती, सन 2007-2008 मधील पूरक मागण्यांमध्येही तरतूद करण्यात आली होती, व सन 2009-2010 मधील मुख्य अर्थसंकल्पात 150 कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणजे किती हजार कोटी रुपयांची तरतूद सार्वजनिक बांधकाम खात्याच्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी केली आहे. या इमारतींचे पुनर्विकास करण्यासाठी टेंडर काढले गेले आहेत. यामध्ये किती अतिशयोक्ती केलेली आहे, किती भ्रष्टाचार झाला असेल याचा विचारच केलेला बरा. साधारण विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, एका बाजूला आपण म्हणता खराब इमारतींची दुरुस्ती करण्यासाठी काही हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या इमारतींची आता दुरस्ती होऊ शकणार नाही म्हणून त्याच्या नावावर, पुनर्विकासासाठी टेंडर काढली गेली आहेत. हे टेंडर काढण्यासाठी पायाभूत समितीची बैठक माननीय मुख्यमंत्र्यांनी सुट्टीच्या दिवशी, शिवजयंतीच्या दिवशी आयोजित करुन त्या फाईलवर सही केली आणि त्याचे टेंडर आता येणार आहे. ह्या इमारतींसाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद केलेली असतांना आपण त्यांची टेंडर्स पुन्हा का काढत आहात हे मला तरी समजत नाही. या इमारती दुरुस्ती लायक नाहीत का? या इमारती दुरुस्ती लायक नसतील म्हणून तुम्ही टेंडर काढणार असाल तर मग एवढे हजार कोटी रुपये गेले कोठे, हे पैसे कोठे खर्च केले ? याची विस्तृत माहिती या सभागृहाला मिळणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, जे 5000 शासकीय कर्मचारी ज्या कॉलनीमध्ये राहतात त्याच्या दुरुस्तीसाठी आपण हजारो कोटी रुपयांची तरतूद केली त्याबाबतीत शासनाने अजून काही धोरणच जाहीर केलेले नाही. 20-20, 25-25 वर्षे सेवा केलेले कर्मचारी आम्हाला दुसरीकडे स्वस्त दरात

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब.....

प्लॉट द्या म्हणून आपल्याशी भांडत आहेत. परंतु हे सरकार त्यांचे म्हणणे काही ऐकत नाही. 96 एकरचा हा भूखंड आहे. परंतु 138 कोटी रुपयांचा भूखंड ज्या लोकांनी लाटला त्या लोकांना तुम्ही जमिनी दिल्या, त्यांनी तेथे घरे बांधली परंतु जे तुमचे स्वत:चे कर्मचारी आहेत ते तुमच्याकडे अल्पदरात भूखंड द्या म्हणून सांगातात त्यांना मात्र तुम्ही भूखंड देत नाहीत. सरकारी कर्मचारी ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणच्या लोकांच्या नावावर हजारो कोटी रुपयांची तरतूद करुन सुध्दा त्या इमारती आजही राहण्याच्या लायकीच्या नाहीत म्हणून तुम्ही टेंडर काढत आहात. त्यामुळे तुम्ही ही निवडणुकीसाठी तरतूद केलेली आहे असे आता आम्हाला वाटायला लागले आहे. ही तरतूद शासकीय कर्मचा-यांसाठी आहे की, निवडणुकीसाठी तरतूद आहे? या विषयाच्या खोलात जाणे अतिशय गरजेचे आहे.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, पोलिसांना घरे देऊ असे आपण सांगितलेले आहे त्याच पध्दतीची तरतूद आपण शासकीय कर्मचा-यांसाठी करणार आहात काय ? त्याचा देखील अर्थसंकल्पाच्या निमित्ताने खुलासा होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 286, गृहनिर्माण विभाग. गृहनिर्माण विभागाने गरीब लोकांसाठी, मध्यमवर्गीयांसाठी आणि उच्च वर्गीयांसाठी घरे बांधलेली आहेत. वर्षानुवर्षे मुंबईत राहणा-या माणसाला सुध्दा तुम्ही डोमेसाईलची अट लावलेली आहे. दुसरा विषय असा आहे की, जे लोक मुंबईत म्हाडाच्या छोटया छोटया घरात राहतात, आता त्यांची कुटुंब मोठी झालेली आहेत, त्यांची मोठया घरात जाण्याची अपेक्षा आहे . असे असतांना आपण त्याच्याकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेता की, म्हाडाचे एक घर असेल तर त्याला दुसरे म्हाडाचे घर मिळणार नाही. जो मुंबईतील रहिवासी आहे, मुंबईत तो वर्षानुवर्षे राहतो आहे, त्याला मोठया घरात जावयचे असेल, त्याला दुसरीकडे राहण्याची सोय नसेल आणि अशा लोकांना मोठया घरासाठी अर्ज करावयाचा असेल तर एका घराची अट जी म्हाडाने लावलेली आहे ती काढून टाकण्यात यावी अशा दोन बाबी आपल्या समोर ठेवून मी माझे विचार येथेच थांबवतो.

-----

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.हेमंत टकले)** : पुरवणी मागण्यांवरील सन्माननीय सदस्यांची भाषणे आणि माननीय मंत्री महोदयांचे उत्तर आजच पूर्ण करावयाचे असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषणे करावीत,अशी माझी त्यांना विनंती आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आपण हे अगोदरच सांगावयास पाहिजे होते

**तालिका सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी भाषण करावे

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी म्हटल्याप्रमाणे आपण जर अगोदरच तसे सांगितले असते तर सर्वांना समान वेळ मिळाला असता..

सभापती महोदय, बाब क्रमांक 70 पान नंबर 74 सबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे. महाराष्ट्र शासनाने पीक संवर्धनाच्या अंतर्गत पीक विमा योजना सुरु केली असून त्याकरता पूरक मागणी मध्ये तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. शेतीसाठी पीक विमा योजना राबविण्यात येते. त्याचप्रमाणे् शेती पूरक व्यवसायासाठीसुध्दा पीक विमा योजना राबविण्यात आली पाहिजे, असे मला या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे. कुक्कुट पालनासाठी तसेच बाकीच्या पशुधनासाठी विमा योजना राबविण्यात येते. परतु शेळया मेंढयासाठी विमा योजना या राज्यात अजूनही सुरु करण्यात आलेली नाही. माननीय केंद्रिय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांना याबाबतीत विनंती केल्यानंतर त्यांनी असे सांगितले की, केन्द्र सरकारने स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मेंढपाळाची योजना पहिल्यांदा या राज्यामध्ये सुरु केलेली आहे. अशा प्रकारे मेंढपाळांना केन्द्र सरकारमार्फत विम्याचे पैसे मिळतात. परंतु राज्य शासनामार्फत शेळया मेंढयासाठी विमा योजना राबविण्यात येत नाही, तसेच मेंढपाळासाठीसुध्दा विमा योजना राबविण्यात येत नाही. तेव्हा राज्य शासनाने शेळया मेढयासाठी विमा योजना सुरु करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर मला सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत असलेली बाब क्रमांक 234,235,236 आणि 237 संबंधी बोलावयाचे आहे. बाब क्रमांक 234 मध्ये मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय आणि आदिवासींसाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ...

शासनाला धन्यवाद देतो. बाब क्रमांक 234 मध्ये मागसावर्गीय उमेदवाराला मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी 15 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु बाब क्रमांक 235 मध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय उमेदवारांना प्रशिक्षण् देण्यासाठी फक्त एक लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याचबरोबर बाब क्रमांक 236 मध्ये वसंतराव नाईक सबळीकरण योजने करिता 1 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करीत असतांना भटके व विमुक्त जमातीसाठी आणि इतर मागासवर्गीयांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 232 आणि पान नंबर 266 सबंधी बोलावयाचे आहे. या पूरक मागणीमध्ये महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळासाठी 23 कोटी 31 लाख रुपये, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळासाठी 5 कोटी रुपये, संत रोहिदास चर्मोद्योग महामंडळासाठी 11 कोटी 66 लाख रुपये , अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ साठी 11 कोटी 66 कोटी रुपये, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करुन प्रत्येक महामंडळाला निधी उपलब्ध करुन दिला आहे. परंतु अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळसाठी वारंवार विनंती करुनही कर्ज वाटपासाठी आजपर्यत एक रुपयाची तरतूद देखील करण्यात आलेली नाही. माननीय मंत्री महोदय श्री.मुश्रीफ यांनी मेंढपाळाच्या मेळाव्यात येऊन 50 कोटी रुपये देण्यात येतील, असे गेल्या अर्थसंकल्पाच्या वेळी सागितले होते. परंतु अजूनही एक रुपयाचा निधी देण्यात आलेला नाही. या महामंडळाशी अनेक मेंढपाळाचा सबंध असल्यामुळे या महामंडळासाठी शासनाने भरीव तरतूद करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 254, पान नंबर 328 संबंधी मला बोलावयाचे आहे डोंगराळ क्षेत्रासाठी 36 कोटी 20 लाख रुपयांची पूरक मागणी केलेली आहे.यासंदर्भात मला शासनाला असे सांगावयाचे आहे की, कोकणपट्टी आणि पश्चिम महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या डोंगराळ भागात काही वस्त्या आहेत. कदाचित सान्माननीय सदस्य श्री राजन तेली आणि डॉ.दीपक

..3..





श्री.रमेश शेंडगे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सावंत हे त्या भागातील असतील. कोकणातील डोंगराळ भागात ज्या वस्त्या आहेत, त्या ठिकाणी अजूनही रस्ते आणि वीज नाही. यामुळे टेकडीवर राहणारी एखादी व्यक्ती जर आजारी पडली तर कोणाच्या तरी खांद्यावरुन त्या व्यक्तीला दवाखान्यात न्यावे लागते ....

नतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . . .

ते लोक डोंगराळ भागामध्ये रहाणारे आहेत. त्यामुळे तेथे कोणाचा मृत्यू झाला तर तो मृतदेह डोलीमध्ये घालून रस्त्यापर्यंत आणावा लागतो. तेथे बहुसंख्य प्रमाणात धनगरांची वस्ती आहे. त्यामुळे याबाबतीत देखील विचार करावा अशी मला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, पान क्र.450, बाब क्र.336 बाबत मुद्दा मांडावयाचा आहे. शासनाने रेशीम उद्योगासाठी जवळजवळ 4 कोटी 83 लाख अधिक 1 कोटी 75 लाख रुपयांचे नियोजन केलेले आहे. तसेच आपण सूत गिरण्यांच्या बाबतीत सुध्दा नियोजन करीत आहोत. परंतु मला येथे मुद्दाम सांगावेसे वाटते की, या राज्यामध्ये आपल्याला मेंढयांपासून लोकर मिळते. पण त्यावर प्रक्रिया करणारा एकही कारखाना याठिकाणी नाही. तसेच त्याकरता या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, त्यांनी या उद्योगाकडे देखील लक्ष द्यावे. हा उद्योग रेमंड वगैरे सारख्या कारखानदारांसाठी सोडून दिलेला आहे काय ? लोकरीचा उद्योग हा देखील शेती व्यवसायाला पूरक अशा प्रकारचा असल्यामुळे त्यासाठी देखील भरीव नियोजन करण्यात यावे अशी माझी विनंती आहे. धन्यवाद.

-----

. . . .4 डी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक मानकर (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी याठिकाणी 2009-2010 च्या पूरक मागण्यांच्या संबंधात माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी सादर करण्यात आलेल्या मागण्यांमधील सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.3 व 4 बाबत बोलत आहे. राज्य शासनाच्या प्रशासकीय सेवेमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी "कोड ऑफ कंडक्ट"पाळले पाहिजे. कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये व्हिजिटर्स्च्या बाबतीत, लोकप्रतिनिधींच्या बाबतीत अतिशय चांगल्या भावना असतात. तसेच त्यांच्या हाताती काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत देखील चांगल्या भावना असतात. अशा वेळी "कोड ऑफ कंडक्ट" कसे पाळावयाचे याच्या काही मर्यादा सुध्दा असतात. पण अनेक वेळा ते पाळले जात नाही. त्यामुळे प्रत्येक कार्यालयाच्या प्रमुखांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियम, 1981 च्या माध्यमातून आपल्या वर्तणुकीच्या बाबतीतील सर्व गोष्टींचे काटेकोरपणे पालन करणे हे अत्यंत आवश्यक आहे. निवडणुकीच्या बाबतीत नियम हे पहिल्यापासूनच इलेक्शन मॅन्युअलमध्ये आहेत. माजी माननीय निवडणूक आयुक्त श्री.टी.एन.शेषन यांनी या पदाचा कार्यभार घेतल्यानंतर निवडणुकीच्या कामामध्ये शिस्त आणण्याचा प्रयत्न केला आणि मग हळूहळू निवडणुकीच्या प्रक्रियेला शिस्त लागली. पण आज राज्यामध्ये मग ते शासकीय अधिकारी असोत किंवा त्यांच्या हाताखाली काम करणारी असोत किंवा लोकप्रतिनिधी असोत, या सर्वांनी मर्यादा पाळण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.म्हणून यासंबंधी शासनाने एक परिपत्रक काढावयास पाहिजे. या सर्व मर्यादांच्या बाबतीतील माहिती सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना, शासकीय कर्मचाऱ्यांना, लोकप्रतिनिधींना करुन दिली पाहिजे. आज अशी अवस्था आहे की, आम्हाला हक्कांची जाणीव आहे, पण कर्तव्याची जाणीव नाही.

**तालिका सभापती (श्री.हेमंत टकले)** : सन्माननीय सदस्य श्री.अशोक मानकर, यांनी सदनामध्ये ज्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत, त्या अनुषंगाने आपले भाषण करावे.

श्री.अशोक मानकर : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागातर्फे सर्व अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांना "कोड ऑफ कंडक्ट"बाबतची माहिती देणे आवश्यक आहे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, पान क्र.6, बाब क्र.1 मला सांगावयाचे आहे. मात्र मला माननीय राज्यपालांच्या संबंधात बोलावयाचे नाही. पण आज मंत्रालयामध्ये जाणे हे काही येऱ्यागबाळ्याचे ...

. . . .4 डी-3





श्री.अशोक मानकर . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काम नाही. पाचव्या मजल्यावर प्रमुख विभागाचे कार्यालय आहे. पहिल्या मजल्यावर त्याचे उप कार्यालय आहे.त्यामुळे दिल्ली येथील मंत्रालयामध्ये ज्या पध्दतीने विविध विभागांच्या कार्यालयांची रचना करण्यात आलेली आहे.त्याच धर्तीवर मुंबईतील मंत्रालयाची रचना करावयास पाहिजे. दिल्ली मंत्रालयामध्ये एकाच ठिकाणी संबंधित विभागाचे कार्यालय, त्याचे प्रशासकीय कार्यालय जवळ-जवळ आहे. त्याप्रमाणेच मुंबई येथील मंत्रालयामध्ये सुध्दा एकाच ठिकाणी संबंधित विभागाचे कार्यालय आणि त्याचे प्रशासकीय कार्यालय असले तर मग कोणालाही मंत्रालयामध्ये गेल्यावर अडचणीचे होणार नाही. म्हणून यापध्दतीने मंत्रालयातील कार्यालयांची विभागवार रचना करण्यात यावी, त्यासाठी तरतूद करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.102 व 104 बाबत बोलावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . ..

श्री. अशोक मानकर...

यासाठी तरतूद व्हावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाची बाब क्रमांक 102, पृष्ठ क्रमांक 102 व 104 बाबत मी बोलू इच्छितो. राज्य शासनाच्या रस्ते आणि इतर कामामध्ये इंजिनियर आणि ठेकेदाराच्या संगनमतानेच सर्व टेंडर्स निघतात. या विषयावर मी जास्त बोलणार नाही. आज अशी अवस्था आहे की, (अडथळा) पर्सेंटेजमुळे रस्त्यांची जाडी कमी होत आहे, याबाबत मी बोलू काय, जी कामे होतात त्यांचे मोजमाप चार भिंतीमध्ये होते याबाबत मी बोलू काय? माननीय मंत्रिमहोदय, श्री. सुनील देशमुख यांनी थोडयावेळा पूर्वीच सांगितले की, त्यांना नागपूरला जावयाचे आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (बसून) : माननीय मंत्रिमहोदयांना सहकार्य करावे.

श्री. अशोक मानकर : फार पूर्वी पासून आम्ही त्यांना सहकार्य करतो. सभापती महोदय, क्वालिटी कंट्रोल सुध्दा कागदावरच राहिले आहे. त्यामध्ये सुधारणा व्हाव्यात अशी अपेक्षा आहे. अधिकारी, कॉन्ट्रॅक्टर आणि लोकप्रतिनिधी यांच्यावर याबाबतीत अंकुश असावा. (अडथळा) लोकप्रतिनिधी नाहीत पण तुम्ही म्हणाल लोकप्रतिनिधीना यातून सोलडले काय? म्हणून लोकप्रतिनिधींचाही उल्लेख मी केला.

सभापती महोदय, सामाजिक कामासाठी दिलेला निधी खऱ्या अर्थाने सार्थकी लावण्याची गरज आहे. शासन विदर्भाच्या बाबतीत सातत्याने अन्यय करीत आहे. तेव्हा किमान विदर्भावर अन्याय करु नये, अशी माझी भावना आहे. विशेषत: सार्वजनिक बांधकाम क्षेत्रात 100-100 कि.मी. अंतरावर एक विश्रांमगृह आहे. या विश्रांमगृहांची अवस्था वाईट आहे. त्यासाठी या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. विश्रामगृहांच्या दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 196,205 आणि 208 वर मी बोलू इच्छितो. बेकारांना रोजगार दिला पाहिजे म्हणून उद्योग काढले पाहिजेत. एमआयडीसी च्या जागा लिलावात निघतात, आता या जागा लिलावात काढणे राज्य शासनाने बंद केले आहे. मोठे उद्योग बंद पडले आहेत.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक मानकर....

लहान उद्योगांना आणि मध्यम उद्योगांना जागा मिळत नाहीत. एमआयडीसीमध्ये ज्या जागा उपलबध आहेत, त्यामुळे एमआयडीसीमध्ये ज्या जागा उपलब्ध आहेत त्या छोटया उद्योगांसाठी आहेत त्यांची लिलाव प्रक्रिया सुरु व्हावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, महसूल विभागाची स्थिती अतिशय वाईट आहे. बाब क्रमांक 51,52,आणि 53 वर मी बोलू इच्छितो. भूमी अभिलेख कार्यालय या राज्यामध्ये आहेत त्यांची अवस्था अतिशय दयनीय आहे. सन 1983, 1984 साली त्या जमिनीचे फेरफार करण्यात आले होते आणि शासनातर्फे मोहीम राबविण्यात आली होती. ते फेरफार त्या काळात पूर्ण केले. शेतकऱ्यांना 7/12 चे उतारे मिळले आहेत त्या 7/12 च्या उताऱ्यावर त्यांना शेतीचे नंबर बदलून मिळाले आहेत सभापती महोदय, शेतकरी या 7/12 च्या उताऱ्याच्या भरवशावर श्ेती करतो. त्या शेतीच्या वाटण्या झाल्या किंवा शेती विकली गेली किंवा नॉन ॲग्रकल्चर किंवा टाऊन प्लॅनिंगमध्ये मोठया नगराच्या बाजूला आली तर त्याबाबतीत तो शेतकरी जेव्हा चौकशी करायला जातो त्यावेळी पटवाऱ्याच्या रेकॉर्डवर 7/12 चे वेगळे आकडे असतात आणि भूमी अभिलेख कार्यालयामध्ये जुनेच आकडे असतात अशाी अवस्था या भूमी अभिलेख कार्यालयाची महाराष्ट्रभर आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक मानकर ......

त्यामुळे ज्यांच्या त्या जमिनी आहेत त्यांच्या बाबतीत पटवाऱ्याच्या रेकॉर्डवर फेरफार पूर्ण झाले परंतु भूमी अभिलेख कार्यालयामध्ये 25 वर्षापूर्वीचा, 50 वर्षापूर्वीचा रेकॉर्ड तसाच आहे. त्यामुळे याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण शेतकऱ्यांचे हाल बेहाल आहेत.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने 2008 मध्ये मोठ्या प्रमाणामध्ये प्राथमिक आणि ामाध्यमिक शाळा देण्याचे ठरविले होते. त्यासाठी प्रस्ताव मागविले होते. त्याची अनेक वेळा छाननी झाली परंतु परवानगी दिली नाही. विनापरवानगी अनेक शाळा सुरु झालेल्या आहेत. माझी अशी मागणी आहे की, ज्या शाळांचे इन्फ्रॉस्ट्रक्चर तयार झाले असेल अशा शाळांना ताबडतोब परवानगी देण्यात यावी. कारण अनेक लोकांनी लाखो रुपये खर्च करुन इमारती बांधलेल्या आहेत. परंतु परवानगी अभावी त्या शाळा सुरु करु शकलेले नाहीत. या ठिकाणी एकदा आपण अहवाल मागविला आणि आता पुन्हा फेर तपासणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांना पाठविले आहे. खऱ्या अर्थाने पहिला जो अहवाल आहे त्यावर कोणतीही प्रक्रिया झालेली नाही. येत्या आठ ते दहा दिवसांमध्ये शाळा सुरु होणार आहेत. त्यामुळे येत्या आठ ते दहा दिवसात ज्या ज्या शाळांचे इन्फ्रॉस्ट्रक्चर पूर्ण झाले असेल अशा प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना परवानगी देण्यात यावी अशी मी मागणी करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी महसूल विभागाच्या बाब क्रमांक 52, 53, 54, 55 आणि 56 बाबत बोलणार आहे. राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम यासाठी 31 कोटी 27 लाख 46 हजार रुपये, 3 कोटी 91 लाख 23 हजार रुपये, 1 कोटी 30 लाख 41 हजार रुपये, 4 कोटी 35 लाख 15 हजार रुपये अशा मागण्या यामध्ये करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, लातूर, बुलढाणा आणि नागपूर या पाच-सहा जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अशोक मानकर यांनी या ठिकाणी चांगला प्रश्न उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, पूर्ण महाराष्ट्रात 1927 साली सेटलमेंट सर्व्हे झालेला होता. त्यानंतर सेटलमेंट सर्व्हे झालेला नाही. आता या आधुनिकीकरणामध्ये पाच-सहा जिल्हे घेण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अशोक मानकर यांनी या ठिकाणी सातबाराचे उदाहरण दिले ते बरोबर आहे. एखाद्या शेतकऱ्याची 25 एकर जमीन असेल ती जमीन जेव्हा एन.ए. होऊन जेव्हा भूमी अभिलेख विभागाकडे जाते तेव्हा त्याप्रमाणे भूमी अभिलेख विभाग त्यांची नोंद घेते परंतु सातबारामध्ये त्याची नोंद तशीच राहते. त्या जमिनीचे कमीजास्त पत्रक होत नाही. म्हणून हा आधुनिकीकरणाचा कार्यक्रम केंद्र शासनाने राबविलेला आहे. दोन्हीकडे म्हणजे तलाठ्याकडे त्याचे नाव असते आणि भूमी अभिलेख विभागाकडे कधी नाव असते तर कधी नसते. अशा परिस्थितीमध्ये या कार्यक्रमामध्ये हे जे पाच सहा जिल्हे घेण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे हा कार्यक्रम महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये घ्यावा. प्रत्येक जिल्ह्यामध्ये सेटलमेंट सर्व्हे झाला तर शासनाला रेव्हेन्यू सुध्दा खूप मिळेल. तसेच न्यायालयामध्ये मोठ्या प्रमाणात जे खटले प्रलंबित आहेत आणि दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढत आहे ते खटले सुध्दा यामुळे कमी होणार आहेत.

सभापती महोदय, यानंतर मला नगरविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 101 वरील बाब क्रमांक 91 बाबत बोलावयाचे आहे. केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्यूअल मिशन योजना राबवली. त्याचाच एक भाग म्हणून बीयूएसपी आणि आयएचएसडीपी अशा दोन खूप चांगल्या योजना या महाराष्ट्रामध्ये राबविण्यात आल्या. त्यासाठी 272 कोटी, 90 लाख 33 हजार रुपयांची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

श्री. गोपीकिसन बाजोरिया .....

मागणी करण्यात आली आहे. माझ्याकडे अशी माहिती आहे की, आयएचएसडीपी योजना राबविण्यात आली त्यासाठी ज्या ज्या नगरपालिकेकडून प्रपोजल आले त्यांना केंद्र शासनाकडून पैसे आल्यानंतरसुध्दा पैसे मिळालेले नाहीत. एका नगरपालिकेमध्ये 1 कोटी 2 जाख रुपये आले. त्यापैकी 70 लाख रुपये आयएचएसडीपी म्हणजे एकात्मिक गृहनिर्माण योजनेमध्ये वर्ग केले. उरलेल्या 32 लाख रुपयांपैकी 30 लाख रुपये सर्व्हेयरची फी म्हणून कॉन्ट्रॅक्टरला दिले. त्याबाबत चौकशी करावी. मी नाव सांगण्यात तयार आहे. अकोला महानगरपालिकेमध्ये हे घडलेले आहे. 1 कोटी 2 लाख रुपये आयएचएसडीपीमध्ये वाढविले त्यापैकी 70 लाख रुपये विभागाकडे वळते केले आणि उरलेल्या 32 लाख रुपयांपैकी 30 लाख रुपये सर्व्हेअरची फी म्हणून कॉन्ट्रॅक्टरला दिले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बोजोरिया...

केवळ 2 लाख रुपये एकात्मिक गृहनिर्माण योजनेसाठी ठेवले आहेत. हे एक उदाहरण मी अकोला जिल्हयाचे दिले आहे. इतर जिल्हयांमध्ये सुध्दा अशाप्रकारे रक्कम वळती झालेली नाही. याबाबत मंत्रिमहोदयांनी जातीने लक्ष द्यावे. एकात्मिक गृहनिर्माण ही अत्यंत महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेद्वारे 225 चौ.फू.ची घरे दिली जाणार आहेत. परंतु कंत्राटदारांनी, विकासकांनी 150 चौ.फू.ची जागा असेल तर त्यांना 225 चौ.फू.ची जागा देता येत नाही असे सांगून तो आराखडा प्रलंबित ठेवला आहे. त्यामुळे त्या लोकांना 225 चौ.फू.चे घर देता येत नाही. अशा परिस्थितीत केंद्र सरकारची किंवा राज्य सरकारची जमीन असेल तर या योजनेसाठी तात्काळ जमीन उपलब्ध करुन द्यावी आणि तेथील झोपडपट्टीचे निर्मूलन करावे. त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ही योजना आहे. केवळ 2 झोपडया बांधण्यासाठी, 70 लाख रुपये इतर ठिकाणी वळविण्यासाठी आणि सर्व्हेसाठी 30 लाख रुपये देण्यासाठी ही योजना नाही. या 272 कोटींचे नियोजन प्रत्येक जिल्हयामध्ये, प्रत्येक नगरपालिकेमध्ये चांगल्या प्रकारे झाले पाहिजे. त्या भागामध्ये आलेला निधी प्रत्यक्षात योजनेसाठी दिला जाणार आहे काय हा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे अकोला जिल्हयासाठी एकात्मिक गृहनिर्माण योजनेंतर्गत विशेष बाब म्हणून जमीन खरेदी करण्यासाठी 10 कोटी रुपये द्यावेत. अशाप्रकारे झ ोपडपट्टयांचे क्लस्टर युनिट म्हणून युआयटी, एसएसएमटी या योजनेंतर्गत रस्ते, पाणी या सुविधा पुरविण्यासाठी एखादी योजना राबविली जाणार आहे काय आणि घनकचरा विल्हेवाट यासाठी 272 कोटीमधून तरतूद करणार काय असे मी शासनाला निवेदन करतो आणि येथेच थांबतो.

--------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MAP/

श्री.अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेला आलेल्या पुरवणी मागण्यांवर मी माझे विचार मांडण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या अंतर्गत असलेल्या परिवहन विभागाच्या बाब क्रमांक 36 ते 38 वर मी माझे विचार प्रथम मांडतो. परिवहन विभागाच्या आधुनिकीकरणासाठी तरतूद केलेली आहे. या विभागाच्या अंतर्गत एस.टी.महामंडळ येते. या एस.टी.महामंडळाला सरकारकडून येणे आहे. त्यावेळी करार करण्यात आला होता. त्या कराराची प्रतिपूर्ती करण्यात येईल असे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी सांगितले होते. सरकारने 352 कोटी रुपये एस.टी.महामंडळाला द्यावयाचे आहेत. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांना सवलत, विद्यार्थ्यांना सवलत यासाठी 332 कोटी रुपये द्यावयाचे आहेत, पोलीस वॉरण्ट यासाठी येणारा 40 कोटींचा खर्च, म्हणजे जवळजवळ 700 कोटी रुपये शासनाकडून एस.टी.ला देणे आहे. या पुरवणी मागण्यांमध्ये त्यासाठी नया पैशाची सुध्दा तरतूद केलेली नाही. ही तरतूद करावी अशी या निमित्ताने मी मागणी करतो. एस.टी.महामंडळाच्या कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू होत नाही, तसेच त्यांचा वेतन करारही होत नाही. शासनाकडून येणे असलेली रक्कम एस.टी.महामंडळाला मिळाली तर त्यांचा वेतन करार होईल. कारण आता एस.टी.नफ्यामध्ये आहे. त्यामुळे शासनाने ही रक्कम त्वरित द्यावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 81 अंतर्गत प्राथमिक शाळांमधून पुस्तक पेढया उघडण्यासाठी तरतूद केली आहे त्याचे मी स्वागत करतो. पण यानिमित्ताने मागणी करतो. दुर्दैवाने इंग्रजी माध्यमांच्या शाळा अति वाढत चालल्या आहेत. मुंबईच्या संदर्भात जेव्हा जेव्हा लढा होता, संघर्ष होतो तेव्हा आधुनिक पिढीला, हे लोक कशासाठी संघर्ष करतात, कशासाठी लढा देतात ते समजत नाही. मुंबई लढा देऊन मिळवावी लागली आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा उभारला गेला. म्हणून पुस्तक पेढीच्या निमित्ताने मागणी आहे की, शासनाने केलेल्या तरतुदीमध्ये आणखी भर घालावी. संयुक्त महाराष्ट्राचा इतिहास, त्याचा लढा नव्या पिढीला समजण्यासाठी तरतूद करावी, याचा अंतर्भाव पुस्तकांमध्ये करावा अशी मी मागणी करतो. संपूर्ण राज्यात भाषावार प्रांतरचना झाली, पण मुंबईला संयुक्त महाराष्ट्राची चळवळ करुन मिळवावे लागले. 1960 साली मुंबई झाली व मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला, त्याचा इतिहास नव्या पिढीला समजला पाहिजे अशी मी मागणी करतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियानाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. या अभियानांतर्गत आलेल्या निधीमध्ये आपण फक्त एकच प्रकल्प पूर्ण केलेला आहे. गुजराथ राज्याने तीन प्रकल्प पूर्ण केलेले आहेत. प्रकल्प पूर्ण करण्याच्या संदर्भात केन्द्र सरकारने राज्य सरकारला धमकी दिलेली आहे. तेव्हा हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन काय करणार आहे याचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृ.क्र.127वरील बाब क्रमांक 105 मध्ये मार्ग व पूल यांच्या परिरक्षण व दुरुस्तीकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. मी या सभागृहामध्ये सातत्याने जोगेश्वरी-विक्रोळी पुलाच्या संदर्भात शासनाला सूचना केलेल्या आहेत. मुंबईच्या प्रश्नावरील चर्चेच्या वेळी मी वरळी-बांद्रा या सागरी महामार्गाबाबत बोललो. त्यावेळी ट्राफिक जामचा प्रश्न कसा सोडविणार असा प्रश्न मी विचारला होता. परंतु त्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी त्यावेळी उत्तर दिले नाही. आज ती ट्राफिक जामची परिस्थिती महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातून छापून आलेली आहे. जोगेश्वरी-विक्रोळी पुलाच्या संदर्भात मी अशी सूचना करीत आहे की जोगेश्वरी-विक्राळी रस्त्यावर आपण आयटीआय समोर भुयारी मार्ग किंवा फ्लायओव्हर केला नाही तर तेथील ट्राफिक कुठेही हटणार नाही. रेल्वे पूल तसाच पडून आहे. तो केव्हा पूर्ण करणार ? त्यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या पान क्रमांक 228 वरील बाब क्रमांक 204 मध्ये चितळी डिस्टीलरी लि.च्या कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतनाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही डिस्टिलरी 10 वर्षापासून बंद आहे. तेथील कामगारांना पगार देण्याचे काम हे शासन करीत आहे. माननीय मंत्री महोदयांनी ही शेवटची तरतूद आहे असे सांगितल्यामुळे मी त्यावर जास्त काही बोलत नाही.

सभापती महोदय, नोकर भरतीच्या संदर्भात काढलेला जी.आर. तातडीने दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. 80 टक्के मराठी माणसाच्या भरतीसाठी काढलेल्या जी.आर.ला कोणी मानत नाही. त्या जी.आर.मध्ये सेवा उद्योगाचा देखील अंतर्भाव करावा, तसेच पर्यवेक्षक या शब्दा ऐवजी अधिकारी असा शब्दप्रयोग करावा जेणेकरुन त्यामध्ये महाराष्ट्रातील इंजिनिअर झालेली मुले येऊ शकतील. तेव्हा या सूचनेनुसार अंमलबजावणी करावी अशी मी विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

सभापती महोदय, पर्यावरण आणि ग्लोबल वॉर्मिगच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. मी कोकणाच्या संदर्भात बोलू इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी आम्हाला विकास नको असे सांगितले. मी सांगू इच्छितो की, सबंध देशामध्ये सिंधुदुर्ग हा एकमेव पर्यटन जिल्हा आहे. 600 जिल्हयामध्ये फक्त सिंधुदुर्ग हा एकच जिल्हा केन्द्राने पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. असे असताना तेथील पर्यावरणाचा ऱ्हास होता कामा नये याची शासनाने दक्षता घेण्याची गरज आहे. तेथे खाण उद्योग येत असतील तर त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होईल. तेव्हा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विकास करावा अशी मी शासनाला विनंती करतो.

रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या पान क्रमांक 507 वरील बाब क्रमांक 399 मध्ये नियतव्ययामधून खर्च भागविण्यासाठी तरतूद केलेली आहे. या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने मी शासनाला अशी सूचना करतो की, तुम्हाला जर स्थानिक भूमिपुत्रांना नोकरभरतीमध्ये प्राधान्य द्यावयाचे असेल तर ती नोकरभरती सेवायोजन कार्यालयातूनच करण्याची सक्ती विविध आस्थापनांना करावी. असे केले तरच स्थानिक लोकांना नोकरभरतीच्या बाबतीत काही तरी न्याय मिळू शकेल.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पान क्रमांक 51 3 वरील बाब क्रमांक 402 मध्ये माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील चित्रपट तयार करण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. या निर्णयाचे मी स्वागत करतो. मी आणखी अशी मागणी करतो की आपण महाराष्ट्र राज्याचा 50 वा सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहोत. यानिमित्ताने संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाची फिल्म तयार करावी आणि त्यामध्ये प्रल्हाद केशव अत्रे, कॉ. डांगे, प्रबोधनकार ठाकरे अशा थोर दिग्गज प्रभुतींचा अंतर्भाव असावा अशी मी विनंती करतो.

...नंतर श्री. रोझेकर...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.........

सभापती महोदय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्रमांक 408, पृष्ठ क्रमांक 517 याव्दापरा राज्यातील गड, किल्ले आणि ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थळांची देखभाल करण्यासाठी साधारणपणे 2.33 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. शासनाने केलेल्या या तरतूदीचे मी स्वागत करतो. दुर्देवाने आज अनेक किल्ल्यांवर आपण केलो तर रिकाम्या बिसलरी बाटल्या, दारुच्या बाटल्या पडलेल्या आपणास पहावयास मिळतात. सिंहगडाच्या पायथ्याशी रेव्ह पार्टी होते. उद्याच्या काळात ती गडावर करण्याचे धाडसही होईल. शासनाने किल्ल्यांसाठी तरतूद केली, त्याचे मी अगोदरच स्वागत केले आहे. आवश्यकता वाटली तर ही तरतूद वाढवा, पण किल्ले रक्षणाचे, संवर्धनाचे व जतन करण्याचे काम याहीपेक्षा अधिक जागरुकतेने करा, एवढीच माझी विनंती आहे. दुर्देवाने जंजिरा किल्ल्याला शिवप्रभुंचे पाय लागले नाहीत. पण या किल्ल्याची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. किल्ल्याच्या आतल्या भागात पडझड झाली आहे. आर्किऑलॉजी विभाग नेमके काय काम करतो, माहीत नाही. परंतु, आहे ते जतन करण्यासाठी आवश्यक ती सर्व बंधने शासनाने घातली पाहिजेत आणि या ऐतिहासिक स्थळांचे रक्षण, जतन केले पाहिजे, असे मला वाटते. दिल्लीला ऐतिहासिक स्थळे आहेत, इतरही ठिकाणी आहेत. त्या ठिकाणी ऑर्किऑलॉजी विभागाचा एक फलक असतो आणि एका ओळीत त्या स्थळाचे नांव व विभागाचे नांव लिहिलेले असते. किल्ल्याची ऐतिहासिक माहिती त्या ठिकाणी कोठेही लिहिलेली नसते. त्यामुळे पर्यटकांना कोणीतरी अर्धशिक्षित गाईड आपल्या कुवतीनुसार माहिती देतो. माझी विनंती आहे की, प्रत्येक ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी सुंदर आणि परिपूर्ण माहिती देणारा फलक लावण्याची व्यवस्था राज्य शासनाने करावी.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. सिंधुदुर्ग जिल्हयात शिवाजी महाराजांचे देऊळ आहे. त्याकडे खास करुन लक्ष द्यावे, त्याची डागडुजी करावी, एवढी विनंती करतो. मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आपले आभार मानतो आणि थांबतो. धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

-----------

....2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग, बाब क्रमांक 2, पृष्ठ क्रमांक 7 याव्दारा निवडणूक कर्मचारी वर्गास व मतमोजणी कर्मचारी वर्गास मानधन देण्यासाठी तसेच कर्मचारी वर्गास व मतदारांना अतिरिक्त सोयीसुविधा पुरविण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदय, प्रश्न एवढा गंभीर आहे की, देशात, राज्यात मशिनव्दारा मतदान पध्दती सुरु झाली त्यावेळी आपल्याला बरे वाटले होते. कारण, मतमोजणी पटकन होते. बरेच दिवस मला एक प्रश्न सतावित होता तो आज या माध्यमातून सभागृहासमोर मांडण्याची मला संधी मिळते आहे. मशिनव्दारा मतदान पध्दतीमुळे निवडणुकीत आपण कोणाला मत दिलेले आहे, हे आपल्याला कळत नाही. आता आपल्याला मशिनची कळ दाबावी लागते. पूर्वी आपण मतपत्रिकेवर शिक्का मारित होतो. मतपत्रिकेवर शिक्का मारल्यानंतर मत दिल्याचे मला कळत होते. मात्र, मशिनमुळे नेमके कोणाला मत दिले, हे कळत नाही. आज इलेक्ट्रॉनिक युगात, इलेक्ट्रॉनिक कार्यप्रणालीच्या माध्यमातून, संगणक कार्यप्रणालीचा वापर करुन काय करता येईल, हे आपल्याला सांगता येणार नाही. मतदानाच्या दिवसांमध्ये असे लक्षात येते की, एवढे दिले तर मॅनेज करुन देतो, असे सांगणारेही भेटतात, हे सगळयांना माहीत आहे. मतदानात गडबड होईल का, गडबड झाली का ? असे प्रश्न मला या ठिकाणी उपस्थित करावयाचे नाहीत. परंतु, मतदान करण्याचा मला अधिकार आहे आणि मी मत कोणाला दिले आहे, हेही समजण्याचा मला अधिकार आहे. पूर्वीच्या पध्दतीमध्ये मतपत्रिकेच्या काऊंटर स्लिपवर मतदाराची स्वाक्षरी असायची. ज्यावेळी एखाद्या निवडणुकीसंदर्भात न्यायालयात रिट फाईल होतो त्यावेळी प्रत्येक मतपत्रिका व्हेरिफाय होत होती, चेक होत होती. कित्येक वर्षे हा सगळा दस्तऐवज जतन करुन ठेवला जायचा. मतमोजणी करण्यास त्रास होतो म्हणून ही नवीन पध्दत अवलंबली असली तरी राज्य शासनाने यासंदर्भात निवडणूक आयोगाला कळवावे. कारण, निवडणूक प्रक्रियेसाठी पैसे आपण देत आहोत, जनतेच्या करातील, राज्य शासनाच्या तिजोरीतील हे पैसे आहेत. त्यामुळे मशिनव्दार मतदान पध्दती बंद करावी, अशी माझी मागणी आहे. अमेरिकेत ही मतदान पध्दती बॅन केली गेली आहे. परंतु, जग जे फेकून देते ते

....3.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

आपण घेतो, असा इतिहास आहे. औषधांच्या बाबतीतील उदाहरण आपण पहा. जी औषधे अमेरिकेने बॅन केलेली आहेत, ती आपण घेतो. अमेरिकेसारख्या प्रगत लोकशाही देशाने फेकून दिलेली मतदान पध्दती आपण का स्वीकारायची ? हा खरा प्रश्न आहे. मी सदनात ज्या भावना मांडल्या आहेत, त्या कदाचित तुमच्या सगळयांच्या नसतील. पण नागरिकाला, मत कोणाला दिले आहे, हे समजण्याचा अधिकार आहे, तो नवीन पध्दतीनुसार प्राप्त होत नाही, अशा माझ्या भावना आहेत आणि त्या भावना मी या माध्यमातून सभागृहासमोर मांडल्या आहेत.

सभापती महोदय, राज्य मराठी विकास संस्था....मराठी भाषेसाठी काय काय सांगायचे, असा प्रश्न आता मला पडला आहे. कारण, या विषयाचा आता कंटाळा आला आहे. किती वाद घालायचा ? हे राज्य मराठीचे आहे का ? बाहेर आम्हाला प्रश्न विचारले जातात.

यानंतर श्री.गिते.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

एक गोष्ट लक्षात घ्या की, तुमच्या खासदारांनी लोकसभेत हिंदी भाषेत शपथ घेतली. मी त्या दिवशी बोललो नाही. आम्हाला तुम्ही कशाला हिणवता ? माननीय शिवसेना प्रमुखांनी आम्हाला भाषण संपविताना "जय हिंद" व नंतर "जय महाराष्ट्र" असे बोलावे अशा सूचना दिल्या आहेत. आम्ही भाषण संपविताना प्रथम "जय हिंद "व नंतर "जय महाराष्ट्र" असे बोलतो आणि मग भाषण संपवितो. प्रथम देश आणि मग राज्य याला आम्ही प्राधान्य देतो. महाराष्ट्रातून जाणारा खासदार लोकसभेत हिंदीतून शपथ घेत असेल, टिंगल, टवाळी करुन माझ्या मराठीची मस्ती जिरविण्यासाठी हिंदी भाषेचा वापर करणार असाल तर ती गोष्ट तुमच्यासाठी दुर्देवाची आहे. माननीय शिवसेना प्रमुख देखील प्रथम "जय हिंद" व नंतर "जय महाराष्ट्र" असे बोलतात, त्यानंतर भाषण संपवितात. जाहिरातीसाठी इंग्रजीचा वापर करु नये अशा प्रकारच्या सूचना चार दिवसापूर्वी शासनातर्फे देण्यात आल्या आहेत. जाहिरातीसाठी इंग्रजी भाषेचा वापर करतील त्यांचे विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल असे सांगितले. मराठी भाषेची अंमलबजावणी काळजीपूर्वक करु असेही सांगितले. यासंदर्भात शासनाकडून ज्या दिवशी सूचना दिल्या गेल्या, त्याच्या दुस-याच दिवशी "महाराष्ट्र प्रतिष्ठान शिक्षण परिषद, मुंबई यांची "मुंबई सकाळ" या वृत्तपत्रात इंग्रजी भाषेतून जाहिरात आलेली आहे. जाहिरातीच्या बाबतीत आदेश काढले आहे. सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, (विस्तार भवन), मुंबई यांनी दिनांक 7 एप्रिल, 2008 रोजी आमच्या आग्रहाखातर आदेश काढले आहेत. शासनाच्या आदेशांची माझ्याकडे मोठी फाईलच तयार झालेली आहे. यासंदर्भात शासनाशी रोज रोज पत्र व्यवहार करुन मी कंटाळलो आहे. मराठी भाषेसाठी झगडण्याचे आमचे रोजचे काम आहे. शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे असा त्या आदेशातील विषय आहे. त्यांनी सर्व विद्यापीठांना, कृषी विद्यापीठाना कळविले आहे. शासनाच्या अभ्यासक्रम प्रवेश सूचना, जाहिराती, परीक्षा अर्ज, वेळापत्रके, नियम सूचना, पात्रता प्रमाणपत्रे, गुणपत्रिका, अभ्यासक्रम पूर्तता प्रमाणपत्रे, भरती व निविदा जाहिराती, विधी कागदपत्रे, अहवाल, धनादेश, पत्रके, सूचना फलक, विविध प्रकाशने इत्यादी बाबी मराठीतून होण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी असे आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. अशा प्रकारचे आदेश असताना, त्या आदेशाला धुडकावून लावून सातत्याने मराठी वृत्तपत्रात जाणीवपूर्वक इंग्रजी भाषेतून जाहिरात दिली जाते यासंदर्भात संबंधितांविरुध्द काय ॲक्शन घेणार आहात याचा मला खुलासा हवा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

असे सांगितले आहे की, मराठी भाषेचा वापर राजकारणासाठी करु नये. आपल्या महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे. महाराष्ट्रातील कारभार हा मराठीतूनच झाला पाहिजे. मराठी भाषिकांचे हे राज्य आहे. जर कोणी मराठी भाषेला मानत नसेल तर आम्हाला राजकारण करावे लागेल. कारण त्याच माध्यमातून आम्हाला विधिमंडळात यावे लागते. मी याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, वृत्तपत्रात जाहिरात देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या स्पष्ट सूचना आहेत. शासनाच्या निदर्शनास असे आले आहे की, मराठी वृत्तपत्रांना दिल्या जाणा-या शासकीय, अर्ध शासकीय व महामंडळाच्या जाहिराती अजूनही इंग्रजी भाषेत दिल्या जातात. राजभाषा वर्षामध्ये असे घडावे हे निश्चितच खटकणारे आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षात हे घडते आहे. तेव्हा हे टाळणे अत्यावश्यक असल्याने शासनाच्या सर्व कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येत आहे की... सभापती महोदय, हा सूचना काढणारा विनंती करतो आहे. विनंती करणारा कोण दळभद्री अधिकारी आहे ? तो विभागांना विनंती करतो आहे. माझ्याकडे सदर आदेशासंबंधीची कागदपत्रे आहेत, ती मी माननीय मंत्री महोदयांना सादर करणार आहे. सदर आदेश दिनांक 13 सप्टेंबर, 1979 रोजी काढलेला आहे. आदेश काढणारे अधिकारी निवृत्त झाले असतील. त्यांची मुले इंग्रजी भाषेत शिकत असतील. मराठी भाषिक पत्रात द्यावयाच्या सर्व जाहिराती मराठी भाषेतूनच द्याव्यात असे स्पष्ट आदेश शासनाकडन देण्यात आले आहेत. हा आदेश नवीन नाही. हा तर अतिशय जुना आदेश आहे. शासकीय जाहिराती देण्यासंबंधीचा पुढचा आदेश जास्त महत्वाचा आहे. खरे तर मराठी भाषेचा शासन जाहिरातीत वापर होत नाही यासाठी भाषा संचालनालयाचे जे अधिकारी आहेत त्यांना दोषी धरले पाहिजे आणि त्यांच्या विरुध्द कारवाई केली पाहिजे. भाषा संचालनालयाकडे इंग्रजी भाषेत जाहिराती येतात, त्या जाहिराती या संचालनालयाने मराठीत करुन नंतर त्या प्रसिध्दीला द्यावयाच्या असे शासनाचे आदेश आहेत. यासंदर्भात आपणाला जर कोणावर कारवाई करावयाची असेल तर उद्याच्या उद्या भाषा संचालनालयातील अधिका-यांवर केली पाहिजे. यासंदर्भात शासनाचे स्पष्ट आदेश आहेत की, वृत्तपत्रात जाहिराती कशा व कोणत्या भाषेत द्यावयाच्या असा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता....

यानंतर श्री. भोगले...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ SBT/ MAP/ 18:55

श्री.दिवाकर रावते.......

शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र.1079/28, दिनांक 5 नोव्हेंबर, 1979 चे आहे. यामध्ये म्हटले आहे की, मराठी वृत्तपत्रांना द्यावयाच्या शासकीय जाहिराती मराठी भाषेतच देण्यात याव्यात. असे असताना शासनाच्या निरनिराळ्या कार्यालयातून दिल्या जाणाऱ्या जाहिराती बऱ्याच वेळेला इंग्रजीतून दिल्या जातात व संबंधित वृत्तपत्रांना त्यांच्या भाषेत भाषांतर करुन छापण्याची सूचना दिली जाते. काही जाहिराती कायद्याच्या तरतुदीनुसार द्यावयाच्या नोटीसीबाबत (भूसंपादन अधिनियम) असतात अशा नोटीसा......सभापती महोदय, या ठिकाणी मराठीत सांगण्यासाठी नोटीस हा इंग्रजी शब्द वापरला आहे.....अशा नोटीसांचे प्रमाणित नमुने मराठीत किंवा हिंदीत अजूनपर्यंत तयार करुन न घेतल्यामुळे जाहिराती इंग्रजीतून दिल्या जातात. तेव्हा जाहिराती देण्याबाबत एकसूत्र नसल्यामुळे पुष्कळ गोंधळ होतो. मागील अधिवेशनात.....म्हणजे 1979 सालच्या अधिवेशनाचा उल्लेख आहे. मागील अधिवेशनात या प्रश्नावर झालेल्या चर्चेत ज्या विभागांनी मराठी किंवा हिंदी वृत्तपत्रांना इंग्रजी जाहिराती दिल्या त्यांची नावे देऊन त्यांच्या या कृत्यावर जोरदार आक्षेप घेतला होता. त्याबद्दल शासनाने सर्वंकष विचार करुन पुढील मार्गदर्शक तत्वे ठरविली असून सर्व शासकीय कार्यालयांनी ती पाळावीत अशी शासनाची अपेक्षा आहे. जाहिराती इंग्रजी सोडून इतर भाषिक वृत्तपत्रात द्यावयाच्या असतील तर मराठी वृत्तपत्रात मराठी व इतर वृत्तपत्रात हिंदीतून देण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत त्या इंग्रजीत देऊन त्यांचे भाषांतर संबंधित भाषेत करण्यास सांगितले जाऊ नये. ज्या जाहिराती कायद्याच्या तरतुदीबाबत (नोटीस/अधिसूचना) द्यावयाच्या असतात त्यांचे नमुने मराठीत प्रथम तयार करुन भाषा संचालनालयाकडे तपासणीकरिता पाठवावेत. भाषा संचालनालयात विधीविषयक सल्लागार समिती आहे. त्या समितीद्वारे कायदेशीर, योग्य मराठी भाषांतर तयार करुन त्या त्या कार्यालयाकडे पाठविली जातात व अशा मान्य केलेल्या नमुन्यांप्रमाणे मराठी किंवा हिंदी वृत्तपत्रात जाहिराती दिल्या जाव्यात. माहिती व जनसंपर्क संचालनालय सूचना देईल. यापुढे मराठी किंवा हिंदी वृत्तपत्रात द्यावयाच्या जाहिराती इंग्रजीतून आल्यास त्या छापण्याकरिता स्वीकारल्या जाऊ नयेत व त्या संबंधित कार्यालयास परत पाठविण्यात याव्यात. एवढे स्पष्ट निर्देश आहेत. शासन पत्र क्र.संकिर्ण 1079/3452/28, दिनांक 5 मार्च, 1979 च्या आदेशाची अंमलबजावणी अद्याप होत नाही. म्हणून शासकीय कर्मचाऱ्यांनी मराठी भाषेचा वापर करण्याबाबत मी परवा विषय मांडला. मला सातत्याने हे सांगावे लागते. परंतु याची

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

अंमलबजावणी का होत नाही हे मला कळत नाही. सातत्याने सांगूनही ऐकणार नसतील तर त्या अधिकाऱ्यांना तुम्ही अद्याप जाब का विचारत नाही, त्यांना शासन का केले जात नाही? हे मोठे दुर्दैव आहे. टी.व्ही.वर आम्ही रोज बातम्या बघतो. त्या बातम्यांमध्ये अजूनही अधिकाऱ्यांची नावे इंग्रजी भाषेत दाखविली जातात. डी.वाय.पाटील वगैरे... तुम्हाला स्पष्ट आदेश आहेत. परंतु त्यांनी नावे कशी लिहावीत? ते का असे लिहित नाहीत? अजूनही आमच्या अनेक शासकीय कार्यालयात हजेरीपटावर इंग्रजीत सही केली जाते. मराठी माणसे इंग्रजीत सह्या करतात. तो प्रश्न मी का विचारावा? ते म्हणतात, आमची सही आहे. परदेशातील माणसे आपल्या भाषेत सही करतात. चीनमधील माणूस त्यांच्या भाषेत सही करतो. मुस्लिम माणूस उर्दू भाषेत सही करतो, तो इंग्रजी भाषेत सही करीत नाही. आपल्या घरी कोणी इंग्रज माणूस येत नाही तरी देखील मराठी माणूस आपल्या नावाची पाटी इंग्रजी भाषेत लिहितो. ती सुंदर इंग्रजी भाषेत लिहिलेली असते. त्याच्यात तो समाधान मानतो. इथेच आमचे मराठीकरण मरते अशी परिस्थिती आहे. मराठी माणसांनी घराघरातून मराठी उतरविली त्याला काय करणार? परंतु शासनाला याची अंमलबजावणी का करता येत नाही?

4एल.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

अनेक मंत्री आता मराठीतून सह्या करीत असतील तर बरे होईल. म्हणून मराठी भाषेची अगदी जाणीवपूर्वक आणि अतिरेकी अंमलबजावणी केली नाही तर मला वाटत नाही की, यात सुधारणा होईल. फार कौतुक करावे असे म्हणणार नाही, कोणाला आपल्या मुलांना कॉन्व्हेंटमध्ये टाकायचे असेल तर टाकू द्या निदान त्यांना आईवडिलांनी घरातच मराठी व मराठी संस्कृतीची ओळख करुन द्यावी असे तळमळीने सांगतो. त्याचबरोबर विधानमंडळाच्या इतिहासामध्ये सुध्दा असा प्रकार कधी घडला नाही तो आता घडला आहे. तो म्हणजे पूरक मागण्यांचे जे जोडपत्र जोडलेले आहे ते म्हणजे कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्या आमदारांच्या व खासदारांच्या मतदारसंघातील गल्ली-बोळातील रस्त्यांबाबत 50 हजार पासून ते 1 लाख आणि 1.50 लाखापर्यंत छोटे मोठे रस्ते बनविण्यासाठी तसेच जलसंधारणाची कामे करण्यासाठी मागणी केली आहे. हे निवडणुकांची तयारी करण्यासाठी मान्य करुन घ्यावे असे शासनाला वाटत असेल. कारण कॉंग्रेस आणि राष्ट्रवादीच्या मंत्र्यांना वाटत असावे की, निवडून येण्यासाठी आपण पुरवणी मागण्या मंजूर करुन घेऊ आणि ती मागणी मान्य करण्यासाठी सभागृहासमोर आलात. अशा प्रकारे जवळपास 8 हजार कामांच्या मागण्यांना सरकार आज मान्यता मागणार आहे. हे झाल्यानंतर हे लोक नारळं फोडत सुटणार आणि निवडणुकीचा प्रचार करणार. तसेच कोट्यवधीच्या जलसंधारणाच्यामागण्याही दाखविल्या आहेत अशा प्रकारे बिनबोभाट मागण्या सादर करुन सभागृहाच्या मान्यतेसाठी शासनाने हया पुरवणी मागण्या आणल्या आहेत. एवढे बोलून माझे भाषण संपवितो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

-----

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/

**पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी**

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहात पुरवणी मागण्यांवर चर्चा चालू आहे. तरी देखील मी आपल्या परवानगीने शासनाच्या निदर्शनास एक महत्वाची बाब आणून देऊ इच्छितो. ती बाब म्हणजे मोखाडा, जि.ठाणे येथील ग्रामीण रुग्णालय येथील रुग्णांचे जेवण गेल्या 16 दिवसांपासून बंद आहे. 16 दिवस या आदिवासी, गरीब व कुपोषित बालकांना जेवण मिळत नाही. उद्या सुट्टीचा दिवस आहे आणि परवा सोमवार आहे. यासंदर्भात गटविकास अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. हे जेवण पुरविणारा कंत्राटदार हा गरीब आदिवासी कातकरी समाजाचा असल्यामुळे या रुग्णांना तो जेवण घालू शकत नाही, कारण त्याच्याच घरात खाण्यासाठी काही नाही त्यामुळे तो रुग्णांना जेवण देऊच शकणार नाही. तेथील खासदारांनी गेल्याच आठवड्यात बैठक घेतली आणि सांगितले की, आठ दिवसात रुग्णांची जेवणाची व्यवस्था करतो. माझी या निमित्ताने सामाजिक न्याय विभागाच्या मंत्र्यांना विनंती आहे की, हा कळकळीचा प्रश्न असल्याने, आदिवासी रुग्णांचा प्रश्न असल्याने तसेच कंत्राटदार देखील कातकरी समाजाचा आहे म्हणून त्याचे दीड वर्षांपासून जे 11 लाखाचे बिल शासनाकडे थकलेले आहे ते ताबडतोब देण्यात यावे व रुग्णांची जेवणाची व्यवस्था पुन्हा सुरु करावी.

श्री. गणेश नाईक ( उत्पादन शुल्क तथा पालक मंत्री) : सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने नोंद घेण्यात आली असून ताबडतोब यासंबंधीची कार्यवाही करण्यात येईल.

-----

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2009-2010 च्या पूरक विवरण पत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

श्री. हसन मुश्रीफ (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नगरविकास खात्याच्या अंर्तत सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी जेएनयुआरएम आणि इतर विषयाच्या संदर्भात आम्ही कोणता एमओयु केलेला आहे याची माहिती मागवलेली आहे त्यासंदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्दितो की, सोमवार दिनांक 15 जून, 2009 रोजी बिलाच्या वेळेस यासंदर्भातील संपूर्ण माहिती दिली जाईल.

एफएसआय आणि टीडीआरचा विचार करतांना तसेच पार्किंगची व्यवस्था पुरेशी नसतांना एफअएसआय आणि टीडीआर दिला जातो यासंदर्भात देखील सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विचारणा केलेली आहे. त्यामुळे पुढील काळात पार्किंगसाठी एफएसआय आणि टीडीआर देतांना निश्चितपणे विचार करुनच दिला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी कणकवली नगरपंचायतीस निधी देणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत मत मांडलेले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खांन यांनी परभणी येथील दुकान गाळयाच्या संदर्भात विचारणा केली असून त्यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी निश्चितपणे केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी औषधांवरील ऑक्ट्राय माफ करण्याच्या संदर्भात सूचना केलेली आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, औषधावरील ऑक्ट्राय माफ करण्याच्या संदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरीया यांनी आयएसडीपी अंतर्गत पैसे येऊन सुध्दा सर्व्हेअरला 30 लक्ष रुपये फी दिल्याची माहिती दिलेली आहे त्यामुळे यासंदर्भात निश्चितपणे चौकशी केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी जेएनएनयुआरएम विचारणा केलेली आहे यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, या योजनेमध्ये आम्ही मध्ये एकच प्रकल्प पूर्ण केलेला आहे बाकीचे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचा आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी चर्चगेट येथे पुतळयाचे बांधकाम पाडलेले आहे अशी तक्रार केलेली आहे त्यामुळे ही बाब तपासून योग्य ती उचित कारवाई करण्यात येईल.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ....

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी जेजूरी आळंदी येथे तीर्थक्षेत्राचा विकास करण्याबाबत प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी केलेली आहे. जेजुरी आणि आळंदी येथील तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासंदर्भात प्राधिकरण स्थापन करण्याचा शासन विचार करीत आहे एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्दिछतो. नगरविकास, अल्पसंख्यांक आणि विधी व न्याय खात्याच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

---------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक 1, 2, 4, 5, 6, 7, 89, 10, 11, 12, 14, 15, 16, 17, 18,19 व 20 यांना मान्यता मिळावी यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारणीचा उल्लेख करणे गरजेचे आहे असे मला वाटते. 300 कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद या स्मारकासाठी करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याच अनुषंगाने येथे काही मागणी करण्यात आलेली आहे. त्यासाठी साधारण 49 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या मागण्यांवर चर्चा करीत असतांना सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी ईव्हीएम मशीनच्या बाबतीत सूचना मांडलेली आहे की, मतदान करतांना ईव्हीएमचे बटन दाबल्यानंतर आपण मतदान कोठे केले हे कळत नाही यासंदर्भात विचारणा केलेली आहे. त्याच बरोबर उद्योग खात्याच्या मागण्या बाब क्रमांक 177,196,197,198,199,200,201,202,203,204,205,206,208 आणि 209 या देखील मान्य कराव्यात अशी मला आवर्जून विनंती करावयाची आहे. या मागण्यांमध्ये सामूहिक प्रोत्साहन योजनेसाठी 250 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यावर्षी सुरुवातीलाच 400 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती व आता 250 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीमुळे उद्योगांना फायदा होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सुपरवायजर ही जी व्याख्या आहे त्याऐवजी ऑफिसर असा बदल करण्याच्या संदर्भात चांगली सूचना केलेली आहे. तसेच त्यांनी सर्व्हीस इंडस्ट्रीजचा उल्लेख केलेला आहे . त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी काही सूचना केलेली आहे त्या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 19.10

श्री.राणा जगजितसिंह पाटील ..

सभापती महोदय, महसूल विभागाच्या पूरक मागण्यांवर सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकीरण कार्यक्रमाच्या बाबतीत या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी आवर्जून उल्लेख केला आहे.नॅशनल लॅन्ड रेकॉर्ड मॉर्डनायझेशन प्रोग्राम त्याचबरोबर नॅशनल लॅन्ड रिसोर्स मॅनेजमेन्ट प्रोग्राम या दोन्हीच्या माध्यमातून पायलट बेसिसवर पुणे,सिंधुदूर्ग,नाशिक,लातूर, बुलढाणा आणि नागपूर या सहा जिल्हयांचा समावेश करण्यात आला आहे. हे काम अधिक गतीने करण्याचे शासनाने ठरविले आहे. तसेच पुढच्या टप्यामध्ये संपूर्ण राज्यातील जिल्हयांचा समावेश करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम संपूर्ण देशव्यापी असून या कार्यक्रमासाठी निश्चितपणे गती मिळेल अशी माझी अपेक्षा आहे. महसूल विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूरक मागण्यांच्या सदर्भात ज्या सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडले आहेत त्याला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी भटक्या विमुक्ताच्या वाडया वस्त्याला जोड रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा असा महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.त्या बाबत ती त्यांना सांगू इच्छितो की, 1981 ते 2001 या रस्ते विकास कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार 100 हून अधिक लोकसंख्या असलेल्या वस्ती व वाडयांना एक तरी बारमाही रस्ता असणे आवश्यक असून त्या दृष्टीने शासनाची कार्यवाही सुरु आहे. त्याकरिता 202 कोटी रुपयांचा निधी रस्त्याच्या देखभाल आणि दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पात देण्यात आला आहे. त्यातून सर्व ग्रामीण मार्ग, जिल्हा मार्ग, राज्य मार्ग इत्यादीच्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासन निधी देणार आहे.सर्वच सन्माननीय सदस्यांना याची माहिती आहे की` गावातील जे लहान रस्ते आहेत त्यांची कामे डीपीडीसीमध्ये घेण्यात आली आहेत. त्याकरिता डीपीडीसीची तरतूद वाढवून दिलेली आहे. त्यामुळे लहान रस्त्याची कामे राहिली असतील तर सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याच स्तरावर डीपीडीसीमध्ये पाठपुरावा करावा.

श्री.प्रकाश शेंडगे : त्या ठिकाणी या रस्त्याच्या कामाचा विचार होत नाही.

डॉ.सुनील देशमुख :डीपीडीसीमध्ये आपण पाठपुरावा करावा. त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांशी मी नंतर बोलेन.

सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब या ठिकाणी उपस्थित नाहीत त्याचबरोबर सन्माननीय सदस्या डॉ नीलम गो-हे देखील उपस्थित नाहीत.

श्री.अरविंद सावंत : ते जरी उपस्थित नसले तरी त्यांनी मांडलेल्या मुद्याची उत्तरे आम्हाला ऐकावयाची आहेत.

डॉ.सुनील देशमुख :सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.अनिल परब यांनी राज्यातील शासकीय इमारतीच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी केलेल्या अतिरिक्त तरतुदीबाबत प्रश्नउपस्थित केला होता त्याबाबत मी सांगू इच्छितो की, राज्यातील शासकीय कार्यालयांचे जोते क्षेत्रफळ जवळजवळ 94 लाख चौरस मिटर असून निवासी इमारतीचे जोते क्षेत्रफळ 74 लाख चौरस मिटर

3..



VTG/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे या इमारतीच्या दुरुस्ती आणि देखभालीकरिता 2005-2006 सालापर्यंत आवश्यकतेपेक्षा 50 टक्के रक्कम कमी मिळाली होती त्यामुळे 2007-2008 मध्ये आवश्यक रक्कम 600कोटी रुपयांची होती त्यापैकी 372 कोटी रुपये मिळाले होते .2008-2009 मध्ये 615 कोटी रुपयापैकी 566 कोटी रुपये मिळाले होते आणि 2009-2010 साली 683 कोटी रुपयापैकी फक्त 283 कोटी रुपये मिळाले आहेत.राहिलेली जी 300 कोटी रुपयांची तरतूद होती ती अतिरिक्त तरतूद या वर्षी केलेली आहे.राज्यातील इमारतीच्या बांधकामाची किंमत जवळजवळ 15 हजार कोटी रुपयांची आहे. ही आपली असेटस आहे. त्याच्या दुरुस्तीसाठी 600 कोटी रुपयांचा निधी आवश्यक असतो. त्यामुळे यावर्षी जास्त तरतूद करण्यात आली होती आणि मधल्या काळात ज्या इमारती जास्त खराब झाल्या होत्या त्यांच्या दुरुस्तीसाठी पुरेशी रक्कम देऊन दुरुस्तीचा मोठा महत्वाकांक्षी कार्यक्रम शासनाने आखला असून त्याकरता ही तरतूद करण्यात आलेली आहे

सभापती महोदय ,सन्माननीय सदस्य श्री राजन तेली यांनी सोनुरे घाटाच्या रस्त्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या रस्त्याला लागणा-या जमिनीचे भूसंपादनाचे काम मंजूर करण्यात आलेले आहे त्या ठिकाणी वन जमिनीचा प्रश्न येत नाही. या रस्त्याची लांबी मंजूर असून निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रमानुसार या रस्त्याचे काम हाती घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सभापती महोदय,सागरी महामार्गाच्या बांधकामा बाबत या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला होता. मी सन्माननीय सदस्याना माहीत आहे की, 750 किलोमिटर्स पैकी 696 किलोमिटरर्सचे काम पूर्ण झाले असून 54 किलोमिटर्सचे काम शिल्लक आहे. 45 पैकी 36 मोठया पुलाची कामे पूर्ण झालेली आहेत आणि 9 पुलांची कामे सुरु आहेत.

श्री.राजन तेली : अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई करणार आहात

डॉ.सुनील देशमुख :एस.ई. श्री.खोब्रागडे यांच्या गैरव्यवहारासबंधी आपण तक्रार केली होती त्यासबंधीची कागदपत्रे विभागाला आपण देणार आहात तेव्हा ही कागदपत्रे तपासून त्यावर आवश्यकता वाटल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल त्याचबरोबर आपण जे पुरावे द्याल ते पुरावे जर योग्य आढळून आले तर दक्षता पथकाचे जे सीई आहेत त्यांच्या मार्फत एक महिन्याच्या आत योग्य ती कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी प्रत्येक जिल्हयात एक मॉडेल विश्राम गृह तयार करुन अद्ययावत विश्रामगृहे बांधावीत अशी सूचना

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माडलेली आहेत. ते या ठिकाणी उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी काही मुद्दे मांडले होते परंतु त्याही आता याठिकाणी उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्य श्री सुभाष चव्हाण यांनी वित्त विभागाच्या पूरक मागण्यांवर बोलत असतांना आमदार व खासदार निधीचे वितरण करण्यासंबंधीचे निकष ठरवावेत आणि जास्तीत जास्त निधी वापरण्यास मिळावा असा मुद्दा मांडला होता . यानिधीचे निकष आपण अगोदरच निश्चित केलेले आहे.

नंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ पूर्वी श्री.गायकवाड . . . . 19:15

डॉ.सुनील देशमुख . . . .

निधीचे वाटप दर तीन महिन्यांनी करतो आणि या तीन महिन्याच्या निधीचे वाटप एप्रिल 2009 मध्ये केलेले आहे. मी सन्माननीय सदस्यांना अशी विनंती करतो की, त्यांनी वित्त विभागाच्या बाब क्र.98 ते 100, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.101 ते 152, नियोजन विभागाच्या 243 ते 265 तसेच सन्माननीय माननीय उप मुख्यमंत्रीच्या विशेष सहाय्य विभागाची एक मागणी आहे. या सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी मी सदनाला विनंती करतो.

----

. . . .4 ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी रेशीम शेतकऱ्यांचे मेळावे घ्यावेत अशी मागणी केली. परंतु जिल्हयासाठी मुळातच 50 हजार रुपयांची तरतूद आहे. त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी सांगिते की, लोकरीच्या उद्योगाची वाढ व्हावयास पाहिजे. ही सूचना निश्चित चांगली असल्याने, आम्ही याबाबतीत विचार करु.म्हणून मी सभागृहाला अशी विनंती करतो की,सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभागाच्या बाब क्र.337 ते 345 वरील 38110.49 लाख, त्याचप्रमाणे वस्त्रोद्योग विभागाच्या बाब क्र.336 ते 342 वरील पुरवणी मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

----

. . . .4 ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सतीश पाटील (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, माझ्या विभागाच्या म्हणजे परिवहन, जलसंधारण व विमुक्त व भटक्या जमाती यासंदर्भात चर्चा झाली असून परिवहन विभागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकरसाहेब आणि सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी आपले विचार व्यक्त केले.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकरसाहेबांनी बाब क्र.47 वर बोलताना "वैभववाडी ते कोल्हापूर" हा रल्वेमार्ग होण्याच्या बाबतीत मागणी केली. तसेच कोकण रेल्वेचे दुहेरीकरण आणि "वैभववाडी ते कोल्हापूर" रेल्वे मार्ग या संदर्भात सर्व्हे झालेला आहे आणि याबाबतीत माननीय मुख्यमंत्री महोदयांशी लवकरच चर्चा करुन याबाबतचा प्रस्ताव माननीय केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे पाठविण्याच्या बाबतीत कार्यवाही करणार आहोत.

सभापती महोदय, यावर्षी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण होत आहेत म्हणून स्पेशल पॅकेज अंतर्गत वर्धा-नांदेड व्हाया यवतमाळ-पुसद हा रेल्वे मार्ग, तसेच मनमाड-इंदौर व्हाया मालेगाव-धुळे-शिरपूर हा रेल्वे मार्ग, तसेच अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ हा 261 कि.मी.चा रेल्वे मार्ग, तसेच वडसा-देसाईगंज-गडचिरोली हा रेल्वे मार्ग इ.साठी आपण 196 कोटी रुपये इतका खर्च प्रस्तावित केलेला आहे आणि त्यासंदर्भातील ही मागणी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंतसाहेबांनी एस.टी.महामंडळाच्या संदर्भात बोलताना सांगितले की, राज्य शासनाने एस.टी.महामंडळाला काही देणे शिल्लक आहे. जवळपास 700 ते 750 रुपये राज्य शासनाकडे आहेत. यासंदर्भात राज्य शासन आणि एस.टी.महामंडळ यांच्यामध्ये समन्वय साधण्याचे काम सुरु आहे आणि राज्य शासनाने देखील यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सभापती महोदय, गृह विभागाकडे वॉरंटच्या संबंधात जो काही पैसा आहे, तो गृह विभागाने देण्याची घोषणा केलेली आहे, त्याप्रमाणे लवकरच ते काम होईल. एस.टी.कामगारांचा 2008-2009 चा जो करार आहे, तो देखील लवकर होण्याच्यादृष्टीने आपली कार्यवाही सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी जलसंधारण विभागाच्या बाबतीत बोलताना सांगितले की, कोकणातील लघु पाटबंधारे योजनांचे मापदंड सुधारण्याबाबत सूचना केली आहे. त्या बाबतचा प्रस्ताव देखील आपण जलसंपदा विभागाकडे पाठविलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.प्रकश शेंडगे साहेबांनी बाब क्र.242 बाबत विमुक्त व भटक्या ......

. . . .4 ओ-4





डॉ.सतीश पाटील . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

जमातीच्या संदर्भात सूचना केलेली आहे. भटक्या विमुक्त जमातीसाठी वेगळा खर्च केला जात नाही. त्यासाठी वेगळी तरतूद करावयास पाहिजे. त्यासंदर्भातील तरतूद देखील पुरवणी मागण्यांमध्ये केली आहे. त्यामुळे माझी सदनाला विनंती आहे की, परिवहन विभागाच्या बाब क्र. 37,38,50,135,39 व 47 याला मंजूरी द्यावी.

तसेल जलसंधारण विभागाच्या 234,217,223,228 आणि 230 त्याचप्रमाणे विमुक्त जाती भटक्या जमातीच्या मागण्या आहेत म्हणजे बाब क्र.233,235237,239 व 242 याला मंजूरी द्यावी अशी विनंती करतो.

यानंतर कु.थोरात . . ..

अस्थारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रितमकुकार शेगांवकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाची बाब क्रमांक 286 सभागृहाने मंजूर करावी अशी मी आपल्यामार्फत विनंती करतो. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी जी बाब तपासण्यासा सांगितली आहे. त्याबाबतीत विचार करण्यात येईल्.

सभापती महोदय, बंदरे विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, खार भूमी विभागाची बाब क्रमांक 153 व बाब क्रमांक 162 या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/

श्री. सुरेश वरपुडकर ( कृषी राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभाग, रोजगार व स्वंयरोजगार विभाग, कृषी विभाग, माजी सैनिक कल्याण याच्या पुरक मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी चर्चा उपस्थित केलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे आता सभागृहात नाहीत परंतु राज्यात वेगवेगळया संस्थांची संमेलने होतात, त्यामुळे दोन-दोन संमेलने होतात या संदर्भात त्यांनी चर्चा उपस्थित केलेली होती. सभापती महोदय, राज्यात पुष्कळशा साहित्यिक संस्था आहेत परंतु मराठी साहित्य परिषद ही एकच प्रमुख संस्था आहे आणि ती ऑल इंडिया लेव्हलवर असल्यामुळे या संस्थेवर राज्य शासनाचे कुठल्याही प्रकारचे बंधन नाही. फक्त अनुदानाच्या संदर्भात राज्य शासनामार्फत तरतूद करण्यात येते. त्यांनी दोन संमेलने घ्यायची कां एक संमेलन घ्यायचे हा त्यांचा प्रश्न आहे आणि त्यांनी तो समेटाने सोडविण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी राज्यातील नवीन सांस्कृतिक धोरणा विषयीचा महत्वाचा मुद्दा मांडला आहे. निश्चित असे सांस्कृतिक धोरण आपल्या राज्याचे असले पाहिजे यादृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने नवीन सांस्कृतिक धोरण अवलंबिले आहे.शासनाने सर्व कलाकारांना मग ते वेगवेगळया चित्रपटातील कलाकार असोत, नाटककार असोत, साहित्य क्षेत्रातील असोत वा लेखक असोत तसेच ग्रामीण भागातील ज्या विविध कला आहेत त्यासंदर्भातील सर्व कलाकाराना एकत्र बोलावून त्यांची एक कार्यशाळा घेण्यात आली. त्यावेळी त्यांच्याकडून सूचना मागविण्यात आल्या. त्याप्रमाणे त्यांच्याकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्या सूचनांची स्क्रुटिनी करण्याचे काम चालू आहे. ही स्कृटिनी झाल्यानंतर त्याबाबतीत सन्माननीय आमदारांचा सल्ला घेतला जाईल.

सभापती महोदय, कलाकारांना देण्यात येणाऱ्या मानधनाच्या बाबतीत या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आला. राज्यस्तरावरील कलाकारांना 600 रुपये, राष्ट्रीय स्तरावरील कलाकारांना 700 रुपये आणि जिल्हा स्तरावरील कलाकारांना 500 रुपये इतके मानधन देण्यात येते. यावर्षी मानधनाची ही रक्कम दुप्पट करण्यात आलेली आहे. या राज्यात आता पर्यंत सुमारे 21000 कलाकराना दरमहा अनुदान देण्यात येत आहे.

सभापती महोदय, श्री. प्रकाश शेंडगे यांनी पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर चित्रपट निर्माण करावा अशा प्रकारची सूचना केलेली आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विदर्भातील श्री. देशमुख यांनी त्यांच्या मतदारसंघातील केश कापणारे, अमुक करणारे, तमूक करणारे अशा कलाकारांना मानधन दिले होत. त्याबाबतीत कारवाई करण्याची घोषणा या सदनामध्ये करण्यात आली होती, त्याबबातीत काय कारवाई झाली? माननीय मंत्रिमहोदय, कलाकारांना मानधन दिल्याचे या ठिकाणी सांगत आहत तसे त्या कारवाईचे काय झाले ते सांगावे.

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, यासंदर्भातील माहिती घेऊन मी आपल्याला कळवितो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश वरपुडकर .....

आता आपण स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्यावरील चित्रपट निर्माण करण्यासाठी प्रतिष्ठानला 3 कोटी रुपये दिलेले आहेत. चित्रपट निर्मितीच्या संदर्भात जे थोर राष्ट्रपुरुष आहेत, जे समाजसुधारक आहेत त्यांच्या जीवनावर चित्रपट काढण्याच्या संदर्भात शासनाकडून 50 लाख रुपये टप्प्याटप्प्याने देत असतो. परंतु जे राष्ट्रपुरुष आहेत, थोर पुरुष आहेत, समाज सुधारक आहेत त्यांच्या जीवनावर चित्रपट काढावयाचा असेल तर त्यासंदर्भात मंत्री पातळीवर एक समिती आहे. त्या समितीची जर आपण मान्यता घेतली तर आपल्याला हे 50 लाख रुपये मिळू शकतात. त्यामुळे यासंदर्भात जे कोणी असतील त्यांनी निश्चित स्वरुपात अर्ज करावा.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याच्या संदर्भात उपस्थित केला होता. सन्माननीय सदस्यांचे वडील आणि माजी मंत्री श्री. शिवाजीराव शेंडगे यांनी चर्चगेट येथील चौकाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव दिले होते आणि त्या चौकामध्ये अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा उभारण्याच्या संदर्भामध्ये कार्यवाही सुध्दा त्या काळात सुरु झालेली होती. हा विषय जरी माझ्या खात्याकडे नसला तरी मी यासंदर्भात माहिती घेतलेली आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा पुतळा बसविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने आपल्याकडील प्रधान सचिवांना परवानगी मागितली होती. आयुक्तांनी ती परवानगी मागितली होती परंतु ती परवानगी मिळाली नाही. ती देण्यासाठी आम्ही निश्चित स्वरुपात प्रयत्न करु. ती परवानगी न मिळाल्यामुळे...

श्री. प्रकाश शेंडगे : बांधकामाला परवानगी दिली. प्लॅन मंजूर केला. सगळे केल्यानंतर ते बांधकाम का पाडले ? मी बांधकाम केलेले नाही. महानगरपालिकेने बांधकाम केले. मी फक्त माझा आमदार निधी दिला.

श्री. सुरेश वरपुडकर : ही जागा भुयारी मार्गाच्या संदर्भात आहे. शासनाची परवानगी मिळण्यास हरकत नाही असे हेरिटेज डिपार्टमेंटला सांगितले आहे. परंतु त्यानुसार नगरपालिकेने प्रधान सचिव, नगरविकास यांच्याकडे परवानगी मागितली होती ती अद्याप मिळाली नव्हती एवढेच त्यावेळी सांगितले होते परंतु पूर्वीच्या शासनाने नियम 37 खाली परवानगी दिली होती आणि विशेष निधीतून याला 20 लाख रुपये सुध्दा दिलेले होते व या स्मारकाचे काम जवळपास 80 टक्के पूर्ण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश वरपुडकर .....

झालेले होते. परंतु या कामाच्या संदर्भात हायकोर्टाने सुध्दा एक हरकत घेतली होती अशा प्रकारची माहिती आपल्याला मिळाली परंतु माझे असे म्हणणे आहे की, माझ्याकडे जरी हे खाते नसले तरी मी या सर्व प्रकरणाच्या बाबतीत त्या खात्याला कळवीन आणि आपल्याला इत्यंभूत माहिती दिली जाईल आणि नेमके काय झाले हे आपल्याला सांगितले जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सोमवारी पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे. त्यावेळी संबंधित खात्याच्या माननीय मंत्रिमहोदयांना या पुरवणी मागणीच्या संदर्भामध्ये योग्य ती माहिती सभागृहासमोर ठेवावी. अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकासंबंधीचा विषय आहे. त्यावेळच्या सन्माननीय मंत्रिमहोदयांनी हे सर्व सुरु केलेले आहे आणि हे सर्व त्यांच्या मुलापर्यंत आणि भांडणापर्यंत येते हे बरोबर वाटत नाही. हा सामाजिक विषय आहे.

श्री. सुरेश वरपुडकर : आपल्या मताशी सभागृह सहमत आहे. त्यामुळे त्या खात्याकडे चौकशी करुन निश्चित माहिती घेऊन सभागृहाला देण्याचा प्रयत्न करु. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत तसेच सन्माननीय सदस्य राजन तेली यांनी शिवाजी महाराजांच्या संदर्भात, सिंधुदुर्गच्या संदर्भामध्ये, किल्ले जंजिराच्या संदर्भामध्ये प्रश्न उपस्थित केला. या ठिकाणी खात्यामध्ये मोठ्या प्रमाणावर तरतूद केलेली आहे. परंतु त्या किल्ल्याच्या संदर्भातील माहिती असली पाहिजे यादृष्टीने फलक लावण्याच्या संदर्भात आपली सूचना अत्यंत चांगल्या प्रकारची आहे. तीसूचना निश्चितपणे खात्याला कळविली जाईल आणि अशा प्रकारची तरतूद या ठिकाणी केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : यासंदर्भात एक गोष्ट वारंवार घडत आहे आणि ती क्लेश देणारी आहे. रायगडावर शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर छत्री उभारावी याकरिता सतत आंदोलन होते. शासन सांगते की, आम्ही ते करु आणि प्रत्येक वर्षी ते जातात आणि छत्री धरतात. ती छत्री काढा म्हटले तर आम्ही काढणार नाही असे सांगतात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

परवा मेघडंबरीतील पुतळयावर अभिषेक करण्यात आला. त्यामुळे तेथे मोठी विचित्र अवस्था निर्माण झाली. मागील वर्षी श्री.संभाजीराजे यांना असे सांगितले होते की, आम्ही योग्य ती परवानगी घेऊन मेघडंबरीमध्ये पुतळा बसवू. त्यामुळे श्री.संभाजीराजे यांनी आंदोलन मागे घेतले होते. यावर्षी पुन्हा श्री.संभाजीराजेंच्या नेतृत्वाखाली जनसमुदाय तेथे गेला, छत्रपतींच्या पुतळयावर अभिषेक झाला. त्यासंबंधी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना सांगावे लागले की, शासन तो पुतळा हलविणार नाही. परंतु पुरातत्व विभागाची त्यासाठी परवानगी घ्यावी लागते. मला हे कळले नाही की, महाड मतदार संघाचे आमदार श्री.माणिकराव जगताप हे आमच्या सारखे सदस्यच आहेत. त्यांनी तेथे असे सांगितले की, हा पुतळा अजिबात हलविला जाणार नाही, शासनाचे तसे आदेश आहेत. हे कोण सांगणारे ? शासनाच्यावतीने बोलण्याचा त्यांना काय अधिकार आहे, पुराणवस्तू विभागाचा त्यांच्याकडे अधिकार आहे काय? सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी मात्र असे सांगितले की, त्यासंबंधीचा खुलासा आज करु नये, हा भावनात्मक विषय आहे, सर्व शिवप्रेमींचा विषय आहे. आदरणीय श्री.उद्धवजी ठाकरे यांनीही सांगितले होते की, शासनाने जर ती छत्री उभी केली नाही तर आम्ही ती उभी करु. महाराजांच्या सगळयाच गोष्टींसाठी राज्यात आंदोलन करावे लागणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी हे अधिवेशन संपण्यापूर्वी संपूर्ण महाराष्ट्राला यासंबंधी ज्ञात करुन दिले तर बरे होईल. तेथे जो पुतळा आहे तो ठेवला जाईल का, योग्य पुतळा बसविला जाईल असा शब्द त्यांनी वापरला आहे त्याप्रमाणे योग्य पुतळा बसविला जाणार आहे का आणि त्यासाठी परवानगी कधी घेणार आहे ते जाहीर करावे अशी मी विनंती करतो.

श्री.सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, कृषी विभागासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी बाब क्रमांक 27 वर विचार मांडले आहेत. राष्ट्रीय कृषी विमा योजनेच्या संदर्भात त्यांनी माहिती दिली आहे. त्यांनी त्यासाठी या वर्षी चांगल्या प्रकारची तरतूद केली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये त्यासाठी जेवढा हप्ता भरला जातो ती रक्कम सोडून उर्वरित रक्कम द्यायची असते, त्यापैकी अर्धी रक्कम केंद्र सरकारची असते आणि अर्धी राज्य सरकारची असते. यावर्षी राज्य सरकारने त्याची तरतूद पूर्णपणे केलेली आहे. म्हणून सांस्कृतिक विभागाच्या, रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या, कृषी विभागाच्या व माजी सैनिक कल्याण विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 81, 82 व 86 संबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. विशेष करुन सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी अभ्यासक्रमाबाबत बोलत असताना एमसीआरटीसंबंधी उल्लेख केला. आपले आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भातील त्याचबरोबर हेगडेवार आणि पं.मदन मोहन मालवीय यांच्या संदर्भातील मुद्दा मांडला होता. या अभ्यासक्रमात सातत्याने बदल करण्याची मागणी होत आहे. म्हणून राज्य सरकार एक उच्चस्तरीय समिती स्थापन करीत आहे. मूळात अभ्यासक्रम तयार करणाऱ्यांमध्ये सातत्याने तेच लोक दिसत आहेत. त्याबाबत शासन आढावा घेत आहे. केंद्र सरकारचा एमसीआरटीच्या माध्यमातून अभ्यासक्रम येत आहे. कन्करन्स लिस्टच्या अनुषंगाने राज्य सरकारला अधिकार आहे. उद्या याविषयी त्यांचे म्हणणे असेल तर राज्याची अस्मिता लक्षात घेता अभ्यासक्रमासंबंधी एक नीटपणे मार्गदर्शक तत्वे तयार करणे आवश्यक आहे. कारण दैवतांबाबत जे लिखाण केले जाते त्यातून नव्याने भानगडी निर्माण होऊ नयेत अशी शासनाची धारणा आहे. पुस्तकांमधून त्यांचे लिखाण काढून टाकण्याचा मुद्दा नाही तर राज्य सरकारच्या अस्मितेचा प्रश्न निर्माण होतो, त्यामुळे सरकारला त्यासंबंधी गांभीर्याने भूमिका स्वीकारावी लागेल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....)

अशा प्रकारच्या चुका पुन्हा होणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल असे मी सदनाला आश्वासित करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी इयत्ता आठवीच्या पुस्तकातील पंडित मदन मोहन मालविय यांचा फोटो काढण्याचे कारण काय ? त्याची चौकशी करणार की नाही ? अशी विचारणा केली. याबाबतीत चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत. वर्षानुवर्षे ठराविक लोकांची मक्तेदारी अभ्यास मंडळावर का झालेली आहे हे देखील पाहिले जाईल. एक सक्षम असा अभ्यासक्रम आपण तयार करीत आहोत. अभ्यासक्रमाचा दर्जा वाढविण्याच्या संदर्भात या ठिकाणी सातत्याने चर्चा होत असते. सन्माननीय सदस्यांच्या सूचना लक्षात घेऊन ॲग्रीकल्चर टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेण्ट म्हणजे कृषी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन या अभ्यासक्रमाचा देखील शालेय अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्याचे शासनाने ठरविलेले आहे. मात्र या अभ्यासक्रमाची विद्यार्थ्यांना सक्ती असणार नाही. या अभ्यासक्रमाचा समावेश शालेय अभ्यासक्रमामध्ये पुढील वर्षापासून करण्याच्या संदर्भात शासन पावले उचलीत आहे.

विनाअनुदानित शाळांच्या बाबतीत प्रस्ताव तयार केलेला असून तो अंतिम टप्प्यात आहे. त्याबाबतीत निर्णय होईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी सर्वशिक्षा अभियानाच्या संदर्भात काही मुद्दे मांडले. ही योजना राज्यामध्ये गेल्या 8-9 वर्षापासून सुरु आहे. या योजनेची फलनिष्पत्ती काय आहे याची चौकशी एनजीओ मार्फत किंवा एखाद्या इव्हॅल्यूएशन समिती मार्फत करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील. यामुळे या योजनेतील भ्रष्टाचाराच्या तक्रारी बाबत किंवा त्रुटीबाबत शासनाला मार्गदर्शन होईल. सनमाननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यानी विनाअनुदानित शाळांचा प्रश्न मांडला. अधिवेशन संपण्यापूर्वी त्या संदर्भातील निर्णय होईल. सोमवारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर हा विषय आणण्याच्या दृष्टीने आमची कार्यवाही सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना मी सांगू इच्छितो की, राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याच्या संदर्भात सर्वपक्षीय समिती स्थापन केलेली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा संपूर्ण इतिहास शालेय अभ्यासक्रमामध्ये आणण्याच्या संदर्भात निर्णय घेतलेला आहे. काही सन्माननीय सदस्यांनी सहावा वेतन आयोग लागू करण्याच्या संदर्भात विचारणा केली. राज्य शासनाने आदेश काढून हा वेतन ओयाग सर्वांना लागू केलेला आहे. वेबसाईटवर देखील या संदर्भातील माहिती उपलब्ध झालेली आहे. या चर्चेच्या माध्यमातून ज्या काही अन्य सूचना सन्माननीय सदस्यांनी





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राधाकृष्ण विखे-पाटील...)

केलेल्या आहेत त्याचाही शासन निश्चितपणे विचार करील. तेव्हा शालेय शिक्षण विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्रमांक 232, 233, 234, 235,236, 237 आणि 241 व 242 यावर सन्माननीय सदस्यांनी चर्चा केली. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हण यांनी महामंडळांना भागभांडवल वाढवून देण्याच्या संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे अशी विचारणा केली. मी त्यांना सांगू इच्छितो की, सन 2009-2010 या वर्षाकरिता मोठ्या प्रमाणात भागभांडवल देण्याचे प्रस्तावित केलेले आहे. आणखी भागभांडवल देण्याच्या संदर्भातही विचार केला जाईल. महामंडळाच्या कर्जमाफीच्या संदर्भातील डिटेल माहिती तीन महिन्याच्या आत द्यावी असेही त्यांनी सांगितले.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे...

ती निश्चितपणे दिली जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विचारणा केली की, या महामंडळाचे कर्ज माफ केल्यानंतर किती उद्योजक तयार झाले ? यासंदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ही सगळी महामंडळे मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी शासनाने निर्माण केली आहेत. महात्मा फुले मागावर्गीय विकास महामंडळ 1978 या वर्षी सुरु झाले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ 1985 या वर्षी सुरु झाले. संत रोहिदास चर्मकार विकास महामंडळ 1974 या वर्षी सुरु झाले. कै.वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ 1984 या वर्षी सुरु झाले. या महामंडळाची ज्यावेळेस स्थापना झाली, त्यावेळेस अत्यंत नगण्य बीज भांडवल, लाभांश होते. कोणाला 2 हजार, कोणाला 5 हजार रुपये कर्ज दिले गेले होते. सदर कर्ज हे भाजी विकणे, कपडा विकणे अशा लहान व्यवसायासाठी मागासवर्गीय लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करुन दिले होते. त्यावेळी कर्जाला लिमिट घालून देण्यात आले होते. परंतु आता लिमिट वाढवून देण्याचा आम्ही विचार करीत आहोत. एन.एस.एफ.डी.सी.चे कर्जाचे लिमिट 5 लाखापर्यंत होते, ते वाढवून देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. मोठया प्रमाणात उद्योजक निर्माण करण्यासाठी आपल्या सगळयांच्या सहकार्याने आम्ही प्रयत्न करु.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, भूमिहिनांना जमिनी देण्याच्या बाबतीत शासनाने वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत. भूमिहिनांनाच जमिनी दिल्या पाहिजेत. भूमिहिनांना जमिनी मिळवून देण्यासंदर्भातील आंदोलनात त्या सहभागी होत्या. भूमिहिनांना न्याय मिळाला पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. 40-50 भूमिहिनांना जमिनी मिळाल्या होत्या असे त्या म्हणाल्या. मी आपणास सांगू इच्छितो की, माझ्या टेन्युअरमध्ये जवळ जवळ साडेतीन ते चार वर्षामध्ये आतापर्यंत 14 हजार एकर जमीन शासनाने खरेदी केली. त्यापैकी 11 हजार 173 एकर जमिनीचे भूमिहिनांना वाटप केले आहे, उर्वरित जमिनी वाटपाचे काम प्रोसेसमध्ये आहे. त्यासाठी 61 कोटी 45 लाख खर्च आला. 2009-10 या वर्षात 21 कोटी रुपयांची तरतूद नवीन जमिनी खरेदी करण्याचे आम्ही प्रस्तावित केले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी अशासकीय आश्रमशाळांना सुविधा देणे याबाबतील मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे. कायम विना अनुदानित शाळांचा

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडारे...

'कायम' हा शब्द वगळावा असाही त्यांनी उल्लेख केला. शासकीय अनुदानित शाळांसाठी सुविधा देण्याचा शासनाचा प्रयत्न राहिलेला आहे. त्यासाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कायम विना अनुदान तत्वावर असणा-या केंद्रीय आश्रमशाळांबाबत आम्ही फक्त शिफारस करीत असतो. केंद्र सरकार आणि संस्था यांच्यामधील तो विषय आहे. या केंद्राना सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात केंद्र शासनाला निश्चितपणे आम्ही शिफारस करु. सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले की, नवी मुंबई येथे मुलीं करिता वसतिगृहे बांधावीत. महाराष्ट्रात 152 वसतिगृहे बांधण्याचे काम सुरु झालेले आहे. नवी मुंबईत सुध्दा मुलींसाठी वसतिगृह बांधण्याचे काम हाती घेत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय श्री. रमेश शेंडगे आणि श्री. प्रकाश शेंडगे या दोन्ही बंधुनी विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या संदर्भात अतिशय चांगले मुद्दे सभागृहात मांडले आहेत. मी आपणास सांगू इच्छितो की, त्या दोघा बंधुचे मुद्दे रास्त आहेत. सामाजिक न्याय विभाग जरी एकत्रित असला तरी विभागांचे मंत्री वेगवेगळे आहेत. विमुक्त जाती व भटक्या जमाती हा विभाग माननीय श्री.सुरुपसिंग नाईक यांच्या अखत्यारित आहे. आपल्या भावना, आपल्या सूचना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी निश्चितपणे माझा प्रयत्न राहील. श्रीमती फौजिया खान यांनी सुध्दा एस.बी.सी.प्रवर्गासाठी वसतिगृहे बांधावित असा मुद्दा मांडला आहे. ही बाब सुध्दा विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागाचे मंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. सामाजिक न्याय विभागाच्या बाबतीत चांगल्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत. त्या सूचनांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. मी मघाशी सुतोवाच केले त्याप्रमाणे माझ्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक 232, 233, 234, 238, 239,240, 241 सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

----------

यानंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ प्रथम श्री.रोझेकर..... 19:45

श्री.गणेश नाईक ( पर्यावरण व राज्य शुल्क उत्पादन मंत्री ): सभापती महोदय, पर्यावरण व राज्य उत्पादन शुल्क या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, अरविंद सावंत यांनी आपल्या सूचना मांडल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे यांनी धरणाच्या कामाच्या संदर्भातील पुनर्वसनाचे काम झालेले नाही, असा मुद्दा उपस्थित केला आहे. पुनर्वसनाच्या कामाच्या अनुषंगाने पुनर्वसन विभागाला कळविले जाईल. तसेच, पुनर्वसनाच्या कामाची पुर्तता होण्याच्या दृष्टीने लक्ष दिले जाईल. त्याचप्रमाणे त्यांनी अशीही मागणी केली आहे की, कॅचमेंट एरियामधील जी झाडे नष्ट झाली आहेत, त्याची भरपाई करण्यासाठी झाडांची पुर्नलागवड करण्यात यावी आणि पर्यावरणाचे संतुलन राखले जावे. यादृष्टीनेही प्रयत्न केले जातील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी लोह खनिजाच्या अनुषंगाने खाणींना परवानगी देत असतांना पब्लिक नोटीस काढली जात नाही, नागरिकांचा विचार न घेता खाणी सुरु राहतात, असा मुद्दा उपस्थित केला आहे. तेथील नागरिकांचा कौल विरुध्द असतांना खाणी कशा चालू झाल्या, याबद्दल मी माहिती घेतो आणि ही माहिती मी सभागृहाला व सन्माननीय सदस्यांना देईन. तसेच, ज्या ठिकाणी जनसामान्यांनी विरोध केला असेल आणि अशा ठिकाणी खाणी सुरु असतील तर त्या बंद केल्या जातील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे काम अधिक जबाबदारीने झाले पाहिजे, अशी सूचना केली आहे. याबाबतही शासन सतर्क आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून राज्य शासनाने घोषित केला आहे. त्या ठिकाणी पर्यावरणाचा समतोल राखण्याचे काम करावे. पर्यावरणाला हानी पोहोचेल, असे उद्योग येऊ नयेत, अशी माझी सूचना होती.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, अनेक वेळा विरोध करुनही जनसुनावणी आयोजित करण्यात आली नाही, असे मला म्हणावयाचे आहे.

...2......

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जनसुनावणीमध्ये लोकांनी विरोध करुनही खाणी चालू ठेवण्याचे काय प्रयोजन आहे, कोणत्या कारणाने त्या चालू ठेवल्या आहेत, याची मी तपासणी करतो आणि जनसामान्यांना त्रास होत असेल तर खाणी बंद करण्याचे आदेश पर्यावरण विभागाला दिले जातील.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याबद्दल मला आनंद वाटतो. सभागृहाला विनंती करीन की, पर्यावरण व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी.

**तालिका सभापती (श्री.हेमंत टकले)** : सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभागृहापुढील कामकाज आता संपले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार दिनांक 15 जून, 2009 रोजी सकाळी 10 वाजता पुन: भरेल. सकाळी 10 ते 11.58 वाजेपर्यन्त विशेष बैठक होईल. या बैठकीत शासकीय विधेयके घेण्यात येतील. त्यानंतर दुपारी 12 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सांयकाळी 7 वाजून 48 मिनिटांनी सोमवार, दिनांक 15 जून, 2009 रोजीच्या सकाळी 10 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही